॥ श्री जटाजूटः शरणम् ॥

# श्री अन्नपूर्णा स्तोत्रम्

## श्लोक १ ला

नित्यानंदकरी वराभयकरी सौंदर्यरत्नाकरी।
निर्धूताखिल घोरपावनकरी प्रत्यक्षमाहेश्वरी॥
प्रालेयाचल वंशपावनकरी काशीपुराधीश्वरी।
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी॥ १॥

सकाळच्या प्रहरीं ब्रह्ममुहूर्तावर श्रीमद्शंकराचार्यांना काय वाटलं असेल कुणास ठाऊक! त्यांनीं स्वतःकरितां भिक्षा मागितली असेल का आपल्याकरिता मागितली असेल तें सांगूं शकत नाहीं. परंतु त्यांनीं भगवतीचा दरवाजा ठोठावला आहे.

देवाला ओळखण्या करितां देवाच्या कृपेची जरूरी आहे. थोडयाफार मेहनतीनंतर ईश्वरीकृपा पाहिजे; प्रभुकृपेशिवाय प्रेमाचा झरा मिळत नाहीं, म्हणून भगवतीजवळ ज्ञानाची आणि प्रेमाची भिक्षा मागायची असते.

जीव पुष्कळ मेहनत करून जीवन–विकास करून, विचार करतो कीं. परिपूर्ण ज्ञान मिळालें का? मला अंतःकरणांत प्रभुप्रेमाचा झरा गवसला का? तेव्हां वाटतं कीं प्रभुकृपेशिवाय हें साध्य होणार नाहीं. तर मग आतां काय करावं! भीक मागावी! भीक मागावयाची असेल तर ती देवाजवळ माग. दुसऱ्या कुणाजवळ मागूं नकोस, कारण देव निश्चित देईल

देवा! मला प्रेमाची आणि ज्ञानाची भिक्षा घाल. ही भिक्षा सामान्य नाहीं, ही भिक्षा प्रेमाची आहे. आपणाला क्षुद्र वस्तूंची आसक्ति (attachment) आहे, ओढ आहे; त्यालाच आपण प्रेम म्हणतो. पण हा मोह आहे. खरोखर प्रेम हें आत्मिक प्रेम, आत्मिक प्रसन्नता, अंतरात्म्याचा निर्मळ झरा आहे. असें प्रेम भगवतीजवळच मागावें. तसंच सकल ब्रह्मांडाला समजण्याची आपणाजवळ शक्ति नाहीं, बुध्दि नाहीं, ज्ञान नाहीं, म्हणूनच ज्ञानाची भिक्षा भगवतीजवळ मागावयाची. भगवतीजवळ मागण्याचा शंकराचार्यांना अधिकार आहे. आत्मिक प्रेमाचा झरा सतत वहावा आणि हे मातोश्री!

पाहून कुन्तीमाता पण पहायला आली. चौकशी करतां आढळून झालें लाडू सर्व संपले आणि वाढायला लाडू नाहींत. म्हणून कुन्तीमातेनें व कोण जेवत आहे तिकडे जरा पाहिलें. व आंत गेली आणि लाडवांचा चुरा होता त्याचे लहान लहान पांच लाडू बनविले आणि वाढणाऱ्याला ते लाडू वाढायला सांगितले. पण वाढपी ते लहान लाडू वाढायला तयार झाले नाहीं. त्याला वाटलें कीं. हे लाडू पाहून तो भोजनकेसरी रागवेल, म्हणून तो तयार होईना परंतु कुन्तीमातेच्या आज्ञेवरून त्याला जावेंच लागलें, भीत भीत वाढप्यानें ते लाडू ब्राह्मणाला वाढले. ब्राह्मण मनांत समजला कीं. हे लाडू आपल्या आईनेंच मुद्दाम पाठविले आहेत. ते लाडू खातांच भीमाचें पोट भरलें. इतक्या जणानीं पुष्कळ वाढलें पण कुन्तीमातेच्या हातच्या लाडवांनीं भीमाचें समाधान तावडतोब झालें.

त्याप्रमाणें जगदंबे! सर्व जगांतील लोकांनी जरी कितीही दिलें तरी तुझ्या हातच्या एक मुठी धान्यानें आम्हाला संतुष्ट कर. ज्यांना तुझ्या हातचें मिळालें त्यांची धावपळ बंद झाली. त्यांना शान्ति मिळते. समाधान मिळतें. म्हणूनच ज्या श्रीमदाद्य शंकराचार्यांनीं जगत असत्य ठरविलें ते शंकराचार्य आसक्तिनें तुला हांक मारून सांगतात कीं. जगदंबे! तुजवरून एक मूठभर धान्य जोपर्यंत मिळालें नाहीं तोंपर्यंत मी संतोषी नाहीं. पुष्कळ खाल्लें पण आईच्या हातचें अन्न मिळालें तरच कृतकृत्य होईन. आईच्या हातचा ज्ञानाचा, प्रेमाचा घास मिळेल तरच मनांत कृतकृत्यता येईल.

पुन:पुन्हा हाक मारून म्हणतात कीं, आई! तूं कशी आहेस? **नित्यानंदकरी.** आई तूं सर्वांना आनंद देणारी आहेस नित्यानंदकरी म्हणजे नित्य आनंद देणारी. कोठल्याही स्थितींत मी राहीन, तूं ज्ञानी माणसाला ज्या प्रकारचा आनंद देतेस त्याच प्रकारचा भोगी माणसाला आणि त्याच प्रकारचा आध्यात्मिक माणसाला पण आनंद देतेस. क्षुद्र माणसाला पण त्याचप्रकारचा आनंद! सर्व आनंदांत तूं आहेस. आणि म्हणूनच तुला नित्यानंदकरी म्हटलें आहे.

दोन प्रकारचा आनंद ह्या अशा जगात आहे. एक जग आहे, व दुसरें ब्रह्म आहे. दार्शनिक विचारानें जर चिन्तन कराल तर जड आणि

या कृपेनें जीवन कृतकृत्य बनविण्यासाठीं साधना करून आजपर्यंत जें हीं केलें त्याला तूं ज्ञानाची आणि प्रेमाची भिक्षा घालून पूर्ण कर. श्रेष्ठ प्रयेला गेलेला जीव पण ज्याला कशाचीच अपेक्षा नाहीं तो जीव केवळ अन्नरूपी प्रेमाची आणि ज्ञानाची मागणी करीत आहे.

लहानपणीं ऐकलेली एक गोष्ट मला आठवते. भीमसेनाचें बळ र्योधनादिक कौरवांना सहन होत नव्हतें. या चांडाळचौकडीनें भीमसेनाला रायचा घाट केला. ठरविल्या प्रमाणें दुर्योधनानें गंगाकिनारीं सुंदर तंबू भा केला. तऱ्हेतऱ्हेचीं पक्वान्नें तयार केलीं. सगळी तयारी झाल्यावर ाडवांना गंगाकिनाऱ्यावर जलक्रीडेकरितां आमंत्रण पाठविलें. पांडव पण र झाले. आणि गंगा किनाऱ्यावर जलक्रीडेकरितां आले. कौरव-पांडवांनी कत्र जलक्रीडा केली. आणि त्यानंतर सर्व बंधू जेवायला बसले. दुष्ट दुर्योधन धुर गोष्टी करून भीमाला आग्रह करीत होता आणि भीमानें टाऊक सल्यामुळें वीष घातलेले लाडू खाल्ले. पहिली गोष्ट म्हणजे भीमसेन खूप लक्रीडा करून फार श्रमला होता. आणि वीष पोटांत गेल्यामुळें भीमावर ोडा विषाचा अमल पण चढत होता. तो बेसावध होतांच दुर्योधनानें नरपतीनें बांधून गंगेच्या प्रवाहांत भीमसेनाला ढकलून दिला.

इकडे भीमसेन बेसावध अवस्थेंत पाताळांत आला. तेथें त्याला वासुकीजवळ नेण्यांत आलें. नागराज वासुकीनें उपचार करून सर्व वीष उतरविलें. नागलोकांच्या मदतीने भीम हस्तीनापुरीं परत आला. तेव्हां पुष्कळ ब्राह्मण हस्तिनापुरांत येत होते. चौकशीअंतीं बातमी समजली कीं, ते सर्व भीमसेनाच्या बाराव्या दिवशीं जेवावयालाच जात आहेत. भीमसेनाचा पट्टेखोर स्वभाव म्हणून त्याला थट्टा करण्याची इच्छा झाली. इतके दिवस पाताळांत राहिल्यामुळें भीमाला कोणी ओळखलें पण नाहीं. ब्राह्मणाच्या बरोबर भीमसेन पण जेवावयास बसला. 'नमः पार्वतीपते हरहर महादेव' बोलून जेवावयास सुरुवात झाली. भोजनांतर्सरी भीमानें लाडवांवर हात मारला. लाडू वाढणारा भीमापासून पुढें जाऊंच शकेना. सर्व विचारांत पडले कीं, हा ब्राह्मण आहे तरी कोण ? परंतु भीमाची आतां कुठें सुरुवात होत होती!

सर्वांचीं जेवणें झालीं पण उठायचें कसें ? कारण भीम लाडू वाढायला येतील त्याची वाट पहात होता. स्वयंपाक घरांत धावपळ सुरू झाली. तें

(आई!) तुझ्याजवळ अशा करितां भिक्षा मागतों, की तू कृपापूर्ण दर्शनें जीवनाला आधार देणारी आहेस. माणसाला आधार पुष्कळ प्रकारचा मिळतो. क्षुद्रस्वार्थानीं माणसाला आधार मिळतो पण जगदंबे! तूं मला आधार देतेस तो क्षुद्र स्वार्थाकरितां नाहीं. क्षुद्र स्वार्थी मनुष्य स्वत:ला आधार पाहिजे म्हणून दुसऱ्याला आधार देतो. स्वत:च्या स्वार्थाकरितां दुसऱ्याला आधार देतो. पण आई! तूं मला आधार देतेस तो क्षुद्र स्वार्थाकरितां नाहीं.

स्वार्थी आधार देतो त्याप्रमाणें कित्येक आधार देतात. पण ते दुसऱ्यांना दुबळे करून आधार देतात. परंतु भगवती! तूं दुसऱ्यांना दुबळे करून आधार देणार नाहींस.

भगवती! जेव्हां साधक जीवनाला सुरुवात झाली तेव्हांपासूनच तुझा आधार होता, तर्कच नव्हे तर मी भोगवादी होतों तेव्हां पण तुझा आधार होता.

भोगप्रधान जीवनाला तूंच आधार देतेस, भक्तिप्रधान जीवनाला तूंच आधार देतेस आणि आध्यात्मप्रधान जीवनाला पण तुझाच आधार आहे!

आई! तूं पूर्ण अन्नेश्वरी आहेस. ह्या शरीराला किती प्रकारचें अन्न पाहिजे तें मला माहित नाहीं. आपल्याला दुपारी भाकरी मिळाली कीं काम झालें; पण असें नाहीं. ज्याप्रमाणें शरीराचें अन्न, त्याचप्रमाणें भावनेचें अन्न, बुद्धीचें अन्न, आत्म्याचें अन्न मिळून पूर्ण जीवनाला उपयोगी अन्न तूं देतेस. ह्या चारी प्रकारच्या अन्नाची अत्यंत आवश्यकता आहे. आई! तूं पूर्ण अन्न देणारी आहेस. भावनेला अन्न तूंच वाढतेस. बुद्धीला अन्न तूंच देतेस. आत्म्याला अन्न तूंच देतेस.–शरीराला अन्न तुझ्याच शक्तीनें मिळतें. म्हणूनच पूर्ण जीवनाला आवश्यक अन्न वाढणारी तू पूर्ण आहेस. आणि म्हणूनच तूं अन्नपूर्णेश्वरी आहेस.

श्रीकृष्णभगवान पूर्ण आहे. माझ्या भोगजीवनाला तुझाच आधार. भक्ति-जीवनाला तूंच आधार. आध्यात्मिक जीवनाला पण तुझाच आधार. ह्या चारी प्रकारच्या जीवन–विकासाला अन्न देऊन पुष्ट करणारी तूंच आहेस. म्हणूनच ज्ञानाची आणि प्रेमाची भिक्षा घाल. त्यांनींच माझें जीवन सफल करूं दे! साधक बनून जन्मजन्मांतरीं मेहनत करून जीवन उच्च बनवलें. आता

चेतन आहे. Matter and spirit, आत्मा आहे आणि जड आहे. त्यामध्यें परमात्मा कोठून आला? शंकराचार्य म्हणतात कीं, एक भोगानंद आहे व दुसरा आत्मानंद आहे.

हे आई! भोगानंदांत राहून अनेक जन्म मी फुकट घालविले आहेत. भोगांकरितां किती तरी सत्कार्यें चालत आहेत. भोगानंदाचा कैफ असा आहे कीं, ऐंशी वर्षांचे म्हातारे पण त्यांतच मग्न आहेत. म्हाताऱ्या माणसाला दुसरा कांही आनंदच नाहीं. भोगानंदांत भोजनानंद आणि दुसरा विषयानंद. पण भगवती! माझी अवस्था जरा निराळी आहे.

वैचारिक जीवन उच्च झालें कीं, मग भोगानंदाची क्षुद्रता, क्षणभंगुरता लक्षांत येते. भोगानंदाबद्दल तिरस्कार वाटूं लागतो. तेव्हांच त्यांनीं दुसरा कुठला तरी आनंद मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुसरा कुठला आनंद? आत्मानंद! येथपर्यंत पोहोंचलेल्या जीवाची स्थिती जरा चमत्कारिक आहे. कारण भोगानंद सोडला तर दुसरा कोणता आनंद शोधला पाहिजे? भोगानंदांत पड-लेल्या जीवाला फार अडचण भासरी नाहीं. सामान्य जीव कर्मांच्या सिद्धांता प्रमाणे भोग भोगतो. तो सत्कर्म करतो आणि भोग भोगतो. पण ज्याला भोगानंद श्रेष्ठ वाटत नाहीं, उच्च वाटत नाहीं, अवर्णनीय लागत नाहीं त्याला दुसरा आनंद पाहिजे. पण भोगानंद जेव्हां क्षुद्र वाटायला लागतो तेव्हां दुसरा आनंद पाहिजे ही गोष्ट खरी पण आत्मानंद पकडण्याइतका जीव ज्ञानी नसेल तर त्या जीवाची कोणती स्थिति? त्या जीवानें काय करावें?

भोगानंदांत निमग्न राहायला मी क्षुद्र नाहीं आणि आत्मानंदांत बुडून जाण्याइतकें माझ्याजवळ ज्ञान नाहीं, म्हणून भगवती! तें निमरा आनंद निर्माण केला आहेस. सगुण-साकार मूर्तीमध्यें एकाग्र होण्याचा आनंद. भावानंद मिळावा, या करितां विशुद्ध ब्रह्म सगुण-साकार रूप घेऊन नाचेल. पण तें कोणाकरितां? निरंजन निराकार प्रभु साकार झाला तो कोणाकरितां? मला भावानंद मिळावा म्हणून विशुद्ध ब्रह्मानें सगुण-साकार रूप घेतलें. प्रत्येक व्यक्ति आनंद मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि कर्मानुसार मिळालेला आनंद भोगत आहे. पण भोगानंदात बुडण्याइतका जीव क्षुद्र

नाहीं व आत्मानंदांत पोहाण्याइतका ज्ञानी नाही. यांकरितां भगवान सगुण साकार रूप घेऊन आले आणि जीवनांत भावानंद आला. अशाप्रकारे भोगानंद–भावानंद–आत्मानंद देणारी तूं शक्तिमान आणि आनंदमूर्ति आहेस.

पत्नी पाहिजे, रागावण्याकरितां. पिता पाहिजे, रक्षण करण्याकरितां; संस्कार सिंचन करण्याकरितां. माता पाहिजे, पालन–पोषण करण्याकरितां. माझी माता पण तूंच, पिता पण तूंच आणि पुत्र पण तूंच आहेस. निर्गुण-निराकार ब्रह्म सगुण-साकार झालं आहे ते कांहीं जगत् चालविण्याकरिता नव्हे. जगत् चालविण्याकरितां सगुण-साकार होण्याची जरूरी नाहीं तर भगवान साधकाकरितां सगुण-साकार झाला, आणि म्हणूनच साधकाचे सर्वच आनंद ह्या परमेश्वरांत एकत्र झाले आहेत. जरी साधकाचा भोगानंद सुटला तरी घरांत लोक आनंदी दिसतात. ते बघून साधकाला आनंद होतो तो भोगानंदच. जो जीव विव्हळ आणि अगतिक झाला आहे त्याच्याकरितांच ईश्वर सगुण-साकार झाला; तो कांहीं कोणा येऱ्यागबाळ्यासाठीं नव्हे. भगवान सगुण-साकार झाला तो कोणाकरितां? ज्याला अशा प्रकारची उत्कंठा लागली असेल त्याच्याकरितां

नंतर आचार्य म्हणतात: **वराभयकरी**. वर म्हणजे वरदान आणि अभय म्हणजे निर्भयता. आई! तुला दोन हात कशाकरितां आहेत; तर तूं एका हातानं वरदान देतेस आणि दुसऱ्या हातानं अभय देतेस. स्तोत्र म्हणजे ईश्वराची अतिप्रेमानं केलेली स्तुति.

माझ्याजवळ जी संपत्ति आहे, वैभव आहे, जें जें कांहीं आहे ते सर्व आई! तुझें वरदान आहे. तं प्रत्येकालाच हें दान दिलें आहेस.

बुद्धिवादी मनुष्य म्हणतो कीं, माझ्या बुद्धीनेंच मी हें मिळविलें आहे. शास्त्रकार म्हणतात, तुझे दैव चांगले आहे म्हणून तुला मिळाले आहे. पण हे आई! माझा कांहीं माझ्या बुद्धीवर विश्वास नाहीं. कारण माझ्या बुद्धीनें पुष्कळ वेळां मला दगा दिला आहे आणि दैवानें जें मिळालें आहे तें मला पसंद नाहीं. ज्याला ज्याप्रमाणें बोलायचें असेल तें बोलो, पण हे मातोश्री! मला जें कांहीं मिळालें आहे तो सर्व तुझा कृपाप्रसाद आहे.

दुसऱ्या हातानें तू अभय देत आहेस. तुझ्याजवळ येतांना लाज वाटते. कारण मी पुष्कळ चुका केल्या आहेत. तरी सुद्धां, इतके होऊन सुद्धां तुझ्याजवळ येण्याचा प्रयत्न केला. पण मन तुझ्याजवळ येतच नाहीं. मनुष्य देह मला मिळाला आहे. त्याचें सार्थक केलें पाहिजे. पण जनावर आणि पशु–पक्षी यांच्या जीवनापेक्षां माझें जीवन उन्नत नाही पशुपक्षांच्यापेक्षां वेगळें जीवन जगण्याकरितां तू मला मनुष्य देह दिलास. पण मी कांहीं त्यांच्यापेक्षां उच्च जीवन जगूं शकलों नाहीं. म्हणून आई! आतां तुझ्याजवळ कसा येऊं? सर्व बुद्धि उदरभरणाकरितां वापरली आणि जीवन सर्व फुकट घालवलें. पण ह्यालाच लोक म्हणतात यशस्वी जीवन. जर फक्त पत्नी पुत्रांदिकांचे उदर भरणाकरितां जीवन संपलें असेल तर मनुष्यापेक्षां गाढव जन्म काय वाईट? माणूस पशुसारखें जीवन जगत आहे. अन्न आणि घर पशु पण मिळवतात, मनुष्यानें स्वःची कर्तृत्वशक्ति आणि इच्छाशक्ति एवढ्याकरितांच वापरायची असेल तर गाढव काय म्हणून कमी प्रतीचें? त्यासाठीं तूं बुद्धि दिलीस तें मी करीन. आई! तूं सर्व जीवन व्यवस्थित रहाण्याकरितां प्रयत्न करतेस पण जीव उलट वागतो. आई! तूं सर्व जग व्यवस्थित चालण्याकरितां प्रयत्न करतेस आणि मी सर्व नियम मोडून अव्यवस्थित होत आहे. म्हणून तुझ्याजवळ येण्याचें मला भय वाटतें. जेव्हां यमराज विचारील कीं, बोल: तूं काय काय मक्तूल्यें केलींस? तर काय उत्तर देऊं? इतकी मोठी बुद्धिशक्ति मी क्षुद्र कार्याकरितां फुकट घालविली म्हणून सांगूं? मी सर्व आयुष्य फुकट घालविलें म्हणून आई! मला तुझ्याकडे येतांना भीति वाटते.

पंडित कर्मकांडी आहेत. त्याना विचारलें तर ते काय उत्तर देतील? वकील, सॉलिसिटर सर्वच कर्मकांडी आहेत. कर्मकांडी मला समजतात कीं, भगवान कर्मफलदाता आहे. त्याप्रमाणें कर्म कराल त्याप्रमाणें फळ मिळेल. मीमांसा शास्त्र वाचाल तर समजेल की. ईश्वर पण तुमच्या कर्माच्यामध्यें पडत नाहीं. हें सत्य असेल पण तूं कर्मफलदाता आहेस. हे वाचून मला धक्का बसतो. शास्त्रकार सांगतात भगवान न्यायी आहे. हें वाचून तर मी भयाकुल झालों आहे. कारण न्यायी परमेश्वरा! तूं जर माझें जीवन पाहूं लागशील तर तें पूर्ण अन्यायी आहे!

भगवान कर्मफलदाता हें मला मान्य नाहीं. कारण मीं तुला 'आई' म्हटलं आहे. आई! जर मी तुला समजलें आहे तर तूं माझ्या बाबतींत प्रेमानें पाहाशील; संपूर्ण न्यायानें नाहीं. कारण मी तुझ्याजवळ माता-पुत्राचा संबंध ठेवला आहे. आई मुलाच्या बाबतींत नेहमींच पक्षपाती असते. जर मुलानें आरसा फोडला असेल आणि घरीं आल्यावर जर वडील मुलाला रागवले तर तो दोष ती आपल्याकडे घेईल. याप्रमाणें मी जीवनांत चुका केल्या आहेत. तुझ्याकडे बघायची माझी दृष्टि तूं कर्मफलदाता नाहींस आणि न्यायी पण नाहींस, अशी आहे. मी तुला 'आई' म्हणून हाक मारीन. यामुळं तुझं आपण मला अभय देईल खातां मी निश्चिंत आहे. तूं मला आई होऊन अभय दिलें आहेस.

कोणी म्हणतील तूं आई म्हणून हाक मारशील पण भगवती प्रसन्न होईल का! नक्कीच होईल. कारण कुठल्या वयस्क-प्रौढ स्त्रीला जर तुम्ही 'आई' किंवा 'आजी' म्हणून हाक माराल तर ती नक्की दोन मिनिटें उभी राहून तुमच्याशीं प्रेमानें बोलेल.

या जगाची अतिशय वृद्ध अशी आई तूं आहेस. म्हणून 'आई' म्हणून हाक मारतांच उभी राहशील. आणि आईचा संबंध जोडतांच तं मला अभय देशील.

हे आई! तूं दोन हातांनीं दिलें तरी मी संतुष्ट आहे. हजार हातांनीं ईश्वर देतो पण तो हजार हातांनीं नेतोही. म्हणून आई तूं हजार हातांची अशी विचित्र बनूं नकोस. जेव्हां अर्जुनानें श्रीकृष्णाचे विराटरूप पाहिलं तेव्हां अर्जुन म्हणाला की, भगवंन! तूं चार हातांचा, नेहमींचा हो. मला तर दोन हातांचा ईश्वर पाहिजे. कारण एका हातांन वरदान देणारी व दुसऱ्या हातानं अभय देणारी तूं मला फार आवडतेस.

**सौंदर्यरत्नाकरी:** हे आई! तू सौंदर्याची खाण आहेस. सृष्टि रमणीय वाटते. तर ती सृष्टि उत्पन्न करणारी किती सुंदर असेल! ही सर्व सृष्टि तूं घडविलीस असेंच नव्हे तर तूं निच्यांत अंशरूपानें राहात आहेस. जर ही सर्व सृष्टि मला रमणीय आणि आकर्षक वाटते तर त्या सृष्टीचा निर्माता किती सुंदर असेल! श्रावण मासांत बाहेर जाऊन बघा. जिथं बघाल तिथं

सौंदर्य. सुंदर मूर्ति बनवणारा शिल्पी कदाचित् सुंदर असणार नाहीं, कुरूपही असेल. परंतु आई! ही सारी सृष्टि तुझ्या हाताने बनलेली आहे इतकंच नव्हे तर तुझ्या अंशानं बनलेली आहे. म्हणून ती सुन्दर आहे.

शक्तिमान मनुष्य नेहमी चांगला वाटतो. नेहमींच शक्ति माणसाला आकर्षून घेते! आई! तुझी शक्ति आकर्षक आहे, सामर्थ्य-सुन्दर आहे. आणि अशा प्रकारे सौंदर्य तूं मनुष्यांत पण ओतलें आहेस. रूपसौंदर्य शक्ति-सौंदर्य, तिसरें बुद्धिसौंदर्य. आई! तुझ्याजवळ शक्तीच्या अनंत गोष्टी आहेत त्यामुळे मी आकर्षिला जात आहें. आई! तुझ्याजवळ बुद्धिसौंदर्य आहे. मानच्या पोटांत विलक्षण रचना आहेत. पोट जर उघडें केले तर नरदेह रचना ध्यानांत येईल. एक एक रचना पाहून खूप व्हावें! ग्रहांची रचना, वृक्षवनस्तींची रचना हें सर्व बघून तुझ्या बुद्धिसौंदर्यानं मी आश्चर्यचकित होत आहे.

वर्णन करतां येणार नाहीं असं तुझ्या गुणांचं सौंदर्य आहे. 'असित गिरिसमस्यात्कज्जलं ..... तदपि तव गुणानामीश पारं न याति।' अशाप्रकारें तुझ्याजवळ गुणसौंदर्य. बुद्धिसौंदर्य आणि रूपसौंदर्य आहे. तूं सौंदर्याची खाण आहेस. पण आई! एवढें सर्व समजायला माझ्याजवळ कल्पनाशक्ति आणि समजूत नाहीं. गुण समजण्याइतकं माझं गुण-सौंदर्य पण नाहीं. तुझे हें सर्व सौंदर्य पाहायला माझे डोळे निर्बल आहेत. म्हणून तुझीं सर्व प्रकारचीं सौंदर्यें मला निरुपयोगी आहेत. पण ह्या सर्वांपेक्षां तूं माझी आई आहेस म्हणून मला जास्त सुन्दर व प्रिय आहेस. आणि म्हणूनच तुझा आणि माझा संबंध अनिर्वचनीय आहे. लहान असतांना आई सर्वस्व वाटते. पण वयानें मोठें झाल्यावर वाटते की, आईपेक्षां आपल्याला जास्त समजतं. म्हणून लहान राहाण्यांतच मी समाधानी आहे. माझ्या आईला मी मोठीच समजेन. आई! तूं सकारण सुन्दर नाहीस तर तूं अकारण सुन्दर आहेस आणि म्हणूनच तुझे सौंदर्य अनिर्वचनीय आहे.

श्री जटाजूटः शरणम् ।

# श्री अन्नपूर्णा स्तोत्रम्

श्लोक १ ला व २ रा

नित्यानंदकरी वराभयकरी सौंदर्यरत्नाकरी।
निर्धूताखिलघोरपावनकरी प्रत्यक्षमाहेश्वरी॥
प्रालेयाचलवंशपावनकरी काशीपुराधीश्वरी।
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी॥१॥
नानारत्नविचित्रभूषणकरी हेमांबराडंबरी।
मुक्ताहारविलंबमानविलसद्वक्षोजकुंभांतरी॥
काश्मीरागुरुवासिता रुचिकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी॥२॥

[मागील अंकावरून चालू]

निर्धूताखिलघोरपावनकरीः— आई! माझ्या हातून अनेक पातकं झाली आहेत तीं नाहींशीं करून मला पवित्र कर लहान मुलं जशीं *अजाणतां धुळींत जातात तशींच माझ्या हातून अजानतां अनेक पापं झालेली* आहेत मी जाणूनबुजून नियमांचं उल्लंघन करीत नाही. आईचं नातं जोडल्यावर जे कांहीं दोष निर्माण होतील ते तूं साफ करणारच, पण अजाणतां मी जरी नियमांचं उल्लंघन केलं तरी शास्त्रकार स्पष्ट शब्दांत सांगतात कीं, **there is no forgiveness for a broken law** अजाणता जरी नियमांचे उल्लंघन झालं तरी त्याला क्षमा नाहीं) त्यावेळीं आई! तुझीच आठवण येते. ज्यावेळी शास्त्रकार न्यायकर्म याचे सिद्धांत समजावून सांगतात व अपराध्यानं शिक्षा भोगलीच पाहिजे असं सांगतात त्यावेळी आई! मी कोणाकडे जाऊं बरं! माझे दोष तूच नहीं का दूर करणार! तूंच आम्हांला पावन करतेस! तुझ वैशिष्ट्य तें हेंच तूंच वाल्या कोळ्याची पापं नाहींशी केलींस, पवित्र बनवलंस. त्यामुळेंच तर वाल्मीकि प्रातःस्मरणीय झाले! तूं वाल्याकोळ्याला सुधारलंस. त्याच्या जीवनाची दिशा बदललीस यांत विशेष

नाही, त्याची पातकेंही नाहींशीं केलींस यांतही विशेष नाहीं पण त्याला तूं पवित्र केलंस त्यांत गोडवा आहे. सर्व ऋषींमध्ये वाल्मीकीच्या नांवाची गोडी कांहीं वेगळी आहे.

कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम्।
आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम्॥

वाल्या कोळी पवित्र झाला. तुझ्या व इतरांच्या पापं नाहींशीं करण्यात भेद आहे. म्हणून पापं जर नाहीशी करायचीं असतील तर तीं आईच्या प्रेमानं धुतली पाहिजेत. त्या प्रेमानं पापं तर नाहीशी होतातच पण त्या व्यक्तीलाही पावित्र्याचा लाभ होतो. अशाच तऱ्हेनं कामलंपट तुळशीदासांना तूं पवित्र केलंस व भक्तही बनवलंस. आई! खरोखर तूं माझी घोर पातकंच नाहीशी करतेस एवढंच नव्हे तर मला पवित्रही करतेस.

कांहीं कांहीं वेळां ऋषि व संत यांचा भगवंतापेक्षांही जास्त सन्मान केला जातो. याच कारण तूं त्यांना पवित्र केलेलं आहेस. पवित्र्याला कांहीं वेगळाच अर्थ आहे, वेगळीच भावना आहे. स्वच्छता वेगळी व पावित्र्य वेगळं. एखादी व्यक्ति निष्पाप असेल म्हणून ती पवित्र असेलच असे खात्रीनं सांगतां येणार नाही. पवित्र व्यक्तीच्या संसर्गात दुसरा पवित्र होतो. ज्यामुळं दुसऱ्याचे मालिन्य दूर होतं त्याला पवित्र म्हणायचं. स्वच्छ माणसं पुष्कळ असतील पण ती पवित्र असतील कीं नाही याचीच शंका आहे. घोर पातकं करणाऱ्यांनाही तूं पवित्र करतेस हें तुझें वैशिष्ट्य आहे.

**प्रत्यक्षमाहेश्वरी...** आई! तू प्रत्यक्ष माहेश्वरी आहेस. तूं प्रत्यक्ष जगदीशच आहेस महेश्वराची तूं पत्नी आहेस म्हणून तूं माहेश्वरी आहेस असा याचा अर्थ नव्हे तर तूच जगदीश आहेस. तूं परप्रकाशित नसून स्वप्रकाशित आहेस तुला जगदीशामुळं सामर्थ्य प्राप्त झालेलं नाहीं कारण तूं महाऐश्वर्यशालिनी आहेस. पतीच्या ऐश्वर्यामुळं तूं ऐश्वर्यसंपन्न नव्हेस बिंब व प्रतिबिंब या दोहोंच्या शक्तींत फरक आहे. डॉक्टरच्या पत्नीला डॉक्टरीण म्हणतात पण तिला वैद्यकीय ज्ञान असतं असा त्याचा अर्थ नव्हे. आई तुझ्या बाबतीत अशा प्रकारची गोष्ट नाहीं. तू साक्षात् महान ऐश्वर्याची देवता आहेस पण मी जर ऐश्वर्यवान् असेन तरच तुला आई

म्हणून हाक मारण्याची माझ्यांत पात्रता आहे. आकाशात सतत बदलणारे रंग तुझ्या शक्तीमुळं बदलतात हें मला माहीत आहे. तूं पण माझ्यासारखी क्षुद्र आहेस असं समजून मी तुला 'आई' अशी हाक मारीत नाहीं. पण तूं जर माहेश्वरी असशील तर तुला 'माझी आई' अशी हाक योग्य नाहीं का? याला काय तूं माझं साहस म्हणणार? होय. पण आई! तूं माहेश्वरी आहेस असं समजून मी तुला 'आई' अशी हाक मारीत आहें. पण भगवती! अशी वस्तुस्थिति आहे कीं, मी तुझ्याकडे मागितलें किंवा रडलों तरी लोक मला मोटा मानतात लोक असंही म्हणतात. कीं, यानं दुसऱ्या कोणाजवळ याचना केली नाहीं फक्त भगवंताजवळच मागितलं असं लोक माझं कौतुक करतात.

आई! मी तुझ्याजवळ मागितलं तर लोक माझं कौतुक करतात पण आई! तुझ्याशीं मी नातं जोडूं लागलों तर लोक मला हंसतात. माझा उपहार करतात. तूं महान सामर्थ्यसंपन्न लावण्यवती आणि मी असमर्थ. मग तुझं माझं नातं जुळणार कसं? केवळ रुदन करून किंवा याचना करून माझं समाधान होणार नाहीं पण तुझं व माझं नातं जुळावं कसं बरं? तुझ्यासारख्या महान व्यक्तीशीं नातं जोडायला जावं तर लोक माझा उपहार करणार! मग मी करूं तरी काय?

भगवान पति व्हावा अशी इच्छा असेल तर पत्नी गुणसंपन्न व रूपसंपन्न असायला हवी. पण तीही गोष्ट शक्य नाहीं. मग मी कोणत्या प्रकारचं नातं जोडूं? ऋषि-मुनि लवकर कां उठतात? आकाशांत तारका असेपर्यंत ते उठत होते ही भावात्मक गोष्ट होय. 'उत्तमा तारकोपेता।' जंगलांत राहाणारे ऋषि लवकर उठत असत याचं कारण ते ज्यावेळीं भगवंताला 'आई' म्हणून हाक मारीत त्यावेळीं त्यांना कोणी पाहूं नये. ऋषींप्रमाणं मी पण तुला हाक मारण्यासाठीं लवकर उठतों पण मला लाज वाटते. एखाद्याजवळ एखादी वस्तु पाहिली कीं, मला वाटतं अशा प्रकारची वस्तु आपल्याला कशी मिळेल? अशास्थितींत मी तुझ्याशीं नातं कसं जोडणार? कोणी पाहिल या भीतीनं मी अगदीं घाबरून जातो. रात्रीं ज्यावेळीं सर्व जग झोपलेलं असतं. बाल्य वात्सल्याच्या, यौवन प्रणयाच्या आणि वार्धक्य वैराग्याच्या बाहुपाशांत विश्रान्ति घेत असतं त्यावेळीं मी उत्थित होतों व तुझ्याशीं नातं जोडण्यासाठी

तुला हाक मारतों. आपणाला कोणी पहात नाहीं ना किंवा कोणी आपलें ऐकत नाहीं ना याची माणूस अगोदर काळजी घेतो. म्हणून रात्रीं अत्यंत दक्षतापूर्वक मी तुला हाक मारतों. आईला 'आई!' अशी हाक मारतेवेळीं माणसानें हजार वेळां विचार करायला पाहिजे कीं, 'आई' म्हणून हाक मारण्याची माझी लायकी आहे का? मी तुझ्याशीं अगदीं जवळचें नातें जोडण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून तूं मला पवित्र कर. पण मी असें ज्यावेळीं म्हणतों त्यावेळीं तुझें काय महत्त्व आहे हें मला माहितच नाहीं असें तुला कदाचित वाटण्याचा संभव आहे. पण तसं नाहीं. तूं प्रत्यक्ष माहेश्वरी आहेस.

नंतर म्हणतात– प्रालेयाचलवंशपावनकरी.... प्रालेय म्हणजे बर्फ. अचल म्हणजे पर्वत. तूं बर्फाच्या पर्वताचा– हिमालयाचा वंश पावन केलेला आहेस. हिमालयाचीं सर्व शिखरं मला पवित्र वाटतात. कारण तिथं तुझा निवास आहे. पर्वतांत तुझा जन्म झालेला असल्यामुळं तुला पार्वती म्हणतात. पर्वताची मुलगी पार्वती इत्यादि सर्व रूपकं आहेत. पण तुला कोणत्याही नावानें हाक मारली तर तूं चित्‌शक्तीस्वरूप असल्यामुळं अटळ आहेस. ज्या भगवच्छक्तीनें ही सृष्टी निर्माण केली व जी ह्या सृष्टीचं पालन करते ती स्थिर आहे आदिमशक्तीजवळ स्थैर्य आहे.

ईश्वराला मूर्ख म्हणणारे, त्याच्या कामांत चुका दाखविणारे पुष्कळ लोक आहेत. परंतु आदिमशक्तीजवळ स्थैर्य आहे. गांभीर्य पण आहे त्याच बरोबर भव्यता आणि भयानकतेचाही थोडा अंश आहे आणि सामर्थ्यसंपन्नता असल्यामुळेच तर ही सृष्टी निर्माण झालेली आहे. तुझ्याजवळ वरील गुणांबरोबर कोमलता सौंदर्य आणि प्रेमळपणा हेही गुण आहेत. या आदिमशक्तीजवळ स्त्रीच्या ठिकाणीं दिसणारे गुण दृग्गोचर होत असल्यामुळं तिच्यावर स्त्रीत्वाचा आरोप करण्यात आलेला आहे पण ती जशी स्त्री नाही तशी पुरुषही नाहीं. कारण स्त्रीच्याठिकाणीं दिसणाऱ्या गुणांबरोबरच स्थैर्य, गांभीर्य, भव्यता, कांहीं प्रमाणात भयानकता आणि सामर्थ्यसंपन्नता या पुरुषी गुणांचेंही अस्तित्व आहे. हे सर्व गुण पर्वतासारखे आहेत. त्याचप्रमाणं रमणीयता, कोमलता, प्रेमळपणा हेही गुण त्या शक्तीजवळ असल्यामुळं आणि हे गुण स्त्रीच्याठिकाणीं आढळून येत

असल्यामुळं तुझं रूप पार्वती या रूपानं मानलं गेलं आहे. या मुळंच शिवाचंही अर्धनारीनटेश्वराच्या रूपानं चित्रण करण्यांत येतं.

प्रभो! तूं जर केवळ गंभीर असतास तर तुझ्याजवळ बालकं येणार नाहीत. परंतु तुझ्याजवळ आकर्षकता आणि रमणीयता हे गुण आहेत. म्हणूनच तुझं आणि माझं नातं जुळूं शकलं. तुला मी 'आई' म्हणतों त्याचं हें कारण आहे. शंकराच्या अर्धनारीनटेश्वरामध्यं पुरुष व स्त्री या उभयतांचे गुण आहेत. स्थैर्य, गांभीर्य वगैरे पुरुषी गुण महान असतील पण मला त्यांचं आकर्षण वाटत नाही. पण स्त्रीजवळ असणारे प्रेमळपणा, कोमलता आणि रमणीयता हे गुण तुझ्याठिकाणीं आहेत म्हणूनच मला आकर्षित करूं शकतात.

संन्यासी विरक्त असतो. त्याच्याजवळ एखादं मूल आलं तर त्याला साफ समजून तो फेकून देतो. रागावतो. संन्याशाजवळ मुलं जात नाहीत याचं हेंच कारण आहे. 'समलोष्टाश्मकांचन' या सारखे गुण महान असतील परंतु त्यामुळं मी तुझ्याजवळ येऊं शकणार नाहीं. तुझ्याजवळ असलेला कोमलपणा व प्रेमळपणा यामुळंच मी तुझ्याजवळ येऊं शकतों. तुझा एकच संबंध संभवूं शकतो व तो म्हणजे तूं माझी आई हा. म्हणूनच मी तुला आई म्हणून हाक मारतों.

काशीपुराधीश्वरी.... काशींत एकच विचारप्रवाह सुरू असे. व तो म्हणजे ज्ञानप्रवाह. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवन जगणाऱ्यांना व दुसऱ्यांना तशा प्रकारचं जीवन कसं जगावं हें शिकविणारं तें एक तपोवन होतं. काशीत दुसरा कोणताच व्यवसाय नव्हता. तिथं सर्वच ज्ञानी होते. काशींतील महान पंडित ज्ञानी आणि अनासक्त असून सुद्धां तुला 'आई' म्हणूनच हाक मारीत असत. तुझ्या कोमलपणादि गुणामुळंच तुला ते आई अशी हाक मारीत असत हजारों वर्षांपूर्वीचं काशीचं चित्र उभं करा. तिथं फक्त ज्ञानाचीच देवाणघेवाण चालत असे. काशींत शुभ चरण कोणाचे! राजाचे, अधिकाऱ्यांचे कीं मंत्रीमहाशयाचे? काशींत मान्यता कोणाला होती? फक्त ईश्वरालाच. दुसऱ्या कोणालाही नव्हती. काशींत ज्यांनी परिश्रम करून काशीच तपोवन बनवलं त्या ऋषिमुनींना मान्यता

होती. काशीची सत्ता परमेश्वराच्या हातीं होती. 'अहंब्रह्मास्मि' अशा प्रकारची अनुभूति प्राप्त केलेले ज्ञानी लोकही तुला 'आई' म्हणून हाक मारीत असत. पण आज काशीत उसन्न वादविण्यासाठीं मंदिरात लोक दुकानं ठेवतात, ही गोष्ट अशास्त्रीय व अधार्मिक आहे. काशीची सत्ता कोणाच्या हातांत असेल तर फक्त ती परमेश्वराच्याच हातांत होती. मूर्ख लोक तुझ्या चरणांवर लोळण घेतात ही गोष्ट ठीक आहे परंतु ज्ञानी, तेजस्वी आणि पूर्णकाम लोक मात्र तुला 'आई' अशी हाक मारतात. म्हणून श्रीमदाद्यशंकराचार्यांना 'काशीपुराधीश्वरी' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा वाटला व त्यांनीं प्रत्येक श्लोकांत हा शब्द घातलेला आहे. काशीनगरीची तूं अधिष्ठात्री देवता आहेस.

नानारत्नविचित्रभूषणकरी ... आई? तूं कशी आहेस! आई! तूं अनंत रत्नांचे दागिने धारण केलेली आहेस. नानाप्रकारच्या रत्नामुळं तूं आश्चर्यकारक वाटतेस. तुझं हें वैभव पाहून मी अत्यंत गोंधळून जातों. तुझ्या वैभवानं मी मोहित होतों. व्यवहारांत मुलानं चांगलं काम करावं व 'आई' म्हणून हाक मारावी म्हणून त्याच्यासमोर एखादं वैभवाचं खेळणं आई फेकित असते. द्राक्षं खार्जूरमात्रं ... तूं वैभवांत रममाण झालास तर मग तुला आईची जरूर काय? खेळणं पाहिल्याबरोबर मूल आईला विसरून जातं. त्याचप्रमाणं तूं वैभवाचं एखादं खेळणं माझ्याकडे फेकून देतेस व त्यामुळं मी तुला विसरून जातों. पण आई! तुझ्या वैभवाचं मला यासाठीं आकर्षण आहे कीं मी त्या वैभवांत तुला पाहूं शकतों. शंकराचार्यांना दागिन्याचा मोह मुळींच नव्हता माझ्यासारखीं माणसं रत्नावरच पाहातात व तुला विसरून जातात. पण ज्ञानी लोक तुला रत्नामध्यंच पाहातात. त्यांना रत्नामध्यंही आई दिसते. आश्चर्यकारक रत्नांचे दागिणे घातलेल्या तुला–आईला मी पाहात आहें. कित्येक लोक मृत्युनंतरही आईचे दागिने जपून ठेवतात. कारण ते पाहिल्यानंतर त्यांना आईची आठवण होत असते. अशाच प्रकारं तुझ्या दागिन्यामध्यं मला तुझं दर्शन होत असतं.

हेमांबराडंबरी ... ...सोन्याचं जिचं सिंहासन आहे अशा तुझं शंकराचार्यांना कौतुक कां वाटावं! विश्व जिनं निर्माण केलं तिचं सिंहासन जर सोन्याचं असल तर त्यांत आश्चर्य तें कसलं?

दार्शनिक विचार असा आहे कीं 'सुवर्ण तैजसम्' सुवर्ण म्हणजे तेज. म्हणूनच जुन्या काळीं जेवतांना लोक हातात आंगठी ठेवीत असत. कारण जेवतांना तशा प्रकारची तेजस्विता प्राप्त व्हावी हा त्याच्या मुळाशीं हेतु असे पण आज आंगठी झिजते म्हणून लोक जेवतांना आंगठी काढून ठेवतात. नवीनच जन्माला आलेल्या बालकाच्या अन्नप्राशनाच्या वेळीं (प्रथम त्याला जेवायला घालावयाच्या संस्कारप्रसंगीं) सोन्याच्या आंगठीवर खी ठेवून बालकाच्या जिभेवर 'ॐ' काढीत असत. यामध्यें मूल तेजस्वी व्हावें असा हेतु असे. शंकराचार्यांना याचंही फारसं महत्त्व वाटलं नसावं सूर्याचं तेज व विजेचा चमचमाट ही तुझी सहज लीला आहे. म्हणूण सोन्याचं तुझं आसन असण्यांत विशेष तें काय? मलाही असंच तेजस्वी व्हायचं आहे, हीही गोष्ट माझ्या ध्यानांत आहे. मग 'हेमांबराडंबरी' यामध्यें विशेष काय वाटलं?

तेजस्विता कशांतून येते? निःस्पृहतेतून तेजस्विता येते, अशा प्रकारचा ऋग्वेदांत उल्लेख आहे. परंतु तुझ्याजवळ तर स्पृहा भरपूर आहे. आणि मला तुझी स्पृहा आहे. आपल्याला तर दोघांचीही स्पृहा आहे. मग तुझ्याजवळ हें तेज कुठून आलं? जीवनांत काय मिळवायचं? ईश्वरानं मला मांडीवर घ्यावं व भरवावं. पण मला तुझं दूध केव्हां मिळणार? मी तें केव्हां पिऊं याची मला आसक्ति आहे व मी कधी पाजूं अशी तुला आसक्ति आहे.

भिक्षां देहि..... म्हणून शंकराचार्य मागत आहेत याला महान अर्थ आहे. शंकराचार्यांनीं अनेक जन्म तपश्चर्येत व्यतीत केले आहेत. तुझ्यावर त्यांनीं प्रेम केलं आहे. आणि त्यामुळं ज्यांना अधिकार प्राप्त झालेला आहे अशा शंकराचार्यांनी मागितल्यावर त्यांना दिल्याशिवाय तुझी सुटकाच नाहीं. निःस्पृहतेतून जर तेजस्विता प्राप्त होत असेल तर तुझी बैठक तेजस्वी कशी असणार? कारण तूं स्पृहेने भरलेली आहेस. मला तुझी स्पृहा आहे. तुला माझी आहे मुलाला पाजण्यासाठी आई अधीर झालेली आहे, मूल तें प्यायला उतावीळ झालं आहे 'करावेंसे वाटे जीवा स्तनपान नव्हे हें वचन शृंगारिक... अशा प्रकारं तू निःस्पृह नसशील तर तुझं आसन तेजस्वी कसं? शंकराचार्यांना असं सांगायचं आहे कीं, जगांतील नैष्ठिक सिद्धांत मोडून तुझी बैठक तेजस्वी आहे. ही तुझी स्पृहा खोटी नव्हे.

स्पृहा जर क्षुद्र स्वार्थासाठीं असेल तर जीवनांत तेजस्विता येणार नाहीं. जर तुझ्या दागिन्याकडे मी क्षुद्र स्वार्थानें पहात असेन तर माझ्याठिकाणीं तेजस्विता येणार कुठून? पण आई! मला तुझ्या दागिन्यांची यासाठीं स्पृहा आहे कीं, त्यामध्यें मी तुला पाहूं शकतों. स्पृहेच्या या दृष्टिकोणातून पाहिलें तर ईश्वरही निःस्पृह नाहीं. ईश्वर भक्तांकडे स्पृहेनें पाहात आहे. भगवान जर निःस्पृह झाला तर आपल्याला जगायचें कांही कारणच राहाणार नाहीं. आई जर निःस्पृह झाली तर जीवनाचे सर्व व्यवहारच नाहींसे होतील. देव निस्पृह झाला तर भक्तांचेही अस्तित्व राहाणार नाही. ईश्वर ज्या दिवशी निःस्पृह होईल त्या दिवशी सज्जनांना आत्महत्या करायला हवी.

प्रत्येक क्षणीं आसक्तिपूर्ण नजरेनें तूं माझ्याकडे पाहात आहेस. म्हणूनच या जगद्रूपी अंगणांत मला नाचायला आवडतें जर आईच पत्थर झाली तर तिथें राहण्यांत तरी काय अर्थ आहे? जिथें आईची निरंतर प्रेमळ आणि स्नेहपूर्ण दृष्टि असेल तें घर म्हणजे नंदनवन होय! हेमांबराडंबरी... अशासाठीं म्हटलं आहे कीं, आई निःस्पृह नसूनही तिचं आसन तेजस्वी आहे. मूल लहान असलें कीं आईला आसक्ति असतेच.

आपल्याला लहान व्हायचें आहे कीं मोठं व्हायचं आहे? जर आपण लहान झालों तर आईचं प्रेमळ हृदय प्राप्त होईल. आणि मोठे झालो तर लवाडी मिळेल. पण लहान व्हायचं कसं? जो इच्छा, वासना सोडून देतो तो लहान. आपलं सुख कशांत आहे हें आपल्याला माहित आहे का? आपल्याला हे ज्ञान नसतांनाच आपण आपलं शहाणपण चालवून जें सुख नाहीं त्याच्या पाठीमागं मृगजळासारखे धावत आहोत, म्हणून आपल्याला सुखाऐवजीं दुःख प्राप्त होत असतं. ज्यांत आपल्या इच्छा, वासना भगवंताला अर्पण केल्या व स्वतःच्या सुखदुःखांचा निर्णय करण्याची जबाबदारी परमेश्वरावर सोपविली तो लहान. जर आपण लहान असूं तर आपल्याला आईची प्रेमळ मांडी प्राप्त होईल. अशा प्रकारच्या बालकांची जगदंबेला स्पृहा आहे.

सोन्याचं सिंहासन जर असेल तर त्यांत कौतुक करण्यासारखं कांहींच नाहीं निःस्पृहतेतून तेजस्विता येते पण आई निःस्पृह नाहींच. निःस्पृह नसूनही

ती तेजस्वी मात्र आहे व यातच वैशिष्टय आहे शंकराचार्यांना हीच महत्त्वाची गोष्ट इथं सांगायची आहे

कित्येक भाव असे आहेत की, त्यांना शब्दस्पर्श झाल्यावर ते कोमेज तात अगदी सुकुमार फुलासारखी त्याची अवस्था असते या भावाचें शब्दानी वर्णन करता येणार नाही भक्त अणि भगवान याचे कित्येक संबंध असे आहेत की, ते वर्णनातीत आहेत

नंतर म्हणतात वक्षोजकुंभातरी आई! तू मला ज्यावेळी दूध पाजायला प्रवृत्त होतेस त्यावेळीं तुझे स्तन दुधाने भरलेले कुंभ आहेत व ते सृष्टीला जीवन देणारे आहेत ज्यावेळीं मी दुग्धपान करायला लागतो त्यावेळीं माझे लक्ष तुझ्याकडे जात नाही माझं ध्यान त्याच वेळीं कुठं जातं ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे त्याच शंकराचार्यांनी केलेलं वर्णन पुढील अंकीं वाचू

॥ श्री जटाजूटः शरणम् ॥

# श्री अन्नपूर्णा स्तोत्रम्

नानारत्नविचित्रभूषणकरी हेमांबराडंबरी
मुक्ताहारविलंबमानविलसद्वक्षोजकुंभांतरी ॥
काश्मीरागुरुवासिता रुचिकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥ २ ॥

योगानंदकरी रिपुक्षयकरी धर्मार्थनिष्ठाकरी
चंद्रार्कानलभासमानलहरी त्रैलोक्यरत्नाकरी ॥
सर्वैश्वर्यसमस्तवांछनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥ ३ ॥

मुक्ताहारविलंबमानविलसद्वक्षोजकुंभांतरी... आई! ज्या ज्या वेळीं तूं मला दुग्धपान करवतेस त्या त्या वेळीं माझी दृष्टि दुसरीकडेच जाते. संपूर्ण जगाला तेजाचें आणि प्रेमाचें पान करविणाऱ्या तुझ्या स्तनकुंभांच्यामध्यें शोभणाऱ्या मोत्यांच्या हाराकडे माझें लक्ष जातें. साऱ्या जगाचें पोषण करणाऱ्या वक्षस्थलावर रुळणाऱ्या मुक्ताहाराचे ठिकाणीं मी जेव्हां तल्लीन होतों त्यावेळीं मी दुग्धपान विसरतों. त्या हारांत मी काय पाहातों तें तुला सांगूं का? त्या हारांत उत्तमोत्तम मोत्यें आहेत. त्यांतील एक एक मोती म्हणजे....

वाल्मीकिः सनकः सनंदनतरुर्व्यासोवशिष्ठोभृगु–
र्जाबालिर्जमदग्निकच्छजनको गार्गोऽङ्गिरागौतमः।
मान्धाताऋतुपर्णवैन्यसगरा धन्यो दिलीपो नलः
पुण्यौ धर्मसुतौ ययाति नहुषौ कुर्वन्तु मे मङ्गलम्॥

वाल्मीकि, जनक, व्यास, वशिष्ठ, भृगु, जाबालि, जमदग्नि, अंगिरा, गौतम, मांधाता, सगर, दिलीप इत्यादि प्रातःस्मरणीय महान चरित्रें मला आठवतात. अशा प्रकारच्या या हारानें तुझ्या वक्षस्थळाची शोभा आणखींच वाढत आहे. जीवन पवित्र, दिव्य आणि भव्य करण्यासाठीं या लोकांनीं किती परिश्रम

घेतले असतील ! अशा प्रकारच्या प्रातःस्मरणीय संतांचें दररोज स्मरण केलं पाहिजे. तुझ्या गळ्यांत जो मोत्यांचा हार आहे तो झवेरी बाजारांत मिळणाऱ्या मोत्यांचा नाहीं; तर या महान चरित्ररूपी मोत्यांचा लखलखचक हार आहे. त्यानं तुझं वक्षस्थल शोभत आहे. या चरित्रांचं मला आकर्षण आहे त्यामध्यं मी तल्लीन होतों.

माझी नजर नेहमीं या हाराकडं गेलेली असते हें खरं; पण ज्यावेळीं तूं मला दुग्धपान करवीत असतेस त्यावेळीं मला माझी किंमत कांहीं वेगळीच वाटते. आई ! तूं मला मांडीवर घेऊन दुग्धपान करवितेस. ही कांहीं ल्हानसहान सिद्धि नव्हे. तूं मला दुग्धपान करवितेस ही खरोखर विलोभनीय गोष्ट आहे. पण त्याहीपेक्षां तूं या लोकांना गळ्यांतला हार बनवून धारण केलं आहेस याचं मला आश्चर्य वाटतं. दुग्धपानाच्या वेळीं मी चापल्य करतों. मी माझ्या पायाच्या आंगठ्यानं त्या मोत्यांच्या हाराला ओढतों. तूं मला चापट देतेस, त्यावेळीं मला वाटतं, माझ्यापेक्षां या लोकांवर तुझं अधिक प्रेम आहे. त्यामुळंच तर तूं त्यांना गळ्यांत ठेवलेलं आहेस ! किंमत कमी असल्यामुळंच मी चापल्य करतो परंतु हे भक्तश्रेष्ट विकास करतां करतां उच्च पदवीला पोंचले. त्यांची माझ्याकडून उपेक्षा होते ही गोष्ट तुला सहन होत नसावी. म्हणूनच तूं मला चापट मारतेस. ज्यानं स्वतःच्या जीवनांत या महापुरुषांचा अपमान करण्याचं काम केलं त्याला आई नेहमीं चापट मारणार.

या जगांत ईश्वर आहे की नाहीं याची तुम्हीं आम्हीं चर्चा करतो. त्यांच्याविषयीं न बोललेलं बरं. परंतु ज्याच्यावर ईश्वराचं प्रेम आहे त्यांच्यासाठीं त्यानं विद्या, कीर्ति, संपत्ति या गोष्टी पाठविल्या असतील. ते तुमच्या आमच्यापेक्षा निश्चितच श्रेष्ट असतील. पुण्यानिमान्परमभागवतान् स्मरामि । हा शिक्का ज्याच्यावर बसला ते परमेश्वराचे अत्यंत लाडके असतात. ज्यांना सर्वत्र श्यामसुंदर दिसायला लागला तीं माणसं खरोखरच मोठीं होत. रूप पाहतां लोचनीं म्हणजे ज्यांच्या नेत्रांत परमेश्वर येऊन बसला ते निःसंशय श्रेष्ठच होत. प्रत्येक ठिकाणीं भगवान दिसूं लागला कीं असं वाटतं, याचा डोळा परमेश्वरानं निर्माण केला आहे. हीं माणसं मोठीं आहेतच; पण ज्यांना पूर्णतेचा अनुभव आला तीं याच्यापेक्षांही श्रेष्ठ होत. अशा प्रकारचीं माणसं गुप्त

परिश्रम करून विकारांवर विचारानं विजय मिळवून, आत्मरूप ईश्वराजवळ जातात. परंतु त्यांना समोरून प्रतिसाद मिळत नाहीं. त्यांच्यापेक्षां ज्यांना समोरून प्रतिसाद मिळतो, प्रभु ज्यांना आपले मानतो व म्हणतो **यो मद्भक्तः स मे प्रियः** तूं आणि मी एकच आहोंत असं ज्यांच्याविषयीं भगवान म्हणतो त्या व्यक्ति वर वर्णन केलेल्या व्यक्तींपेक्षां श्रेष्ठच होंत. अशा प्रकारच्या व्यक्तींना भगवान आपल्या मांडीवर बसवतो.

पुष्कळ वेळां शेटजी कारकुनाला किंवा गड्याला आपला मानतात पण त्यांना मांडीवर बसवीत नाहींत जे लोक खूप परीश्रम करून आत्मिक विकास करीत असतात व परमेश्वरामध्यें विलीन होऊं इच्छितात त्यांना प्रभु आपले मानतो व त्यांनाच तो मांडीवर घेतो. भगवान त्यांचे खूप लाड करतो. त्यांची नेहमीं काळजी वाहतो. अशा व्यक्तींना काय हवं तें प्रभु नक्की करतो. त्यांचं प्रभु थंडीवाऱ्यापासून रक्षण करतो, पोषण करतो व त्यांना मांडीवरही बसवितो, तरीही त्यांच्यामध्यं परकीपणा राहाण्याचा संभव आहे. शेजाऱ्याच्या मुलाला आई मांडीवर घेईल पण त्याला दुग्धपान करूं देणार नाहीं. त्याला खेळवील, त्याचे लाड करील. मनुष्य जसजशी प्रगति करतो, तसतशी त्याची दृष्टि ऊर्ध्वगामी होते व तो एक दिवस भगवद्रूप होतो. व्यवहारांत जशी चढती श्रेणी दिसते तशी भक्तींतही असते. पण भक्तीमध्यं पायऱ्या आहेत.

आईच्या मांडीवर जो बसला त्याला कशाची उणीव भासणार? त्याला जगत् तुच्छ वाटतं. पण त्याला एका गोष्टीचं दुःख होतं आई शेजारणीच्या मुलाला मांडीवर बसविते पण त्याचं तोंड स्तनाला लावूं देत नाहीं. ही गोष्ट भक्ताच्या अंतःकरणाला टोचते. अशीं माणसं निःस्पृह असतात. समाज काय म्हणेल याची कधींही परवा करीत नाहींत. श्रीमदाद्यशंकराचार्यांना आईच्या प्रेताचे तीन तुकडे करून तिला न्यावं लागलं होतं. त्यावेळीं शंकराचार्यांना सामाजिक प्रतिष्ठा होती तरीही ते डगमगले नाहींत. अशा तऱ्हेच्या महान तेजस्वी लोकांना आई मांडीवर बसविते. ईश्वराचं दुग्धपान केलं नसेल तर तेज कुठून येणार? अशा तऱ्हेच्या तेजस्वी लोकांनीं सत्ताधीश, विद्वान् किंवा श्रीमान् यांच्यापुढं लाचारी केलेली नाहीं. श्रीमंतांजवळ कधीं मागितलं नाहीं. मिळायचं असेल तर मिळेल. मी माझ्या मार्गानं जाणार. काय ही तेजस्विता, हिम्मत आणि मिजास! अशा लोकांना समाज काय म्हणेल याची पर्वा नसते.

जे विश्वमातेचं दुग्धपान करीत असतात त्यांच्यापेक्षां कोण मोठा असणार! दुग्धपान करतां करतां गळ्यांतील हाराला आंगठा लावण्याचा प्रयत्न करणाऱ्याला चापट माराची अशा प्रकारचे हे मोती प्रिय असतात. त्यामुळंच आईचं दुग्धपान करणाऱ्या या लोकाची स्थिति पण विलोभनीय वाटते. असं वाटतं कीं, आई! तुझ्या गळ्यांत मला केव्हां स्थान मिळेल? अशा प्रकारचे भक्त व भगवान यांचा व्यवहार अगदीं प्रेमाचा असतो. अशा लोकांनाच भगवान आपल्या गळ्यांत स्थान देत असतो.

> **प्रल्हाद नारद पराशरपुण्डरीक।**
> **व्यासाम्बरीषशुक शौनक भीष्मदाल्भ्यान॥**
> **रुक्माङ्गदार्जुन वशिष्ठ विभीषणादीन्।**
> **पुण्यानिमान् परमभागवतान् स्मरामि॥**

प्रल्हाद, नारद, पराशर, पुंडरीक वगैरे महान ऋषि आईच्या गळ्यातील हारांतील मोतीं आहेत. हे आई! तूं ज्यावेळीं *तुझ्या गळ्यांतील हाराच्या* मोत्यांत माझी गणना करशील त्यावेळीं मी धन्य होईन. *'कृतकृत्यथभागत'* होईन. ईश्वराचा भक्तांशीं अशा प्रकारचा व्यवहार असतो. इथं कर्म सिद्धान्त लागू पडत नाहीं. नंतर प्रमाद झाले तरीही हरकत नाही. या पाऊल वाटेनं या. जोंपर्यंत या पाऊल वाटेनं आपण जात नाहीं तोंपर्यंत कर्माचा फार मोठा रस्ता असतो व तिथं फारच गर्दी असते. कोणी दान करतात, कोणी जप करता, कोणी तप करतात; त्यामुळं गर्दी असणं अगदीं स्वाभाविक आहे नंतर ही पाऊल वाट लागते. कांहीं कांहीं वेळं याज्ञवल्क्य, वशिष्ट, पतंजलि यांमारखी एकटी दुकटी व्यक्तिच जात असेल. म्हणूनच त्यांना उद्देशून तर्पण करायचं. **'वशिष्ठं तर्पयामि अत्रिं तर्पयामि।** आईचं दुग्धपान करायला मिळणं ही भाग्याची गोष्ट आहे. व ती ज्यांना लाभली अशा प्रकारचे हे महान पुरुष आहेत. या जगात यापेक्षा आणखी काय हवं! ईश्वराच्या गळ्यांतला जो लाल झाला त्यापेक्षां श्रेष्ठ कोण असणार? अशा लोकांचीं संकटं भगवान आपल्या डोक्यावर घेतो. व त्याच्या दर्शनानं ईश्वर स्वतःला धन्य समजतो. अशा प्रकारचे हे महापुरुष असतात.

**काश्मीरागुरुवासिता......**आई! तुझ्याजवळ केशर, कस्तुरी, चंदन. अगरु, अबीर वगैरे सर्व तऱ्हेच्या सुगंधी वस्तु आहेत. तुझ्या सान्निध्यांत

असलेल्यांना सतत हा सुगंध मिळत असतो. जो तुझ्याजवळ येतो त्याचेठिकाणी दुर्गंध असणारच नाहीं. जसेजसे आपण ईश्वराजवळ जाऊं तसातसा आपल्याला सृष्टीचा सुवास यायला लागतो.

श्रावण महिन्यांत सृष्टीचा सुगंध निराळा आणि भाद्रपद महिन्यातला निराळा. कुठंही बसा, कुठंही फिरा त्यावेळीं तुम्हांला एक वेगळाच सुगंध अनुभवायला येईल. आश्विनातल्या नवरात्रांच्या दिवसांत एक वेगळाच सुगंध अनुभवायला मिळतो. अशा प्रकारचा सुगंध अनुभवण्याची ज्याला सवय लागली त्यालाच या सृष्टींत सुगंध मिळेल, आपणास वास येतच नाहीं. कारण आपलं नाक सरदीनं भरून गेलं आहे. तपकीर ओढणाऱ्याला अत्तराचा सुवास कुठून येणार ? आपला श्वासोच्छ्वास आसक्ति व लालसा यांच्यासाठीं चालू असतो, त्यांना सुवास कसा काय मिळणार? ज्याला भक्त व्हायचं असेल त्याला एखादं तरी पाऊल आसक्ति आणि लालसा यांनी रहित टाकलं पाहिजे. तरच भक्तीचा प्राणवायु मिळेल. व मगच भक्तीचं जीवन जगतां येईल

आसक्ति व लालसा रहित असं आपलं एखादं तरी कृत्य असायला पाहिजे. तरच भगवंताचा प्राणवायु मिळेल. हा भगवंताचा प्राणवायु मिळाला नाहीं तर भक्त जगणार नाहीं, आम्हीं पूजा करतों, गीतेचा स्वाध्याय करतों पण या सर्व गोष्टी आसक्ति व लालसा यांच्या पूर्तीसाठींच. म्हणूनच मुलाला मृत्यु आला तर पूजा बंद. गीता वाचणं बंद. अशानं भक्तीचा शुद्ध प्राणवायु मिळत नाहीं. तो जर मिळेल तर ही संपूर्ण सृष्टि सुगंधित होईल.

**रुचिकरी......**या सृष्टींत कांहीं स्वाद असेल तर तो या आईमुळंच या सृष्टींत ही आई येऊन राहिलेली आहे. म्हणूनच प्रत्येकाच्या जीवनांत आनंद आहे. प्रत्येकाला जगण्याची उत्सुकता आहे. वस्तुत: हा जीवनपट मरणानं घुसळलेला, आपत्तींनीं भरलेला व चितांनीं व्यापलेला आहे. असं असूनही प्रत्येक जीवन मोहक वाटतं. याचं कारण हे आई! तूं या सृष्टींत येऊन राहिली आहेस. त्यामुळंच प्रत्येक वस्तूला स्वाद निर्माण झाला आहे.

लहान मुलाला पाहिल्यानंतर त्याच्याविषयी मोह कां होतो ? तात्विक दृष्टीनं पाहिलं तर पति-पत्नीमधलं आकर्षण म्हणजे काय? हाडं व चामडी यांचीं ही मडकीं; पण असं असूनही तीं आकर्षक आहेत; रमणीय आहेत. हें आकर्षण कोणी निर्माण केलं? हें आकर्षण प्रत्येकालाच वाटतं. म्हणूनच

सिंहासारखा प्राणी घराबाहेर जातो व संध्याकाळीं पुन: घरीं परत येतो. अशा स्थितींत कांहीं लोक पैसा म्हणजे दु:ख समजतात. कित्येक विरक्तीची भाषा बोलतात. कारण भोजनांत स्वाद नसेल तर थोडं आणखीं मीठ टाकायला पाहिजे तरच स्वाद प्राप्त होईल. त्याचप्रमाणें संपत्ति, सत्ता वगैरे ठिकाणीं जर प्रभुस्पर्श आहे अशी भावना झाली तर त्यांमध्यंही गोडी निर्माण होईल. व या संसाराचा कंटाळा येणार नाहीं. जर एखादे वेळेम जीवन रुचिहीन वाटलं तर त्याला भगवंताचा स्पर्श करावा किंवा त्यांत भक्तीचं मीठ घालावं म्हणजे तेंच जीवन सुमधूर होईल. संसारात गोडी आणण्याचं सामर्थ्य पैशांत नाहीं तर तें भगवत्स्पर्शांत किंवा भक्तींत आहे.

द्रव्य, वित्त या सर्व भौतिक वस्तु आहेत. त्यांना जर प्रभुस्पर्श झाला तर त्यांतही गोडी निर्माण होईल. संसारात परमार्थाचं मोहन टाकलं व कणीक तयार केली तरच अध्यात्माची पोळी तयार होईल. कित्येक लोक संसारच करीत असतात व त्यांना ईश्वरकडे पहायला वेळच नाहीं. प्रभुभक्ति, भजन या सर्व गोष्टी बायकांच्या आहेत असं मानतात. या उलट कित्येक लोक ईश्वराचंच नांव नेहमीं घेत असतात व त्यांना संसाराकडे पहायला वेळच नाहीं. त्याना जग भक्त समजतं व आपणही अशा लोकांना भक्त मानतों भगवद्भक्तीचं पाणी आणि संसाराची कणीक या दोहोंचं मिश्रण करतां आलं तरच त्यांचं जीवन विकसित होईल. कांहीं भक्त असे असतात कीं, त्यांना विचारलं कीं अहो! माध्यान्ह काळची काय व्यवस्था करणार? तर ते म्हणतात आपल्याला काय काळजी? पाहाणारा पाहून घेईल. पण मग ईश्वरानें जी शक्ति दिलेली आहे ती काय तिजोरींत ठेवण्यासाठीं दिलेली आहे? वैदिक वाङ्मय वाचल्यानंतरच व्यक्ति कोण हे ध्यानांत येतं. अध्यात्मरूपी पोळी जर करायची असेल तर त्यासाठीं कणीक कशी भिजवायची हें कुठल्या पुस्तकांत मिळणार नाहीं. तें ज्ञान संतांच्या जीवनाशीं एकरूप झालेलं असतं, *म्हणूनच त्यांच्या जीवनाकडे पाहतां पाहतां कणीक भिजवतां* यायला पाहिजे. अशा प्रकारचे महापुरुष आत्मविश्वासानं सांगतात कीं,-**यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि।** त्यांच्याजवळ जा, बघा; आणि मुलगी पहात असतांना आई ज्याप्रमाणें कणीक भिजवते त्याप्रमाणें त्या संतांकडे पाहतां पाहतां कणीक भिजवायला शिकलं पाहिजे. हे संत

म्हणजे आपली आई होय. प्रल्हादनारदपराशर...... हे कणीक भिजवत असतील तेव्हां त्यांच्याजवळ जाऊन बसा.

कांहीं लोक पाणीच जास्त घालतात तर कांहीं कणीकच जास्त घालतात. त्यांना बरोबर कणीक भिजवतां येत. नाहीं. अशा तऱ्हेनें अयशस्वी झालेले पुष्कळ लोक आहेत. पण ज्यांनीं ईश्वराला संसारांत आणलें त्यांचा संसार गोडच होणार. एकनाथस्वामींचा संसार दिव्य होता. आईमुळेंच संसाराला गोडी येते. म्हणूनच तूं गोड आहेस.

**योगानंदकरी....** योग म्हणजे काय? योग म्हणजे एकरूप होणें. योगांत ध्यान, धारणा, समाधि वगैरे बऱ्याच मोठ्या गोष्टी आहेत. परंतु अहं्‌ नाहींसा करणें, विसरणें, तल्लीनतेचा आणि अद्वैताचा आनंद मिळविणें याचें नांव योग. योगाचा आनंद अद्वैतांत मिळतो हें खरें. पण आई! तुला आई अशी हाक मारल्याबरोबर द्वैतांतही तोच आनंद आहे, हें श्रीमदाद्यशंकराचार्य ज्यांनीं केवलाद्वैताचा सिद्धांत समजावून सांगितला, ते सांगत आहेत. जे जगाला तुच्छ मानतात, जगत् असत् ठरवितात तेच त्याची योग्यता जाणतात. जे ऋषि जगाला तुच्छ मानतात तेच मानव शरिराला श्रेष्ठ समजतात. आपणाला मानवी शरिराचें महत्व कळत नाहीं. आपण त्याला ऐंशी वर्षांपर्यंत तुच्छच मानतों. आपल्याला त्याचें महत्व कधींच कळत नाहीं. लग्न झाल्यानंतर कोणाही व्यक्तीला संसार मधुर वाटला तर त्यांत विशेष कांहींच नाहीं. परंतु दहा वर्षांनंतर तोच माणूस संसार मिथ्या समजतो. परंतु जगाला तुच्छ लेखणारे शंकराचार्य जन्माला येण्यांत आनंद मानतात. केवलाद्वैताचा सिद्धांत प्रतिपादन करणारे शंकराचार्य आईला म्हणतात–

**न मोक्षस्याकांक्षा भवविभववांछापि च नमे।**
**न विज्ञानापेक्षा शशिमुखि सुखेच्छापि न पुनः॥**
**अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै।**
**मृडानी रुद्राणी शिव शिव भवानीति जपतः॥**

वरील श्लोकांत शंकराचार्य पुन्हा जन्म यावा अशी इच्छा करीत आहेत व त्यांतच त्यांचें वैशिष्ट्य आहे. स्वतःचें अस्तित्वच नाहींसं करणारे, अद्वैताचा आनंद उपभोगणारे शंकराचार्य म्हणतात कीं, हे आई! तुझा

हाक मारण्यांत मला आनंद मिळतो. 'आई!' अशी हाक मारून द्वैतांत मला योगाचा, अद्वैताचा आनंद प्राप्त होतो. अशा तऱ्हेनें द्वैतांत अद्वैताच आनंद मिळतो व हेंच तुझें वैशिष्ट्य आहे. म्हणूनच तूं 'योगानंदकरी आहेस.

नंतर म्हणतात कीं, आई! तूं **रिपुक्षयकरी....** आहेस. तूं शत्रूचा नाश करणारी आहेस. ज्यांचें आईवरील प्रेम वाढतें त्यांचे लौकिक शत्रूही खलास होतात किंवा त्यांना शत्रू वाटतच नाहींत. अशा व्यक्ति मूर्ख मात्र नव्हत. ही तारेवरची कसरत आहे. भगवान श्रीकृष्णाला पण शत्रू होते. त्याच्यावर लोकांनीं चोरीचा आळही घेतला पण श्रीकृष्णाला हें माहीत होतें कीं हे आरोप करणारे कोण आहेत. त्यांमध्यें अक्रूर प्रमुख होता. भगवंताचें अनैतिहासिक वर्णन करणारे म्हणतात कीं, अक्रूर मुक्त झाला. कारण तो श्रीकृष्णाबरोबर मथुरेला आला. श्रीकृष्णाच्या जीवनांतही संघर्ष होता. संघर्ष दोन प्रकारचा असतो. एक समन्वयात्मक आणि दुसरा सहयोगात्मक. शत्रु असेल पण त्याचे ठिकाणीं शत्रुत्व असणार नाहीं. रावणाबरोबर रामाचा संघर्ष होता पण तो सहयोगात्मक होता. शास्त्रीय परिभाषेंत शत्रुत्वच नाहींसें होतें. माझें जीवन पण तोच चालवितो व त्याचेंही तोच चालवितो. मग शत्रु राहिलाच कुठें!

आध्यात्मिक जीवनांतही शत्रु असतात. काम हा शत्रु आहे. पण आई! तुला पाहातांच काम नाहींसा होतो. भगवंताला पाहिल्यानंतर काम स्वतः च स्थान सोडून देतो आणि मनही अतिशय पवित्र होतें. भगवद्भक्तीमुळेच काम निर्माण झालेला आहे. जसं जसं आईवरचं प्रेम वाढेल तसतशी उपभोगाची इच्छा कमी होईल. काम हा पवित्र वाटला तरच तो कमी होईल. **धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ।** एवढंच नव्हे तर काम कमी होतो, उपमोग घेण्याची 'वृत्तीच कमी होते, जेव्हां उपभोग्य वस्तूंत आईचंद र्शन होतं

आई! मी तुझा मुलगा असतांना अपूर्ण कां? या अपूर्णतेची लाज वाटते व काम निवून जातो. काम लोकांना सतावतो. आणि ज्याचा प्रभूशीं संबंध आहे असा मी असतांना अपूर्ण कां? म्हणून माझी मलाच लाज वाटते. काम, तीन गोष्टींनीं कमी होतो. ही वस्तु भगवंतानं निर्माण केली आहे, म्हणून ती पवित्र आहे, अशी भावना झाली म्हणजे काम कमी होतो व मन पवित्र होतं. दुसरी गोष्ट प्रत्येक

वस्तूंत तूंच दिसतेस म्हणून काम कमी होतो आणि तिसरी गोष्ट मी तुझा मुलगा असूनही अपूर्ण; ही गोष्ट मला शोभत नाहीं, असं वाटलं की काम कमी होतो व तो काम मग त्रासही देत नाहीं. अशा तऱ्हेनं कामांतील शत्रुत्वच नाहींसं होतं. आध्यात्मिक दृष्टीनं पाहिलं तर काम त्रास देतच नाहीं.

प्राचीन वाङ्मयांत स्त्री-पुरुष नव्हतेच ब्रह्मदेवानं प्रथम मानसिक प्रजा निर्माण केली ती एक शक्ति होती. परंतु ही सृष्टि अखंड चालायला पाहिजे. यासाठीं माणसानं प्रजेची इच्छा तर केली पाहिजे तरच मानससंतति निर्माण होईल. पण इच्छाच केली नाहीं तर? प्रजा निर्माण होणार नाहीं. म्हणून ही सृष्टि अविच्छिन्न चालेल की नाहीं आणि चालली तर कशी? पण हा त्यांचा प्रयोग फसला व त्यामुळं त्यानं एकाचे दोन भाग केले. त्यामुळेंच ममत्व निर्माण झालं हिलाच माया म्हणतात **भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया।** आई! ही सर्व तुझीच लीला आहे. हें कळल्यावर कामातलं शत्रुत्वच नाहींसं होतं.

दुसरा शत्रु क्रोध. पण तुझ्या शब्दानं, दर्शनानं क्रोध नाहींसा होतो मूल रागावलं पण आई दिसताच राग कुठल्या कुठं पार नाहींसा होतो. पण या सर्व लहानपणातल्या गोष्टी आहेत. हें सारं कुठपर्यंत कीं जोपर्यंत आई हेंच एकमेव आकर्षण असतं तोंपर्यंत.

कांहीं कांहीं वेळां या सृष्टीसंबंधीं क्रोध येतो. सगळीकडे अन्याय दृष्टीला पडतो. माणसाचे विचार व इतर गोष्टी पाहून सर्व अमांगलिक वाटतं व सृष्टीचा राग येतो. प्रत्येकठिकाणीं मोठा लहानांचं भक्षण करीत असतो. जगांत अस्वास्थ्य आहे, विषाद आहे. दुःख आहे, शांतीचं तर नांवच नको. मग सृष्टीचा कंटाळा येणार व तिच्याविषयीं क्रोधही येणार. एक सद्गृहस्थ जगांतील या सर्व गोष्टी पाहून कंटाळले व शहरांतनं निघून एका खेडेगांवांत गेले. पण तिथंही तेंच. तिथून एका जंगलांत गेले. एका झाडाखालीं बसले त्या झाडावर एक कबूतर बसलं होतं त्यानं त्याच्या अंगावर मलमूत्र विसर्जन केलं. गृहस्थ चिडले, त्याला वाटलं ही सृष्टि म्हणजे कचराच आहे, पाण्यात गेले तर तिथं मोठा मासा लहान माशाला खात होता हें दृष्टीला पडलं. शेवटीं कंटाळून चिता पेटवायचं ठरविलं.

तिथं एक महात्मा भेटला. त्यानं विचारलं, 'अहो! हें काय करतां?' त्यांनी सांगितलं की, 'हें जग दुःखमय आहे, वाईट आहे.' त्यावेळीं त्या महात्म्यानें सांगितलं 'तूं पण खराब आहेस. तूं इथं मेलास तर दुर्गंधि येईल म्हणून तूं इथून दुसरीकडे जा,' असं पाहिल्यानंतर वाटतं कीं सृष्टीची गरजच नाहीं. राग येतो व उद्वेगून बाहेर जावसं वाटतं. पण एकदां 'आई' अशी हाक मारली कीं तो क्रोध कुठल्या कुठं नाहींसा होतो. पशु, पक्षी यासर्वांच्या ठिकाणीं तुझंच दर्शन होतं व क्रोध पार नाहींसा होतो. सर्व ठिकाणीं तुझाच आवाज ऐकूं येतो स्वार्थी माणसांना जगदीश नाचवीत असतो हें पाहिल्याव' सृष्टींत तुझाच आवाज ऐकूं येतो व माझा क्रोध नाहींसा होतो. कांहीं वृद्ध माणसं म्हणतात कीं. हे प्रभो! माझे हे डोळे कायमचे बंद कर यापुढें मला आतां कांहींही नको.

केव्हां केव्हां आई! मला तुझ्याविषयीं सुद्धां क्रोध येतो. कारण या जगात असलेलीं ढोंगी माणसं – जीं वरून स्वागताची भाषा बोलतात व हृदयांत कांहीं वेगळेच विचार सुरू असतात अशा लोकांचा विचार केला कीं तुझ्याविषयीं क्रोध येतो. अशा प्रकारची ही खोटी सृष्टि पाहिल्यावर सृष्टि निर्माण करणाऱ्याविषयीं साहजिकच क्रोध चढतो. सगळ्या दुनियेला जें दिसतं तें मला कां नाहीं दिसलं? आः! मी तुझ्यावर खूप चिडतों पण कुठपर्यंत? पशुपक्षी ईश्वराचा शब्द ऐकल्याबरोबर शान्त होतात. त्यांना सृष्टि रमणीय वाटते. आनंददायक वाटते.

या सृष्टींतले जवळ जवळ शंभर टक्के लोक तुझ्यावर चिडलेले आहेत. कांहींना घर नाही म्हणून, कांहींना पत्नी नाहीं म्हणून, कोणींना पैसा मिळत नाहीं म्हणून, तर कांहींना बसमध्यें जागा मिळत नाहीं म्हणून. अशा तऱ्हेनं सर्वच तुझ्यावर क्रुद्ध झालेले आहेत. कपिलोक सुद्धां चिडतात. ज्ञान नाहीं, भक्ति नाहीं म्हणून हे लोक चिडतात. एवंच सज्जन, दुर्जन दोन्ही प्रकारचे लोक तुझ्यावर चिडतात. पण तुझा शब्द ऐकला कीं, त्यांचा क्रोध पार मावळतो. तं धावत येतेस व प्रेमळ शब्दांनीं सांगतेस, 'बाळा! कांहीं घाबरू नकोस. मी आहें ना तुझ्या पाठीशीं. मग तुला कसली आली आहे काळजी?' हे शब्द ऐकतांच मुलांचा क्रोध पार नाहींसा होतो. 'भी येतें जिवा देतें' या दोन शब्दांत सर्व कांहीं येतं व हे शब्द कानावर पडल्यावर क्रोध राहिलच कसा? केव्हां केव्हां भगवान सांगतो. संभवामि युगे युगे। तर कधी कधी अनन्याश्चिंतयन्तोमां.........

**योगक्षेमं वहाम्यहम्।** असें सांगतो. या दोहोंपैकीं कोणतेही शब्द ऐकलेस तरी क्षोभ पार विलीन होतो. अशाच प्रकारें भक्तीविषयीं गरज लागेल त्यावेळीं भगवान **न मे भक्तः प्रणश्यति।** असें तिसरेंच आश्वासन देतो

कधीं कधीं सृष्टीवर तर कधीं कधीं तुझ्यावर विशा माझ्यावरच मी रागावतों. मी असा मूर्ख कां झालों? मला अजून ज्ञान मिळायचें आहे. जिथें आईनें काम होत नाहीं,हाक मारतों तेव्हा 'ओ' मिळत नाहीं त्यावेळीं वाटतें कीं या देहाचा त्याग करावा. पण शरीर त्याग करायला मन धजत नाहीं. कारण हें जीवन तं मला दिलेलें आहेस. तुला याचें काय वाटेल.' म्हणून मी शरीर त्याग करीत नाहीं. ज्यानें जीवन दिलें, ज्यानें तें चालवलें त्याच्याशीं अशी बेइमानी! माझें मन कुविचारांनीं ज्यावेळीं गढूळ होतें त्यावेळीं तुझी आठवण येते! तुला काय वाटेल' आणि हा विचार आला कीं क्रोध पार नाहींसा होतो

ज्याला काम नाहीं, त्याला क्रोध पण नसतो. लोक वाटेल तें करोत पण तूं 'शान्ताकारं' अशीच आहेस. तुझ्या मांगल्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. कुठल्याही स्वरूपाचा राग आला तरी तो आईचा आवाज ऐकला कीं पार नाहींसा होतो.

**लोभः**—लोभ ही वस्तु फेणापासूनही सुटत नाहीं. लोभ सोडणें ही भावा पलीकडील आहे. लोभ सर्वांना व्यापून उरला आहे आपण कृष्णाची उपासनाही लोभानेंच करीत असतों. म्हणून म्हातारा झाला म्हणजे काम नमतें। चिडून फायदा नाहीं म्हणून क्रोध नाहींसा होतो पण लोभ मात्र कायम रहातो. हा लोभही नाहींसा होईल. हे आई! या शत्रुचा क्षय तं करतेस याच एवं येणेप्रकारें मनोभूमिका व्यापते ती पुढील अर्की पाहूं.

॥ श्री जटाजूटः शरणम् ॥

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

श्लोक ३

योगानंदकरी रिपुक्षयकरी धर्मार्थनिष्ठाकरी।
चंद्रार्कानलभासमानलहरी त्रैलोक्यरक्षाकरी ॥
सर्वैश्वर्यसमस्तवांछनकरी काशीपुराधीश्वरी।
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥ ३ ॥

आई! तू कशी आहेस? **योगानंदकरी**......योगाचा आनंद एकरूप झाल्यावर, अद्वैत प्राप्त झाल्यावरच मिळतो; त्यासाठीं द्वैत विसरावं लागतं. संपूर्ण विश्वाला विसरल्यावर, 'अहम्'ला विसरल्यावर नंतरच अद्वैताचा आनंद मिळतो. परंतु याठिकाणीं 'योगानंद करी' वापरून शंकराचार्यांना असं म्हणायचं आहे कीं, अद्वैताचा आनंद द्वैतातही मिळतो. तो कसा? ही गोष्ट आपला आत्मशक्तीशीं कसा संबंध आहे यावर अवलंबून आहे. भगवान् गीतेंत सांगतात-**ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्।** तुम्हीं प्रभूशीं जसा संबंध ठेवाल तसा प्रभु तुमच्याशीं ठेवील

**रिपुक्षयकरी** शत्रुत्व नाहीसं होतं. जोपर्यंत मी कर्माचा सिद्धांत मानतो तोपर्यंत सुख-दुःख, शत्रू वगैरे असणारच. परंतु भक्तीचा संबंध स्थापित केल्यावर कोणी शत्रु राहाणारच नाहीं. कारण भक्तीच्या सिद्धांतामध्यं चिच्छक्ति कोणत्या स्वरूपानं भेटायला येते हा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं.

आध्यात्मिक शत्रूत, काम तुला पाहूनाच नाहीसा होतो. क्रोध तुझ्या दर्शनानं नाहीसा होतो परंतु मी लोभापासून मुक्त होऊं शकत नाहीं, याचं कारण मला त्याचं आकर्षण आहे. लौकिक कामना जरी सोडल्या तरी स्वर्गाचा लोभ आहेच. परंतु स्वर्गलोकही क्षीणेपुण्ये मर्त्यलोकं विशन्ति। पुण्य संपल्यावर माणूस पुन्हा मृत्युलोकांत येतो. या उक्तीप्रमाणं क्षीण होणार आहे हें कळल्यानंतर स्वर्गाचा लोभ सुटेल पण निसर्गाचा लोभ राहि

तुझ्या मांडीवर बसण्याचा लोभ होतोच परंतु तो कुठपर्यंत राहाणार? आईवर ज्याचा विश्वास नाहीं त्याचा लोभ राहील. पण ज्याचा तुझ्यावर विश्वास आहे, त्याचा लोभ कमी कमी होत जातो. आमच्या धर्मशास्त्रांत चोरापेक्षां कंजूप माणसाला जास्त पापी मानण्यांत आलं आहे. भावमय जीवनाला आमच्या शास्त्रकारांनीं जास्त महत्व दिलेलं आहे. म्हणूनच माणसाचा कंजूषपणा हें मोठं पाप मानलं गेलं आहे. भावजीवनांत व आध्यात्मिक जीवनांत कंजुषाला किंमतच नाहीं. पण आई! हा लोभ कुठपर्यंत राहाणार? जोंपर्यंत तुझं दर्शन झालं नाहीं तोंपर्यंत. पण तुझा आश्वासनाचा शब्द ऐकला कीं लोभ नाहींसा होतो.

लहान मुलाला आईनें दोन लाडू दिले तर तो त्यांपैकीं एक खातो व दुसरा कुणालाही न देतां दुपारीं भूक लागली तर खायला उपयोगी पडावा म्हणून राखून ठेवतो. पण आईनं सांगितलं कीं, बाळ! हा दुसरा लाडू शेजाराच्या मधूला दे, तुला मी आणखीं देईन. लहान मुलाला आईचें हें आश्वासन मिळतांच तावडतोब दुसरा लाडू तें मधूला देऊन टाकतं म्हणून आई! जोंपर्यंत तुझ्या तोंडून आश्वासन आलं नाहीं तोंपर्यंत लोभ राहाणारच. तोंपर्यंत माझं कसं होणार ही काळजी जीवनांत राहाणारच. पण आई! तुझ्या वरील विश्वासानं लोभ नाहींसा होतो. पण हा विश्वास केव्हां निर्माण होतो? प्रेम असेल तरच. आई! तुझ्यावर प्रेम असेल तर विश्वास निर्माण होतो आणि विश्वास निर्माण झाला कीं लोभ पार नाहींसा होतो.

संसार व परमार्थ यांत फारसं अंतर नाहीं. जसे व्यवहारांत आपण मुलांशीं वागतों तशीच ही जगदंबा आपल्याशीं वागते. प्रत्येक घरांत जसा व्यवहार चालतो तसाच प्रकारचा व्यवहार ज्ञानी, भक्त आणि संत यांच्याशीं असतो.

मूल खेळणं देऊन टाकतं कारण त्याचा आईवर विश्वास असतो. शेजाऱ्याच्या मुलाला दे म्हटल्याबरोबर तावडतोब देत नाहीं. पण दुपारीं दुसरं देईन म्हटल्याबरोबर तावडतोब तें देऊन टाकतं. आईवर विश्वास आहे, प्रेम आहे आणि त्यांत आश्वासनही आहे. इतक्या गोष्टी झाल्यावर लोभ रहातच नाहीं. संग्रह कशाला करायचा? आई मला देणार आहे मग संग्रह कशासाठी?

**काम**-लहान मुलाजवळ हा विकार नसतो. तसेंच कांहीं एक विशिष्ट वय झाल्यानंतरही हा विकार नाहींसा होतो. क्रोध हा विकार सर्वव्यापी नाहीं. परंतु लोभ हा सर्वव्यापक आहे. लहानापासून वृद्धापर्यंत सर्वांना लोभ असतो. मुक्त होणाऱ्या जीवालाही लोभ असतो. कदाचित् तो सात्विक लोभ असेल. ईश्वराच्या चरणकमलांचा लोभ असेल. लोभ सर्वांनाच असतो. परंतु आईच्या आश्वासनाचे शब्द ऐकले कीं लोभ नाहींसा होतो.

**मोह**-कोणतीही वस्तु पाहिल्यावर मोह निर्माण होतो. पण तुझ्यांशीं एकदां संबंध जडला कीं, मोहाचा नाश होतो. मी मोहित होतों हें खरें पण तितक्यांतच तुझें स्मरण होनें व वाटतें, मी मोहित होतों यांत माझी क्षुद्रता आहे. माझ्या आईला काय वाटेल याचें स्मरण होतें.

**मद**-थोडा पैसा मिळाला, थोडी विद्या प्राप्त झाली कीं, गर्व होतो. माणूस मिजासी होतो. माझ्याजवळ विद्या, संपत्ति, कीर्ति असें सर्व प्रकारचें सामर्थ्य आहे व त्यामुळेंच माज चढतो. पण आई! एकदां तुझ्याकडे पाहिलें कीं वाटतें, तुझ्यांत सर्व विश्वाचें सामर्थ्य एकवटलेलें आहे. **कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्।** अशा प्रकारचें सामर्थ्य असूनही तूं सामान्य होऊन आमच्यांत राहातेस. जिच्याठिकाणीं लोकोत्तर शक्ति आहे, जिच्या अंगावरून नुसता वारा आला तरी माणूस कोट्याधीश होतो असें असतांनाही तूं सामान्यांतली सामान्य होऊन राहातेस मग माझ्याठिकाणीं मद राहिलच कसा? जितक्या प्रमाणांत ईश्वराचें वैभव ध्यानांत येतें तितक्या प्रमाणांत मद कमी होतो. विश्व जिच्या कृपाकटाक्षानें चालतें; चंद्र, सूर्य जिच्या भृकुटीकडे ध्यान देऊन चालतात अशी महान शक्ति असलेली आई माझ्याजवळ सामान्य होऊन राहाते, खेळते, रमते. शास्त्रांची श्रेष्ठता, वैदिक वाङमयाची भव्यता, दिव्यता आणि लोकोत्तरपणा या गोष्टी पाहून मस्तक नम्र होतें. अशा प्रकारचे वेद वाचल्यावर मिजास चढते कीं. इतकें श्रेष्ठ वाङ्मय जें कोणाला माहीत नाहीं तें मी वाचलें आहे. हें वाङ्मय वाचलें तर एवढा मद मग ज्यानें हें वाङमय लिहिलें, निर्माण केलें त्याला किती गर्व व्हायला पाहिजे! हें वाङमय निर्माण करणारी माझी आई किती बुद्धिमान असेल! अशा प्रकारचें पूर्ण ज्ञान ज्याला झालें तो कृमिकीटकांतही बसतो. मोठ्या विद्वानाच्या अंगांत राहाणारें चैतन्य, गाढवाच्या आणि वासराच्याही

शरिरांत सामान्य होऊन राहातें हें पाहिल्यावर गर्व राहिलच कसा?

**मत्सरः**–आई! आजपर्यंत जर कुणाचं भलं झालं तर मी त्याचा मत्सर करीत होतों. पण तुझ्याशीं संबंध आल्यापासून सर्व विश्वच माझं आहे असं मला वाटतं. जगाशीं अशा प्रकारचे आत्मीय संबंध स्थापित केल्यानंतर मी परका नाहीं; मी घरचाच असल्यामुळं माझी कांहीं तक्रारच नाहीं. घरीं आल्यानंतर आईनं चौघांना चहा दिला व मला दिला नाहीं तर माझी तक्रार नसते. परंतु परका मानल्यावर, पाहुणा झाल्यावर जर पांचा पैकीं एकाला चहा मिळाला नाहीं तर तात्काळतेच तक्रार होते. जोंपर्यंत तक्रार असते तोंपर्यंत आत्मीयतेचा दृष्टिकोण नसतो.

मी माझ्या आ.च्या घरीं आहें अशी भावना झाल्यावर सृष्टि स्वतःचीच आहे असं वाटतं. या सृष्टिशीं तादात्म्य झाल्यावर सृष्टींत राहाणारे सर्व प्राणी माझे आहेत अशी भावना होते. कुणाचीही उन्नति पाहिली तरी माझाच भाऊ आहे असं वाटल्यावर मत्सर उत्पन्नच होणारच नाहीं. जोंपर्यंत हा परका वाटतो तोंपर्यंत मत्सर वाटतो पण आत्मीयता निर्माण झाल्याबरोबर त्याची उन्नति पाहिल्यावरही मत्सर वाटेनासा होतो.

दुसऱ्याचं दुःख पाहिल्यानंतर मत्सर वाटत नाहीं पण सुख पाहिल्यानंतर मत्सर वाटतो. योगदर्शनकार सांगतात–**मैत्रीकरुणामुदिता।**

ही सृष्टि माझ्या आईची आहे आणि सृष्टींतील प्राणी आईचे आहेत व त्यामुळं ते माझे भाऊ आहेत. म्हणून त्यांच्या वैभवाकडं पाहून मला मत्सर वाटत नाहीं. जितक्या प्रमाणात सृष्टीशीं आत्मीयतेचे संबंध प्रस्थापित होतील तितक्या प्रमाणांत दुसऱ्याचं वैभव पाहून आनंद होईल, मत्सर वाटणार नाहीं.

काम, क्रोध, लोभ, मद मोह आणि मत्सर हे षड्रिपु मला सतावतात पण आई! तुझ्याशीं संबंध जोडल्यावर त्यांच्यातील शत्रुत्वाचा दंश नाहींसा होतो. तुझ्याशीं जोडलेला आत्मीय संबंध ध्यानांत आल्याबरोबर हे शत्रु निघून जातात.

हे सहा शत्रु काढून टाकण्याचा प्रयत्न केला तरी जाणार नाहींत. त्यांना दाबूनही ठेवणं शक्य नाहीं, तर जीवनाचा दृष्टिकोण बदलून

(Divine Attachment) दैवी संबंध किंवा आकर्षण निर्माण होईल तरच शेजाऱ्या विषयीं मत्सर निर्माण होणारा नाहीं दैवी संबंध स्थापित झाल्यावरच शेजाऱ्याविषयीं मत्सर वाटणार नाहीं. कारण मग शेजाऱ्याला वैभव मिळालं तर मला वाटतं कीं, यानं माझ्या आईची सेवा केली असेल. माझ्या आईचा सेवक झाला असेल म्हणून. याला वैभव मिळालं असेल अशा प्रकारचा आत्मीयतेचा संबंध वाटला कीं, मत्सराला स्थानच राहात नाहीं. दैवी संबंध स्थापन झाल्यावर शत्रूच्या मधलं शत्रुत्वच नाहींसं होतं.

**धर्मार्थनिष्ठाकरी ...** माझी धर्मा विषयीं निष्ठा असली पाहिजे. धर्माविषयीं निष्ठा कोण निर्माण करतं? आई निर्माण करते. श्रीमद् शंकराचार्यांच्या स्तोत्रांत ही गोष्ट बरोबर नाहीं असं वाटतं. कारण शंकराचार्य हे महान-बुद्धिनिष्ठ (Rational) होते. धर्माविषयीं निष्ठा कोण निर्माण करतो? सर्व सामान्य माणसाची धर्मावर जी श्रद्धा आहे ती फळामुळं आहे. आपल्याला कांहीं ना कांहीं फळाची अपेक्षा आहे, म्हणून आपण धार्मिक आहोंत. आपण श्रावण महिन्यांत धार्मिक क्रिया करतों कारण त्याचं फळ या जन्मांत किंवा पुढच्या जन्मात तरी मिळेल. या दृष्टीनंच सर्व धार्मिक क्रिया केल्या जातात. अशा प्रकारची धर्मनिष्ठा निर्माण करायला आईची गरज नाहीं.

मीमांसा-शास्त्रकार तर-धर्मावरच सगळा भार टेवतात. अमुक कर्म केलं कीं अमुक एक प्रकारचं फळ मिळणारच. यांना दुसऱ्या कशाचीही गरज नाहीं. अशा तऱ्हेनं या फळामध्यं धर्मनिष्ठा उभी करण्याची शक्ति आहे. मग ती आईत कुठून असणार? या श्लोकांत धर्मनिष्ठा दृढ करण्याची शक्ति आई मध्यं आहे असं शंकराचार्यांना सांगायचंच नाहीं. संपूर्ण मीमांसाशास्त्र सगुण भगवान मानीतच नाहीं. तें वेदांना मानतं. विधिनिषेध मानतं. माणूस फळामुळं धार्मिक आहे. अशा प्रकारं भगवानाला न मानणाराही धार्मिक असू शकेल. कारण त्याला चांगल्या फळाची अपेक्षा आहे. अशाप्रकारं फळामध्यं धर्मनिष्ठा निर्माण करण्याचं सामर्थ्य आहे. मग ही धर्मनिष्ठा तुझ्यामुळं नाहीं का निर्माण होते? आई! त्यालाही तूंच कारणीभूत आहेस. इथं धर्म शब्द प्राणिधर्म वाचक आहे.

**अहं ब्रह्मास्मि** असा आत्मसाक्षात्कार झाला कीं, आत्म्याचं भान होतं. पण आई! तुझ्याशीं नातं जडल्यावर **अहं ब्रह्मास्मि** होण्याची इच्छाच नाहीं.

आई! तुझ्या प्रेमप्रवाहांत स्नान केल्यावर मला जीव धर्मच आवडतो. मला देव धर्माची गरज नाहीं. आई! तुझ्याशीं नातं जोडल्यावर मला जीव म्हणूनच राहाण्याची तीव्र इच्छा आहे. मला देव व्हायचं नाहीं जीव म्हणूनच राहायचं आहे. वेदान्त सांगतो कीं, मी देव होतों. वेदांतावर पूर्ण विश्वास आणि आदर ठेवूनच मी सांगतों कीं, भक्तीच्या राज्यांत प्रवेश केल्यावर मला **अहं ब्रह्मास्मि** होण्याची इच्छा नाहीं. वेदांत सांगतो कीं, तूं मुक्त हो. हा सिद्धांत चांगला वाटतो. हें शाश्वत सत्य आहे. पण आई! तुझ्यांशीं जडलेल्या नात्यामुळं, प्रेमामुळं मला ही इच्छाच होत नाहीं. आई! तुझ्यावरील प्रेमाची उत्कटता वाढली कीं मला मुक्त होण्याची इच्छाच होणार नाहीं. मला जीव म्हणूनच रहायचं आहे

जे ज्ञानानं परिपूर्ण होते, दुनियेंतल्या क्षुद्र व्यवहारांविषयीं ज्यांना आसक्ति नव्हती व मोक्ष ज्यांच्या पायाशीं होता असे जगद्‌गुरु शंकराचार्य म्हणतात कीं, मला जन्म दे **नमोक्षस्याकांक्षा ....अतस्त्वांसंयाचे जननि जननं यातु ममवै।** हे म्हातारीचे शब्द नव्हत. हे शंकराचार्यांचे शब्द आहेत. शंकराचार्य म्हणतात- 'मला जीव होऊं दे. मला देव व्हायचं नाहीं.' आईच्या प्रेमाची दिव्यता, लोकोत्तरपणा, उत्कटता किंवा तीव्रता ज्यावेळीं उत्कट होते त्यावेळीं आपल्याला मुक्ति नको असंच वाटतं. कारण जीवधर्म नाहींसा झाल्यावर देव धर्म प्राप्त होतो. पण त्यांना जीवधर्माचीच इच्छा आहे. तुकाराम महाराज म्हणतात **नलगे मुक्ति धनसंपदा...।** मला जन्म हवा आहे. मला जगायचं आहे. अहो! जीव असेल तरच वासना आणि लालसा राहाणार! वासना आणि लालसा खुशाल राहोत; त्यांतही आनंदच आहे. आईविषयीं वासना आणि लालसा असायलाच पाहिजे. मुलानं आईजवळ हट्ट केला तर आईला आनंद होतो. मुलानं आईजवळ हट्टच केला नाहीं तरच आईला चमत्कारिक वाटतं. मुलगा जर फारच शहाणा झाला तर आई तक्रार करते. मुलगा विद्वान झाला, मोठा झाला आणि त्यानं आईजवळ कांहीं मागितलंच नाहीं. तर आईला कसंसंच वाटत. पण आईला असं वाटत असतं कीं, मुलानं थोडा हट्ट धरावा, आपल्याजवळ मागावं. ही सगळी क्रीडा आहे. त्याचा आनंद कांहीं वेगळाच असतो. याचंच नांव जीवन होय.

या जीवनांत आनंद आहे. इतर लोक दिवस घालवीत असतात. सृष्टीकडे क्रीडा या दृष्टीनं पाहाल तरच आनंद मिळेल. नाहीं तर हें जीवन म्हणजे एक शिक्षा वाटेल. मला कांहीं नको यापेक्षां मला कांहीं हवं आहे आणि मी तें आ जवळ मागेन ही गोष्ट मला अतिशय आवडते. कांहीं मुक्तीसाठीं उपासना करतात तर कांहीं भुक्तीसाठीं उपासना करतात. पण मला यांपैकीं कांहींही नको. आई! मी फक्त तुझ्या प्रेमासाठीच जगावं अशी ईच्छा करतो.

अलौकिक प्रेम निर्माण झालं आणि या प्रेमप्रवाहांत स्नान करण्याची संधि मिळाली तर हा जीवधर्म परिणत अवस्थेला पोचेल. वेदांतावर प्रेम असून आणि त्यांतील सिद्धांतावर प्रेम ठेवूनही जिवाला शिवपण प्राप्त होण्यापेक्षां जीव रहाण्यामध्येंच मजा आहे.

उपासनेचा अर्थच हा आहे कीं, तुम्हांला मुक्ति किंवा भुक्ति यांपैकीं कांहीं तरी हवं आहे वास्तविक मला मुक्तीची किंवा भुक्तीची मुळींच ईच्छा नाहीं मला जीव म्हणूनच राहूं दा. **स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।** वेदांत मला परधर्म सांगतो पण मला तर स्वधर्माची आवश्यकता आहे. आई! तुझं दर्शन व्हावं, तुझ्या प्रेमप्रवाहांत स्नान करायला मिळावं एवढी एकच इच्छा आहे

**चंद्रार्कानलभासमानलहरी......**चंद्र, सूर्य आणि अग्नि. चंद्रासारखी शीतलता आहे, सूर्यासारखी कांति आहे आणि अग्नीसारखं तेज आहे. या तिन्ही गोष्टी तुझ्याठिकाणीं आहेत.

आ ची कांति शीतल आहे. चंद्र पाहिल्याबरोबर सागर ज्याप्रमाणं उचंबळून वर येतो त्याचप्रमाणं आईला पाहिल्याबरोबर या हृदयसागराला भरती येते. चातुर्मासांत चंद्र पाहायला मिळत नसे म्हणून जुन्या काळच्या लोकांना चैन पडत नसे. म्हणूनच शरद् पूर्णिमेच्या दिवशीं चंद्राला पाहाताच लोक वेडे होऊन जात. तीन महिन्यानंतर चंद्र दर्शन झाल्यामुळ लोक चांदण्यांत बसतात, नाचतात, बागडतात आणि शरद्पूर्णिमा साजरी करतात. आपण कधींही तल्लीन होऊन निसर्गाकडे पाहातच नाहीत. आमचं जीवन भावनाशून्य आणि ममत्वरहित झालेलं आहे. म्हणूनच चंद्र दर्शन झालं नाहीं तर आम्हांला त्याचं कांहींच वाटत

नाहीं. आपण हिरवीगार वनश्री पाहाण्यासाठीं वेडावून जातच नाहीं. **एका धर्म एका धर्म सर्वत्र एकटकायतो** हा सिद्धांत मानणारे लोक राक्षस आहेत. हें ईश्वराचं काम आहे. ईश्वराच्या हक्कावर आपण आक्रमण करता कामा नये पण एवढंच सांगतां येईल कीं, हीं माणसं नव्हत. सृष्टीशीं तादात्म्य संपादन केलं नाहीं, हिरवळ पाहिली नाहीं, वाऱ्यानं डोलणारं, हसणारं, नाचणारं, वागडणारं, गवत पाहिलं नाहीं म्हणूनच आज आपलं जीवन भावनाशून्य व ममत्वरहित होत चाललं आहे. संपूर्ण गावाला चोल्या, चंद्राच्या शीतलतेचा अनुभव घ्या, नाचा, गा, बसा; खूप आनंद लुटा कोणी दूध आणा, तर कोणी पोहे आणा आणि त्या बरोबरच चंद्राच्या शीतलतेचा अनुभव घ्या. आज फक्त पोहेच राहिले आहेत. कोणीही निसर्गाकडे आत्मीयतेनं पाहात नाहीं. कोणाला जायला सवडच नाहीं त्यामुळंच लोक निसर्गांत लीन होत नाहींत. तर मग चंद्राच्या शीतलतेचा अनुभव कसा मिळणार ?

अर्क म्हणजे सूर्य. आई ! तूं सूर्यासारखी प्रभावी आहेस. वाणींत प्रभाव असला पाहिजे. आई! तुझ्या वाणींत प्रभाव आहे. आजवर आठवड्याच्या शेवटीं आईबापाची व मुलांची गांठभेट होते आईबापांना वाटतं कीं, मुलांच्या मनांतून आम्हीं उतरलों तर मग काय होणार? म्हणूनच आईबाप कडक होऊं शकत नाहींत. आई ! तूं प्रेमळ असूनही तुझ्या शब्दांत धाक आहे, प्रभाव आहे, तुझ्या तोंडांतून शब्द निघाला कीं, मला त्याची पूर्ती केलीच पाहिजे. चंद्रासारखी शीतल असूनही सूर्यासारखी प्रभावी आहे.

अनल म्हणजे अग्नि. आई ! तूं अग्नीसारखी महान परोपकारी आहेस. सूर्य तेजस्वी खरा पण त्यालाही दूर ठेवलें आणि कडकडीत थंडी पडली असेल तेव्हां अग्नीपासूनच उष्णता घेतो. अग्नीजवळ बसलें तर उष्णता लागते. सूर्य प्रखर तेजस्वी असल्यामुळं त्याच्याकडं पहावत नाहीं. पण अग्नीजवळं एक आश्चर्यकारक तत्त्व आहे. थंडीपासून निवारण करण्यासाठीं जर उष्णता हवी असली तर अग्नीजवळ बसावें असं वाटतं. अग्नी उपकारक आहे. आई ! तूं अग्नीसारखी आहेस. माझ्याजवळ वसतेस. आई जवळ बसल्यामुळं उष्णता मिळते. चंद्रसूर्याजवळ बसतां येत नाहीं. म्हणूनच चंद्र, सूर्य आणि अग्नि यांचं तेज जिच्या मुखावर झळकत आहे अशी तूं आहेस.

**त्रैलोक्यरक्षाकरी**......त्रैलोक्याची रक्षा करणारी आई तूंच आहेस. आई! या त्रैलोक्यचं रक्षण करण्याचं तू कंकण बांधलेलं आहेस.

एक दंतकथा प्रसिद्ध आहे. शिवाजीमहाराज एकदां एक किल्ला बांधीत होते. हजारों लोक काम करीत होते. शिवाजीमहाराजांच्या मनांत असं आलं कीं, इथं हे इतके लोक काम करीत आहेत त्यांचं रक्षण मी करतों. त्यांचं पोषण माझ्यामुळं होतं.

आजकालचे शिवाजीरावही असंच बोलतात कीं, ही फॅक्टरी काढून शंभर माणसांचं मी पोट भरीत आहें. हें ढोंग आहे. आमचे शास्त्रकार म्हणतात कीं तुम्हीं दुसऱ्यांना मजूरी देतां यांत तुमचाच स्वार्थ आहे किंवा ईश्वराचं कार्य आहे; यापेक्षा तिसरी गोष्ट शक्य नाहीं. आपण एखादा नोकर ठेवला तर आपल्याला असं वाटतं कीं, मी एकाचं पोट भरीत आहें. त्यामुळंच नरसी मेहता म्हणतो कीं, 'मी करतों, मी करतों याचंच नांव अज्ञान.' गाडीखालून चालणाऱ्या कुत्र्याला नाहीं का वाटत कीं, या गाडीचा भार मीच वाहात आहें. तशीच ही गोष्ट आहे.

शिवाजीमहाराजाना अहंकार झाला आहे हें कळतांच रामदास स्वामीना वाटलं कीं हा भयंकर रोग आहे. याला तावडतोब उपाय केलाच पहिजे त्यांच्यासमोर एक मोठा दगड होता. रामदासस्वामी म्हणाले कीं, शिवबा! हा दगड फोडायचा आहे. शिवाजीमहाराज विचारांत पडले. पण गुरुजींची आज्ञा! एका बेल्दाराला दगड फोडायला हुकूम केला. बेल्दारानं दगड फोडल्याबरोबर त्यांतून एक जिवंत बेडूक बाहेर पडला. त्या वेळीं रामदास-स्वामी म्हणाले कीं, शिवबा! या बेडकाचं रक्षण सुद्धां तूंच करतोस नाहीं का? शिवाजी महाराज समजले व त्यांनीं तावडतोब रामदासांचे पाय धरले.

प्रेमळता आणि कोमलता हे दोन गुण प्रभूनं प्रत्येक आईच्या ठिकाणीं ठेवलेले आहेत. त्यामुळंच तर आई सर्व मुलांचं संगोपन करते. आ जवळ जर प्रेम नसतं तर मूल झाल्याबरोबर आईनं मुलाला सोडून दिलं असतं. परंतु त्यासाठींच प्रभुनं तिच्या ठिकाणीं प्रेम निर्माण केलं आहे. म्हणूनच आईचे ठिकाणीं ममत्व निर्माण झालेलं आहे. अशा रीतीनं आई! विविध रूपांनीं तूंच या त्रैलोक्याचं रक्षण करीत आहेस; पण तुझ्या इच्छेप्रमाणं

आपण लहान मुलांना जसं वाटतं तसं संगोपन न करतां त्याच हित करूं होईल या दृष्टीनं संगोपन करतों, त्याला समजावतों, कधी कधीं त्याला धाक दाखवतों तर कधीं दमदाटी देऊनही त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला शिक्षण देतों. त्याचप्रकाणं ईश्वर आपल्या इच्छेप्रमाणं जगाचं संगोपन करतो. तुला शाळेंत जायचं असेल तर जा; असं मुलाला सांगितलं तर मुलगा शाळेंत जाणार नाहीं व या जगांत एकाही शाळेची गरज भासणार नाहीं. म्हणून आपल्या इच्छेप्रमाणं आपण जसं मुलाचं लालनपालन करतों त्याचप्रमाणं जगदंबा आपल्या इच्छेप्रमाणं लोकांचं लालनपालन करते.

**सर्वैश्वर्यसमस्तवांछनकरी**.... आई! संपूर्णपणं ऐश्वर्य देण्याची शक्ति तुझ्या ठिकाणीं आहे. समस्त ऐश्वर्याची इच्छा तूंच पुरी करूं शकशील. भौतिक ऐश्वर्य किंवा मानसिक ऐश्वर्य आई! तुझ्याच कृपेनं मिळूं शकतं. वाल्याकोळ्याचा वाल्मीकि ऋषि झाला तो तुझ्याच कृपेमुळं. क्रौंच पक्षांच्या जोडप्यापैकीं एका पक्षाला एका पारध्यानं बाणान विद्ध करून खाली पाडतांच त्याचं अंतःकरण द्रवित झालं व त्याच्या तोंडून पुढील उद्गार बाहेर पडले —

मा निषादप्रतिष्ठांत्वमगमःशाश्वतीःसमाः।

मूर्खपणा पाहिल्यानंतर स्वस्थ बसवत नाहीं. वाल्मीकींची पण अशीच अवस्था झाली असावी व त्यांनीं पारध्याला शंभर वर्षेपर्यंत प्रतिष्ठा मिळणार नाहीं असा शाप दिला असेल. यालाच मानसिक ऐश्वर्य म्हणतात.

बौद्धिक ऐश्वर्यही असंच असतं. याज्ञवल्क्यांचे बौद्धिक जीवन पाहून आपण आश्चर्यनं थक्क होतों. ब्रह्मलोकापर्यंत त्यांनीं तयारी केली होती. शिवाचा डमरू वाजतांच पाणिनीच्याबुद्धींत ज्ञानाचा प्रकाश पडला. पाणिनीचं एकही सूत्र बदलण आजवर कोणाला शक्य झालं नाहीं. हें बौद्धिक ऐश्वर्य कुठून आलं? हें बौद्धिक तुझ्यापासूनच मिळालं.

तुझ्या मांडीवर बसणं हेंही एक आगळं ऐश्वर्य आहे. आईचा आदार करणं हें सुद्धां एक ऐश्वर्यच आहे. आईचा अंतःकरणापासून आदर करणं हें फारच मोठं ऐश्वर्य आहे. सुरुवातीला साधक म्हणतो कीं आई! एकदां मला तुझ्या अस्तित्वाची खूण दाखव. तुझ्या महात्म्याचे गुण वाचले, शिल्पकारानं

तयार केलेली सुन्दर मूर्ति पाहिली व भावपूर्ण अंतःकरणानें नमस्कारही केला पण डोळे उघडून पाहिलें तों तुझ्या अस्तित्वाचें चिन्हच दिसेना. कांहीं ठिकाणीं बुद्धीचें चापल्य असतें म्हणून शिल्पकाराच्या मूर्तीत सौंदर्यपूर्ण कला दिसते, पण आई दिसत नाहीं. माझ्याजवळ बुद्धि असेल तर एखादं नवं शास्त्र निर्माण करीन. माझ्याजवळ उत्कृष्ट प्रतिभा असेल तर मी एखादं सुन्दर काव्य लिहीन. परंतु हें सर्व मानवी चातुर्य आहे. आई! तुझ्याविषयीं प्रेम निर्माण होण्याकरितां तुझ्या अस्तित्वाची एखादी खूण जोंपर्यंत दिसत नाहीं तोंपर्यंत तुझ्यावर प्रेम बसणार नाहीं. तर मग बुद्धि कुठं स्थिर करायची?

यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यऽज्ज्ञातव्यमवशिष्यते।

अशा प्रकारची एखादी खूण दाखव आई! मी काय करणार? चालता बोलता, पावलोपावलीं तुझं अस्तित्व मला समजलं तरच माझं वैभव वाढेल. माझ्या शरिराची किंमत वाढेपर्यंत हें शरीर म्हणजे हाडं व मांस याचा गोळा या शरिराची किंमत वाढायला तुझ्याशिवाय कोण उपयोगी पडणार? क्षुद्रता नाहींशी झाली म्हणजे माझं वैभव मला कळून येईल. सनातन ब्रह्म माझ्याशीं बोलतं, चालतं आणि त्यामुळंच मला किंमत आहे ईश्वरी प्रेम वाढलं तरच माझी किंमत वाढते पण त्यासाठीं वेगळी दृष्टी असायला हवी

हें सर्व समजायला ज्ञानाची गरज आहे प्रेम हव म्हणूनच शंकराचार्य द्रवित अंतःकरणान मागणी करीत आहेत कीं—

भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी। आई! यासाठीच मला ज्ञान आणि प्रेम याची भिक्षा दे!

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

## श्लोक ४

कैलासाचलकंदरालयकरी गौरी उमाशंकरी
कौमारी निगमार्थगोचरकरी ॐ काराबीजाक्षरी॥
मोक्षद्वारकपाटपाटनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥ ४ ॥

आई! तूं कैलासपर्वताच्या गुहेत राहातेस. घर समजून तिथं तूं निवास केलेला आहेस. कशासाठीं? तपश्चर्या करण्यासाठीं का? अशी एक पौराणिक कथा आहे कीं, शिवप्राप्तीसाठीं पार्वतीनं कैलास पर्वतावर तपश्चर्या केली होती. वस्तुतः चिद्घन शक्तीला सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय करणाऱ्या चित्शक्तीला तप करायचं तरी कारण काय? या चित्शक्तीला शंकराचार्य 'आई' अशी हाक मारतात. ती सर्वज्ञ, सर्व श्रेष्ठ असूनही तप करते. आई! तूं शंकराच्या प्राप्तीसाठीं का तप केलंस? होय. **शं करोति इति शंकरः।** जो कल्याण करतो तो शंकर. आईनं तप केलं तें स्वतःसाठीं नव्हे तर माझ्या कल्याणासाठीं केलं.

आईचं मुलावर अंतःकरणापासून प्रेम असावं आणि मुलगा चोर, हरामखोर निघाला म्हणजे तिला अतिशय दुःख होतं. मुलाच्या कल्याणासाठीं आई व्रत घेते. उपास करते. आई दर पंधरा दिवसांनीं उपास करते. कशासाठीं? स्वतःसाठीं नव्हे. तर मुलगा सुधारावा यासाठीं. शंकराचार्य म्हणतात कीं, हे आई! मी बिघडलेला आहें. मी क्षुद्र झालों आहे व हें पाहून तुझं अंतःकरण तिळतिळ तुटत आहे. तुला दुःख होत आहे. म्हणून आई! तूं तप करतेस. तें तप शंकराच्या प्राप्तीसाठीं नसून माझं कल्याण व्हावं यासाठीं आहे. मी सुधारावा, माझं कल्याण व्हावं यासाठीं तूं तप करतेस. म्हणून हें तप नसून व्रत आहे. कारण तपांत निष्कामना असते आणि व्रतामध्यें कामना असते. फळाची आकांक्षा असते.

व्रत आणि तप दोन्ही समानच वाटतात. व्रत आणि तप करणारीं माणसं

उपासाचें बंधन मान्य करतात परंतु व्रत आणि तप करणाऱ्यांमध्यें मानसिक फरक आहे. व्रत सकाम असतें आणि तप निष्काम असतें.

सामान्य मातासुद्धां मुलावरील प्रेमाखातर - तो परीक्षेंत पास व्हावा, त्याचें कल्याण व्हावें म्हणून कष्ट सहन करून व्रत करते मग जिचें या संपूर्ण सृष्टीवर प्रेम आहे अशी जगदंबा - स्वतःच्या मुलाचें कल्याण व्हावें म्हणून व्रत करणारच.

आई! मी अधःपतित झालों आहें. माझें कल्याण व्हावें म्हणून तूं हें व्रत केलेंस. माझ्यासाठीं कष्ट सहन करतेस. मी सुधारावा म्हणून कैलासाच्या गुहेंत जाऊन राहिली आहेस. **कैलासाचलकंदरालयकरी...** ही ओळ वाचल्याबरोबर वाचणाऱ्याला आपल्या अधःपतनाचा उद्वेग आला पाहिजे. स्वतःसंबंधींची चीड आली पाहिजे. आई! मी तुझा मुलगा आहे ना; मग माझें मन आकाशासारखें विशाल व्हायला पाहिजे. तें होत नाहीं तर दिवसें दिवस तें क्षुद्रच होत चाललें आहे. ज्या शरिरांत तूं राहिली आहेस तो मी इतका निस्तेज आणि लाचार? तेजस्वी होण्याऐवजीं निस्तेज कां झालों? शास्त्रकार सांगतात - **पूर्ण मदः पूर्ण इदम्।** मी भगवंतासारखा पूर्ण असतांना क्षुद्र कां बरें झालों? अधःपतनाच्या डबक्यांत राहून बेडकासारखी 'डरांव डरांव'ची गर्जना करीत बसलेलों आहें. जीवनविकास करून, प्रभुप्राप्ति करून घेण्याचें सामर्थ्य असलेला हा कर्तृत्ववान् जीव जीवन-विकास न करतां चार पैसे मिळविण्यासाठीं अधःपतित झालेला आहे. त्यासाठीं आई तपश्चर्या करीत आहे. आईला तप करावें लागलें याचें कारण माझी चूक आहे. तेजस्वी आसनावर विराजमान झालेली 'हिमांबरडंबरी' आई कुठें अन् क्षुद्र गोष्टींत रममाण झालेला मी कुठें! हें सर्व पाहून आई! तुला नक्कीच चीड येत असेल. आणि म्हणूनच माझ्या कल्याणासाठीं, मी सुधारावा म्हणून तूं गुहेंत बसून तप करीत आहेस.

एखाद्या सामान्य मुलानें चोरी केली व त्या आईनें पंधरा दिवस उपवास केला तर मुलाला वाटतें कीं; मी चोरी केली ही गोष्ट आईला आवडली नाहीं. माझ्यासाठीं आईला उपाशी रहावें लागलें. म्हणून मुलगा म्हणतो, आई! तूं जेवत नाहींस का? आई! तूं भोजन कर चूक तुझी नाहीं तर माझी आहे. मी चोर निपजलों. तुझी मी क्षमा मागतों पण आई! तूं भोजन कर. पापुढें

असली गोष्ट कधीही करणार नाहीं. हें ऐकल्याबरोबर आईचें हृदयही भरून येतें आणि मुलाचेंही हृदय भावपूर्ण होतें.

आई ज्यावेळीं उपास करते त्या वेळीं कांहीं फाजील मुलांना वाटतें कीं आईची चरबी वाढली असेल म्हणून करीत असेल उपवास झालें. चार दिवस होऊन गेले तरीही उपवास चालूच आहे. हें पाहातांच मुलाला वाटतें कीं पुढचा जन्म चांगला मिळावा, पुण्य मिळावें, म्हणून एखादें व्रत करीत असेल पण ज्यावेळीं मुलाला कळतें कीं, हें व्रत आई माझ्यासाठीं करीत आहे त्यावेळीं मुलगा धावत धावत जातो व आईचे पाय धरतो. याचप्रमाणें सुरवातीला आपणालाही असें वाटतें कीं, पार्वती स्वत:च्या स्वार्थासाठीं, स्वत:ला शंकरासारखा पति मिळावा म्हणून तप करीत असेल. परंतु नालायक मुलांना हें कळत नाहीं कीं, आई हे व्रत स्वत:साठीं करीत नाहीं. स्वत:ला चांगला वर मिळावा यासाठीं ही चित्‌शक्ति तप करीत असेल हें योग्य असेल काय? आई स्वत:साठीं तप करीत असेल असें म्हणणें म्हणजे आईवर एक प्रकारचा आरोप करण्यासारखें आहे. माझ्या ठिकाणीं अनेक दुर्गुणांचा प्रवेश झाला आहे व ते दुर्गुण जावेत यासाठीं आई आपल्या देहाला कष्टवीत आहे.

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदांधः समभवं ।
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ॥
यदा किंचित्किंचिद्बुधजनसकाशादवगतं ।
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदोमेव्यपगतः ॥

शंकराचार्यांसारख्या गूढ व्यक्तींनाही जेव्हां सत्संग होतो तेव्हां ध्यानांत येतें कीं मी किती मूर्ख होतो व आपण मानत असतो कीं आई स्वत:च्या स्वार्थासाठीं तप करीत असेल. शंकराचार्य म्हणतात, आई! जगानें मला चोर म्हटलें तरी चालेल पण तें मला चोर म्हणावेंस हा विचार पटत नाहीं. आई! मी माझी चूक सुधारीन. अद्यापपर्यंत उन्मत्त झालेल्या मला आतां समजत चुकलें आहे कीं, हे सारें तप तें माझ्याकरितां करीत होतीस. मी सुधारावें, यासाठीं तूंही आपल्या देहाला कष्टवीत होतीस. हा दृष्टिकोण स्वीकारूनच शंकराचार्य म्हणतात कीं आई! तूं **कैलासाचलकंदरालयकरी ...** आहेस. हा देहदंड स्वत:च्या स्वार्थासाठीं नसून स्वत:चीं मुलें सुधारावीं यासाठीं होता व ही गोष्ट ज्यावेळीं

ध्यानांत येईल त्यावेळीं आईवरील प्रेम वाटेल. पण ही गोष्ट सत्य आहे का? हो! अगदीं खरी आहे. यानंतर शंकराचार्य म्हणतात,- **गौरी उमाशंकरी**.... **गौरी.** गौरी म्हणजे निष्पाप आई! तूं गौरी आहेस. गौरी म्हणजे जिला रजोदर्शन झालं नाहीं अशी मुलगी. जगाची आद्यशक्ति, सृष्टीला नाचविणारी, चालविणारी, पालनपोषण करणारी जी शक्ति निच्याठिकाणीं असणाऱ्या प्रेमळपणा. कोमलपणा या गुणांमुळं तिला शंकराचार्य आई म्हणून हाक मारीत आहेत

आई झाली म्हणजे स्त्री झाली व स्त्री झाली म्हणजे पतीची इच्छा आलीच. यामुळंच पुराणांत लिहिलं आहे कीं, पार्वतीनं शंकर वर मिळावे म्हणून तप केलं, हें खोटं नव्हे. परंतु तें आपण नीट ध्यानांत घेतलं पाहिजे. हा पहिला धडा आहे व हा एकच धडा लहानपणापासून म्हातारपण येईपर्यंत घोकीत राहातों. याच्यापुढं एक पाऊलही टाकीत नाहीं. पुढं विकास किंवा साधनाच नाहीं. मग हें सारं कसं लक्षांत येणार?

जगत् आणि जगदीश यांच्यासंबंधीं असलेलीं रूपकं समजून घेतलीं पहिजेत. केवळ शब्दार्थ घोकीत बसता कामा नये. म्हणूनच शंकराचार्य म्हणतात कीं तूं गौरी आहेस, निष्पाप आहेस. तूं आई आहेस म्हणून तप करीत आहेस. शंकर याचा अर्थ भगवान्. शंकर पति मिळावा यासाठीं नव्हे तर मी क्षुद्र झालेल्या आहें, अधःपतित झालेल्या आहें, तो सुधारावा. माझं कल्याण व्हावं यासाठीं आई! तूं हें व्रत करीत आहेस.

**उमाशंकरी**.... कैलासाचलकंदरालयकरी आणि उमाशंकरी यांमध्यं गौरी शब्द घातलेला आहे. याचं कारण आपल्या मनांत निर्माण झालेला गैर समज दूर व्हावा यासाठीं उमा या शब्दांत 'उ' हें मुलीला उद्देशून संबोधन आहे व 'मा' म्हणजे करूं नकोस.

पार्वती अत्यंत कडक तपश्चर्या करीत होती त्यावेळीं तिला आईनं हाक मारली - 'उ'! म्हणजे हे मुली! 'मा.' असं करूं नकोस. इतकी कडक तपश्चर्या करूं नकोस. यामुळंच तुझं नांव उमा असं पडलेलं आहे. हा सर्व विचार पौराणिक दृष्टीनं झाला. परंतु आपली ही जगदंबा एक स्त्रि आहे. परंतु तिला पतीची आवश्यकता नाहीं. त्याचप्रमाणं या चिद्घन शक्तीला कोणी आई पण नाहीं कीं जी तिला उमा म्हणून हाक

मारील. असं असल्यामुळं ही पार्वतीरूपी जगदंबा आपल्याला हाक मारीत आहे कीं, हे 'उ' मुला! 'मा' असं करूं नकोस.

आज सर्वच लोक **पीत्वा मोहमयीं प्रमादमदिरां उन्मत्तभूतं जगत्।...** उन्मत्त झालेले आहेत. त्यामुळंच आई आपल्याला वारंवार 'उ-मा' अशी हाक मारीत आहे म्हणूनच तुला 'उमा' हें नांव मिळालेलं आहे. नापास झालेल्या मुलाला आई जशी वारंवार सांगत असते कीं, बाळ! अभ्यास कर. मुलगा गेल्या वर्षी नापास झालाच होता पण यावर्षी तरी पास व्हावा अशी आईची इच्छा असते. त्याप्रमाणं आ ला गेल्या जन्माचं ज्ञान असतं. गेल्या जन्मांत मुलानं काय कर्मे केलेलीं आहेत तीं सर्व आईला माहीत आहेत व पुढील जन्मांत तो काय करणार हेंही प्रत्यक्ष दिसत आहे. म्हणून पार्वती सांगत आहे कीं, हे मुला! 'उ-मा.' असं करूं नकोस. पुढच्या जन्मांत आपण अयशस्वी होऊं नये, म्हणून आई हाक मारून सांगत आहे कीं, बेटा! असं करूं नकोस.

'उमा' हें आईनं ठेवलेलं नांव नव्हे तर ती आपल्याला वारंवार 'उ-मा' असं सांगत आहे. म्हणून तिला हें उपनाम प्राप्त झालं आहे.

पार्वती जगदंबा आहे. विश्वसंचालन करणारी चिच्छक्ति आहे. तिला कोणत्याही पतीची आवश्यकता नाहीं. तसंच तिची कोणी आई असेल, तिच्यापेक्षां ती मोठी असेल हेंही संभवत नाहीं. कारण शिव आणि विष्णु दोघेही देवीचीं स्तोत्रं गात असतात. सर्वच तिचं पूजन करतात.

चिच्छक्ति किंवा भगवच्छक्तिमधील कोमलतेचा अंश हा स्त्रीत्वाचा अंश आहे म्हणूनच तिला इथं आई! अशी हाक मारली आहे. ही आई मुलाला सतत असं बजावून सांगत आहे कीं, मुला! असं करूं नकोस रे!

महमद गझनीनं मंदिरं फोडलीं. जगांतील सर्व संपत्ति गोळा केली. तिचा मालक झाला भगवंताचा हिस्साच खाल्ला असं नव्हे तर त्यालाही खायला निघाला. आईला हें सहन झालं नाहीं आणि म्हणूनच आईला वारंवार सांगावं लागतं - 'बेटा! असं करूं नकोस.

'उ-मा' म्हणजे संहार करूं नकोस. आपलीं कृत्यंच अशीं आहेत कीं, ज्यामुळं भगवंताच्या संहार-शक्तीला संहार करण्यासाठीं यावं लागतं. त्या

शक्तीमुळं नुकसान होऊ नये म्हणून आई धावत येते व ओरडून सांगते, बेटा! असं करूं नकोस. माझ्या मुलाला मारूं नकोस. कित्येक वेळां ही संहारशक्ति मारायला प्रवृत्त झालेली असतांना डोळ्यांत आसवं आणून आई मध्यं पडून सांगत असते कीं, 'उमा.' संहार करूं नकोस. पार्वतीची ही कृपा आहे. म्हणूनच आपण सर्व जिवंत आहोंत. वस्तुतः आपण जगायला लायक नाहींत परंतु तिच्या कृपेनं जगत आहोंत. भगवान दयाळू आहे, कृपाळू आहे असं आपण मानतों व बाजूला होतों. परंतु भगवंत दयाळू किंवा कृपाळू असण्यापेक्षां तो प्रेमळ आहे. परंतु त्यानं आपल्यावर कां प्रेम करावं? त्यांनंच तर गीतेंत स्पष्ट सांगितलं आहे – **ये यथा मां प्रपद्यंते तां तथैव भजाम्यहम्।** भगवंताची कृपा, दया कोणाला हवी? **Grace** मार्वस् कोणाला हवेत? नापास झालेल्या मुलांना. अभ्यास न करणाऱ्या मुलांना. परंतु जे वैदिक वाङ्मयाचं अध्ययन करीत असतील किंवा वैदिक विचारांनीं ज्यांचं मस्तक पूर्ण असेल, जे उत्कृष्ट जीवन जगत असतील ते म्हणतील कीं, आई! तूं प्रेमळ आहेस

भगवान माझी आई आहे. परंतु आईनं माझ्यावर कृपा करावी, दया करावी हें म्हणणं बरोबर नाहीं. आई माझ्यावर दया करीत नाहीं तर प्रेम करीत आहे. मालकीण असेल तर ती कृपा करील. परंतु माझा आणि भगवंताचा संबंध मालक आणि नोकर यांच्या संबंधासारखा नाहीं तर तो आई व मूल यांच्यासंबंधासारखा आहे. म्हणूनच आई माझ्यावर प्रेम करते. आईनं दया करावी हा विचारच खटकतो. परंतु आम्ही इतके क्षुद्र आणि अधःपतित झालेले आहोंत कीं ज्यामुळं आम्हांला भीक मागावी लागत आहे. जसजसा जीवनविकास होईल, आत्मप्रत्यय वाढत जाईल तसतसा ईश्वराकडे पहाण्याचा दृष्टिकोणही बदलेल. आईकडे कोणत्या दृष्टीनं पाहातों यावरून आपला दृष्टिकोण नक्की होत असतो. आपला दृष्टिकोण जितका उच्च होईल तितकी आई प्रेमळ वाटेल.

संहारशक्ति ज्यावेळीं संहार करायला प्रवृत्त होते त्यावेळीं आपलं ऐकत नाहीं, म्हणून आई चिडते आणि मारण्याची आज्ञा पण करते परंतु तितक्यांतच तिची प्रेमळवृत्ति जागृत होते आणि डोळ्यांत अश्रु आणून सांगते, मानवसमाज बिघडलेला आहे, हें मी जाणतें परंतु मला असा विश्वास वाटतो कीं, या बिघडलेल्या मानवसमाजाला मी सुधारीन

'उ'चा दुसरा अर्थ आहे क्रोध. 'उ-मा' म्हणजे क्रोध करूं नकोस. आई सतत सांगत आहे कीं, चिडूं नकोस. या सृष्टीवरही रागावूं नकोस. ज्यावेळीं आपल्यावर आपत्ति येते त्यावेळीं आपण चिडतों त्यावेळीं आई सांगते, बाळ! चिडूं नकोस. आपत्ति तुझ्या भल्यासाठीं आहे; कल्याणासाठीं आहे. आई सांगते कीं, तुझ्या बाहूंत सामर्थ्य यावें म्हणून तुझ्यावर आपत्ति आलेली आहे. नदीच्या प्रवाहांत उलट्या दिशेनें पोहणारा जो असतो त्याला फारच परिश्रम करावे लागतात व ते परिश्रम करूनही तो फारच थोड्या प्रमाणांत पुढें जाऊं शकतो. परंतु असें करण्यांत त्या पोहणाऱ्याच्या हातांतील शक्ति वाढत असते. प्रवाहाच्या उलट्या दिशेनें जाणाऱ्याच्या हातांत आई सामर्थ्याचा संचार करविते.

भक्तही फार परिश्रम करतात. **यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम्। यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः।** व्यवहारी माणूस जसा चिडतो तसाच अयशस्वी आणि असफल झालेले भक्तही चिडतात. आई! मी इतके कष्ट करीत आहें, तरीही तुझें दर्शन होत नाहीं. त्यावेळीं आई सांगते, बाळा! चिडूं नकोस. रागावूं नकोस. 'उ—मा।'

'उ'चा तिसरा अर्थ संपत्ति असा आहे. तुझ्यावर विश्वास ठेऊन या देहाची, बुद्धीची आणि मनाचीं खूप श्रीमंति दिली; परंतु दारू पिण्यांत. चोरी करण्यांत या श्रीमंतीचा तूं व्यय करीत आहेस. संपूर्ण जीवन फुकट घालवीत आहेस. बाळ! मला हें ठीक वाटत नाहीं. असें करू नकोस. 'उ—मा' म्हणजे हें तुझें मौलिक जीवन व्यर्थ जात आहे, यामध्यें तुझ्या मनाची व बुद्धीची संपत्ति खर्च करू नकोस. 'उ'चा चौथा अर्थ आहे प्रश्न. आई म्हणते कीं, प्रश्न विचारूं नकोस 'उ-मा'.

रोज आई एकच शब्द सांगत आहे. 'उ-मा'. करू नकोस. पण त्या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. म्हणूनच आपण तिचें 'उमा' असें नांव ठेवलें आहे. ज्यावेळीं आपण जगदंबेजवळ जाऊं त्यावेळीं ती एकच शब्द उच्चारितें 'उमा.' हा उमा शब्द तिच्या आईचें संबोधन नव्हे तर आपल्याला उद्देशून उच्चारलेला शब्द आहे.

या शक्तीला आकार नाहीं, उपाधि नाहीं, ती स्त्री नाहीं आणि पुरुषही

नाहीं. बाल पण नाहीं आणि वृद्ध पण नाहीं. अशा प्रकारची आई दररोज वेगवेगळ्या अर्थानें आमच्यावर प्रहार करून बजावून सांगत आहे, मुला! 'उ-मा.' असं करूं नकोस. आदिमशक्तीजवळ असलेला प्रेमळपणा पाहिल्यानंतर असं वाटतं कीं, हिच्याजवळ सर्व प्रकारचे विचार असले पाहिजेत. पण ही खोटी कल्पना आहे. उलट तीच आपल्याला वेगवेगळ्या तऱ्हेनं खडखडावून बजावीत आहे कीं, 'उ मा.' असं करूं नकोस.

**शंकरी** म्हणजे शंकराची पत्नी असा अर्थ नाहीं. **शं करोतीति शंकरः।** जी कल्याण करते ती शंकरी. ती स्वतः स्वयंसिद्ध आहे, स्वप्रकाशित आहे. ती आपल्याला बजावीत आहे. कारण ती कल्याण-करणारी आहे. कल्याण करणं हा तिचा स्वभाव आहे. डॉक्टरीण होण्याचे दोन प्रकार आहेत. डॉक्टरची पत्नी असेल ती एक डॉक्टरीण व दुसरी जी स्वतः वैद्यकीय परीक्षा पास झालेली असेल ती. 'शंकरी' म्हणजे शंकराची पत्नी नव्हे. पण ती स्वतःच शंकर आहे. ती स्वतःच कल्याणकारी असल्यामुळंच ती वारंवार आपणाला खडसावून बजावीत आहे.

पार्वतीनं तप केलं व शंकर तिचे पति झाले ही गोष्ट बाल–बुद्धि पुरतीच मर्यादित राहिली तर ठीक. पण वास्तविक पाहिलं तर ती माझ्यासाठीं तपश्चर्या करीत आहे. माझं अधःपतन झालेलं आहे व त्यामुळं तिला दुःख होत आहे. म्हणून ती तपश्चर्या करीत आहे. ती स्वतःसाठीं तपश्चर्या करीत नाहीं. ईश्वराचे ठिकाणीं दिसणारे प्रेमळपणा व कोमलपणा हे भाव स्त्रीत्वाचे भाग आहेत. ही स्त्री आहे पण कोणाची पत्नी नाहीं. आई आहे पण तिची कोणीही आई नाहीं. या चिच्छक्तीच्या ठिकाणीं जसे पुरुषाचे गुण आहेत तसे स्त्रीत्वाचे गुण आहेत. परंतु ही भव्यता समजण्याची पात्रता आमच्यांत नाहीं. भगवान्! तुझं सामर्थ्य ओळखण्याची आमच्यांत ताकद नाहीं. परंतु आई! तुझ्याठिकाणीं असलेल्या कोमलपणाचा व प्रेमळपणाचा आम्हीं अनुभव घेत आहोंत कीं, त्यामुळं आमच्या मनोविकारांना संतोष होतो. परंतु त्या विकारांपासून मुक्त होऊन तुझ्याजवळ यावं व तुला 'आई' म्हणून हाक मारावी. हेच शंकराच्या अर्धनारी नटेश्वराचं रूप आहे. त्याच्याठिकाणीं असलेले जे कोमलपणा व प्रेमळपणा हे स्त्रीत्वाचे गुण, त्यांचा आपण विकास करीत असतों. त्यांच्या वश होऊन त्यांना 'आई' म्हणून हाक मारीत असतों.

आम्हीं मनोविकारांनीं भरलेले आहोंत आणि आई आमचे विकार साफ करीत आहे. म्हणूनच आई! तूं कल्याणकारी आहेस. आई केवळ कल्याणाची इच्छा करणारी नाहीं तर ती कल्याण करणारी आहे. ती शंकरी आहे. ती कर्तृत्वसंपन्न आहे.

**कौमारी**.... म्हणजे कुमारी नव्हे. जर तूं कुमारिका असशील तर मग तुला लग्न करण्याची इच्छा असेल व जोंपर्यंत योग्य वर मिळणार नाहीं तोंपर्यंत सुयोग्य वराच्या शोधांत असणार. परंतु हें खरं नव्हे. तूं आई असूनही स्त्री नाहींस आणि तुझी कोणी आईही नाहीं. तूं कुमारांची आई आहेस, म्हणून तूं कामारी आहेस तूं कार्तिकस्वामीची आई आहेस. कार्तिकस्वामी कुमार होते. देवांचे सेनानी होते.

दैवी व आसुरी संपत्ति यांचा अनादि काळापासून झगडा सुरूच आहे. दैवी संपत्तीचा विजय व्हावा यासाठीं कार्तिकस्वामींनीं आपलं सर्वस्व खर्च केलं. कार्तिकस्वामी अत्यंत शूर व पराक्रमी होते. दैवीसंपत्ति परत उभी करावी यासाठीं सर्वस्व देणाऱ्या, तिच्यासाठीं झीज सोसणाऱ्या मुलाला आई कुमार म्हणून हाक मारीत आहे.

कार्तिकस्वामी ही एक ध्येयनिष्ठ संस्था होती. क्षुद्र, लाचार जीवन जगणाऱ्या लोकांना आई 'कुमार' म्हणून हाक मारीत नाहीं तर असा एक वर्ग आहे कीं जो दैवी संपत्तीसाठीं सर्वस्व द्यायला तयार आहे. कार्तिकस्वामी अतिशय शूर होते आणि देवासुर संग्रामांत त्यांनीं प्रखर पराक्रमही प्रगट केलेला होता. अशा वेळीं स्त्रीचं दर्शन होणं योग्य नव्हे; म्हणून कोणीही स्त्री त्यांचेकडे जातही नव्हती. आज आपली परंपरेनें चालत आलेली रूढी अशी आहे कीं, स्त्रियांनीं कार्तिकस्वामींचं दर्शन घेऊं नये. शंकर, गणपति यांचं दर्शन घ्यायला मोकळीक आहे पण कार्तिकस्वामींचं दर्शन स्त्रीनं घेऊं नये. ही कल्पना जरी रूढ असली तरी तिच्या पाठीमागे कोणतेंही शास्त्र नाहीं. कार्तिकस्वामी शूरवीर होते. त्यांचं दर्शन शूरवीरांनीं घ्यावं. अशा प्रकारचे शूरवीर काळ खराब आहे म्हणून रडत बसत नसतात. हा काळ कसा सुधारेल असं म्हणून रडणारे नामर्द होत. कुमार शूरवीर होते. आणि आई ज्यांना कुमार म्हणून हाक मारते ते शूरवीर होणारच.

आपण लक्ष्मीनारायणाचं दर्शन करायला जातों पण आई 'बाळ!' अशी हाक मारीत नाहीं. कारण आपण तिथं भिकारी म्हणून जात असतों. या जमलेल्या भिकाऱ्यांवर आई कृपा करीत आहे. जसें एखाद्या शेटजींची बायको मोठ्या मोटारींतून येते आणि सर्वांना एक एक पैसा देते त्यावेळीं सर्व तिला वेढा घालतात व सारखे मागतच राहातात. तसेंच भगवंताच्या मंदिरांत आपण सर्व भिकारी म्हणून येतों व भगवंताला घेरून टाकतों. अशा लोकांना आई 'कुमार' म्हणून हाक मारीत नाहीं. असा एखादाच निर्माण होतो कीं. त्याला आईनं 'कुमार' म्हणून हाक मारावी.

मग शूरवीर कोणाला म्हणावं? जो पुष्कळ कत्तल करतो तो शूर! तसं असेल तर वांद्र्याच्या खाटिकखान्यांत अनेक पशूंची हत्या करणारा खाटीकही शूर म्हटला पाहिजे. एखाद्या तत्त्वासाठीं जीवन-सर्वस्व अर्पण करणारा, किंवा एखाद्या सिद्धांताच्या पालनासाठीं जो स्थिर असतो तो शूर. अशा कुमाराला आई शाबासकी देत आहे. बाळ! फार छान काम केलंस; असं म्हणून हाक मारीत आहे. Solomon Grandy सारखं जीवन जगणारे पुष्कळ लोक आहेत. आणि भगवान आम्हांला केव्हां हाक मारतोय अशी वाटही पहात बसलेले आहेत. पण ईश्वराला सवडच कुठं आहे! आई हाक मारते, कुमार! ये. कुमार म्हणून हाक मारीत असल्यामुळं कौमारी असलेल्या आईला अशा प्रकारच्या कुमारांना हाक मारतांना धन्यता वाटते. म्हणूनच आई होण्यांत तिला भूषण वाटतं.

संबंध स्थापित करतांना हा प्रश्न निर्माण होतो कीं, मला आईनं 'बाळ' म्हणून हाक मारावी कीं, मी आईला 'आई' म्हणून हाक मारावी? बात अगदीं साधी आहे असं वाटतं. तूं 'आई' म्हणून हाक मार, म्हणजे भगवान तुला मुलगा म्हणेल, परंतु आई हट्टी आहे, तसा मुलगा पण हट्टी आहे. दोघंही हट्टी आहेत.

आई सांगते कीं, तद्रूप होण्याची दुर्दम्य इच्छा ठेव, निष्ठा ठेव, श्रद्धा ठेव. तद्रूप होण्याची दुर्दम्य मनीशा आणि इच्छा दररोज तुझ्या मनांत निर्माण व्हायला पाहिजे. त्यावेळीं दररोज मी तुझं हृदय तपासीन त्यावेळीं तद्रूप होण्याची प्रभावी इच्छा तुझ्या अंतःकरणांत आहे, असं मला कळलं पाहिजे. तुझ्या ठिकाणची ज्योत जागृत आहे असं दिसेल, त्याचवेळीं मी बाळ म्हणून हाक मारीन.

LIBRARY

आपण भक्ति करायला सुरुवात करतों पण जरासा फायदा व्हायला लागला कीं, भक्ति अळणी व्हायला लागते. ज्याला शस्त्र छेदूं शकत नाहीं, अग्नि जाळूं शकत नाही, पर्जन्य ओलें करूं शकत नाहीं, वायु कंपित करू शकत नाहीं त्याला आई 'बाळ!' अशी हाक मारते.

**सोऽविकंपेन नेङ्गते।** अशी ज्याला तद्रूप होण्याची इच्छा असेल, जो रक्तानें स्नान करील परंतु ज्याच्या डोळ्यांत अश्रूचा एक थेंबही येणार नाहीं, रक्ताचें पाणी पाणी करावें लागलं तरीही ज्याच्या डोळ्यांत अश्रू निर्माण होणार नाहींत, ज्यानें प्रभुकार्यासाठीं आपलं जीवन व्यतीत केलं (तरीही जग सुधारलं नाहीं) त्याला कुणी सांगितलं कीं, तुझं जीवन व्यर्थ गेलं तर त्याला तो सांगेल कांहीं हरकत नाहीं. कोणी विचारलं — जग सुधारलं का? तर तो सांगेल कीं, मी जग सुधारायला आलोंच होतों कुठें? मी माझी सर्व शक्ति आईच्या चरणावर अर्पित केलेली आहे. तिचा परिणाम किती झाला हा विचारच नाहींत. मनोबळ शत्रानें विद्ध झालं तरीही डोळ्यांत अश्रू नाहींत, अंतःकरणांत भीति नाहीं, पराभवाची भीति नाहीं, अशा प्रकारची तद्रूप होण्याची दुर्दम्य इच्छा आई पाहाते त्यावेळीं ती 'बाळ! कुमार!' अशी हाक मारते.

आपल्याला वारा लागला तर सरदी होते. ऊन लागलं तर उष्णता होते. प्रकृतीला सांभाळून वागणारे **'most practical'** म्हणजेच अतिशय व्यवहारी माणसं; म्हणजे मुडदेच. ही कावळ्याची दृष्टी आहे. पिंडाकडे कावळा या दृष्टीनं पहात असतो. हळुहळु पुढं येतो व एकदम चोंच मारतो. अशा लोकांना आई हाक मारीत नाहीं. पण जे निःस्वार्थपणं आईसाठीं पुरुषार्थ करतात अशा प्रकारच्या कार्तिकस्वामींना आई कुमार अशी हाक मारते. अशा प्रकारच्या कुमारांमुळं आई 'कौमारी' आहे. अशा कुमाराविषयीं आईला अभिमान वाटतो व आई त्यांना 'बाळ्यनो!' अशी हाक मारते.

नंतर शंकराचार्य सागतात - **निगमार्थगोचरकरी...** निगम म्हणजे वेद. वेदांचा अर्थ जाणणारी तूं आई आहेस. वेदाचा अर्थ बुद्धीनं जाणण्याचा आपण प्रयत्न करतों पण बुद्धीनं प्रकाशच पडत नाहीं. परंतु आईनं अंतःकरणापासून हाक मारली कीं, हृदयांत प्रकाश पडतो व अर्थाचं स्फुरण होतं व त्याच वेळीं वेदांचं रहस्य कळतं. तें रहस्य खरोखरच कांहीं आगळं असतं.

श्री जटाजूटः शरणम्।

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

कैलासाचलकन्दरालकरी गौरी उमाशंकरी
कौमारी निगमार्थगोचरकरी ॐकारबीजाक्षरी।
मोक्षद्वारकपाटपाटनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥४॥

आई! तूं कशी आहेस ! निगमार्थगोचरकरी ... निगम म्हणजे वेद. वेदांचा अर्थ गोचर करणारी तूं आहेस आई! वेदांचा अर्थ आम्हांला कळत नाहीं. या महान् वेदांचे तीन हेतु आहेत. वेद ज्ञान देण्यासाठीं, आश्वासन देण्यासाठीं आणि आनंद देण्यासाठीं आहेत.

वेदांचा अर्थ केवळ बुद्धीनं आकलन होत नाहीं, आई! मी वेद वाचले, पाठ केले पण त्याचा अर्थ कळत नाही. बुद्धीनं जाणण्याचा प्रयत्न केला पण हृदयांत प्रकाशच पडत नाहीं. पण आई ! तू प्रेमानं हाक मारलीस त्यावेळीं डोक्यांत प्रकाश पडूं लागला. आई! ज्या दिवशीं ही बुद्धि तुझ्या चरणांवर अर्पित केली, त्या दिवशीं वेदांचं रहस्य घ्यानात आलं. तोंपर्यंत वेदांचं रहस्य कळतच नव्हतं. आई! तूं प्रेमानं हाक मारलीस त्या दिवशीं या मुलाच्या हृदयांत प्रकाश पडला. बुद्धीचा मोह सोडला आणि तुझ्या चरणीं सर्व शक्ति अर्पित केली, त्यावेळीं वेदांचं नवनीत प्राप्त झालं. आईच्या प्रेमामुळंच वेदांचं नवनीत प्राप्त होत असतं.

कुत्रा ज्याप्रमाणं हाडूक चघळत असतांना आपल्याच दातांतून निघणारं रक्त हाडांतून निघणारं रक्तच समजत असतो त्याचप्रमाणं केवळ वेदांचा अभ्यास करणाऱ्यांची अवस्था होत असते बुद्धि चांगली असणारे लोक असेच निष्फळ प्रयत्न करीत असतात.

वेदांचा अर्थ जाणणं खरोखर कठीण आहे. आई! पण हा वेदांचा न कळणारा अर्थ तूं समजावून देतेस. हळूहळू तो अर्थ तूं समजावतेस. वेद कशासाठीं आहेत हें सर्व सामान्य लोकांना कळतच नाहीं. तसेंच त्यांना

वेदांचा अर्थही कळत नाही. त्यांना त्याचं रहस्य तर नाहींच नाहीं समजत. वेद ज्ञानासाठीं आहेत, मार्गदर्शनासाठीं आहेत, आश्वासन देण्यासाठीं आहेत. वेद कसे निर्माण झाले हेही माहीत नाहीं. रामरक्षेचा अर्थ न कळतां लहान मुलं ती ज्याप्रमाणं पाठ करतात त्यांचप्रमाणं आपण वेदही पाठ करीत असतों. परंतु मुलं मोठीं झाल्यावर रामरक्षेचं रहस्य कळतं, गोडी कळते. तसंच आई! आम्हीं वेद वाचतों, पाठ करतों पण त्यांचं रहस्य तूं ज्यावेळीं प्रेमळपणानं हाक मारतेस तेव्हांच समजतं.

ज्यानं ही सृष्टि निर्माण केली त्याला असं वाटत असेल कीं, या माझ्या मुलांना आश्वासन कोण देणार? मार्गदर्शन कोण करणार? आनंद प्राप्ति कशी होणार? त्यासाठीं या चित्‌शक्तीनं वेद निर्माण केले आहेत. आम्हांला वेदांचा जर अर्थच कळत नाहीं तर आश्वासन, मार्गदर्शन व आनंद या गोष्टी तरी कुठून मिळणार? म्हणून आम्हीं अस्वस्थ होतों. पण आई तू प्रेमळपणानं हाक मारलीस कीं हें रहस्य समजण्यासारखा प्रकाश हृदयांत पडतो. म्हणून आई! तुला 'निगमार्थगोचरकरी' म्हणतात.'

**ॐकार बीजाक्षरी :** 'ॐकार, हें हिचेंच बीज आहे. तूं अनिर्वचनीय आहेस. तुझी माया वेगळी आहे. तुझा संबंध कांहीं वेगळाच आहे. आईशीं आपला संबंध कायम राहावा असा आपण प्रयत्न करतों. '**त्वमेव माताच पिता त्वमेव**' असं आपण म्हणतों पण तें संपूर्णपणं खरं नाहीं. अर्जुनानं सुद्धां '**पितेव पुत्रस्य सखेव सख्युः।** असं म्हणून संबंध जोडला होता. परंतु हा आपला संबंध शंभर टक्के खरं नव्हे. जगांतल्या लौकिक आईपेक्षां ही आई कांहीं वेगळीच आहे. तिला ओळखण्याची भाषाही वेगळीच आहे. हिच्याशीं आपला संबंध आर्थिक संबंधापेक्षां कांहीं वेगळाच आहे. त्यामुळंच ती अनिर्वचनीय आहे. म्हणूनच तिचं वर्णन ॐकारानं केलं आहे. आई! तूं अनिर्वचनीय आहेस, म्हणून तुला हाक मारायला आम्हीं 'ॐ' शब्दाचा उपयोग करतों.

'अक्षरी' म्हणजे जिचा विनाश होत नाहीं अशी. अक्षर म्हणजे जे घडत नाही तें. म्हणूनच आईला 'अक्षरी' असं म्हणतात. तुझी कोमलता व प्रेमळपणा कधींही कमीच होत नाहीं ते गुण शाश्वत

आहेत. 'क्षरति इति क्षरम्'- जें 'क्षीण' होतें किंवा जें कमी होतें तें क्षर. आपल्या ठिकाणीं कोमलपणा व प्रेमळपणा येतात पण ते टिकत नाहींत जगांतलें सुख जसं क्षणिक तसे विकारही क्षणिक असतात. कांहीं कांहीं प्रेमाची भावना उफाळून येते पण ती क्षणिक असते. पण आई! तुझा कोमलपणा व प्रेमळपणा हीं कधींही नाश पावत नाहींत. सकाळपासून संध्याकाळ पर्यंत तू या जगाचे सर्व व्यवहार चालवतेस. इतकं असूनही लोक तुझं ऐकत नाहीत. सूज्ञ माणसाचाही तुझ्या या कर्तृत्वावर विश्वास नाहीं. जगांतल्या प्रत्येक व्यवहारांत आज पावलोपावलीं अविश्वास दृष्टीला पडत आहे. परंतु ईश्वराचा कोमलपणा व प्रेमळपणा मात्र कमी होत नाहीं. आई! तुझं कोणीही ऐकत नाहीं असं असूनही तुझ्या कोमलपणांत व प्रेमळपणात अंशमात्रही फरक पडलेला नाहीं.

लौकिक आईविषयीं जर अविश्वास दाखवला गेला तर तिचा कोमलपणा व प्रेमळपणा कमी होईल. परंतु आई! तुझ्याठिकाणीं असलेले हे गुण मात्र अक्षर आहेत.

**'मोक्षद्वारकपाटपाटनकरी':** मोक्षाचें दार खोलण्याचें सामर्थ्य फक्त तुझ्याच ठिकाणीं आहे. लोकांना जर मुक्ति द्यावयाची असेल तर ती तूंच देऊं शकशील. शास्त्रकार म्हणतात कीं, द्यायची नसते तर ती मिळवायची असते. गीता सांगते कीं, **'वियोगं योगसंज्ञितम्'** तर मग आई! तू मुक्ति नाहीं कां देत?

आई! तुझ्याजवळ आलें कीं, मोक्षाचें दार उघडतें. ज्याला जिवंत असतांनाच मुक्ति मिळते त्याला जीवनमुक्त म्हणतात. जीव तीन तऱ्हेच्या भीतींपासून मुक्त होतो म्हणून त्याला मुक्त म्हणतात. मुक्ति म्हणजे भयमुक्ति, विकारमुक्ति आणि रोगमुक्ति. त्यालाच जीवनमुक्त म्हणतात, कीं जो भय, विकार आणि रोग यांपासून मुक्त झालेला असतो.

ज्याला उपजीविकेची काळजी नसते किंवा ज्याला मृत्यूचें भय नाहीं त्याला भयमुक्त म्हणतात. अशा प्रकारच्या भीति नाहींशा झाल्या म्हणजे माणूस निर्भय होतो. ज्या माणसाजवळ १० लाख रुपये असतात तो २० लाख रुपये करण्याचा प्रयत्न करतो, कारण त्याला जीविकेची भीति

असते. आज माझ्या जवळ पैसे आहेत, उद्यां नसले तर काय होईल? परंतु आई! मी तुझा झालें, कीं ही भीति पार नाहींशी होते. तुझ्यांजवळ आल्यावर माणूस भित्रा राहातच नाहीं. तुझ्या सान्निध्यांत आल्यावर मग भीतीच कसली? जीव जर रडत असेल तर समजायला हरकत नाहीं कीं त्याला आईचा सहवास लाभलेला नाहीं. तसेंच तुझ्या सान्निध्यांत आलेल्या माणसाला मृत्यूचीही भीति राहात नाहीं.

माणसाला विकारांपासून मुक्त होण्याची इच्छा असते. परंतु रात्रंदिवस याची दृष्टि मात्र विकारांनीं भरलेली असते. मला अमुक मिळालें नाहीं म्हणून दुःख होतें. त्याऐवजीं प्रत्येक वस्तूकडे पाहाण्याची सौंदर्यपूर्ण दृष्टि झाली पाहिजे.

सृष्टींत सर्वच ठिकाणीं सौंदर्य आहे. पर्वत, डोंगर, सागर, पशुपक्षी सर्वच सुंदर आहेत. त्यांतहीं माणसाची रचना तर खरोखरच अद्भुत आहे! इथं तर सौंदर्याची परमावधि दृष्टीला पडते. प्रत्येक ठिकाणीं विकारांच्या ऐवजीं सौंदर्याची दृष्टि यायला पाहिजे. त्यानंतर पूजनीयही दृष्टि व्हायला पाहिजे. तरच विकारमुक्त होतां येईल. ही सौंदर्यसृष्टि व नंतर आदरपूर्ण दृष्टि करण्याचं सामर्थ्य आई! तुझ्याच ठिकाणीं आहे.

अशा तऱ्हेनें आई! तू रोगमुक्तही करतेस. दुःख, दैन्य आणि दारिद्र्य यांच्या रोगापासून आई आपणाला मुक्त करते. हे आई! तुझ्याजवळ यायला लागल्यावर दुःखाची भीतीच नाहीशी होते. लोकांना गरिबीची भीति वाटते. परंतु आईजवळ गेलेल्यां लोकांना तर असं वाटतं कीं, सात पिढ्यांच्या गरिबीचा आम्हांला अनुभव आहे. मग तिला घाबरायचं काय म्हणून? आई! तूं जिथं आहेस किंवा ज्याच्या अंतःकरणांत प्रवेश झालेला आहे, तिथं लाचारी येणारच कुठून? अशा प्रकारचा माणूस स्वार्थासाठीं लाचारी करणार नाहीं आणि परमार्थासाठीं पण लाचारी करणार नाहीं; इतकंच नव्हे तर जो माणूस परमेश्वराजवळ सुद्धां मागायला तयार नाहीं, त्याला लाचारीची भीति काय म्हणून वाटणार? मग शंकराचार्य परमेश्वराजवळ ही भिक्षा कां बरं मागतात?

सामान्य माणसाचं मागणं आणि यांचं मागणं यांत जमीन आस्मानाचं अंतर आहे. सामान्यांना भिक्षा मागितल्यावर भिक्षा मिळेल कीं नाहीं, अशी

शंका वाटते. परंतु शंकराचार्यांनीं मागितल्यावर दिल्याशिवाय सुटकाच नाहीं. आईजवळ मुलानं लाडू मागितल्यावर आई देणारच. मुलाच्या या मागणीमध्यं दुर्बलता किंवा लाचारी कांहींच नाहीं. शंकराचार्य जी भिक्षा मागत आहेत ती मागणी नव्हे. मागणी जिथं असते तिथं मिळण्याची शक्यता असते किंवा नसतेही. ही भिक्षावृत्ति इथं नाहीं. 'भिक्षां देहि' हा शंकराचार्यांचा विनय आहे. कारण कृतिशील मुलाला आई देणारच. त्याचप्रमाणं माणूस जीवनमुक्त केव्हां होतो? तर तुझ्याशीं संबंध प्रस्थापित केल्यावर मोक्षाचा दरवाजा खुला होतो. जप, तप वगैरे करून माणूस जीवनमुक्त होत नसतो. पण आई! तुझ्याशीं संबंध जडला, तुझ्यावर प्रेम केलं कीं, माणूस जीवनमुक्त होतो. आई! तुझ्याजवळ मी भिक्षा मागतों कीं, मला प्रेम आणि ज्ञान दे.

**दृश्यादृश्यविभूतवाहनकरी**.... जगांत कांहीं दृश्य आणि कांहीं अदृश्य विभूति आहेत. संत ही एक अशी विभूति आहे कीं, तिच्यासाठीं लोकांची कमिटी नेमण्याची आवश्यकता नाहीं, तिला सरकार नियुक्त करूं शकत नाहीं. संत असे असतात कीं, त्यांना सरकार पदवी देऊं शकत नाहीं किंवा लोकही देऊं शकत नाहींत. तेव्हां अशा प्रकारच्या दृश्य व अदृश्य संतांना शक्ति देणारी माता तूं आहेस. आई! जगानं दिलेल्या पदवीला मीक न घालणारे, जगाच्या मानापमानाची पर्वा न करणारे जे लोक आहेत, त्यांच्या ठिकाणीं आई! तुझीच शक्ति आहे.

तुझीं कित्येक माणसं अदृश्य असतात. त्यांची लोकांना जाणीवही नसते. आई! तुझा कोण? खरा संत कोण? योगी कोण? हें सुद्धां कळत नाहीं. संसार सोडतो तो योगी? छेछे! जनक राजानं संसार केला, घरदार सोडलं नाहीं, अधिकार सोडला नाहीं, राजसत्ताही सोडली नाहीं, शासन करायला योग्य असलेल्या व्यक्तीला शासनही केलं; असं असूनही जनकराजा योगी होऊं शकला. जनकाला विदेही जनक म्हणतात. गीता संत किंवा योगी यांची वेगळीच व्याख्या करते. गीता म्हणते कीं, जे स्वतःची शक्ति यज्ञासाठीं खर्च करतात ते संत. **यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्व किल्बिषैः।** जे ब्रह्मचारी असतात ते मोठे अशी कांहीं लोकांची समजूत असते. विवाह करणं किंवा न करणं या गोष्टीचा संतांशीं संबंध नसतो. जो बुद्धिवादी नसतो तो वाटेल ते निर्णय करतो. संतांचं आचरण समजणं कठीण असतं. अदृश्य महापुरुषांची

संख्या मोठी आहे. परंतु त्याना ओळखणं कठीन आहे. जगानं विकार केला तरीही त्याच्यावर प्रेम करणारे व कार्यकारणभाव सांगतां येणार नाहीं, असं त्यांचं वर्तन असतं. अशा लोकांना ओळखणं कठीण आहे. संतांजवळ दोन प्रकारचं सामर्थ्य असतं. क्रियासामर्थ्य आणि कृपासामर्थ्य. आपण कसे असतों? कर्म जोंपर्यंत आम्हांला जागवतं तोंपर्यंत आपण जागत असतों. लक्षावधि जीवांना जगण्याचं ध्येय नसतं. पण कर्मामुळं ते जगत असतात. मी कशाला जगायचं? मरण्याचं माझ्याजवळ सामर्थ्य नाही म्हणून. क्रियासामर्थ्य भगवत्कृपेशिवाय शक्य नाहीं.

तसंच संतांजवळ कृपासामर्थ्यही असतं. संतांजवळ अशा कित्येक गोष्टी असतात कीं, ज्या ईश्वराजवळ सुद्धां नाहींत. ईश्वर **विनाशायच दुष्कृताम्** म्हणजे दुर्जनाच्या विनाशासाठी असतो. दुर्जन भगवंताकडे जात नाहींत. कारण त्यांना भीति वाटते. परंतु संत वाईट लोकांचा नाश न करतां त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळं ते कृपासागर होत. ईश्वराला जर एखाद्या व्यक्तीला सुधारायचं असेल तर ईश्वर त्याला संतांकडे पाठवून देतो. तो ईश्वराजवळ गेला तर त्याचं डोकंच उडवलं जाईल. परमेश्वराला ही गोष्ट माहित आहे म्हणूनच वाल्मीकि, याज्ञवल्क्य, पतंजलि अशा प्रकारच्या महापुरुषांना पाठविलेलं आहे. पुष्कळ वेळां असं होतं कीं, मुलांचं वर्तन इतकं मर्यादेच्या बाहेर जातं कीं, त्याच्यावर अंकुश ठेवणं वडिलांना अशक्य होतं. अशा वेळीं वडील मुलाच्या मामाला सांगतात कीं, या माझ्या मुलाला सुधारा. अशा प्रकारचे मामा म्हणजेच वशिष्ठ, वाल्मीकि, पतंजलि, वेदव्यास हे होत. ही संत मंडळी अशा मुलाला आईच्या प्रेमानं समजावतात. आईच्या प्रेमानं जो समजावतो तो मामा. अशा तऱ्हेनं संत हे कृपासागर होत व त्यांच्याजवळ असलेलं कृपासामर्थ्य आई! तुझंच आहे.

आपल्याला असं वाटतं कीं, ईश्वर स्वतः जीवांना कां सुधारत नाहीं? दोन भागिदार होते. त्यांची ३०-४० वर्षांची जुनी भागिदारी होती. परंतु ज्यावेळीं देण्याचा प्रसंग येई त्यावेळीं एक भागिदार दुसऱ्या भागिदाराला सांगे कीं, तूच दे. वस्तुतः देण्याची इच्छा होती, भावना व शक्तिही होती परंतु त्याच्या हातून ही गोष्ट घडत नव्हती. तो असल्या गोष्टी आपल्या भागिदारावर सोपवीत असे.

भगवंताच्या बाबतीतही असंच आहे. भगवंताला सगळ्यांना सुधारावयाचे आहे. पण ती गोष्ट स्वतःच्या हातून होत नाही. म्हणून तो संताना पाठवून देतो. हे संत भगवंतापेक्षाही कृपाळू आहेत. संत माणसाची दृष्टि बदलतात. शास्त्रकार केवळ मार्ग दाखवतात पण संत दुसऱ्याचा बोजाही आपल्या डोक्यावर घेतात. आपण चालायला लागलें तर सामान संत घेतात. जीं कर्मे माणूस करतो त्याचा बोजा परमेश्वरावर सोपवायला सांगतात अशा तऱ्हेनें संतांचं सामर्थ्य अतर्क्य आहे.

भगवंताची माया कशी वेगळीच आहे. त्यानं हें जग कसं बनवलं हें आपल्याला कळतही नाहीं. त्याची कृपा करण्याची पद्धतीही अशीच वेगळी आहे. परमेश्वर साक्षात् कृपा न करता संतांकरवीं कृपा करतो.

आई! या दृश्य व अदृश्य असलेल्या महापुरुषाना क्रियासामर्थ्य व कृपासामर्थ्य देणारी तूंच आहेस. म्हणूनच तुला 'दृश्यादृश्यविभूतवाहनकरीं' असं म्हणतात.

तसच तूं **ब्रह्माडभांडोदरी......**आहेस. तुझ्या पोटांत हें त्रैलोक्य सामावलेलं आहे. संपूर्ण विश्वाला तुझ्याठिकाणीं स्थान आहे. सत्, असत् सर्वच तुझ्याठिकाणीं आहे. संपूर्ण जगाचं तुला कल्याण करायच आहे. तुझ्या दरबारात सज्जनाना आणि चोरांना सारखंच स्थान आहे. गंगा ज्याप्रमाणे चांगल्या व गटारांतल्या अशा दोन्ही प्रकारच्या पाण्याला स्थान देते, तशीच तूंही आपल्याठिकाणीं सर्वांचा समावेश करतेस. आई! एखादा चोरही येऊन तुझं दर्शन करूं लागला तर हळूहळू त्याची चोरी करण्याची भावना कमी होत जाईल.

पुष्कळ लोक म्हणतात कीं, हा चोर आहे, वाईट आहे, नालायक आहे, तरीही गीता वाचतो. अरे तो नालायक आहे म्हणूनच त्याला गीता वाचण्याची जरूरी आहे. जर तो चागला असता तर त्यानं गीता वाचलीच असती कशाला? अशा तऱ्हेनं लोकाना स्वतःला काहींही करायचं नसत म्हणून ते अशा प्रकारं बोलत असतात अशा प्रकारचे लोक महाभयंकर होत, राक्षस होत.

या जगात आईला सर्वांचंच कल्याण करायचं आहे, म्हणून आई सर्वांना देते मग जर प्रत्येकाला देत असेल तर मग मला कां नाहीं देत

नाहीं? आई मलाही देते. पण आई देतांना हें पाहाते की, मला देण्यानं जगाचं नुकसान तर नाहीं ना होणार? हा सर्व विचार करून आई आपल्याला देते.

पुराणांत एक सुंदर गोष्ट आहे. हंस भगवंताला सांगतो कीं, 'प्रभो! तूं जर मोत्यांचा पाऊस पाडलास तर किती बरं चांगलं होईल! पण बेडूक म्हणाले नको. त्याऐवजीं चिखलाचा वर्षाव कर. परंतु भगवान पाण्याचा वर्षाव करतो. पाण्यामुळं हंसाला मोती मिळतात आणि बेडकांना चिखलही मिळतो. भगवंताच्या दरबारांत मुंगीपासून माणसापर्यंत कुणाचीही उपेक्षा होत नाहीं. गवत, पानं यांच्याकडेही भगवंताचं लक्ष आहे. म्हणून तीं नाचत असतात; हंसत असतात. म्हणूनच आई! तूं **ब्रह्मांडभांडोदरी** आहेस.

**लीलानाटकसूत्रभेदनकरी...** आई! तुझ्या लीलेनं हें नाटक सुरू आहे. लीला म्हणजे हंसत खेळत या जगाच्या सूत्रांना प्रभो! तूं हालवीत आहेस. खेळतां खेळतां भगवान नाटक करतो. भगवती नटते, कपडे बदलते. सूर्याचे बदललेले कपडे पाहाण्यांत केवढा आनंद आहे! दार्जिलिंगला सूर्योदयापूर्वी क्षणोक्षणीं आकाशाचे रंग बदलतात. तें पाहून असं वाटतं कीं, हें सारं तुझं सौंदर्य पिकून टाकावं. पण याहीपेक्षां खेळांत आपली अद्‌भुत कला प्रकट करतेस. तुझ्या दृष्टीनं हें सारं सहजच आहे. लीलेनं निसर्ग खुलावा म्हणून तूं या जगाचं नाटक लीलेनं निर्माण केलंस.

प्रभो! ही सृष्टि म्हणजे एक नाटकच नव्हे कां? ही सृष्टि तूं निर्माण केलीस व हें नाटकही तुझ्याच लीलेनं निर्माण झालं आहे. सामान्य कित्येक नाटकं सुखपर्यवसायी आहेत तर कित्येक दुःखांत आहेत. परंतु हें म्हणणं बरोबर नव्हे. तुझ्या या नाटकाची अद्‌भुतता कांहीं वेगळीच आहे. तूं जाणूनबुजून सुखद व दुःखद जीवन देतेस. दुःख हें विकासासाटींच असतं. आपण ज्यावेळीं वेदांत वाचतो त्यावेळीं जीवन हें सुखपर्यवसायी आहे, याची प्रतीति येते. सुखपर्यवसायी म्हणजे जीवनाची परिपूर्णता सुखांत होते; किंवा जीवन दुःखपर्यवसायी याचा अर्थ जीवनाची परिपूर्णता सुखांत होते. या दोन्हीही समजुती चुकीच्या आहेत. वेदांत सांगतो कीं, जीवन आनंदपर्यवसायी आहे आणि ही वस्तुस्थिति आहे.

परंतु हें नाटक कांहीं वेगळ्याच कारणासाठीं आहे. परमेश्वरनें ठिकठिकाणीं प्रश्न निर्माण करून ठेवलेले आहेत. सृष्टि ही सुखासाठीं आहे कीं, दु:खासाठीं हें कोणालाच माहित नाहीं. वास्तविक सृष्टि ही आनंदासाठीं आहे. आई! या संपूर्ण जगाला तूं लीलेनें चालवतेस, खेळवतेस

सूर्यचंद्रांना हालवणं एखादे वेळेस शक्य होईल पण या मनुष्य-प्राण्याला ताब्यात ठेवणं ही गोष्ट अतिशय कठीण आहे. माणूस मनव्जातीलाच ताब्यात ठेवूं शकत नाहीं. मला माझ्या कामही संभाळतां येत नाहीं. परंतु प्रभुनें संपूर्ण जगत् आपल्या ताब्यात ठेवलं आहे व ही गोष्ट अतिशय कठीण आहे. बैठक मारून बसलेल्या वायुदेवानं जरा जर आपला पाय लांब केला तर वादळें होतात आणि शहरांतले व्यापार बंद पडतात.

निसर्गाला ताब्यात ठेवण, पशु-पक्षाची काळजी घेणं, चंद्र-सूर्यांना धावायला प्रवृत्त करण या सर्व गोष्टी भगवती करते. या गोष्टी करणं भगवतीला सहज शक्य आहे. परंतु माणसाला ताब्यात ठेवणं ही गोष्ट कठीण आहे आई! तूं इतकं देतेस पण एखादे दिवशीं जर थोडसं कमी दिलंस तर लोक तुझ्याजवळ येऊन तक्रार करतात. अशांची समजूत घालणं ही गोष्ट किती कठीण असेल? आई! तुला किती बर त्रास होत असेल? परंतु हें सर्व तूं सहज लीलेनं करीत असतेस

भगवती! तुझं रूप खरोखरच अतर्क्य आहे. तूं कोणती गोष्ट करीत नाहींस? तू खरोखर अजब आहेस. वाल्मीकींना तू प्रेमळ दृष्टीच्या इशाऱ्यानं नाचायला लावतेस याज्ञवल्क्याशीं बोलतेस व त्याचा हात धरून त्याना मोक्षापर्यंत नेतेस आणि एखाद्या मवाल्याचा हात पकडून त्याला सिनेमाद्वारापर्यंतही घेऊन जातेस. अशा प्रकारच्या लोकांबरोबर तू हंसतेस, खेळतेस. पण इतकं सगळं करत असूनही तू कांहींच करीत नाहींस असं सांगतेस. हेंच तुझं महान नाटक होय. जगाचं नाटक सुरू आहे आणि त्याचं संचालन नटराज करीत आहे.

जरा शान्तपणं विचार केला तर असं दृष्टोत्पत्तीला येईल कीं, जगाला मार्गदर्शन करणाऱ्या, कांहीं लोकांना मोक्ष देणाऱ्या, कांहींना स्वर्गद्वारापर्यंत नेणाऱ्या तर कांहीं लोकांना सिनेमा-थिएटरपर्यंत घेऊन जाणाऱ्या

परमेश्वरानें जर असहकार केला तर सिनेमाला जातां येणार नाहीं. पण हें सर्व नाटक नटराज लीलेनं घडवून आणीत आहे, हेंच त्याचं वैशिष्ट्य आहे. म्हणूनच तू आई! लीलानाटकसूत्रभेदनकरी आहेस.

विज्ञानदीपाङ्कुरी...... आई! तूं विज्ञानाच्या दिव्याला प्रज्वलित करतेस आई! आम्हीं खूप वाचतों पाठ करतों परंतु जोंपर्यंत हें तुला शोभत नाहीं, असं तूं सांगत नाहींच तोंपर्यंत कांहींच परिणाम होत नाहीं. तूं ज्यावेळीं सांगशील कीं, बाळ! हे तुला शोभत नाहीं; त्यावेळीं जीवन बदलेल, नाहीं तर तोपर्यंत 'कथा ऐकून ऐकून किटले कान तरीही येईना ब्रह्मज्ञान' या म्हणीसारखी अवस्था व्हायची. अठरा वर्षांपयत गीतेचे अठराही अध्याय अगदीं तोंडपाठ केले परंतु वृत्तींत कांहींही बदल झाला नाहीं एकदों आठ वेळा सप्ताह श्रवण केले परंतु जसा होता तसाच राहिला. आपणही पुष्कळ वेळा वाचतो. पाठ करतों पण कांहींही बदल होत नाहीं. परंतु भगवती! तुझी कृपा झाली तरच मी बदलूं शकेन.

शाळिग्राम एक तासपर्यंत पाण्यात ठेवला तरी कांहींही फेरफार होत नाहीं. आपणांतही भगवंताचेच गुण नाहींत का? भगवान तटस्थ तसे आम्हींही तटस्थ. भगवान कूटस्थ तसे आम्हींही कूटस्थ. पण आई! माणसाची बुद्धि कोतीच आहे. आमच्यामध्ये असलेला विज्ञानदीप तूच प्रेमानं प्रज्वलित करतेस. तूं म्हणतेस, बाळ! हें तुला शोभतं का? या शब्दांच्या श्रवणानंतरच माझ्या जीवनात परिवर्तन होतं.

शेंकडो ऋषींनी आजपर्यंत महान परिश्रम केले. मार्गदर्शन केलं. परंतु मानव होता तसाच राहिला. कारण आई! कृपा झाली तर नारायण करुणामय! मग हृदय परिवर्तन झालच पाहिजे.

परंतु तुझा दृष्टिक्षेप एकाएकीं होणं शक्य आहे का? शक्य नाहीं. तुझी कृपा संपादन करण्यासाठीं जीवनांत ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याला साधना म्हणतात.

विज्ञान म्हणजे अनुभूति. भगवच्छक्तीशीं रममाण होणं, एकरूप होणं किंवा तल्लीन होणं हें खरं ज्ञान होय. एकरूप झाल्यावर किंवा तल्लीन झाल्यावर

जो आनंद मिळतो तें विज्ञान होय. जगाला विसरणं हे ज्ञान आणि नंतर आनंदाची जी अनुभूति येते तें विज्ञान.

चित्त एकाग्र झाल्यावर प्रभु भेटायला येत नसतो, तोंपर्यंत तो कमरेवर हात ठेवून उभा आहे. हात लांब करीतच नाहीं. परंतु आपली कृति अशी असली पाहिजे, जीवन असं असलं पाहिजे, की, त्यानं आपण होऊन हात लांब केला पाहिजे. ज्यावेळीं प्रभु हात लांब करतो, तीच आनंदाची परमावधि होय परंतु आई! तुझी कृपा झाली तरच ही गोष्ट शक्य आहे. तूंच विज्ञानदीप प्रज्वलित करतेस.

श्रीविश्वेशमनःप्रसादनकरी..... भगवंताचं मन प्रसन्न होईल अशा प्रकारचं जीवन जगलं पाहिजे. काय केल्यानंतर भगवान प्रसन्न होईल, हीच जीवनांत मोठी समस्या आहे. काय केल्यानंतर मी भगवंताला आवडेन बरं!

कोणी म्हणेल की, परोपकार केला की आपण भगवंताला आवडूं परंतु परोपकार करणारे तुम्ही कोण? परोपकार करून तुम्ही भगवंताचे आवडते होणार नाहीत. मग काय केल्यानंतर भगवंत हसत हसत येईल?

भगवंताचा आराम म्हणजे आपलं मन: कांही अशा प्रकारचे भक्त असतील की, त्यांच्या आजूबाजूला भगवान फिरत असेल.आणि अशी वाट पहात असेल कीं, हा माझी केव्हां पूजा करील?

आपलं जीवन क्षुद्र अध:पतित झालेलं आहे, भावनाशून्य झालेलं आहे. कुत्र्यासमोर जसा भाकरीचा तुकडा फेकावा तसा लक्ष्मीनारायणाकडे आपण पैसा फेकीत असतो जियं भावना, भक्ती, हृदय नाही आणि आईवर विश्वास नाही, आईच्या वाङ्मयावर श्रद्धा नाही, वेदांवर निष्ठा नाही, तत्वज्ञानाचे सिद्धात मान्य नाहीत आणि ज्याचं आईवर प्रेम नाही, त्याला भगवान प्रसन्न होत नाही त्याच्या घरी भगवान अन्नग्रहण करीत नाही.

भगवंताचं मन कसं बरं प्रसन्न करायचं? ती जीवन-पद्धति मला माहित नाही. परंतु आई तुझी कृपा झाली तरच ती जीवनपद्धति मी आत्मसात करीन. संपूर्ण गावांत कोणीही वैश्वदेव करीत नाही आणि एखादीच व्यक्ति वैश्वदेव करीत असेल तर त्याच्या घरीच कावळे, कुत्रे आशाळभूत

नजरेने धावत धावत येणार. अशा प्रकार आपली पूजा कोण करतो आहे त्याची भगवान वाट पहात बसला असेल. पूजा पुरी झाल्यानंतर तिथं प्रसाद मिळेल या आशेनं भगवान तिथं फिरत असेल अशा प्रकारच्या लोकाना पहाताच भगवान संतुष्ट होतो

हिण्यकश्यपूचं भयंकर, दांभिक, भोगलंपट जीवन पाहून भगवान संतापला असेल परंतु प्रल्हादाचं कृतिशील जीवन पाहून तो प्रसन्न झाला असेल त्याचा क्रोध शमला असेल

आज सर्वत्र दुर्योधन, हिण्यकश्यपूची संतति दिसत आहे. व ती दांभिक जीवन जगत आहे सात वेळा भगवंताला नमस्कारही करील परंतु भगवान मानणार नाहीं. भगवंताला फसवायला निघालेल्या लोकांची संख्या आज बरीच दिसत आहे म्हणूनच भगवंताचे डोळे क्रोधान लाल झालेले आहेत. या नृसिंह भगवंताला प्रसन्न करण्यासाठीं प्रल्हादाची आवश्यकता आहे. शासन संस्थेच्या विरुद्ध उभ राहून त्याने सृष्टीचं संपूर्ण स्वरूप बदलून टाकलं म्हणून भगवंताला प्रसन्न करणाऱ्या जीवनपद्धतीची गरज आहे

विश्वेश्वराला प्रसन्न करणारी जीवनपद्धति मी आचरावी अशी भिक्षा हे आई! तू मला दे, अशी शंकराचार्य मागणी करीत आहेत कारण आई! तुझ्या शक्तीलाच ही गोष्ट शक्य आहे. तुझी शक्तीच ही मागणी पुरी करू शकेल.

श्री जटाजूटः शरणम्।

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

उर्वी सर्वजनेश्वरी भगवती मातान्नपूर्णेश्वरी ॥
वेणीनीलसमानकुंतलहरी नित्यान्नदानेश्वरी ॥।
सर्वानंदकरी सदाशुभकरी काशीपुराधीश्वरी।
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥ ६ ॥

उर्वी म्हणजे पृथ्वी. पृथ्वीलाही मूल्य आहे पण आई तुझं मूल्य मात्र तिच्यापेक्षांही अधिक आहे. तुझ्यासमोर तिचं मूल्य कांहींच नाहीं. जग परिवर्तनशील असल्यामुळं या सृष्टींतील सर्व उपभोग, संपत्ति, साम्राज्य, वैभव हीं सर्व तुझ्यापुढं अगदीं तुच्छ आहेत. तुझं पारडं नेहमींच जड असतं. जगत् असत् आहे; हा वैदिक सिद्धांत आहे पण या लोकांना पृथ्वीमध्यं जीं तत्वं आहेत तीं तुच्छ वाटलीं. भगवंताकडे पाहात असतांना 'गंगालहरी'मध्यं जगन्नाथ पंडित म्हणतात

अपि प्राज्यं राज्यं तृणमिव परीत्यज्य सहसा।
विलोलद्वानीरं तव जननि तीरं श्रितवताम् ॥

हें सर्व तुच्छ वाटतं. जगन्नाथ म्हणतो कीं, प्राज्य राज्य सोडून तुझ्या किनाऱ्यावर बसावं अशी इच्छा होतो.

भारतांत अनेक युद्ध झालीं पण साम्राज्यासाठीं कधीं युद्ध झालेलं नाहीं. सांस्कृतिक कलह झाले पण ते पृथ्वीवर अधिराज्य मिळविण्यासाठीं नव्हत.दोन राज्यांत लढाया झाल्या पण त्या आसुरी आणि असंस्कृतिक विचारसरणीमध्ल्या झाल्या. परंतु पृथ्वीचें स्वामित्व मिळविण्यासाटीं कधींही लढाई झालेली नाहीं.

पण आई! तूं कीं पृथ्वी असा प्रश्न आला कीं तुझ्यासमोर राज्य, साम्राज्य, तुच्छ वाटनं, अशा प्रकारचीं माणसं क्वचितच आढळतात.

कृष्णानं दुर्योधनाला विचारलं कीं, माझं चतुरंग सैन्य व मी यापैकीं तुला काय हवं? दुर्योधनाला वाटलं कीं, कृष्णाचा काय उपयोग? त्यापेक्षां सैन्यच आपल्याला लढाईच्या कामीं उपयोगी पडेल.

भगवान कोणत्या रूपानं येतो हें सागता येणार नाहीं. भगवंताला चमत्कारच दाखवायचा असता तर दुर्योधनाला तो मानल्याशिवाय सुटकाच नव्हती पण श्रीकृष्ण सरळपणं सागतो कीं, **न धरी शस्त्र करीं मी गोष्टी सागेन युक्तिच्या चार।** दुर्योधनानं भगवंताला नकार दिला व सैन्य घेतल त्याचा काय परिणाम झाला हें आपणा सर्वांना माहित आहेच.

ज्यावेळीं हे महापुरुष आईजवळ बसत असतील त्यावेळीं त्याना हे सुखोपभोग तुच्छ वाटत असतील. संपूर्ण पृथ्वी त्याना छोटी वाटत असेल आईसमोर, भगवतासमोर जग तुच्छ वाटत व याचच नाव वैराग्य. हे लोक ज्यावेळीं भगवंताला सागतात कीं, आई! पृथ्वीचं मोल तुझ्यासमोर तुच्छ आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्याना पैशाचं मूल्य माहित नव्हतं. परतु विश्वभरासमोर त्याना पैशाचं विशेष मूल्य वाटत नाहीं. वैराग्य शब्दाचा अर्थ वस्तु वाईट आहे असा नव्हे. सृष्टि वाईट आहे अस म्हणून तिच्यापासून दूर निघून जाण याच नाव वैराग्य नव्हे ही एक तारेवरची कसरत आहे. वस्तु चागली म्हटली तर त्यावर कामना जडते व वस्तु वाईट आहे म्हटलं तर त्यामुळ मनात भीति निर्माण होते उदीर नाहींसे झाले खरे पण माजर डोक्यावर बसलं ना! आध्यात्मिक क्षेत्रात लोभ आणि भीति दोन्हीही असत्य आहेत जगत् असत् आहे अस वाटतं अशी जर इच्छा असेल तर असा एखादा मार्ग शोधून काढला पाहिजे कीं, जगाच्या आनदापेक्षा तिथ अधिक आनद मिळेल व मगच जगाची आसक्ति कमी होईल प्रभुप्रेमाचं, प्रभुभक्तीचं पारडे ज्यावेळीं जड हो ल, पृथ्वीपेक्षा जड होइल त्यावेळीं तें माप खालीं येईल म्हणून आई! तुझ्यासमोर बसलें कीं सार जग तुच्छ वाटत.

**सर्वजनेश्वरी......**आइ! तू सर्वजनेश्वरी आहेस तू सज्जनाना किंवा भक्ताना आवडशील यात नाहींच विशेष नाहीं परतु वाइट, दुर्जन आणि अभक्तानाही तू आपल्याजवळ करतेस व त्याना आनदित करतेस तू सज्जन व दुर्जन या दोघानाही आपल्याजवळ घेतेस कारण–

अपि चेत् सुदुराचार भजते मामनन्यभाक्।
साधुरेव स मंतव्य सम्यग्व्यवसितो हि स ॥

म्हणून तू सर्वजनेश्वरी आहेस तू सर्वांना ऐश्वर्य देतेस भक्त तसेच पापीसुद्धा जर एखदा तुझ्याकडे वळले तर तू हा कोण आहे, याचा काहीं

विचारच करीत नाहींस. त्याचा भूतकाळ तूं विसरतेस इतकेंच नव्हे तर जगालाही सांगतेस की, भूतकाळ विसरून जा. म्हणूनच लोक वाल्मीकीचा भूतकाळ विसरतात.-वाल्मीकीचा भूतकाळ आठवला तर लोक त्याना चोरच म्हणणार. पण जे प्रभुसन्मुख झाले त्याचा भूतकाळ दृष्टीआड करायचा असतो. पापक्षय श्रीरघुनाथ सेवा। जे रघुनाथ सन्मुख झाले. त्याचा भूतकाळ विसरला जातो.

. तुझ्याकडे आलेल्या दुर्जनाना तूं सज्जन करतेस. लहान मोठे, स्त्री पुरुष या सर्वांना तूं आपल्याजवळ घेतेस, आणि प्रेमसंपन्न करतेस प्रजहाति यदा कामान...। हें जरी खर असल तरीही लहान मोठे, स्त्री पुरुष, पंडित अपंडित, सज्जन दुर्जन या सर्वांना तुझं घर खुलं आहे. गेल्या श्लोकाचें विवरण करताना आपण पाहिलं कीं, वशिष्ठाबरोबर फिरणारा, याज्ञवल्क्याना हात देणारा भगवान नारायणरावाचा हात पकडून त्याला थिएटरकडे घेऊन जातो.

याज्ञवल्क्याना ज्यानें तात्त्विक सिद्धांत समजावून दिले तो भगवान असं म्हणत नाहीं कीं मी, विशेष बुद्धि असलेल्या माणसाशीच बोलेन खालच्या दर्जाच्या लोकाशी न बोलण्याचें माझं तत्त्वज्ञान नाहीं. नामदेव, नावी यासारख्या लोकानीं भगवंताजवळ ' नैवेद्य खा, असा आग्रह धरला व तो त्यानें खाल्ला छे! छें! प्रभूनं खाव या हेतून नामदेवाची झालेली अस्वस्थता पाहून तूं धावत धावत आलास. यामध्यें तुला नामदेवाचा पोरकटपणा नाहीं वाटला.

आई! तुझ्या घराचीं दारं पंडित अपंडित, लहान थोर, संत, पापी, सज्जन दुर्जन या सर्वांसाठीं नेहमीं उघडीं आहेत कारण तूं सर्वजनेश्वरी आहेस

आई! तुला भगवती म्हणतात सहा तत्त्वाना भग म्हणतात व तीं ज्याच्याजवळ असतील त्याला भगवान म्हणतात

ऐश्वर्यस्य समग्रस्य वीर्यस्य यशसः श्रियः।

ज्ञान वैराग्ययोश्चैव षण्णाम् भग इतीरणा॥ वि. पु ६–६–७४
संपूर्ण ऐश्वर्य, वीर्य, यश, श्री, ज्ञान आणि वैराग्य या सहा गोष्टी ज्याच्याजवळ असतील त्याला भगवान म्हटल जातं व त्या भगवान शब्दाचेंच स्त्रीलिंगी रूप भगवती. आई! संपूर्ण ऐश्वर्य तुझ्याजवळ आहे. पण संपूर्ण ऐश्वर्य म्हणजे काय!

नवरत्नांचे हार, सोन्याचे ढीग म्हणजे ऐश्वर्य नव्हे. हें संपूर्ण चैतन्यच आहे, या दृष्टीनें सृष्टीकडे पाहाणं याचं नांव ऐश्वर्य.

**क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति।**
**अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति॥**

आ.! पापी लोकांना क्षमा करण्याचं ऐश्वर्य तुझ्याजवळ आहे. अज्ञानी लोकांसाठीं दयेचं ऐश्वर्य, साधकासाठीं कृपेचं व भक्तांसाठीं ममतेचं ऐश्वर्य प्रदान करणारी तूं आहेस. तसंच ज्ञानी लोकांना आत्मशक्ति देऊन त्याना आत्मस्वरूप करण्याचीही तुझी तयारी आहे. 'भगवान होशील' असं तूं म्हणणं यापेक्षां तें महान दुसरं कुठलं ऐश्वर्य असणार? ज्ञानी लोकांना आत्मस्वरूपाचं ज्ञान देणं किती दुर्घट काम आहे! पण तें देण्यासाठीं तूं नेहमीं तयार असतोस.

राजा खुष झाला तर कदाचित् एखाद्याला प्रधान करील पण तो काहीं त्याला आपल्या सिंहासनावर बसविणं शक्य नाही. परंतु राजाधिराज असलेली तूं मात्र **राजविद्या राजगुह्य** (गी ९) व **यद्गत्वाननिवर्तते तद्धाम परमं मम।** असं असलेलं जे तुझं पद, तिचं तूं दान करीत राहिली आहेस. आत्मस्वरूपाचं दान हें तुझ्या मनाचं महान ऐश्वर्य होय. वडील खुष झाले तर मुलाला स्वत:जवळ ठेवतील, वृद्ध झालेली आई खुष झाली तर स्वत:जवळ ठेवलेलं सोनं देईल परंतु आत्मस्वरूप दानाच्या ऐश्वर्याची सर कशालाही येणार नाहीं. स्वत:जवळ कांहींही न ठेवतां देणं यात केवढी भव्यता आहे!

पापी लोकांना क्षमा करण्याचं ऐश्वर्य तुझ्याजवळ आहे. या जगांत अज्ञानी लोक पुष्कळ आहेत. वडिलांचं अनुकरण करणारे किती तरी अज्ञानी लोक या जगांत आहेत. व आपणही **'पीछेसे आया तो आगे लौटा दिया'** अशा वृत्तीचे आहोत, असं म्हणणाऱ्यांवरही तूं दयादृष्टि ठेवतेस. अशा तऱ्हेचं दुसरं कुठलं ऐश्वर्य आहे का? अशा प्रकारचं क्षमेचं ऐश्वर्य खरोखर तुझ्याजवळच आहे.

साधक ज्यावेळीं साधना करूं लागतात त्यावेळीं त्यांना तुझ्या कृपेचं ऐश्वर्य प्राप्त होतं. त्यांच्याविषयीं तुझी कृपेची दृष्टि असते. तूं सर्वांनाच पहातेस पण तुझी पाहाण्याची दृष्टि वेगवेगळी असते. कोणता माणूस कसा आहे हें तुला अर्ध्या क्षणांत कळतें. हा माणूस पापी आहे,

अज्ञानी आहे, साधक आहे, भक्त आहे की ज्ञानी आहे हें तुझ्या येतं व या व्यक्तींच्या भेदाप्रमाणं तुझ्या दृष्टींतही भेद होतो; असं ऐश्वर्य आहे.

भगवंताच्या मनांत भक्तांविषयीं ममता असते. भक्तांना पाहून वेडा होतो. यालाच ममतेचं ऐश्वर्य म्हणतात. वस्तुतः भगवान किती आहे! पण भक्त त्याला 'तूं' अशी हांक मारतात. तुकाराम महाराज विठो 'विठाई मऊली माझी' असं म्हणतात. श्रीकृष्ण कसे आहेत असं न श्रीकृष्ण कसा आहे असं म्हणतात. श्रीकृष्ण माझा आहे असं आपण बोलता याचं कारण ममताच होय. भगवंताला 'तूं' अशी हाक मारणं यांतलं स्वारस्य आहे. यालाच ममतेचं ऐश्वर्य म्हणतात.

ज्ञानी माणसाला तूं सर्वस्व देतेस. ज्ञानी माणसाच्या 'मी' च्या जागीं 'तूं' ची स्थापना झालेली असते. यालाच '**अहं ब्रह्मास्मि**' असं म्हणतात. हेंच हृदयाचं ऐश्वर्य, हेंच दातृत्वाचं ऐश्वर्य! यापेक्षां दुसरं कुठलं ऐश्वर्य असू शकेल? आई! तुझ्याजवळ काय नाहीं? तुझ्याजवळ अज्ञानी लोकांसाठीं सहनशीलतेचं ऐश्वर्य आहे. हीच क्षमा होय. भक्तांसाठीं तुझ्याजवळ हृदयांचं ऐश्वर्य आहे आणि ज्ञानी लोकांसाठीं स्वतःचं पद देण्याएवढं हृदयाचं ऐश्वर्य आहे.

माझ्याजवळ सहनशीलतेचं ऐश्वर्य नाहीं. जगांतील सामान्य आई आपल्या मुलाचे दोष सहन करायला तयार नसते. जरा कांहीं झालं कीं तिच्या तळ पायाची आग मस्तकाला जाते आणि व्यवहारांतही असंच चालतं. पण आई! तूं आमचे किती दोष सहन करतेस! याचं कारण तुझ्याजवळ हृदयाचं ऐश्वर्य आहे तुझ्याजवळ दातृत्वाचं ऐश्वर्य असल्यामुळं **ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।** असं तूं म्हणतेस. क्षमा, दया, कृपा, ममता, आत्मस्वरूपाचं समर्पण अशा प्रकारच्या संपूर्ण ऐश्वर्यानं तूं भरलेली आहेस. अशा प्रकारचं ऐश्वर्य या सृष्टींत कुणाजवळही नाहीं आणि अशा प्रकारच्या ऐश्वर्याशिवाय माणूस तरी दुसऱ्या कोणत्या प्रकारच्या ऐश्वर्याची अपेक्षा करील?

आईनं किती तोळ्यांचे दागिने घातले आहेत हें मूल पहात नाहीं. तर आई आपल्यासाठीं किती कष्ट करते, केवढा त्याग करते आणि किती

प्रेमळ दृष्टीनं पहाते, हें मूल पाहातं. मुलाचं लक्ष आईच्या इतर गोष्टींकडे जातच नाहीं. **क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति।** हें तुझं ऐश्वर्य आहे. या तुझ्या ऐश्वर्यांमध्यें सर्व प्रकारच्या ऐश्वर्यांचा समावेश झालेला आहे.

वीर्य म्हणजे शक्ति किंवा प्रभाव. क्षमेचं ऐश्वर्य तुझ्याजवळ असूनही तुझ्या दृष्टींत एक विशेष सामर्थ्य आहे. पण या तुझ्या सामर्थ्यामुळंच तुझ्या दयेला एक विशेष अर्थ प्राप्त झालेला आहे. आपण दया कोणावर करतों तर जो असहाय असतो त्याच्यावर. पण जीवन बदलण्याची ज्याच्यामध्यें शक्ति आहे अशा व्यक्तीनं दया केली तर त्याला अर्थ आहे. आई! तुझ्याजवळ जीवन बदलूं शकेल अशा तऱ्हेची शक्ति आहे. आपण जगात दया करतों पण जीवन बदलण्याचं सामर्थ्य त्यात नसतं. अशा प्रकारची दया ही खरी दया नव्हे आई! तुझ्याजवळ यश सुद्धा आहे. तुझ्या नावात यश आहे. भगवान हा शब्द आला रे आला कीं यश आलं रे आलं, म्हणून समजावं.

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।**
**तत्र श्रीः विजयः भूतिः ध्रुवा नीतिः मतिः मम॥**

भगवंताच्या नामातच ऐश्वर्य आहे.

श्री म्हणजे शोभा किंवा सौंदर्य. तुझ्याजवळ अलौकिक सौंदर्य आहे.

**ज्ञान** तुझ्याजवळ अगाध ज्ञान आहे जगाचं ज्ञान तर आहेच आहे परतु मानवी देहाच्या रचनेचं कौशल्य खरोखरच विलक्षण आहे जें जग तूं निर्माण केलंस त्याचं ज्ञान तर तुझ्याजवळ आहेच पण माणसाचंही ज्ञान तुझ्याजवळ आहे जीवशास्त्र, प्राणिशास्त्र, अर्थशास्त्र या सर्वांचं अध्ययन करतां येईल. परतु माणसाला जाणणं कठीण आहे. भगवंताला जाणणं जितकं कठीण तितकंच माणसाला जाणणंही कठीण आहे याचं कारण माणूस हा सुद्धा तुझाच अंश आहे ना! **ममैवांशो जीवलोके।** माणसाला ओळखणं हे कठीण परतु तुझ्या समोर आलेल्या माणसाला मात्र तूं तात्काळ ओळखतेस. कारण तुझ्याजवळ सर्वच प्रकारचं ज्ञान आहे.

वैराग्य– या सृष्टीविषयीं तुला ममता वाटते. तिच्यावर तूं कृपा करतेस त्यावेळी तुला आसक्ति असणारच. पण छे! वैराग्य आहे. पण हें

फसं काय शक्य आहे ? आई ! हेंच तर तुझं वैशिष्ट्य आहे. सारी दुनिया ज्यावेळीं रडत असते त्यावेळीं तू हंसत असतेस. तुझ्या डोळ्यांत मुळींच अश्रू नसतात. श्रीकृष्णभगवंताच्या डोळ्यात अश्रु नाहींत. परंतु भारतीय संस्कृतीसाठीं अभिमन्यूनं ज्यावेळीं आत्मबलिदान केलं आणि भीष्मपितामहांनीं ज्यावेळीं हा लोक सोडला, अशा दोनच प्रसंगीं श्रीकृष्णभगवंताच्या डोळ्यांत अश्रु आले

भगवंताला या जगाविषयीं आसक्ति आहे कीं अनासक्ति आहे, याचा विचार करूं लागलों तर भगवान अनिर्वचनीय आहे. आसक्त शब्दाचा अर्थ एखाद्या व्यक्तीचा हात धरून त्याला चित्रपटगृहांत चित्रपट पहायला घेऊन जाणं आणि अनासक्त म्हणजे आपण कितीही रडलो, आकांत केला तरीही जो विचलित होत नाहीं. उर्वी सर्वजनेश्वरी भगवती.......तूं भगवती आहेस. तूं सर्व ऐश्वर्य सपन्न आहेस.

आसक्ति आणि अनासक्ति या दोन्हीं गोष्टी ज्याच्या जीवनांत दिसतात तें महापुरुष होत सामान्यपणं एक तर आसक्ति दिसेल नाहीं तर अनासक्ति असेल. पण भगवान महान कां तर त्याच्याजवळ जेवढी आसक्ति आहे, तेवढीच अनासक्ति पण आहे. ज्यांच्या जीवनांत आसक्ति अनासक्तींचं मिश्रण आढळलं त्या व्यक्ति महान, पूजनीय होत.

तूं अन्नपूर्णेश्वरी........आहेस. आई ! तूं खरोखरच, पूर्णतेच अन्न खायला देतेस. इतर सर्व प्रकारचीं अन्नं खायला दिलीं जातात पण तीं सर्व अपूर्णतेचीं अन्नं होत. म्हणूनच अकरा वाजतां जरी जेवलं तरी पुन्हा तीन वाजतां भूक लागते. याचं कारण तें अपूर्णतेचं अन्न आहे. तूं फक्त एकदाच अन्न देतेस. यद् गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम। नंतर परत भूक लागत नाहीं. कारण तुझं हें पूर्णतेचं अन्न आहे यद् ज्ञात्वा नेह भूयोन्यत् ज्ञातव्यमवशिष्यते। तें तत्त्व एकदा जाणल्यावर पुन्हा या जगांत जाणण्यसारखं कांहीं रहातच नाहीं

वेणीनीलसमानकुन्तलहरी......कुन्तल म्हणजे केस. तुझ्या काळ्या केसांच्या वेणीनं माझं मन आकृष्ट होतं. मी तुझ्याजवळ आलो परंतु तुझ्या डोक्यावर असलेले केस दृष्टीला पडतांच मी तेच पहात राहिलों वास्तविक

आईच्या मस्तकांत काय आहे तें पहायला हवं. मस्तकात प्रेम आणि ज्ञान भरलेलं आहे. आम्हांला प्रेम हवं आहे व आईजवळ त्यासाठींच गेलं पाहिजे. तुझ्या मस्तकात प्रेम किती आहे, तसंच ज्ञान किती आहे, हें पाहाण्याकरितां आलें पण तुझ्या डोक्यावरील केस पाहूनच मोहित झालें. म्हणून तुझ्या प्रेमापासून आणि ज्ञानापासून मी वंचित राहिलें.

भगवंताचं मस्तक म्हणजे वेद. त्या वेदांतील प्रेम आणि ज्ञान जाणण्यासाठीं वेदांचं अध्ययन केलं. परंतु त्या वेदांचं असं नयनमनोहरत्व आहे कीं, त्यामुळं मी वेद म्हणायला सुरुवात केली, पण त्यांचा अर्थच कळेना. आई! तुझ्या मस्तकाचा बहिरंगच इतका उत्कृष्ट आहे कीं, तो पहात असताना प्रेम आणि ज्ञान मी विसरूनच जातें. प्रेम आणि ज्ञान संपादन करण्यासाठीं तुझ्याजवळ आले पण मोहित होऊन बहिरंगच पहात राहिलें. तुझ्याजवळ आलें पण तुझ्या प्रेमाचा आस्वाद घेतला नाहीं किंबहुना तो आस्वाद घेण्याची माझ्याठिकाणीं बौद्धिक शक्ति नाहीं, तसंच तुझं प्रेम जाणायला माझ्याजवळ अक्कल पण नाहीं, म्हणूनच तुझं आकर्षण मला वाटत नाहीं.

श्रीमत् आद्य शंकराचार्यांचा तोटक या नांवाचा एक शिष्य होता त्याच्याजवळ बुद्धि मुळींच नव्हती. (असं आपल्याला म्हणतां येणार नाहीं कारण त्यानं तोटक वृत्तांत जें काव्य केलं आहे तें अतिशय कठीण आहे. पण ही सुरुवातीची गोष्ट आहे.) तो असं म्हणत असे कीं, गुरुमहाराज! तुम्हीं प्रेमसागर अहांत. तुमचं प्रेम ओळखणं माझ्या शक्तीबाहेर आहे. तुमचं ज्ञान अगाध आहे परंतु तें माझ्या डोक्यावरून जातं. असं असूनही मी दररोज शुचिर्भूत होऊन तुमच्याजवळ पाठ घेण्याकरितां येतों. कारण तुमचं मला आकर्षण वाटतं व्यक्ति पूजेवरून माणूस तत्वनिष्ठेकडे जातो. तोटक म्हणतो, तुम्हीं जें ज्ञान मला देतां तें खरोखर मला समजत नाहीं पण तुम्हांला पाहूनच मी मोहित होतों. यालाच व्यक्तिप्रेम म्हणतात. या व्यक्ति प्रेमातूनच तत्वप्रेम निर्मान होत असतं.

आई! तुझ्याजवळही प्रेम आणि ज्ञान पुष्कळ आहे. पण बाह्य सौंदर्य पाहूनच मी मोहित होतों व त्यामुळंच तुझ्याजवळ प्रेम आणि ज्ञान मिळी

आहे हें मला कळतच नाहीं. असं जरी असलं तरी तुझ्याजवळ यावं असं मला वाटतं.

आईकडे जावं असं मुलाला वाटतं. याचं कारण आई मोठी विदूषी असते म्हणून नव्हे. आईच्या विद्वत्तेशीं मुलाला कांहीं कर्तव्यही नसतं. तीं आई आहे, हेंच त्याला आकर्षण असतं. अशाच प्रकारं आई! तुझ्याजवळ ज्ञान असेल परंतु तुझ्या केसांना पाहूनच मला फार मोठं आकर्षण वाटतं. वेणीनीलसमान कुंतलहरी।

· **नित्यान्नदानेश्वरी** ........ आई! तूं नेहमीं अन्नाचं दान करीत आहेस. मनाला भावनेचं, बुद्धीला ज्ञानाचं, शरिराला स्थूल अन्नाचं आणि आत्म्याला प्रेमप्रवाहाचं अन्न हवं असतं. हें सर्व प्रकारचं अन्न आई! तूं सर्वांना देतेस. भावनेचं अन्न तूं देतेस. संकटांत भावना पुष्ट होते ज्यावेळीं पत्नी आजारी पडते त्यावेळीं एकमेकांची भावन पुष्ट होते. संकट येतं त्यावेळीं भाव पुष्ट होतो. साधनांची रेलचेल असली तर भावना पुष्ट होत नाहीं. समजा एकच लाडू आहे, तो मोठ्या भावानं धाकट्या भावाला दिला पण धाकटा भाऊ म्हणतो, दादा! हा लाडू तुम्हींच खा ना! इथं भाव पुष्ट झालेला दिसतो. ज्याला पगार कमी असेल, त्याच्या घरीं पैशाची चणचण भासत असेल. परंतु ज्याच्याजवळ खूप पैसा आहे त्याची भावना पुष्ट होत नाहीं. मर्यादित आवक असलेल्या कुटुंबांत मोठ्या भावाला जर बोनस मिळाला तर तो घरीं येतो व आईला सांगतो कीं, आई! माझा धाकटा भाऊ कॉलेजात जातो त्याला चागले कपडे नकोत का? म्हणून त्याला मी दोन शर्ट शिवणार आहें त्यावेळीं जवळ असलेला धाकटा भाऊ म्हणतो, दादा! आई! मी तर इकडे तिकडे खेळतों. माझे कपडे मळतात; तेव्हा मला फाटलेले चालतील. म्हणून दादालाच अगोदर कपडे शिवूंद्यात. हें ऐकल्यानंतर त्या मातेला काय वाटेल! अशा प्रकारचं दृश्य ज्याच्या घरीं विपुलता असेल तिथं पहायला मिळणार नाहीं. दोघा भावाचा अशा प्रकारचा गोड कलह ऐकल्यानंतर आईच्या डोळ्यान खरोखर भावनेचे अश्रु निर्माण होत असतील अशा तऱ्हेनं भावना ही संकटकाळीं पुष्ट होत असते.

बुद्धि आणि मन हे जीवनाचे दोन भाग आहेत. या दोघांची पुष्टि करणं अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठीं आजारीपणाची सुद्धां आवश्यकता

आहे. पण ते आजारीपण मर्यादित असलं पाहिजे. तरच भावना पुष्ट होते.

पुष्कळ वेळ्य असा प्रश्न निर्माण होतो कीं, ज्या भगवतीनं हे विश्व निर्माण कलं, तिचीं आपण बालकं. ती जर वैभवसंपन्न आहे तर आपण संकटात का? संकटात भावना पुष्ट होते. म्हणूनच तर कुंतीमातेनं **विपदः संतु नः शश्वत्।** मला वारंवार विपत्ति प्राप्त होवो, असा भगवंताजवळ वर मागितला. कीर्तनकार अनर्थ करतात व सागतात कीं, संपत्ति आल्यानंतर माणूस भगवंताला विसरतो, म्हणूनच कुंतीमातेनं अपत्ति मागितली परंतु आपत्ति आल्यानंतर ईश्वराला विसरणारी कुंतीमाता इतकी का दुबळी होती? आपण आपणावरून जगाची परीक्षा करतो. आपत्तींत भावना पुष्ट होते. यामुळंच कदाचित् तिनं हा वर मागितला असण्याची शक्यता आहे.

भावजीवन पुष्ट करण्यासाठीं आपत्ति व बुद्धि पुष्ट करण्यासाठीं गरज यांची आवश्यकता असते. इच्छा, वासना यांनी बुद्धि गतिमान होते. यामुळंच बुद्धींत हालचाल दिसते. मला कसलीही गरज नाहीं, असं म्हणणारा माणूस संसारात राहातच नाहीं. म्हणून आई! कामना, वासना, गरज यांची आवश्यकता ही तुझीच कृपा होय.

भावना व बुद्धि यांच्या पुष्टीसाठीं कुठल्या ना कुठल्या तरी रूपानं आई संकटं पाठविते. आपत्ति वाईट हा दृष्टिकोण जीवन विकासाला मारक आहे. इवंच नव्हे तर भौतिक जीवनातही आपत्तींची गरज आहे. आपत्ति नेहमींच वाईट असतात ही कल्पनाच चुकीची होय. पाडव वनवासात गेले त्यामुळंच त्याचे जिव्हाळ्याचे संबंध टिकले राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांचं प्रेम अभंग राहिलं. याच कारण रामाचा वनवास राम राज्यात राहिला असता तर कदाचित् याच्या उलटही दृश्य पाहायला मिळालं असतं. पति-पत्नींच्या प्रेमाचंही खरं स्वरूप संकटात व्यक्त होतं. आपल्यासाठीं पत्नीला दुःख सहन करावं लागतं हें पाहून पतीचं पत्नीवरील प्रेम दृढ होतं. जीवनांत सुखदुःख या दोहोंचीही आवश्यकता आहे. म्हणूनच आई! तूं माझ्यासाठीं आपत्ति पाठवून देतेस.

त्याच प्रमाण शरीरपुष्टीसाठीं अन्नही तूच देतेस शेतकरी एक गोण बीं पेरतो व कापणी केल्यावर एक गाडीभर धान्य आणतो. हें अन्न कोणी दिलं? आई! हें भौतिक अन्नही निःसंशय तूंच देतेस.

आत्म्याचा प्रेमप्रवाह हीही आई तुझीच कृपा आहे. त्यामुळें तो प्रवाह वाहूं लागतो व आत्मिक प्रेम वाढतं. म्हणून आई तूं **नित्यान्नदानेश्वरी** आहेस. सर्व प्रकारचं अन्न तूंच देतेस.

**सर्वानंदकरी**......आई! तूं सर्वांना आनंद देतेस. यांत आश्चर्य तें काय? परंतु आई! 'सर्वानंदकरी' वृत्ति तूंच देतेस. भक्ताचे ठिकाणीं सर्वांना आनंद देण्याची वृत्ति आईच्या प्रेमामुळेंच प्राप्त होते. त्यामुळेंच भक्त सर्वांना आवडतात. **अहमेव मतो महीपतेः**। हें अजराजाचं वर्णन सर्वांना आवडतं. कांहीं लोक विद्वानांना आवडतात तर ते अविद्वानांना आवडत नाहींत. परंतु कांहीं लोक असे असतात कीं, ते शहरी-खेडवळ, सुसंस्कृत-संस्कृत, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, तरुण-वृद्ध, या सर्वांनाही आवडतात. ही सर्वानंदकरीवृत्ति तूं देतेस. वस्तुतः ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. परंतु तुझ्या कृपेनं सर्व कांहीं शक्य आहे.

सर्वानंदकरीवृत्ति ही तुझी पॉलिसी (policy) नव्हे. तसं असलं तर केव्हां ना केव्हां तरी ती गोष्ट जाहीर होते. पॉलिसीनं सर्वांचं प्रेम प्राप्त करतां येत नाहीं व मिळालें तरी फार वेळ टिकत नाहीं. नारद सर्वांना प्रिय होते. सुर व असुर या दोघांनाही नारद प्रिय होते. **ईश्वरोऽहमहंभोगी** अशा प्रकारचा घमेंड बाळगणाऱ्या कंसाकडेही नारद गेले व तिथं त्यांचं प्रेमानं स्वागत झालं. सर्व ठिकाणीं सन्मान प्राप्त होणं ही गोष्ट ईश्वरकृपेमुळें शक्य आहे. माझ्याठिकाणीं दिसणारी आनंदवृत्ति तसेंच संतांचे ठिकाणीं दिसणारी प्रसन्नवृत्ति या सर्वांचं तूंच कारण आहेस. माझ्यावर व भक्तांवर असलेल्या तुझ्या निरतिशय प्रेमामुळेंच ही गोष्ट शक्य आहे.

'सर्व' याचा अर्थ 'सगळा' हा जसा आहे तसा सर्व याचा अर्थ 'भगवान' असाही आहे. **सर्वं समाप्नोषि ततो सि सर्वः**। (तूं सर्वांचा समावेश करतोस म्हणूनच तूं सर्व आहेस.) सर्वांना आनंद याचा अर्थ भगवंताला आनंद असाही होईल व तशा प्रकारचं जीवन जगण्याची शक्ति आई! तुझ्याच कृपेनं प्राप्त होते.

कोणता मुलगा पाहिल्यावर भगवंताला आनंद होत असेल! विद्वान मुलाला पाहून ईश्वर चकित होईल का? बुद्धिमंताला पाहून तो थक्क होईल

ना? भगवंताजवळ असलेल्या बुद्धीपैकी एक सहस्रांश हिस्साही बुद्धि आपल्या जवळ नाही भगवंताजवळ वैभव विद्वत्ता, सर्व याचे भांडार आहे धनान्यर्जयध्वम्। असा मंत्र म्हणत रात्रंदिवस पैशाच्या पाठीमागे लागलेल्या व्यक्तीला पाहून का ईश्वर लाजणार आहे? मग उत्कृष्ट कलाकार झाले तर ईश्वर चकित होईल ना?

भगवान एक महान कलाकार आहे सूर्योदय पहा म्हणजे त्याच्या कलेचा प्रत्यय येईल प्रत्येक ठिकाणाहून दिसणारे आकाश वेगळे, त्याच्या क्षणोक्षणी बदलणाऱ्या छटा वेगळ्या, ऋतूचे चक्र वेगळे, फुलांचा वास भिन्न असे असताना आपल्या कलेने आपण ईश्वराला चकित करू शकू काय? मग भगवंताला आवडतो तरी कोण? भोगवादी जीवन जगत असूनही ज्याने भावजीवन पुष्ट केले तो ईश्वराला आवडतो भोगात राहूनही ज्याच्या अंतःकरणात भाव पुष्ट होतात त्याला भगवंताच्या दरबारात मान मिळतो भगवंताच्या दरबारात ज्याची किंमत वाढली तो खरा थोर होय ज्याची सर्वानंदकरीवृत्ति असते, त्यालाच सन्मान मिळतो मी सर्वांचा आवडता होईन ही गोष्ट भगवत्कृपेमुळेच केवळ शक्य आहे

**सदाशुभकरी** . . आई! तू नेहमीच शुभ आहेस व शुभ करणारी आहेस आई म्हणजे शुभ भगवच्चरण पवित्र आहेत माझ्या कानी एक आलेली गोष्ट आहे की, एका गृहस्थाकडे भगवंताचे आगमन झाले परंतु दुसऱ्या दिवशी त्याचे पत्नीशी भांडण झाले झाले, भगवान अपशकुनी आहे, असे ठरवून त्याला मोठ्या सन्मानाने घराबाहेर काढून लावला अरे! भगवंताचा भक्त तुला अपशकुन?

भगवान मंगल, पवित्र शुभशकुनी आहे भगवती! तू माझे शुभच करतेस भगवती! तू मला नेहमी वेगवेगळ्या रूपाने हाक मारतेस, मलाच बोलावतेस मग अतिशय सुख देतेस कारण की माझा तुझ्यावरील भाव वाढावा यासाठी प्रेम वाढावे म्हणून मला आपत्तीत ठेवतेस तू माझ्या सर्व मागण्या पुऱ्या करतेस कारण तू फार चांगली आहेस, असे म्हटले पाहिजे ना? मुलाने आपल्याला चांगले म्हणावे यासाठी पतिपत्नींमध्ये स्पर्धा लागलेली असते वारंवार मुलाला नवीन नवीन वस्तु देते व विचारते ना बाळ! तुला मी

आवडतें की आबा? मूल म्हणतें, बाबा. दुसऱ्या दिवशीं एक अतिशय सुंदर खेळणें आणून देते व विचारते आता कोण आवडतें? मूल म्हणतें. आई तुझ्यावरच माझें प्रेम वाढावें, यासाठीं तूं मला वैभव देतेस. तसेंच तूं आपत्तीही देतेस. कारण आपत्तीत तूं मला विचारतेस की, तुझें कोण आहे? म्हणून मला आपत्तीही शुभ वाटतात तूं सदाशुभकर्त्री आहेस.

आपत्तीत आपला कोण हें कळतें. त्यावेळीं सर्व नातेवाईकांपासून मन वेगळें होतें व भगवंताकडे वळतें व त्यावेळीं भगवानच आपला हें पटतें. मनुष्य सर्वांना खुष राखण्याचा प्रयत्न करतो, परंतु यापैकीं आपला कोणीही नाहीं. फक्त लक्ष्मीनारायण आपला आहे. भगवान संकटात घालतो व विचारतो बेटा! तुझा कोण? त्यावेळीं जीव कान पकडून मागतो

न तातो न माता न बंधुर्न दाता।
न पुत्रो न पुत्री न भृत्यो न भर्ता॥
न जाया न विद्या न वृत्तिर्ममैव।
गतिस्त्वं गतिस्त्वं त्वमेका भवानी

भगवंता! आता मला पूर्णपणें पटलें आहे कीं, हे सर्व खोटे आहेत. म्हणूनच मी म्हणतो **न तातो न माता**........दुसरा कोणी नाहीच. तूंच फक्त सत्य आहेस. ज्याप्रमाणें आपण मुलाशीं खेळतों, संसार करतों तसेंच भगवानही आपल्याशीं खेळतो. संसार ही एक क्रीडा आहे. **लोकवत् तु लीला कैवल्यम् ..तुष्यंतिच रमंतिच।** परमेश्वराकडे आपली प्रवृत्ति व्हावी यासाठींच परमेश्वर संपत्ति व आपत्ति देतो.

परमेश्वर हें सार कशासाठीं देतो तर मुलानें आपल्याला चागलें म्हणावें यासाठीं हे मानसशास्त्र आहे. संपत्ति व विपत्ति या दोन्हीं गोष्टी अशा तऱ्हेनें आमच्या कल्याणासाठींच आहेत.

॥ श्री जटाजूटः शरणम् ॥

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

आदिक्षांतिसमस्तवर्णनकरी शंभोस्त्रिभावाकरी।
काश्मीरात्रिपुरेश्वरी त्रिनयनी नित्यांकुरा शर्वरी॥
कामाकांक्षकरी जनोदयकरी काशीपुराधीश्वरी।
भिक्षांदेहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी॥७॥

आ ! अपासून क्षपर्यंत असलेल्या सर्व शब्दांत तुझीच शक्ति आहे. हास्य, रुदन आदि विविध क्रिया व भाव शब्दांनीच व्यक्त होतात. या जगांत जर शब्द नसते तर काय झालं असतं, याची कल्पनाच केलेली बरी. केवळ माणूसच शब्दांनी भाव व्यक्त करतो असं नव्हे तर प्रत्येक प्राण्याची वेगवेगळी भाषा आहे. इतर प्राण्यांचे शब्दसंकेत आपल्याला कळत नाहींत एवढंच. परंतु ते आहेत यात शंका नाहीं. म्हणूनच भगवान पतंजलि योगसूत्रांत म्हणतात:—

शब्दार्थप्रत्ययानामितरेतराध्यासात् संकरस्तत् प्रविभागसंयमात्सर्वभूतरुतज्ञानम् ॥ पा. यो. द. विभूतिपाद ॥१७॥

प्राण्यांची भाषा आपल्यापेक्षां वेगळी आहे म्हणून ती आपल्याला कळत नाहीं. आपल्याला ती कळत नाहीं, याचा अर्थ ती नाहीं असा नव्हे. लोक कानडी सारख्या विविध भाषेंत बोलतात. आपणाला कुठं या सर्व भाषा समजत असतात? आपल्याला या सर्वांच ज्ञान असत नाहीं.

शब्दात महान सामर्थ्य आहे दुसऱ्यांचे भाव आपण ओळखूं शकलों नाहीं किंवा आपले भाव दुसऱ्यांना कळले नाहींत तर संसार संपलाच म्हणून समजावं. शब्द नसेल तर प्रेम किंवा क्रोध हे भाव व्यक्त करतां येणार नाहींत परंतु विशिष्ट शब्दाचा अर्थ विशिष्ट ही आई ! तुझीच शक्ति आहे. 'या' या शब्दांत केवढी शक्ति भरलेली आहे ? 'या' हा शब्द बाळाना प्रेरित 'करतो' तसाच तो संतांना व भक्तांनाही कार्यप्रवण करतो. शब्दांनीच 'माणसाचे' व्यवहार चालतात. मुके लोकही जगतात पण त्यांना खुणांनीच आपले भाव

व्यक्त करावे लागतात. त्यांतही कधीं कधीं अडचण निर्माण होते, एवं शब्दात शक्ति आहे व शब्दानी भाव व्यक्त होतात.

भगवंतानं ही सृष्टि निर्माण करताना केवढा विचार केला असेल? माणूस जन्माला आल्याबरोबर भगवंतानं शब्द निर्माण केला, उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणं शब्द निर्माण झालेला नाहीं. प्रथम माणूस जन्माला आला व नंतर गरज पडली तेव्हा शब्द निर्माण झाला असं घडलेलं नाहीं. उत्क्रांति वादी म्हणतात कीं, प्रथम सृष्टि निर्माण झाली, नंतर जंतु, पशु, पक्षी आणि नंतर शब्द निर्मिति झाली. पण ही अशास्त्रीय कल्पना आहे.

शब्दात फार मोठी शक्ति असल्यामुळं शब्दाचा काळजीपूर्वक उपयोग केला पाहिजे. या नियमाचा भंग केल्यामुळं जगात आजपर्यंत अनेक उलाढाल्या झालेल्या आहेत. शब्दात भगवच्छक्ति आहे हें आपण विसरले आहोंत. म्हणून मौन हें तपाचं एक अंग ठरलं. परतु अधिक बोलणं हा मात्र दोष मानला गेला

काहीं काहीं वेळा गरजेपेक्षा कमी बोलण्यानं भाव व्यक्त होत नाहींत. सासूचं सुनेवर प्रेम आहे पण तिच्या अबोल स्वभावामुळं तें व्यक्त होत नाहीं. त्यामुळं गैरसमज निर्माण होतो व परिणामी सासुसुनेचीं भाडणं होतात. हृदयातले भाव संपूर्ण व्यक्त न करणं हा त्यामुळं दोष ठरतो या उलट प्रमाणापेक्षा अधिक भाव व्यक्त केल्यामुळं दुष्परिणाम दिसतात. म्हणूनच हें सर्व लक्षात घेऊन शब्दाचा योग्य उपयोग करणं, यानच ऐहिक व पारलौकिक कारण आहे.

शब्दात ईश्वरीशक्ति आहे या दृष्टीन त्याचा उपयोग केला तर ती भक्ति होते. म्हणूनच पतंजलींना सागावं लागलं कीं--

**एकः शब्दः सम्यक् ज्ञातः सम्यक् प्रयुक्तः स्वर्गे लोके च कामधुक् भवति।**

शब्दाच्या योग्य उपयोगामुळं स्वर्गप्राप्ति होते.

**शंभोरिभिभावाकरी**. शंभु म्हणजे, शकर, कल्याण करणारी शक्ति प्रभु ज्ञानी आहे. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर माणूस शांत होतो. अज्ञानामुळं माणूस धावाधाव करतो. परतु ज्ञान झाल्यावर माणसाची धावाधाव थांबते.

स्थिर, अचल, निरंजन व निर्विकारी शंभु ही एक ज्ञान शक्ति आहे. व

त्याची तूं प्राणवल्लभा आहेस. तीन भाव जिथं असतात, त्याला त्रिभाव म्हणतात. तीन भाव म्हणजे प्रेमभाव, आत्मीयभाव आणि तिसरा एकभाव. प्रेमभावात प्रेम दुसऱ्यावर असूं शकतं. प्रेम करणारी पत्नी प्राणवल्लभा होईलच असं सांगता येंत नाहीं. म्हणून प्रेमभावाबरोबर दुसरा भाव आत्मीयभावही असायला पाहिजे. परंतु या दोन भावांमुळं सुद्धा प्राणवल्लभा होता येणार नाहीं. म्हणून या दोन भावाबरोबर आणखी एक तिसरा भाव एकभाव जिथं असतो, त्या तीन भावांना मिळून त्रिभाव म्हणतात. व ज्याच्याविषयी हे तीनही भाव निर्माण होतील ती प्राणवल्लभा होऊं शकते.

संपूर्ण सृष्टिविषयीं प्रेमभाव असूं शकेल, आत्मीयभावही असेल परंतु पतीविषयीं असलेला एकभाव, हा सर्वांवरचा कळस आहे.

हे आई! ज्ञानरूप, निरंजन, निराकार अशा शिवाला तूं आकर्षित केलं आहेस व अशा भगवंताची तूं प्राणवल्लभा आहेस. वास्तविक निर्विकार व निरंजन अशा शिवाला तूं आकर्षित केलस ही एक आश्चर्यकारक घटना आहे. मग तूं आपल्या सौंदर्यानं का शिवाला आकर्षित केलंस? पण हें शक्य नाहीं. कारण तो अविकारी आहे. तो ज्ञानशक्तीनं चकित होणार नाहीं व गुण शक्तीनं मोहित होणार नाहीं.

स्वतः गुणसागर असल्यामुळं तो आई! तुझ्या गुणांनीं चकित होईल, हें शक्य नाहीं. कामाला ज्यानं जाळलं, त्याच्यावर कामशक्तीचाही प्रभाव पडणं शक्य नाहीं. जसजसं ज्ञान वाढतं, तसतशी कामशक्ति कमी होते. शिवजी ज्ञानराणा असल्यामुळं त्यानं काम नष्ट केला. कामाला जाळला, हें एक रूपकात्मक अन् सुंदर असं वर्णन आहे. मग तुझ्याजवळ अशा प्रकारच्या विरक्ताला आकर्षित करण्याजोगी शक्ति तरी कोणती आहे?

भगवंताची जी चित्‌शक्ति ती स्त्रीरूपी असल्यामुळं आपण तिला पार्वती म्हणतो व पुरुषत्व शक्तीला आपण शिव म्हणतो.

"जगतः पितरौ वंदे पार्वती परमेश्वरौ।

आई! तुझ्याठिकाणीं असलेला प्रेमळपणा, कोमलपणा वगैरे स्त्रीत्वाच्या गुणांमुळं भगवान शिवाला तूं आवडली असली पाहिजेस व तुला त्यानं आपल्या जीवनांत स्थान दिलं असलं पाहिजे. तूं प्राणवल्लभा झालीस, म्हणूनच

शिव म्हणजे अर्धनारीनटेश्वर होय. परंतु भगवंतानं तुझ्याशीं कां लग्न केलं, हें कळत नाहीं. कारण प्रेम आलं, याचा अर्थ द्वैत निर्माण झालं द्वैताशिवाय प्रेम संभवतच नाहीं. प्रेम करायला दुसऱ्या व्यक्तींची आवश्यकता आहेच. परंतु तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनं मात्र तें अद्वैतच आहे. म्हणजेच अद्वैत असूनही द्वैत निर्माण झालेलं आहे. अद्वैतांत राहाणाऱ्या भगवंताला इथं खालच्या पायरीवर यावं लागलं आहे. अतींद्रिय चिच्छक्तीचं हें अधःपतन आहे. हा दोष आहे आणि हा दोष म्हणजे अपूर्णता. निरंजन, निर्विकार, पूर्ण भगवंताला कोमलपणा व प्रेमळपणा यांमुळं द्वैत व्हावं लागलं व अपूर्णता मान्य करावी लागली. परंतु भगवंताला हें सर्व करायचं कारण काय! जोपर्यंत मी कोणावर प्रेम करीत नाहीं तोपर्यंत मी अपूर्ण आहे व म्हणून प्रेम करण्याची वृत्ति निर्माण होते. अद्वैत व पूर्णता यांत प्रेमळपणाला स्थान नाहीं भगवन्ता! तूं अचल व सनातन आहेस. 'नित्यः सर्वगतः स्थाणुः अचलोऽयं सनातनः' असं वर्णन आहे. '**पूर्ण मदः पूर्ण मिदं** अशा प्रकारच्या भगवंतानं प्रेमळपणा व कोमलपणा यामुळं तुला प्राणवल्लभा मानली पण यांत असं कोणतं आकर्षण आहे? भगवंतानं हिच्याशी कां लग्न केलं? याचे उत्तर बौद्धिक दृष्टीनं मिळविणं कठीण आहे याचं उत्तर भावार्थेत मिळू शकेल.

मोठमोठ्या ज्ञानी लोकांनीं या कोमलपणा व प्रेमळपणा यांच्या आकर्षणामुळं द्वैतांत राहण्याचं मान्य केलं कां? हें सांगणं कठीण आहे. या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठीं विचारण्यस्वामी व वाचस्पतिमिश्र यांनीं फार मोठे परिश्रम घेतले आहेत. याचं उत्तर हृदयानं शोधायला पाहिजे.

जगदीशाला मोह झाला. त्यानं या गुणांचा स्वीकार केला आणि आई 'आई' झाली जगदीशाला आई होण्याची इच्छा झाली. तो बापपण झाला आणि आईपण झाला. कोमलपणा, प्रेमळपणा हे भाव स्वतःपेक्षाहुन्हां अधिक प्रिय आहेत. परंतु आई झाल्यानंतर मुलगा चांगला निघणं ही गोष्ट दैवाधीन आहे ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः। अशी वस्तुस्थिति असतांना मुलगा चांगला निघाला नाहीं तर त्या जगदंबेला किती दुःख होत असेल! अशा तऱ्हेची किती तरी मुलं असतील कीं ज्यांना पाहून जगदंबा दुःखी झाली असेल. अशा मुलांत आपला नंबर लागता कामा नये.

आई! तूं शिवाची प्राणवल्लभा आहेस. तुझ्या कोमलता व प्रेमळपणा या गुणाना शिव सोडणार नाहीं. आपल्याला द्वैताद्वैत म्हणजे काय ते कळत नाहीं.

पर्वतासारखे स्थिर असलेले जे स्त्रीत्वाचे गुण ते म्हणजे पार्वती. हे **गुण** म्हणजे अनिर्वचनीय शक्ति होय व या शक्तीमुळेंच पूर्णाला अपूर्ण बनविलें. **'स्वलावण्यशंसा घृतधनुपमह्नाय तृणवत्। यमनिरत देहार्ध घटना'** अर्धे शरीर दिलं व द्वैत निर्माण केलं. इतकं तुझं प्रभावी आकर्षण आहे. द्वैत निर्माण करणं ही आपली शक्तीच नव्हे. ती शक्ति आपल्याला प्रेरक होते, खेळवते, गप्पही बसविते तरुण मुलाचा मृत्यु याचाच अर्थ भगवान त्याला गप्प राहायला सांगतो.

**काश्मीरात्रिपुरेश्वरी...**भारतातल्या काश्मीर देशाला उद्देशून काश्मीर हा शब्द नथं नाहीं. काश्मीर म्हणजे स्थूल, सूक्ष्म व लिंग देह होत. हा देह भूतकाळीं होता, वर्तमानकाळीं आहे व भविष्यकाळात जो राहाणार आहे, त्यावर तुझा अधिकार आहे. एकाच शरीरात हीं तीन शरीर आहेत. एका अर्थानं आपण त्रिपुरासुर आहोंत. या तीन देहात मागल्याचा पत्ताच नाहीं. सूक्ष्म व लिंग देहात मागल्याचा विचार नसतो तर केवळ भोगाचाच विचार असतो.

काश्मीर हा शब्द निसर्गवाचक आहे, देशवाचक नव्हे. म्हणूनच आई! तूं निसर्गाची अधीश्वरी आहेस त्रिपुराची तूं अधीश्वरी आहेस. आपण आपल्या या शरिराची रात्रंदिवस काळजी घेत असतो व म्हणतो कीं, हे शरीर माझं आहे. म्हणूनच भगवताला गीतेंत सांगावं लागलं कीं, 'हा देह तुझा नव्हे तर हा देह माझा आहे.'

भगवंताला हें शरीर आपलं आहे असं सांगण्याची पाळी यावी, इतके का आपण मवाली आहोंत' पतीला आपला हक्क सिद्ध का करावा लागतो कधीं? यासाठींच गीतेंतल्या तेराव्या अध्यायात सांगावं लागलं कीं मीं क्षेत्रज्ञ आहें. मी फक्त हें तुझं शरीर तुला वापरण्यासाठीं दिलेलं आहे आई! तूं निसर्गाच्या सौंदर्याची अधिष्ठात्री आहेस

नंतर तिला **'त्रिनयनी'** असं म्हटलं आहे. शंकराला जसे तीन नेत्र

आहेत, तसेंच आई तुला तीन नेत्र आहेत. परंतु तीन डोळे याचे अर्थ तीन प्रकारचे डोळे, असा अर्थ आहे. तुझ्या डोळ्यांत तीन प्रकारचे भाव आहेत. डोळ्यांत असलेलें विशेष तेज तुझंच आहे.

आईचे नेत्र पोषक, शोधक आणि स्नेहार्द्र आहेत. सर्वांच्या प्रेमानं आपल्या शरीराचं पोषण होतं. प्रेमपूर्ण दृष्टीचा चागला परिणाम होत असतो आपण जन्माला आलों त्यावेळीं आपली मोठी बहिण किती आनंदित झाली असेल! किती वेळां तिनं प्रेमपूर्ण दृष्टीनं पाहिलं असेल!

परमेश्वराची नजर या शरिरावर पडली तर आपलं पोषण होतं या प्रभूच्या प्रेमळ दृष्टीनं मानवजातीला पुष्टि मिळते यांतूनच संपूर्ण पुष्टिमार्ग निर्माण झालेला आहे.

आईच्या प्रेमळ दृष्टीमुळंच आपण लहानाचे मोठे होतों. म्हणूनच मुलांजवळ प्रेमानं बसा. तुमच्या प्रेमळ नजरेनं बालकं पुष्ट होतील. आपणा सर्वांनाही भगवंताच्या प्रेमळ दृष्टीचा सतत लाभ मिळत असतो व त्यामुळंच आपल्याला पुष्टि मिळत असते

एक गृहस्थ म्हणाले कीं, मी खूप धावाधाव करतों. घरांत बसायला एका क्षणाचीही फुरसत मिळत नाहीं. त्यांना विचारल्यावर ते म्हणाले कीं, माझी एकच इच्छा आहे कीं, माझ्या मुलांचं कल्याण व्हावं. यासाठीं ही माझी सारी धडपड आहे.

मुलाचं कल्याण व्हावं, ही गोष्ट नंतर परंतु मुलं अगोदर राहिलीं पाहिजेत. यासाठीं त्याच्याजवळ बसून त्याना प्रेम दिलं पाहिजे. अगोदर **Being** झालं तर नंतर **Well being** शक्य होईल. प्रेमानं मुलाचं ऐका. प्रेमानं त्याना सांगा यालाच संसारीजीवन म्हणतात. यालाच संसारांतली पोषक दृष्टि म्हणतात.

शोधक भाव :— भगवंताची दृष्टि सतत शोधित असते. चागलं काय, वाईट काय? जगात असत्सत्‌चा बुरखा घेऊन फिरत असतं, त्यावेळीं सामान्य माणसाची श्रद्धा विचलित होते. आपल्याला न्याय मिळत नाहीं. परंतु आई! तूं शोधक आहेस. तुला खरं खोटं कळतं. तं प्रत्येक व्यक्तीकडे

पाहात आहेस. त्यामुळं मला खात्री वाटते कीं, मला तुझ्याजवळ नक्की न्याय मिळेल.

सामान्य आई वेडीच असते तिला मुलाचं वाईट कांहीं दिसतच नाहीं. परंतु या आईची दृष्टि शोधक आहे. आपल्या मुलांतील दोष जिला कळत नाहींत ती आईच नव्हे चाळींतल्या बायकांत भाडण होतं, याचं कारण त्यांच्यांत शोधक दृष्टि नसते. स्वतःच्या मुलांतील दोष त्यांना दिसतच नसतात व त्यामुळंच मुलाच्या हातून दोष घडलेला असूनही आईला तो दिसत नसतो व भाडणं होतात. पण आई! तुझ्याजवळ असलेल्या शोधक दृष्टीमुळं असं होण्याची मुळींच शक्यता नाहीं.

तिसरा, आसक्ति भाव.- आई! तूं ज्यावेळीं माझ्याकडे पाहातेस त्यावेळीं तुझ्या डोळ्यांत मला आसक्तीचा भाव दिसतो. ही दृष्टि माझ्यावर पडली कीं, मी कृतार्थ झालो आपण मंदिरांत जातों. परमेश्वराच्या दृष्टीकडे पाहातों पण तितक्यांत बायकामुलाची आठवण येते व त्यामुळं आपली दृष्टि दुसरीकडेच जाते. पूजा करतांनाही आपली दृष्टि परमेश्वराच्या दृष्टीकडे लागतच नाही. ती दुसऱ्याच ठिकाणीं असते पण आईची दृष्टि आपणावर कां खिळूं नये? आपण आपल्या जीवनपद्धतीनं असं दाखविलं पाहिजे कीं, आईची आपल्यावरची दृष्टि कधीं उतरणारच नाहीं. तिची आसक्तिपूर्ण दृष्टि आपल्यावर सतत राहील. परमार्थ व संसार यांचा सवर्ष सुरूच आहे. यांपैकीं आपल्याला जास्त कोणु खेचतं, यावर आईचं प्रेम अवलंबून आहे. नरसी महेता, तुकाराम यांच्यावर आईची पूर्ण आसक्तियुक्त दृष्टि होती. त्यामुळं त्यांना दुसरी कशाचीही इच्छा नव्हती. परंतु आपल्यावर पडलेली आईची दृष्टि कायम टिकत नाही. कारण आपली दृष्टि मुलांबाळांकडे जातांच आईची दृष्टि तावडतोब उतरते. आपण परमार्थ व संसार यांच्यामध्यं उभे आहेत. याज्ञवल्क्य, वसिष्ट यांनी असं जीवन घालविलं कीं, त्यांच्याविषयीं आईच्या मनात आसक्ति निर्माण झाली व त्या नजरेला कोणी दूर करूंच शकला नाहीं आपल्हेही असंच वर्तन असायला पाहिजे कीं, ज्यामुळं आपल्याविषयींही आईच्या मनात आसक्ति निर्माण होईल.

१ नवीन विवाहित झालेल्या पतिपत्नींमध्यं एकमेकांकडे पहातांना जी

आसक्ति असते, तशाच तऱ्हेची आसक्ति जगदीशाच्या दृष्टींत आपल्याविषयीं असली पाहिजे. नंतर या दृष्टीला कोणीही विचलित करूं शकणार नाहीं

भगवंताची पोषक व शोधक दृष्टि सर्वांविषयीं असते परंतु आसक्तिपूर्ण दृष्टि मात्र सर्वांविषयीं असत नाहीं. म्हणून आपल्या मुलाला लोकांची नजर लागूं नये म्हणून प्रयत्नशील असलांत तरी परमेश्वराची नजर लागावी यांविषयीं पूर्ण दक्ष असायला पाहिजे. त्या मुलाकडे परमेश्वरानं आसक्तियुक्त नजरेनं पाहात राहावं, असं केलं पाहिजे. दया, कृपा, माया यांची दृष्टि वेगळी व आसक्तीची दृष्टि वेगळी असते. जगदीशाला माझ्या जीवनाविषयीं आसक्ति वाटली पाहिजे. तूंच माझं सर्वस्व आहेस, असं जगदीशाला वाटायला पाहिजे.

**नित्यांकुराः**- आई! तुझं प्रेम, भाव कधीं कमीच होत नाहींत. त्यांना *नित्य नवेनवे अंकुर फुटत असतात.* दररोज वेगवेगळे भाव प्रकट होत असतात. हे भाव कधींही क्षीण होत नाहींत. केव्हां केव्हां माझ्याविषयीं तुझ्या मनांत उपेक्षेचा भाव निर्माण झाला असेल पण तुझ्याकडे पाहायला लागलें कीं, तुझे भाव बदलूं लागतात

आई! मी ज्यावेळीं कर्मांतच रममाण झालेला होतों त्यावेळीं माझी उपेक्षा झालेली होती. परंतु तुझ्या सांनिध्यांत येतांच कृपा, दया, ममता आणि आसक्ति हे भाव निर्माण झाले. म्हणून आपल्याविषयीं असलेली भगवंताची दृष्टि बदलावी, हें आपल्या जीवनाचं ध्येय असायला पाहिजे.

प्रारंभीं माणूस कर्म करतो व त्याला फळही मिळतं. त्याच्यावरची पायरी म्हणजे भगवंतानं आपल्याकडे प्रेमळ दृष्टीनं पाहावं.

परंतु भगवंतानं माझी कीव करावी हा विचार चीड निर्माण करणारा आहे. परमेश्वराला मी केवळ पशुवत् माणूस का आहे कीं, ज्यामुळं त्यानं माझी कीव करावी. यानंतर कृपादृष्टि, ममतादृष्टि व शेवटीं आसक्तिपूर्णदृष्टि निर्माण होते. जीवनांतल्या त्या वेगवेगळ्या पायऱ्या आहेत. आपल्या वर्तनामुळंच हे नेहमीं नवनवे अंकुर फुटत असतात.

गीतेंतही भगवंतानीं हेंच सांगितलं आहे कीं,- ये यथामांप्रपद्यंते तां

स्तथैव भजाम्यहम्। जसं आपलं वर्तन असेल तसा भाव निर्माण होत असतो व ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे.

शर्वरी म्हणजे हिंसक. आई! तूं फटके मारतेस. परंतु फटके मारण्या-मारण्यांत फरक आहे. गुरुजी मारतात. मवाली मारतात आणि आईही फटके मारते. पण या तिघांच्या फटके मारण्यांत जमीनआस्मानाचं अंतर आहे. मवाली स्वार्थानं फटके मारतो. विद्यार्थ्यांची चूक सहन होत नाहीं म्हणून गुरुजी फटके मारतात. पण 'माझा मुलगा आणि असं वर्तन' म्हणून आई फटके मारते. मारतांना तिला स्वतःला रडूं येतं इतकंच नव्हे तर मुलाच्या हातून चूक झाली तर मुलालाही जेवायला वाढीत नाहीं व ही स्वतःही जेवत नाहीं.

मवाल्यानं मारलं तर पळून जातों, गुरुजींनी मारलं तर गुरुजींविषयी द्वेष निर्माण होईल परंतु आई मारते त्यावेळीं मुलगा आईलाच जास्त जास्त बिलगायला लागतो. वास्तविक हें तर्कशास्त्राच्या विरुद्ध आहे. एखाद्यानं आपल्याला मारलं तर आपण त्याच्यापासून दूर जातो; पण आई तुझे फटके कांहीं वेगळेच आहेत. तूं आसक्तीनं मारतेस म्हणूनच तूं शर्वरी आहेस.

परमेश्वर जितके फटके मारतो तितके कोणींही मारीत नाहीं. परंतु त्यामुळं मात्र त्याच्याविषयीचं प्रेम वाढतच जातं. आईचे फटके हिंसक खरे परंतु ते दुसऱ्या अर्थानं आसक्तीनंही भरलेले आहेत.

संपूर्ण सृष्टिकडे आई खुशाल दोन नेत्रानीं पहात असेल परंतु आपल्याकडे तिनं तिसऱ्या नेत्रानं पाहायला पाहिजे व तो तिसरा नेत्र म्हणजे आसक्तिपूर्ण नेत्र. आईनं आपल्याकडे नेहमीं आसक्तिपूर्ण नजरेनं पाहावं, यासाठीं आपण प्रयत्नशील राहिलं पाहिजे. कामाकांक्ष करी याचं विवरण पुढील अंकीं पाहूं.

॥ श्री जटाजूटः शरणम् ॥

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

आदिक्षान्तसमस्तवर्णनकरी शंभोस्त्रिभावाकरी।
काश्मीरात्रिपुरेश्वरी त्रिनयनी नित्याङ्कुरा शर्वरी
कामाकाङ्क्षकरी जनोदयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥७॥

देवी सर्वविचित्ररत्नरचिता दाक्षायणी सुंदरी
वामा स्वादुपयोधरप्रियकरी सौभाग्यमाहेश्वरी।
भक्ताभीष्टकरी दशाशुभहरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥८॥

तूं शब्दाचं अधिष्ठान आहेस शब्दशक्ति तूं आहेस तू हसतेस, तू रडतेस व त्यावेळची शक्तीही तूच आहेस तूं शंकराची प्राणवल्लभा आहेस परंतु नित्यनिरंजन अशा तुला प्रेमलक्षणा कां बरं आवडते? प्रेमलक्षणा मुळं द्वैत आणि अपूर्णता आली आहे. हे दोन्हीही दोष तू कां बरं स्वीकारतेस? तुझी तीन प्रकारची दृष्टि आहे पोषक, शोधक व आसक्तिपूर्ण तटस्थतेची दृष्टि वेगळी अन् दया किंवा मदत करणारी दृष्टि वेगळी व आसक्तिपूर्ण दृष्टि वेगळी

भगवान! तू पहात नाहींस ही पहिली दृष्टि. तूं कर्माचं फळ देतोस, दयादृष्टि देतोस, नोकर म्हणून येतो त्यालाही तू देतोस ही दुसरी आणि तिसरी आसक्तिपूर्ण दृष्टि या दृष्टींनीच गोडवा कांही वेगळाच आहे. तसेंच नित्याङ्कुरा व शर्वरीही आहेस

कामाकांक्षकरी ... तू कामना, इच्छा पूर्ण करतेस आशा आकांक्षा, इच्छा करतो पण सिद्धि प्राप्त करण्याची शक्ति आपल्यात नसते कोणत्याही कार्यांत सिद्धि प्राप्त करायची असेल तर भगवंताची मदत असायला पाहिजे गीतेनंही हेच सांगितलं आहे-

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्रपार्थो धनुर्धरः।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम॥ गीता १८-७८

दृष्टकार्य आणि अदृष्ट शक्ति ज्यावेळीं एक होतात त्याचवेळीं श्री, यश व सफलता मिळते. आपण परीक्षेंत पास होतों, व्यवहारांत आपल्याला पैसा मिळतो या सर्व गोष्टी त्याच्याच शक्तीनं मिळतात पण ही समजूत मात्र फारच थोड्या लोकात दिसते. आपलं कर्म व त्या अदृष्ट शक्तीची मदत याचं फळ म्हणजे यश होय.

पांडव वनवासांत होते त्यावेळीं वेदव्यासानीं त्याना हीच गोष्ट सांगितली. वेदव्यासानीं पांडवांना विचारलं कीं, "यश मिळवायचं आहे कीं नाहीं?"

"हो! हो!" सर्वांनीं एक आवाजात सागितलं. "पण ते मिळणार कसं?"

अर्जुन म्हणाला– "हें माझं गाडीव धनुष्य पाहिलं की नाहीं?"

भीम म्हणाला– "या गदेचा काय उपयोग? या गदेच्या जोरावर सहज विजय मिळवूं."

त्यावेळीं वेदव्यास म्हणाले– "द्रोणाचे अग्नीसारखे बाण सुटतील त्यावेळीं समोर कोण उभा राहूं शकेल? त्यावेळीं गाडीव धनुष्य कुठल्या कुठं फेकलं जाईल गाडीव व गदा याचं काहींही चालणार नाहीं. कर्ण ज्यावेळीं लढेल त्यावेळीं मृत्यूही त्याचा पक्षपात करील; हें तुला माहित आहे काय? **जायेत मृत्योरपि पक्षपातः।** या लोकासमोर तुम्हीं काय करणार? ज्यावेळीं भीष्माचार्य लढतील त्यावेळीं प्रलयकाळचा संहार होईल. त्याच्याशीं लढून तुम्हाला विजय मिळेल काय? म्हणून तुम्हाला जर यशस्वी व्हायचं असेल तर तुमच्या पाठीशीं अदृश्य शक्ति असायला हवी. गाडीव, गदा या सर्व दृश्य शक्ति आहेत.

माणसाच्या ठिकाणीं आपल्या इच्छा पूर्ण करण्याची शक्ति नाहीं. या बाबतीत माणूस दुबळा आहे. मिळाला तर पैसा, सुख, वैभव भोगायचं पण नक्की मिळेलच असं सागता येत नाहीं. आपली चातक पक्षासारखी स्थिति आहे. चातकव्रत पाऊस पाडण्याची शक्ति नसते. माणूस इच्छा करतो व त्या पुऱ्या करण्याचं सामर्थ्य मात्र त्याच्यांत नाहीं तर तें एकट्या भगवंतांत आहे.

यस्तुत कामना व आकांक्षा त्यानेच निर्माण केलेल्या आहेत. माझ्या ठिकाणी आकांक्षा, इच्छा कोण निर्माण करत हे मला माहित नाही. पण इच्छा उत्पन्न होतात हा अनुभव आहे या इच्छा कशापासून उत्पन्न होतात? तर त्या अपूर्णतेतून निर्माण होतात तू मला अपूर्ण ठेवलेला आहेस कारण मी तुला आई म्हणून हाक मारावी अपूर्णता असेल तरच आई म्हणून हाक मारली जाईल। इच्छा, वासना अपूर्णतेतून निर्माण होतात व त्या पुऱ्या करण्यासाठी आपण ईश्वराचं स्मरण करतो जर मला इच्छाच नसेल तर मी पूर्ण होईन, व मग मी प्रभूचं स्मरणही करणार नाही भगवती! मला नेहमी तुझी गरज लागावी यासाठी तू मला अपूर्ण ठेवल आहेस

**शंभोरस्त्रिभावाकरी** शेंकडा ९९% लोकांच्या इच्छा पूर्ण होत नाहीत म्हणून लोक परमेश्वराचं स्मरण करतात

थोडा विचार केला तर असं लक्षात येईल की भूक लागते, तहान लागते पण भक्ति लागत नाही सत्तर वर्षांचे वृद्ध काठी घेऊन फिरतात पण त्याना भक्ति लागत नाही भगवती! तू हा क्रूर खेळ का खेळतोस? भूक लागली तर तुझी आठवण करतो मग भक्ति लागली असती तर तुझी आठवण नसती का केली? मी अपूर्ण आहे त्यामुळ इच्छा, आकांक्षा निर्माण होतात, व त्यावेळी तुझी आठवण होते, हें तुझं कौशल्य आहे हें एक नाटक आहे मदत करण्यासाठी आईला हाक मारली तरच आईला आनंद वाटतो ही प्रत्यक्ष भक्ति नसली तरी परात्पर भक्ति आहेच माझ्या इच्छा पूर्ण न झाल्या मुळ मी तुला मदतीसाठी हाक मारतो हीही भक्तीच आहे यामुळच तर लोक मंदिरात जातात अशा तऱ्हेनं लोकांत परात्पर भक्ति दिसून येते

**जनोदयकरी......**आई! तू सर्व जीवाचा उदय करतेस नवरात्रात लोक आईजवळ जाऊन 'जगदंब ! उदयोऽस्तु' असं म्हणतात आणि आईला नमस्कार करतात आज सर्व भावशून्य वातावरण झालेलं आहे उदय कशाचा व्हायला पाहिजे? माणसाचा उदय व यश कशात आहे? लोक असं मानतात की, मला सृष्टीशीं लढायचं आहे त्या लढाईत यशस्वी व्हायचं आहे आपलं पुढील जीवन यशस्वी व्हावं यासाठी लोक उत्सव करतात पण

आज माणसाचा दृष्टिकोणच बदलला आहे. माणूस ज्यावेळीं म्हणतो कीं, मला एकाहत्तर वर्षे झालीं त्यावेळीं त्याला 'म्हणायचं असतं कीं, मी एकाहत्तर वर्षापर्यंत निसर्गाशीं लढलें. त्याच्यावर विजय मिळविला. अजूनही माझी प्रकृति उत्तम आहे. 'एकही दात पडलेला नाहीं. दातांनीं सुपारीही फोडूं शकतों इतकी अजून ताकत आहे.

आज वैज्ञानिक विचारसरणीप्रमाणें माणसाला तीन आघाड्यांवर लढायचं आहे.

Man, v/s, Man (माणूस वि माणूस)

Man v/s Nature (माणूस वि. निसर्ग)

Man v/s Society (माणूस वि. समाज)

दररोज आपण वर्तमानपत्रांत वाचतो कीं, निसर्गावर माणसानं विजय मिळविला माणूस अंतराळ्यांत फिरूं लागला. चंद्रलोकावर पदार्पण करण्यात यशस्वी झाला. वनस्पति लावून पृथ्वीवर विजय मिळविला परंतु निसर्गावर जो विजय प्राप्त होतो तो भगवंताच्या कृपेमुळंच होय.

निसर्गाशीं आपला संघर्ष आहे कीं नाहीं, हा वादाचा प्रश्न आहे. जर यदाकदाचित् असलाच तर तो सहयोगात्मक संघर्ष आहे. संघर्ष असला तरी तो बाधक नाहीं. स्तनपान करताना मुलाचा स्तनाशी सहयोगात्मक संघर्ष असतो. जनोदयकरी यामध्यं हा अशा प्रकारचा संघर्ष आहे. म्हणूनच तो बाधक नाहीं. सृष्टीवर विजयाची, प्रभुत्वाची दृष्टि आहे म्हणूनच विजय प्राप्त झाल्यानंतरही दीनतेचा भाव जात नाहीं. ही विजयपताका नव्हे तर हा वृत्तींवरचा विजय आहे सृष्टीवर विजय मिळविण्यात वैशिष्ट्य नाहीं, तर वृत्तीवर विजय मिळविण्यांत आहे.

मानवी-जीवनात दोन प्रधान वृत्ति दिसतात. एक भोगवृत्ति आणि दुसरी भक्तिवृत्ति. या दोन वृत्तीमध्यं लढाई चालते.

आमची भक्ति ही भोगासाठीं आहे. त्यामुळं भक्ति सुद्धा भोगवृत्ति आहे. याज्ञवल्क्य भक्तीसाठीं उपभोग घेत होते त्यामुळं त्यांची भोगवृत्ति ही भक्ति वृत्ति होती. आमची भक्ति भोगासाठीं असते तर याज्ञवल्क्यांचा भोग भक्तीसाठीं

होता. आम्हीं भक्तीकडे वळतों पण कशासाठीं? स्वतःच्या फायद्यासाठीं. विश्रांतीसाठीं जसा आपण झाडांचा आश्रय करतों तसंच संसार चांगला चालावा यासाठीं रामकृष्णांचा आश्रय घेतों. वस्तुतः हें कांहीं वाईट कार्य नव्हे. पण ही विजयपताका मात्र नव्हे. कारण आपण भक्तीकडे वळलों तरी आपल्या वृत्तींत बदल झालेला नाहीं. ज्यांनीं जीवनांत भोगालाही भक्ति बनवलं व ज्यांचं भोजनही भक्ति असे त्यांनीं वृत्तींवर विजय मिळविला याचंच नांव जीवनांत भगवंताचा विजय. जीवनांत ईशचंद्राचा उदय. जीवनांतला ईशचंद्र बाहेर आणायचा याचंच नांव जनोदय. आपण ज्यावेळीं 'उदयोऽस्तु' म्हणतों त्यावेळीं माझा जयजयकार व्हावा, -माझ्यांत ईशचंद्राचा व ज्ञानचंद्राचा उदय व्हावा ही इच्छा असते. भोगवृत्तीचं भक्तिवृत्तींत रूपांतर करणं ही गोष्ट भगवत्कृपेशिवाय शक्य नाहीं.

भगवंताला असं वाटलं पाहिजे हा मुलगा माझा आहे. अशा प्रकारचं वर्तन आपल्या हातून घडलं पाहिजे कीं, ज्याच्यायोगं आपण प्रभुकृपेचे अधिकारी होऊं. यासाठीं कर्मजीवन व भावजीवन या दोन्हीही गोष्टी असल्या पाहिजेत. ज्याच्या जीवनांत या दोन जीवनांचा समन्वय दिसतो त्याचं जीवन परमेश्वराला आवडतं.

भावना वाढली पाहिजे. डोळ्यांतून भावाश्रु आले पाहिजेत. दुःखाश्रु येता कामा नयेत. याचकाचे किंवा भिकाऱ्याचे अश्रु असता कामा नये. आठवड्यांतून एखाद्या दिवशीं तरी भावात्मक अश्रु डोळ्यांतून यायला पाहिजेत. त्यासाठीं भाऊबहीण, आई व मुलगा यांच्या प्रेमानं नटलेलं वाङ्मय वाचायला हवं. पुराणं यासाठींच वाचायचीं असतात. या झालेल्या घटना आहेत किंवा नाहींत ही गोष्ट महत्वाची नाहीं. पण ते प्रसंग वाचतांना भावात्मक अश्रु यायला पाहिजेत. दुबळेपणांतून लाचारींतून निर्माण झालेले अश्रु असता कामा नये. स्वतःचं कर्मजीवन असं असायला पाहिजे कीं, दुःखाचे डोंगर समोर उभे राहिले तरी हातपाय गळता कामा नये. भावनेचा एक दिवस तरी संतांच्या डोळ्यांत अश्रु येत. अशा प्रकारच्या माणसांचा उदय होतो. जे लोक प्रभुकार्य करीत नाहींत त्यांच्यावर प्रभुकृपा कधीं होतच नसते.

कर्मजीवन व भावजीवन हीं जर प्रभावी असतील तर भोगवृत्ति नाहींशी

होते व भक्तिवृत्ति वाढते. यासाठीं प्रभुकृपेची आवश्यकता आहे. हीं दोन्ही प्रकारचीं जीवनं जितक्या प्रमाणांत दृढ होतात, तितक्या प्रमाणांत प्रभुकृपा वाढू लागते, व ही प्रभुकृपा वाढल्यावर भोगवृत्तीचं भक्तींत रूपांतर होतं. यालाच 'जनोदयकरी' असं म्हणतात.

मला हें चित्र अतिशय आवडतं. शंकराचार्यांसारखी तेजस्वी, निस्पृही, दुनियेला तुच्छ मानणारी, जगदीशाचा अत्यंत लाडका पुत्र असलेली, पुत्रच नव्हे तर साक्षात् अंश असलेली व्यक्ति उभी आहे. आईचं दार खडखडावीत आहे व याचना करीत आहे हा याचक आईजवळ प्रेम आणि ज्ञान यांची भीक मागत आहे. हा याचक कांहीं वेगळाच आहे. त्याचं तेज वेगळं, भाव वेगळा. लाडक्या मुलानं मागितल्यावर दिल्याशिवाय सुटकाच नाहीं. ध्यांत वेगळीच भावना आहे. त्यांतलं तेज काहीं वेगळंच आहे.

तूं देवी आहेस 'द्यु' म्हणजे प्रकाश. देवी म्हणजे आई तूं प्रकाशंरूप आहेस म्हणून तुझ्याजवळ आलो आहें या प्रकाशांत मालिन्य नाहीं. म्हणूनच आपण भगवतीजवळ गेलें तरी आपलं मालिन्य तिच्या प्रकाशांत झाकून जाईल व तें कमीही होईल आई! तुझ्याजवळ आल्यानंतर मालिन्य राहीलच कसं?

राम हा एकवचनी व रावणाला दहा तोंडं. याचा अर्थ दहा प्रकारं बोलणारा. आपलं सकाळचं बोलणं वेगळं, दुपारचं वेगळं आणि रात्रींचं तर अगदींच वेगळं. म्हणून आपण बहुरूपी जीवन जगतों. व खऱ्या-खोट्यांनीं भरलेलं जीवन जगत असतों. म्हणून आपलं जीवन मलीन होतं.

प्रकाशमय असलेल्या भगवती मातेजवळ गेलांत तर जीवनांतले अन् सृष्टींतले सगळे प्रश्न सुटतील. जीवनांत अनेक प्रश्न आहेत. ही सृष्टी तूं का निर्माण केलीस ? सृष्टि निर्माण केलीस ती केलीस पण सुख–दुःख कां ? असे अनेक प्रश्न आहेत व त्यांची समाधानकारक उत्तरं मिळत नाहीत पण आई ! तुझ्या प्रकाशात ही जीवनपोथी वाचायला लागलों कीं, कळलं कीं, मी या जगात कशाला आलों? तूं सृष्टि कशासाठीं निर्माण केलीस' लोक म्हणतात कीं, लोकवत् तु लीला कैवल्यम । पण ही व्यासांची अनुभूति आहे. पण ही गोष्ट आपल्याला कशी पटणार'

म्हणून आम्हांला तुझ्या प्रकाशांत बसून नीट समजावून घ्यायला पाहिजे तरच सर्व प्रश्न सुटतील. मी कशासाठी आलों हा प्रश्न सुटला कीं, इतर प्रश्न सुटल्यासारखेच आहेत.

**सर्व विचित्र रत्न रचिता**........आई! तूं सर्व रत्नं निर्माण केलीं आहेस. आपली रत्नासंबंधीं कल्पना कांहीं वेगळीच आहे. आपण लाल, पिवळ्या दगडांना रत्न समजतों. इंग्रजींत त्याला (Precious stone) किमती दगड असं म्हणतात. किमती असला तरी तो दगडच ना? पण आई! तूं निर्माण केलेलीं रत्नं विचित्रच आहेत. कारण आम्हांला तीं रत्नं वाटतच नाहींत. तूं तीन रत्नं निर्माण केली आहेत. तहानेलेल्या लेकांसाठीं पाणी, भुकेलेल्यांसाठीं अन्न व जीवनासाठीं सुभाषित; हीं तीं तीन रत्नं होत. वस्तुतः पीठ ही मातीच पण तीमुळं पोट भरत नाहीं. म्हणून अन्न निर्माण केलं, यांतच कला आहे. कारण अन्नांत जीवनसत्त्वं असतात. **पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितम्**

आईनं विकासासाठीं आम्हाला वाङ्मय दिलेलं आहे. हें तिसरं रत्न आहे. एका गुरुजवळ सर्व तऱ्हेचा विकास करणं शक्य आहे. पण आम्हीं १०८ गुरु करतों. मग गुरुविषयीं भावना राहाणारच कशी? **कृष्णं वन्दे जगद्गुरूम्** ही भावना असेल तर पूर्ण जीवनविकास होईल. अगदीं प्रारंभापासून शेवटची सर्वोच्च स्थिति प्राप्त होईपर्यंत एकच गुरु भगवान श्रीकृष्ण. त्यानं आपल्याला अलौकिक वाङ्मय दिलं आहे पण लोकांना तें रत्न वाटतच नाहीं. म्हणूनच शंकराचार्य म्हणतात कीं, **विचित्ररत्नरचिता।**

जें आपल्या डोक्यांत नीट येत नाहीं तें विचित्र. लोकांना रत्नं वाटत नाहींत म्हणून विचित्र. परंतु तीं रत्नं आहेत. नेहमीची गोष्ट झाली कीं, त्याची किंमत कमी होते. हवा दररोजची. तिची किंमत आपणाला असते काय? परंतु एखादे दिवशीं हवा बंद होऊं द्या कीं मग तिचं महत्त्व कळायला लागेल. आपल्याला पाण्याची किंमत वाटत नाहीं. पण 'कोकाकोला'ची किंमत वाटते. म्हणूनच आपण तक्रार करतों कीं, मी अमक्या तमक्याच्या घरीं गेलों होतों व त्यांनीं फक्त पाणीच दिलं. कोकाकोला सुद्धां दिला नाहीं. स्वागत कशाला म्हणतात याचं मनूनं सुंदर वर्णन केलं आहे. मनुस्मृतींत आलेल्या पाहुण्यांचं स्वागत कसं करावं हें सांगतांना मनु म्हणतो—

**तृणानि भूमिरुदकं वाक्चतुर्थी च सूनृता।**
**एतान्यपि सतां गेहे नोच्छिद्यंते कदाचन॥**

पाहुणा आला तर त्याला बसायला आसन, प्यायला लोटाभर पाणी द्यावं व शेवटीं गोड बोलावं 'असं मनु म्हणतो. पाणी हें एक रत्न आहे. आपल्याला चहाचं महत्व वाटतं पण पाण्याचं महत्त्व वाटतच नाहीं. म्हणून पाणी हें एक विचित्र रत्न आहे.

**दाक्षायणी...** दक्ष प्रजापतीची जी कन्या ती दाक्षायणी. याचा दुसरा अर्थ जी स्वतःच आपल्या कार्यांत दक्ष असते, 'तिला दाक्षायणी म्हणतात. हे आई! 'माझ्या विकासविषयीं तूं जागरूक आहेस तूं दर मिनिटामिनिटाला जागृन आहेस. माझ्यावर तुझं सतत ध्यान आहे. आपण म्हणतो कीं, परमेश्वर झोपलेला आहे. वाटेल तेवढा गोंधळ करून घ्या. पण तो झोपत नाहीं चातुर्मासांतले चार महिने तो झोपी जातो मग चातुर्मासांत कोणतेंही पाप करायला हरकत नाहीं.

चातुर्मासांत वाटेल तें केलं तरी चालेल असं वाटतं. परंतु हा भ्रम आहे. परमेश्वराला सर्व कळतं. आई दक्ष आहे आपली वासना कशी आहे तर भावना वाढली कीं, वासनाही वाढते. त्याचा प्रत्येक क्षणांतला तुझ्या-जवळ हिशोब आहे. कारण तूं दाक्षायणी आहेस. त्यामुळं तुला हें सारं कळतं. कारण तुझी दक्षता वेगळ्याच प्रकारची आहे.

विमानतळावर एक **control** असतो. त्याचा प्रमुख विमानांत मार्ग दर्शन करतो कंट्रोलर विमानातल्या वैमानिकाला इतक्या मिनिटांत विमान येईल असं सांगतो. तो कंट्रोलर सतत दक्ष असतो. तो बरोबर मार्गदर्शन करतो व योग्यवेळीं बटन दाबतो म्हणून भगवान झोपलेला असलेल्या वेळीं आपण चांगलं वर्तन ठेवायला पाहिजे. ज्यावेळीं भगवान उठेल त्यावेळीं आपल्या मुलाचं चागलं वर्तन पाहून त्याला आनंद झाला पाहिजे.

नंतर म्हणतात-आई! तूं सुंदरी आहेस. गोष्ट खरी आहे. आई! तूं आत्मीयतेमुळं सुंदरच वाटतेस. जितकी जगाविषयीं आपुलकी जास्त तितकी सुंदरता अधिक तशीच भोगदृष्टि नाहींशी झाली तर सुंदर वाटेल. शरीराचं

सौंदर्य आहे कीं नाहीं कोणाला माहीत, पण मनाचं व बुद्धीचं सौंदर्य आहे. आई! तू माझी सतत आठवण काढत असतेस. प्रेमानं हाक मारतेस. तुझ्याजवळ हृदयाची श्रीमंती आहे. बुद्धीचं सौंदर्य वेदांत व उपनिषदांत दिसतं. जिची वाणी सुंदर, मन सुंदर, बुद्धि सुंदर आहे तिचं शरीर पण सुंदर असलंच पाहिजे असं सहज अनुमान करतां येईल.

एखाद्याला चार-पांच मुलं असलीं तर त्याचं सर्वांवर सारखंच प्रेम असत नाहीं, दृष्टींतही फरक असतो. पण आई! तुझी सर्वांवर समदृष्टि व प्रेमही सर्वांवर सारखंच आहे, यात एक अक्षरही खोटं नाहीं. यशोदा संध्याकाळीं जशी कृष्णाची वाट पहात राहायची तशी तूं संध्याकाळीं सर्व प्राण्यांची वाट पहातेस. कृष्णाला यायला उशीर झाला तर यशोदा कावरी-बावरी व्हायची व गाणं गुणगुणत राहायची —

रमला कुठं ग कान्हा।
बाई तिन्हीसांजा झाल्या। गाई घरा परतल्या।
धुंडोनि नजरा शिणल्या। कुठं शोधूं माझा कान्हा।

सामान्य मातेला भीति वाटते कीं, मुलानं माझं ऐकलं नाहीं तर? माझा मुलगा स्त्रैण नाहीं असा आईला गौरव वाटायला हवा. माझ्यावर त्याचं प्रेम आहे व म्हणून तो माझ्याकडे आकर्षिला जातो.

संध्याकाळ झाली. गाई घरीं आल्या तरी कृष्णकन्हैया का आला नाहीं? याप्रमाणंच जीवनाच्या संध्याकाळीं जगदंबा प्रत्येकाची वाट पहात असते. मुलगा पंचाहत्तर वर्षांचा झाला तरी परत का येत नाहीं? जीवनाच्या संध्याकाळीं तरी माझी त्याला आठवण येते कीं नाहीं? परंतु पंचाहत्तर वर्षे झालीं तरी मुलाच्या मनात आणखी एखादं लग्न करावं, असा विचार येतो. आई मात्र डोळ्यात प्राण आणून मुलाची वाट पहात बसलेली आहे हें जें मातृहृदय, आईचं प्रेम यात सौंदर्य आहे. सुंदरी हे नटीचं वर्णन नव्हे तर जगदीशाचं, जगदंबेचं वर्णन आहे तिच्याजवळ शारीरिक सौंदर्य आहेच पण त्याचबरोबर बौद्धिक व मानसिक सौंदर्यही आहे. प्रत्येक मुलाची त्या जगदंबेला उत्सुकता लागलेली आहे पण मुलगा खेळमध्ये रमी खेळत आहे; अशा वेळीं आई म्हणते- बाळ! जीवनाची

संध्याकाळ झालेली आहे. आईची आठवण कर. पण मुलाला सवडच कुठं आहे ? माणूस आईला विसरतो पण आई मात्र कधींही विसरत नाहीं. हें आईचं सौंदर्य आहे. म्हणून शंकराचार्य म्हणतात–**देवीसर्वविचित्ररत्नरचिता दाक्षायणी सुंदरी।**

नंतर वर्णन करतात–**वामास्वादुपयोधराप्रियकरी...** वामा म्हणजे आकर्षक. आई ! तूं जशी सुंदर आहेस तशीच आकर्षक पण आहेस. विश्वंभराचं सौंदर्य आकर्षक व उन्मादक आहे. त्या विश्वंभराच्या सौंदर्याची ओढ लागली कीं, विश्वाचं राज्यही तुच्छ वाटतं. प्रेम करणाऱ्याला सगळं विसरायला लावते तिलाच वामा म्हणतात. आई! तुझ्या सौंदर्याकडे पहात राहिल कीं जग अगदीं तुच्छ वाटतं. **अपि प्राज्यं राज्यं तृणमिव परित्यज्य सहसा** असं वाटतं. अर्ध्या मिनिटात पाच हजाराची नोकरी सोडून देणं याला उन्माद म्हणतात पण प्रभूचं सौंदर्य पाहिल्यानतर मला काहीं नको असं जगन्नाथाना वाटल. त्यामुळंच ते म्हणतात– **अपि प्राज्यं राज्यं** .. समृद्ध राज्यही मला नको भगवान हवा की विश्व हवं असा प्रश्न येताच शंकराचार्यांना जग असत् वाटलं असेल व यात अस्वाभाविक तें काय आहे ? अशा तऱ्हेच तुझं आकर्षक व उन्मादक सौंदर्य असल्यामुळं तू वामा आहेस

**स्वादु** म्हणजे जिचं दूध अतिशय गोड व स्वादिष्ट आहे. ती. आईचं दूध तेजोरूप आहे. आईचं दूध ज्याला मिळालें त्याचं जीवन, त्याचं वर्तन, त्याचं बोलणं काहीं वेगळच असतं तो आकाशातच फिरत असतो.

आई ! तुझं स्तनपान करावं अशी मनीषा आहे. आईचं दूध पिण्यासारखी दुसरी कोणतीही अलौकिक गोष्ट नाहीं. हें दूध ज्या ओठांना स्पर्श करतं ते ओठ मधुर होतात. त्या ओठातून जें बाहेर पडतं ते चागलं वाटतं. त्याची गोडी काहीं वेगळीच असते. वाल्मीकीच्या ओटांतून निघालेलं सर्वच सुदर आहे.

**रामेति मधुरा वाणीं विश्वामित्रोऽभ्य भाषत।**
**उत्तिष्ठ नरशार्दूल! पूर्वा संध्या प्रवर्तते॥**

यात लालित्य नाहीं, वाङ्मयीन विलास नाहीं', अनुप्रास नाहीं; असं असतानाही त्यात गोडी आहे. यात विश्वामित्र आला व त्यानं रामाला

'ऊठ' असं म्हटलं एवढीच घटना सांगितलेली आहे. यात विशेष तें काय आहे ? या म्हणण्यातच गोडी आहे, लालित्य आहे, सर्व काहीं आहे कारण हे शब्द ज्या ओठांतून बाहेर पडले त्यांनीं आईचं दूध प्राशन केलेलं आहे. त्यामुळंच ओठ सुंदर व त्यातून बाहेर पडलेला प्रत्येक शब्द सुंदर आहे.

वाल्मीकि विद्वान होते की नाहीं कुणाला ठाऊक पण त्यांनीं लिहिलेल्या रामायणातल्या प्रत्येक श्लोकाची गोडी वेगळीच आहे आचार्यांच्या भाष्याची भाषासुद्धा अशीच प्रासादिक व गोड आहे.

लहानपणीं मला पतंजलीच्या भाष्यातला अर्थ कळत नसे. पण वाचताना ते गोड वाटायचं. वेदाचा अर्थ जरी कळला नाहीं तरी नुसते म्हणण्यातही काही औरच गोडी आहे ब्राह्मण वेद पाठ करतात. त्यातली गोडी, आनंद काहीं वेगळाच आहे वेद सांगणाऱ्यावर प्रेम असेल तर वेदात काहीं वेगळाच आनंद अनुभवायला मिळेल.

म्हणून आई ! तुझ्या दुधाचा ज्या ओठांना स्पर्श झालेला आहे त्याच्या ओठांतून निघणाऱ्या शब्दांची गोडी वेगळी व त्याचं जीवन वेगळंच होतं. अशी व्यक्ति खऱ्या अर्थानं नरवीर होय. म्हणून तुला स्वादुपयोधरा असं म्हटलं आहे.

शंकराचार्यांना हें दूध प्राशन करायला मिळालं होतं म्हणून त्यांचं सर्वच मधुर आहे. मधुर तें की, ज्याच्या सेवनानं कधींहि कंटाळा येत नाहीं, जें कधींही अनुत्साहकर असूं शकत नाहीं. जे कधींही आकंठ होतच नाहीं ज्याची वाणी ऐकताच उदासम वाटत नाहीं तें मधुर होय श्रीखंड-बासुंदीचा कंटाळा येतो म्हणून असलीं पक्वान्नं खऱ्या अर्थानं मधुर नव्हत.

यानंतर शंकराचार्य म्हणतात प्रियकरी त्याचा अर्थ पुढील अशी गोष्ट

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

देवी सर्वविचित्ररत्नरचिता दाक्षायणी सुंदरी।
वामा स्वादुपयोधराप्रियकरी सौभाग्यमाहेश्वरी॥
भक्ताभीष्टकरी दशाशुभहरी काशीपुराधीश्वरी।
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥८॥

चंद्रार्कानलकोटिकोटिसदृशा चंद्रांशुबिंबाधरी।
चंद्रार्काग्निसमानकुंतलधरी चंद्रार्कवर्णेश्वरी॥
मालापुस्तकपाशसांकुशधरी काशीपुराधीश्वरी।
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥९॥

हे आई! तूं दक्ष आहेस, सुंदर आहेस. तुझ्या दृष्टीला अप्रिय असं काहीं दिसतच नाहीं.

या जगांत शंभर टक्के लोक दुःखी आहेत. असं असूनही सर्व लोकांमध्ये जगण्याची तीव्र इच्छा दिसत आहे. याचंच नांव माया. या जगांत सगळ्यांनाच जगायचं आहे. असं असतांना जग दुःखी आहे असं कसं म्हणतां येईल? कारण जग जर दुःखी असतं तर जगण्याची इच्छाच लोकांना झाली नसती. परंतु सामान्य माणूस दुःखी आहे ही वस्तुस्थिति आहे. या सामान्य माणसां-प्रमाणें संतही दुःखी आहेत. माझं जीवनपुष्प प्रभु स्वीकारील कीं नाहीं याची त्यांनाही काळजी वाटते- अशा तऱ्हेनें सर्वच लोक दुःखी आहेत. त्याचप्रमाणें एकशें एक टक्के लोक सुखी आहेत, हा सत्य सिद्धांत आहे. अन् आईचं हेंच वैशिष्टय आहे. म्हणूनच **प्रियकरी** म्हणतात.

**सौभाग्यमाहेश्वरी**....तूं स्वतः सौभाग्यशाली आहेसच तशीच तूं या संपूर्ण जगालाही सौभाग्य देणारी आहेस. तिच्यामुळेंच आपणा सर्वांचं सौभाग्य आहे. आपणा सर्वांचे चेहरे हसरे दिसतात याचं कारण तिच सौभाग्य होय. तुझ्या ठिकाणीं सौभाग्य निर्माण करण्याची शक्ति आहे. सौभाग्य असेपर्यंतच जगण्यांत अर्थ आहे. नाहीं तर तें प्रेतच होय.

आई! तूं अखंड सौभाग्यवती आहेस. स्त्री म्हणून तुझं चित्रणकेल्या मुळ तुला पति हवा व त्याची योजना करण्यात आली आहे. वस्तुत. पतीही तूंच आहे व स्त्रीही तूच. तुला अर्धनारीनटेश्वराचं स्वरूप देण्यांत आलं आहे. तुझं सौभाग्य इतर सामान्य स्त्रियांप्रमाण नाहीं तर तूं अखंड सौभाग्यवती आहेस.

पार्वतीनं, जें सांगितलं तें पुराणांत ग्रथित करण्यांत आलेलं आहे. ती तप करीत असतां प्रत्यक्ष शंकर वटूच रूप घेऊन तिची परीक्षा करण्यासाठीं आले. त्यावेळीं ते म्हणाले "ज्याच्या जन्माचा पत्ता नाहीं त्याच्याशी तू लग्न करायला तयार झालीस?" पार्वती म्हणाली- "अशाच प्रकारचा पति मला हवा आहे." त्या वटूनं शंकराच्या अनेक दुर्गुणाचं वर्णन केलं त्यावर पार्वती म्हणाली- "सर्व दुर्गुणांत अलक्ष्य जन्मा हा दुर्गुण मला अतिशय आवडला. कारण ज्याला जन्म नाहीं त्याला मरणही नसतं." आई! याच कारणामुंळ तूं अखंड साभाग्यवती आहेस.

**माहेश्वरी....** माहेश्वरी म्हणजे मुल्य. सामर्थ्यशाली व लाचार नसलेली. आई! तूं सौभाग्यमाहेश्वरी आहेस.

**भक्तामीष्टकरी....** तूं भक्तांचं अभीष्ट म्हणजे कल्याण करणारी आहेस. भक्ताला दुसरं कोण असणार?

**कोण आम्हा पुसे शिणलें भागलें तुजविण उरलें पांडुरंगा।**
**कोणांपाशी आम्हीं सांगावें सुख दुःख कोण तानभूक निवारील॥**
(तुकाराम महाराज.)

कित्येक भाग्यवान भक्तांना जगाचं प्रेम मिळालं असेल. परंतु कित्येक भक्तांना जगानं छळलंही आहे. जग भक्तांवर प्रेम करो न करो परंतु भगवान मात्र भक्तावर प्रेम करतोच. भक्त मनांत म्हणतो कीं मला कोण विचारणार? बेटा! काम करून दमलास ना? असं तुझ्याशिवाय मला कोण विचारणार? पुष्कळ कामा केल, श्रम केले तर पाठीवरून भगवानच हात फिरविणार. सॉक्रेटिसान जीवनभर रक्ताचं पाणी केलं. पण त्याला लोकांनीं विचारलं कीं, यामधं फायदा काय झाला? सॉक्रेटिसाला जीवनांत काय मिळालं असं विचारणारे खरंच गुन्हेगार आहेत. फळाची अपेक्षा करणारे सर्वसामान्य लोक

जगाला तुच्छ समजणाऱ्या लोकांच्या जीवनाची परीक्षा काय करूं शकणार? या जगाला तुच्छ समजणाऱ्यांना आधार कोणाचा? तूं दमलास असं कोण म्हणणार? केवळ भगवंतच; दुसरा कोणीही नाहीं. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात कीं, आमचं दुःख कोणाला सांगावं?

भक्तांचीं सुखं-दुःखं लोकांना कळतच नाहींत. कारण त्यांची दुःखाची कल्पनाच कांहीं वेगळी असते. रामदासस्वामी रात्रीचे रडत. पण कशासाठीं हें कोणालाही कळत नसे. शंकराचार्य, वशिष्ट वाल्मीकि रात्रंदिवस परिश्रम करीत असत. ते काय पैसा मिळविण्यासाठीं? लोक म्हणतात "त्यांना लोकैषणा हवी होती." पण लोकांना काय कळणार? परमेश्वरच फक्त भक्तांना ओळखतो व त्यांची तहानभूक शमवतो. म्हणूनच आई! तूं **भक्ताभीष्टकरी** आहेस. पण भगवान भक्तांच्या इच्छा पुऱ्या करतो यांत विशेष तें काय? म्हणून **भक्ताभीष्टकरी** याचा दुसरा कांहीं तरी अर्थ असला पाहिजे.

भगवान आपल्यावर अर्धीही ओझं घेत नाही. भगवान म्हणतो "तूं काम कर अन् त्या कामाप्रमाणं तुला फळ मिळेलच. तुझ्यावर अन्याय होणार नाही ही गोष्ट जागरुकपणं मी पाहीन. पुष्पदंत म्हणतो- **क्व कर्म प्रध्वस्तं फलति पुरुषाराधनमृते॥** या जगात केलेली कोणतीही गोष्ट निष्फळ जात नाहीं. सर्वसामान्य माणसाच्या कल्याणाची जबाबदारी परमेश्वर आपल्यावर घेत नाहीं. फक्त त्यावर अन्याय होणार नाहीं हें पहातो. परंतु तो भक्ताना मात्र सांगतो कीं, मी तुमचं कल्याण करीन जो भक्त नसेल त्याला भगवान सांगतो कीं, "तुझे विकार निर्मळ कर. प्राणायाम कर, वगैरे वगैरे." पण जे भक्त झाले त्यांची जबाबदारी भगवान घेतो. अर्जुन, रामदास किंवा वशिष्ट यांना तुमचे विकार निर्मळ करा असं भगवतानं सांगितलं नाहीं. महाभारतांत अर्जुनानं साधना केल्याचं वर्णन नाहीं. इंद्रकील पर्वतावर तपश्चर्येला गेल्याच एखादे ठिकाणीं वर्णन आहे. अस असूनही जगांत मिळवण्याजोगं स्थान त्यानं मिळविलं आहे. तुकाराम वैकुंठाला गेले त्यावेळीं त्यांचं सात महिन्याचं मूल होत. 'काम-क्रोध जिंकल्याशिवाय परमेश्वर प्राप्ति होत नाहीं हा सिद्धांत इथं खोटा: ठरतो. त्यांना अभय मिळालं याचं कारण ते प्रभुसाठीं जगले, त्याच्या कार्यांत तल्लीन झाले. अशा प्रकारच्या लोकांच प्रभु कल्याण करतो.

**पांडवानांधनंजयः** असं भगवंतानीं आपल्या मुखानं सांगावं असं भाग्य र्जुनाला लाभलं. परमेश्वरासाठीं जे रात्रंदिवस शिणतात त्यांच प्रभु कल्याण व.तो. आपण पैसा मिळविण्यासाठीं श्रम करतों. अशा लोकांचं कल्याण प्रभु र्वतः करीत नाहीं. हा सर्व विचार केल्यावर तुकाराम महाराज वैकुंठला गेले शसतील असत्य नाहीं. कारण अशा भक्तांचं अभीष्ट करणारी आई आहे. आई! तुझ्या भक्तांचं ओझं घेऊन तूं चालतेस. तूं इतरांचं ओझं घेत नाहींस 'ण भक्तांचं मात्र घेतेस. माझं कल्याण कशांत आहे हें जो पहात नाहीं त्याच्या कल्याणाची जबाबदारी आई घेते. लहान मुलाच्या कल्याणाची जबाबदारी आईवरच असते. लहान मूल दुसरा कसलाही विचार करीत नाहीं आम्ही तर नेहमीं परमेश्वराजवळ याचनाच करीत असतों-प्रभो! माझ्या मुलाचं कल्याण कर म्हणजे मी सत्यनारायण करीन. प्रथम तूं दे; नंतर मी पाहीन ही आपली भाषा आहे.

लहान मुलाचं कल्याण भगवान करतो. पण लहान कोण? ज्याला स्वतःचं सुख दुःख कळत नाहीं तो. माझं सुख दुःख मला कळत नाहीं तें सर्व तुला माहित आहे असं भगवंताला जो सांगतो तो लहान. म्हणून भगवान स्वतः आले असतांनाही त्यानं द्रव्य मागितलं नाहीं. भगवंता! माझा विकास कशांत आहे हें तुलाच माहित. भगवंता! तूं जें म्हणशील तें बरोबर. जे स्वतःच्या इच्छेप्रमाणं वागतात ते मोठे व परमेश्वराच्या इच्छेप्रमाण वागतात ते लहान. आपण मोठे आहोंत व भक्त लहान आहेत. उन्हांत खेळणाऱ्या लहान मुलाला आई ज्याप्रमाणं कडेवर घेते त्याप्रमाणं स्वतःला लहान समजणाऱ्या भक्तांचं भगवान कल्याण करतो. इतरांना फटकेच देतो.

आपण सर्व १०–१२ वर्षांचेच आहोंत. पण भक्त तीन वर्षांच्या बालका-सारखे आहेत.

**प्रल्हाद-नारदपराशर-पुंडरीक**
**व्यासाम्बरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान्।**
**रुक्माङ्गदार्जुनवशिष्ठविभीषणादीन्**
**पुण्यानिमान् परम-भगवतान् स्मरामि॥**

LIBRARY

आपलीं कामें सदोष असणार कार्य आलें कीं दोष आलेच परंतु भक्ताच्या कार्यांत दोष नसतोच मोठ्या मुलाच चुकलं तर आई म्हणते-"एवढीसुद्धा तुला अक्कल नाहीं" पण लहान मुलाच्या हातून काहीं चुकलं तर आईला दुःख होतं

भगवताकडे अनन्यभावान जे जातात त्याच्याशी परमेश्वराच वर्तन काहीं वेगळच असत आपण सामान्य माणस बुद्धि मागतों पण भक्त परमेश्वराला बुद्धि अर्पण करतो एवढा दोहोंमध फरक आहे भक्त राम ठेवील तस रहायला निरंतर तयार असतात **यदृच्छालाभसंतुष्टो** अशी त्याची वृत्ति असते तात्पर्य तू सर्व भक्तांच अभीष्ट पूर्ण करणारी आहेस म्हणून तुला **भक्ताभीष्ट करी** म्हणतात

**दशाशुभहरी** आई तू दहा प्रकारचीं पापं नाहींशी करणारी आहेस तीन शारीरिक पातक, तीन मानसिक पातक व चार वाणीचीं पातकं, मिळून दहा होतात. या सर्व पापाच तू हरण करणारी आहेस भक्ताजवळ पाप राहातच नाहीं चोरी कोण करतो? जो अतृप्त, संशयी अविश्वासू असतो तो भक्त तृप्त असतो त्याला विश्वास वाटतो तो चोरी कशाला करील? त्याचीं पातकं तू नाहींशी करतेस तुकाराम महाराज म्हणतात **जाणतें लेकरूं। माता लागे दूर धरू॥ तैसें नकरी कृपावंते।पांडुरंगे माझे माते॥** हे पांडुरंग माते! तू अस करू नकोस मी आता मोठा झालों पण आई! तूं मला दूर केलस तर कस चालेल? मोठ्या माणसान पाप केल तर त्याच प्रायश्चित्त त्यालाच ध्याव लागत पण लहानाचे हातून काहीं घडल तर त्याची जबाबदारी आई स्वतःकडच घेते आपल्यासाठी प्रायश्चित्त आहे, भक्तासाठीं नाहीं शुभाशुभ कर्म तुझ्यामुळ होतं अस ज्याना वाटत, त्याच्याकरिता प्रायश्चित्त नाहीं, शास्त्राचे नियम आपणासाठी आहेत भक्तासाठीं आई जगदंबा उभीच आहे

लहान याचा अर्थ वयान लहान असा नव्हे तर ज्यानें आपल्या जीवनाच नियंत्रण भगवताच्या हाती दिल, आपल्या हातीं ठेवल नाहीं त्याला लहान म्हणायच शब्दानीं लहान व्हायच नसत अनुभवानीं लहान व्हायला हवं अशा प्रकारच्या लहानान पाप केल तर त्याची जबाबदारी त्याच्यावर नसते

एकदां न्यूटन समुद्रकिनाऱ्यावर उभा होता. तिथं जमलेले सर्व लोक म्हणूं लागले कीं, आपण महान् आहात त्या वेळीं न्यूटननं हातात रेती घेतली व सागितलं कीं, या रेतीच्या कणाएवढं माझं ज्ञान आहे. तुकाराम महाराज म्हणतात कीं, **वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा।** पण ही त्याची मिजास आहे. भक्त पंडिताजवळ विनय रहात नाहीं सामान्य पंडिताजवळ ज्ञान यायला लागलं कीं, तो विनयी होतो. परंतु भक्ताजवळ नम्रतायुक्त मिजास असते. मग अशा भक्ताला लहान कस म्हणणार? विवेक व्यवहार, विचार, विनय, भाषा यानीं आलेलं लहानपण नको तर वृत्तीन लहानपण यायला हवं. भक्त पंडिताची गोष्ट वेगळीच असते–याचा अर्थ सत्याच दर्शन मलाच झालेलं आहे. मग तो लहान कसा म्हणयचा? विवेकानं लहानपण सर्वांनाच प्राप्त होतं पण वृत्तीनं सर्वांनाच प्राप्त होत असं नाहीं.

आपल्याला कोणीं मोठा म्हटलं तर आपण विनयानं नकार देतों. पण भक्त म्हणतो कीं, मी विश्वाचा बादशहा आहें. मला हिरवा रंग आवडतो म्हणून भगवन्तानं ही हिरवी वनश्री निर्माण केली आहे. भक्त नेहमीं वृत्तीन लहान असतात. ते म्हणतात- 'मला माझं सुखदुःख माहित नाहीं तें प्रभूला माहित अशा प्रकारचा भक्त कधींही विचलित होत नाहीं. भाषेची मिजास पाहायची असेल तर भक्त पंडिताकडे जा आणि भाषेची नम्रता पाहायची असेल्तर पंडिताकडे जा. भाषेची मिजास भक्त, पंडित व ज्ञानीभक्त याचे ठिकाणीं असते. ज्ञानीं भक्ताची मिजास काहीं वेगळीच असते. **यदि पथि विपथे वा वर्तयामः स पंथा।**

आम्हीं जें वर्तन करूं तोच धर्म. आम्हीं ज्या मार्गानं जाऊं तोच सुपंथ. वाचस्पति मिश्राची ही मिजास होती. सामान्य माणसाला वाचस्पति मिश्र मिजासखोर होते असं वाटेल व न्यूटन नम्र होता असं वाटेल. लहानपण हें वृत्तींत असायला पाहिजे. ईश्वराच्या हातात सर्वस्व देणं हा वृत्तीचा प्रश्न आहे. अशा प्रकारचे जे वृत्तीनं लहान असतील त्याचीं पातकं दूर करण्याची परमेश्वरावर जबाबदारी आहे.

भगवंताला आपला नियंता बनविणं भक्तीचं परमोच्च फळ होय सर्वच व्यक्ति तुकाराम होऊ शकत नाहींत भगवंतानं हिरण्यकश्यपूचं उदर नखानीं

फाडल व प्रल्हादावर अनुग्रह केला, याचं हेंच कारण आहे. भगवान आपल्या ठिकाणीं सर्वांचाच समावेश करतो पण त्या पद्धतींत फरक आहे एकावर अनुग्रह करून आपल्यात समाविष्ट करतो तर दुसऱ्याला फटका मारून खेचून घेऊन जातो.

लहान असेल तो परमेश्वराचा भक्त व जो मोठा असेल तो परमेश्वराचा नोकर नोकर सात्विक असेल पण तो शेवटीं नोकरच. व ज्याचा भगवान नोकर तो भक्त. भक्ताचीं पातकं भगवान नाहींशीं करतो. अशा प्रकारची वृत्ति व्हायला पाहिजे. अशा प्रकारची वृत्ति आईजवळ मागितली तर मिळते श्रीमदाद्य शंकराचार्य आईजवळ भिक्षा मागत आहेत. **भिक्षांदेहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी।** नवव्या श्लोकांत ते म्हणतात-**चन्द्रार्कानलकोटिकोटिसदृशा** सूर्य व चंद्र हें अग्नीचं कार्य आहे त्याच्यापेक्षां कोट्यवधि- **कोटिकोटि** पटीन आई! तुझा प्रभाव आहे. तुझ्यापुढे चंद्राची शीतलता तुच्छ आहे भगवंतापुढे सूर्याचा कर्मयोग तुच्छ आहे अग्नीच्या दाहकतेपेक्षा कोट्यवधि पटींची दाहकता तुझ्याजवळ आहे.

चंद्र शीतल आहे व तो स्थितप्रज्ञतेचं प्रतीक आहे शुद्ध पक्षात चंद्र लोकाचा अधिष्ठाता आहे त्याला पाहून लोक वेडे होतात, नाचतात पण वद्य अष्टमीच्या रात्रीं चंद्राला पहा. तो स्थितप्रज्ञ आहे असं तुम्हाला दिसेल त्याला कोणीही पाहाणार नाहीं. त्यालाही कोणाची पर्वा नाहीं. त्याला कोणींही मानपत्र देणार नाहीं अस असूनही तितक्याच शांततेनं तो संचार करीत असतो पाहाण्याची दृष्टि असेल तर चंद्र कांहीं वेगळाच वाटतो. कोणाची पर्वा न करता तो पुष्णामि चौषधी सर्वा सोमो भूत्वा रसात्मकः। चंद्रापेक्षाही भगवान जास्त स्थितप्रज्ञ आहे म्हणूनच आपण भगवंताची दगडाची मूर्त बनवतों कारण पत्थरस्वरूप भगवान बदलत नाहीं म्हणूनच भगवंताचे ठिकाणी चंद्रापेक्षा कोट्यवधि पटीची शीतलता व स्थितप्रज्ञता आहे.

सूर्याच्या कर्मयोगापेक्षा आई! तुझा कर्मयोग कोट्यवधि पटीन श्रेष्ट आहे. त्याचप्रमाणं अग्नीच्या दाहकतेपेक्षा अवर्णनीय दाहकता तुझ्याजवळ आहे. परमेश्वराच्या कार्यात जर कोणीं अडथळा करील तर त्याचे परिणाम त्याला भोगायला लागणारच. तिथं दया, क्षमा नाहीं पुराणात अशी कैक उदाहरणं आहेत भगवान जितका शीतल तितकाच तो दाहक पण आहे श्रीकृष्ण भगवान कोणाही सामान्य गवळ्याच्या घरीं जाऊन जेवीत असे पण दुर्योधनानं शिकस्त केली तरीही त्याचे घरी पाणीही प्याला नाहीं

भगवंता! तूं म्हणतोस कीं, **नमेद्वेष्योऽस्ति न प्रियः**। मग तुला दुर्योधन व सुदामा भिन्न भिन्न कां वाटावेत? तूं बोलतोस एक, व करतोस दुसरेंच. तुला ओळखणें खरोखर कठिण आहे. म्हणूनच तूं अनिर्वचनीय आहेस. म्हणूनच तुझ्याठिकाणीं चंद्रापेक्षां कोट्यवधि पटीनें शीतलता, सूर्यापेक्षां कोट्यवधि पटीनें कर्मयोगित्व व अग्नीपेक्षां कोट्यवधि पटीनें दाहकता आहे

**चंद्रांशु विंबधरी....** आई! तुझे ओठ चंद्रकिरणासारखे शीतल आहेत. आईची वाणी अतिशय शीतळ वाटते. **पूर्णोऽहम्** हें ज्यानें ऐकलें असेल त्याला त्या शीतलतेची कल्पना येईल. ज्याच्यावर प्रेम असतें तें शीतल वाटतें

आई झऱ्यांच्या रूपानें बोलते. झाडांतून बोलते. हें अतिशय शीतल आहे. परंतु यासाठीं प्रत्यक्ष झऱ्याजवळ जाण्याची गरज नाहीं. डोळे मिटा म्हणजे हें सारं दृश्य दिसेल. ज्ञानेश्वर भगवंताजवळ वृक्ष व पानें बोलत असत. त्यांची शीतलता कांहीं वेगळीच असते. आई जर बोलली नाहीं तर चुकल्या चुकल्यासारखं वाटतं

तुकाराम महाराज म्हणतात- **मौन कां धरिलें विश्वाचे जीवना। उत्तर वचना देई माझ्या।** आई! तूं माझ्याशीं कां बोलत नाहींस? तूं वाटेल तसं बोल पण बोल. भगवान म्हणेल कीं, मला हजार मुखं आहेत. मग मी कोणत्या तोंडानं बोलूं? आई! कोणत्याही तोंडानं बोल; पण बोल तुझं बोलणं ऐकूं आलं नाहीं तर मला चुकल्याचुकल्यासारखं वाटतं.

वाटेल त्या तोंडानं बोलण्याची माणसाची योग्यता नाहीं. ज्या तोंडानं हरामखोरपणा चालतो त्या तोंडनं भगवान कसा बोलणार? भगवान माणसापेक्षां गवत, पानं यांच्या मुखातून बोलतो.

लहान मूल खेळतां खेळतां पडलं तर आई जवळ जाते. आई तुमनं फऽऽऽ करते व तात्काळ दुःख दूर होतं. याचं कारण आईच्या ओठांत शीतलता असते. आईच्या मुखांतून बाहेर पडलेलें वाङ्मय शीतल व अलौकिक आहे.

रामायणांत असा प्रसंग आहे की, लढाईमध्ये जखमी झालेले वानर येत; राम त्यांच्याकडे तुमनं पाही. रामाच्या निःसीम प्रेमामुळं वानर स्वतःचं दुःख विसरून जात. रामावर त्याचं अमर्याद प्रेम होतं. भगवानही भक्तांच्या दुःखांवर फुंकर घालतो मग दुःखं रहाणारच कशीं? अशा प्रकारं आईचं बोलणं अतिशय शीतळ आहे.

जटाजूटः शरणम्

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम

चद्रार्कानलकोटिकोटिसदृशा चद्राशुबिंबाधरी ।
चद्रार्काग्निसमानकुंतलधरी चंद्रार्कवर्णेश्वरी ॥
मालापुस्तकपांशसांकुशधरी काशीपुराधीश्वरी ।
भिक्षा देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥१॥

चंद्र, सूर्य आणि अग्नि याच्याठिकाणीं जें तेज आहे, त्यापेक्षा किती तरी पटीन जास्त तेज तुझ्याजवळ आहे चंद्राच्या शीतलतेपेक्षा किती तरी पटीनं जास्त शीतलता तुझ्याजवळ आहे. सूर्यापेक्षा किती तरी पटीनं जास्त कर्मयोगिता तुझ्याजवळ आहे म्हणूनच शकराचार्यांना त्यादिए पदार्थाचा मोह वाटला नाहीं मनोहर, सुदर व आकर्षक सृष्टीची पर्वा वाटली नाहीं. या सर्वापेक्षाही श्रेष्ठ, सुदर व आकर्षक अस त्याना हृव होत, ते त्याना तुझ्याजवळ दिसल

**चद्रार्काग्निसमानकुतलधरी** चद्र, अग्नि आणि सूर्य याच्यासारखे तुझे केस आहेत चद्राची शीतलता, सूर्याचा कर्मयोगीपणा, अग्नीची दाहकता या सर्व गोष्टी आपण पाहिल्या यानंतर भगवतीच्या केसाच वर्णन केल जात आहे तुझ्या केसाच्या प्रकाशात जीवनाचा महान ग्रथ वाचता येइल त्यामध जीवनाची परीक्षा होऊं शकेल

शकराचार्यांना आईचीं दोन रूप दिसतात समोर पाहणारी आई व पाठ फिरवून बसलेली आई

आई ! ज्यावेळीं माझ्याकडे पाहातेस त्यावेळीं तुझ मुख इतक सुदर दिसत कीं मी 'स्व' विसरतों व जिथ 'स्व'च नसतो तिथ जीवन तरी कस तपासणार ? तुझ सुदर मुख पाहताना माणूस इतका तल्लीन होतो कीं, स्वत च जीवन वाचायला त्याला वेळच कुठ राहातो ? पण काहीं काहीं वेळा आई तोड फिरवते त्यावेळीं शंकराचार्यांना तिच्या केसाच दर्शन होत आईन तोंड फिरवल म्हणून ते निराश झाले नाहींत जगदीश ज्यावेळीं

पराङ्मुख होतो यावेळीं जीवनाचं भान होणं कठीण परंतु आई पराङ्मुख झाल्यावर आत्मनिरीक्षण करता येतं.

आजच्या श्लोकात शंकराचार्य सांगतात. कीं, आई! तं पराङ्मुख झालेली असतेस त्यावेळीं मी निराश न होतां आत्मनिरीक्षण करतो. तुझ्या केसाच्या प्रकाशांत जीवन तपासतों. शंकराचार्यांना आईचं कोणतंही रूप आवडतं

अनुकूले जगन्नाथे सानुकूलं जगत्रयम्।
प्रतिकूले जगन्नाथे प्रतिकूलं जगत्रयम्॥

जगदीश ज्यावेळीं पराङ्मुख होतो त्यावेळीं माणूस विचार करतो कीं, माझ्या हातून कांही अपराध घडला असेल का? यालाच आत्मनिरीक्षण म्हणतात आम्हांला वठणीवर आणायचं असेल तर जगदीशाला तोंड फिरवावंच लागतं

**चंद्रार्कर्णेश्वरी** . चंद्र आणि सूर्य याच्या सामर्थ्याप्रमाणं तुझा वर्ण आहे. वर्ण म्हणजे रूप म्हणजे चामडीचं रूप तसंच वर्ण म्हणजे शब्द आई! तुझ्या शब्दात चंद्र-सूर्याचा प्रभाव आहे. तुझ्या शब्दात चंद्राचा जसा प्रेमळपणा आहे तशीच सूर्याची प्रभाही आहे. अशा तऱ्हेन तुझ्या वर्णात चंद्राच तेज आहे

आई! तुझ्या हातात माळा आहे. **मालापुस्तकपाशसांकुशधरी** . पण तुला अनेक हात आहेत. मग चार हातात चार का माळा आहेत? गीतेंतल्या विश्वरूप दर्शनान तुला हजार हात आहेत असं वर्णन आहे. परंतु आई! तुझ्या एका हातात माळ, दुसऱ्या हातात पुस्तक आहे. एका हातात पाश, दुसऱ्या हातात अंकुश आहे.

आई! तुझ्या हातातल्या माळेकडे भक्त ज्यावेळीं पहात असेल त्यावेळीं त्याला या माळेंतील कोमल, विलोभनीय व सुंदर फुलांनीं मंडित झालेली माळ दिसत असेल. तसंच भाविक लोकांनीं दिलेल्या प्रेमपुष्पांचीही माळ आहे. **पत्रंपुष्पंफलंतोयं** या भक्तीभावानं तुला समर्पित केलेल्या कोमल फुलांची माळ तुझ्या हातात आहे. आम्हीं फक्त उत्सवाच्या दिवशींच मोठ्या किंमतीचा हार तुला घालतों परंतु भगवंताला एकच हवं आहे व तें म्हणजे तुझ्या कामात मी कुचराई करीत नाहीं अशा प्रकारचे भावुक लोक या जगांत किती तरी असतील व त्यांनीं अर्पण केलेल्या फुलांची माळ तूं धारण करतेस.

दुसरी एक माळ आहे. कर्मयोग्यानीं समर्पित केलेल्या सत्कर्माची मळ तुझ्या हातात आहे. कि येक महापुरुषानीं समर्पित केलेल्या जीवनपुष्पाची मळ तुझ्या हातात आहे. कोणत्याही प्रकारची माळ असो तीं सुंदर व आकर्षक आहे या सर्व मोठ्या मोठ्या माळ आहेत.

या सर्वापेक्षा आणखीं एक महत्वाची माळ आहे; ती म्हणजे अश्रूंची मळ पण हे कोणाचे अश्रू ' कर्मयोगी रूप करतात, रक्ताचं पाणी करतात. त्याच्या डोळ्यात अश्रू येतात. पण हे अश्रु दुर्बळाचे किंवा निराश झालेल्या लोकाचे नव्हत प्रभो! तुझं काम करतो पण तें करताना माझी शक्ति कमी पडते, म्हणून मला वाइट वाटतं. त्यामुळं अश्रूंनीं डोळे भरून जातात.

रामदासस्वामी रात्रींचे रडत असत. रात्रीं प्रभूजवळ एकटे बसून रडत. आईला वाटलं, याचं लग्न झालं नाहीं म्हणून हा रडतोय. नारायणा! पाहिलंस, तुझे मित्र । व्याह करून आज सुखात आहेत. त्यावेळीं तू मूर्खपणा केला नसतास तर आज रडण्याची पाळी आली नसती.

त्यावेळीं रामदास म्हणाले– आई! दररोज मी असाच रडतो. तूं आज उठलीस म्हणून तुला हें कळलं. आई! मी चिंता करतों विश्वाची. या जगात केवढं अधःपतन, केवढी क्षुद्रता दिसते! समाजात कृतघ्नता दिसते. या समाजाला सुधारण्याचा मी प्रयत्न करीत आहें. पण शक्ति कमी पडते. म्हणून मी रडत आहें

अशा तऱ्हेनं कर्मयोग्याची अश्रूंची माळ मोठी विलोभनीय आहे. ही माळ भगवंतानं गळ्यात घातली असेल. तुम्ही भगवंताला माळ देता पण तो स्वीकारायला तयार नसतो. कारण पूर्वपरिचय असल्याशिवाय कोणतीही गोष्ट व्यवहारात जशी स्वीकारली जात नाहीं तशीच परमेश्वराची अवस्था आहे वाढदिवसाच्या दिवशीं आपण ओळख असेल तरच भेट पाठवितो. कर्मयोग्यावर प्रभूच प्रेम आहे. त्याना तो उत्तम रीतीनं ओळखतो.। म्हणून त्याच्या अश्रूंची माळ मोठ्या प्रेमान तो धारण करतो.

आणखींही एका प्रकारच्या माळेचं रूप आहे. ते रूप म्हणजे अयशस्वी साधकाच्या अश्रूंची माळ **यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः।** ध्यान, धारणा करूनही ज्याना प्रभुप्राप्ति होत नाहीं, असे लोक म्हणत असतील-

आई! मी तुझं ध्यान करतों पण तूं माझी उपेक्षा करतेस. म्हणून माझं चित्त परत क्षुद्र विषयाकडे जातं. आता मी काय करूं? असं म्हणून रुदन करणाऱ्या अयशस्वी साधकाच्या अश्रूंची माळ तुझ्या हातात दिसते.

पूर्वीच्या काळीं बालविवाह होत असत. प्रत्येक मिनिटाला तीं पति-पत्नी खेळताना 'गट्टी फू' करीत. त्याप्रमाणें हा साधक म्हणतो कीं, उपासना घेतली खरी परंतु त्या उपासनेंत माझं चित्त रममाण होत नाहीं. सत्संग कोणता त्याच भान राहात नाहीं. यालाच 'गट्टी फू' करणं म्हणतात.

जीवन विकासाठीं सत्संग, एकांतता, एकाग्रता, मनःस्वास्थ्य व निश्चितता या पाच गोष्टींची आवश्यकता आहे. त्या मिळत नाहींत म्हणून साधक अगतिक होतो. तूं त्याला धीर देतेस पण मधेंच त्याला सोडून देतेस लहान मूल ज्यावेळीं चालायला शिकतं त्यावेळीं आई त्याचा हात धरते. त्याला चालायला शिकविते. पण मधेंच त्याचा हात सोडून देते. अशा प्रकारची आई निष्ठुर म्हणायची का? मुळींच नव्हे. त्यानं लौकरात लौकर निर्भयपणं चालायला शिकावं हा हेतु असतो. तसच उपासनेंत उपासकाचा जगदंबेनं हात सोडून दिला तर तें विघ्न आहे, ती निष्ठुरता आहे असा त्याचा अर्थ नव्हे. जीवनात आपल्याला यश मिळायला लागलं असताना जरा कांहीं विघ्नं आलीं तर यशाची दोरी तुटते व आपल्याला वाटतं कीं, परमेश्वर किती निष्ठुर आहे! पण असं करण्यात त्याचा हेतु असतो त्याचा विश्वास दृढ व्हावा ही परमेश्वराची योजना असते. आपण मात्र त्याचा उलटा अर्थ समजतों. तसच जीवन-विकास व्हावा यासाठीं प्रभु मधेंच उपासकाचा हात सोडून देतो. जगदीशाकडे परक्या नजरेनं पाहिल्यामुळंच अनेक शंका-कुशंका निर्माण होतात. असा विचार केला तर मधेंच हात सोडणारा प्रभु निष्ठुर नाहीं. अशा प्रकारच्या अयशस्वी साधकाच्या अश्रूंची माळ प्रभु हातात धारण करीत आहे.

जे साधना करतात, पूर्णतेचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करतात, हजार गोष्टींची त्याना प्राप्तीही होते तरीही ते रडत असतील कीं, हे प्रभो! माझा आपण का त्याग केलात? ही प्रयत्नशील पण अयशस्वी साधकांची हकीगत आहे. प्रयत्नशील पण अयशस्वी साधक ओळखायला भक्ताचं हृदय हवं

शिवाय आणखीही एक माळ आहे काही असे सात्विक लोक असतात कीं, त्याना जगात अनुभवायला येणारं जीवन व स्वतःचं जीवन याची खंत वाटते मानवी जीवन निरर्थक गेलं असं त्याना वाटतं अशा प्रकारच्या पश्चात्तापदग्ध लोकांच्या डोळ्यात आसवं येतात. अशा प्रकारच्या अश्रूंची माळा जगदंबेच्या हातात आहे या अश्रूंत महान सामर्थ्य आहे. खरोखर! संग्रामात पराभूत झालेली मानवता, धुळीनं व रक्तान माखलेली मानवता, स्वतःच्या जीर्ण वस्त्रामुळं लज्जित होऊन अधोमुख झालेली मानवता पश्चात्तापदग्ध होऊन परमेश्वरासमोर उभी राहून अश्रु ढाळीत असेल. अशा वेळी भगवंताच हृदय द्रवित होऊन तिला क्षमा करीत असेल! अश्रूंच्या छोट्याशा थेंबातही प्रचंड शक्ति असते.

साधकान परमेश्वराच्या हातात असलेली कोणती माळ पहायची? गुलाबाची कीं चाफ्याची? हा सर्व विलास आहे यात विकास आहे नाहीं कोणाला माहित!

अशा प्रकार भावुक भक्तानीं, निष्काम कर्मयोग्यानीं, महापुरुषानी प्रभुला समर्पण केलेल्या माळा सुंदर असतील पण या सर्वांपेक्षा साधकाला अश्रूंचीच माळ सर्वांत अधिक आवडते

पश्चात्तापदग्ध सात्विक लोकांच्या अश्रूंत प्रचंड सामर्थ्य आहे ते अश्रु पाहिल्यानंतर भगवंताच हृदय भरून येत व तो क्षमा करतो भगवंताचे प्रभावी शब्द आपल्या कानात निनादत असतात

**परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥**

हा आवाज किती लोकांच्या अंतःकरणात निनादत असेल? सांगणं कठिण आहे. लबाड लोकाना हा आवाज ऐकूंच कसा जाणार?

प्रेमात सामर्थ्य आहे पण तें प्रेम आम्हाला करता येत नाहीं आम्हांला खरी विद्या येत नाहीं त्याग माहित नाहीं. बुद्धिची कल्पना नाहीं परंतु मानवाचं संपूर्ण सामर्थ्य एका छोट्याशा अश्रुबिंदूत आहे अंतःकरणपूर्वक पश्चात्ताप असेल तर त्याची क्षमा सर्वांना होते

पश्चात्तापदग्ध सात्त्विक लोकांच्या अश्रूंची माळ मार्गदर्शक व उपदेशक आहे या केवळ माळेचा जरी विचार केला तरी जीवन बदलेल. विकसित होईल आपण प्रभूला सुगंधी माळ अर्पण करतो तरीही आपलं जीवन बदलत नाहीं. आईच्या हातात अशा प्रकारच्या हृदयपुष्पांची माळ आहे.

पश्चात्ताप अंतःकरणापासून असला पाहिजे. केवळ देखावा करून उपयोग नाहीं. त्यामुळं परमेश्वर रागावतो व सांगतो– "गाढव हो." भीति व पश्चात्ताप यात भेद आहे.

**मालापुस्तक** - आईच्या हातात एक पुस्तक आ . आई! तुझ्या पासूनच सद्‌विचार येतात. अगोदर सद्‌विचार माझ्या बुद्धित शिरत नाहींत व शिरलेच तर जीवनात येत नाहींत. कारण तुझी लिपी मला वाचता येत नाहीं मी एकाग्र वसत नाहीं म्हणून तूं सांगितलेलीं वचनं माझ्या मस्तकात शिरत नाहींत तसंच तुझ्या शब्दांविषयीं माझ्या अंतःकरणात प्रेम नाहीं. जो दिसतो तो मोह होय. तूं प्रेमानं लिहिलेलं आहेस पण माझ्याजवळ प्रेमच नाहीं. पुत्र, पत्नी, घर, पैसा यावरही प्रेम नाहीं, मोह आहे. भगवंता! तुझ्या सत्स्वरूपावरही माझा विश्वास नाहीं, प्रेम नाहीं. जर प्रेम असत तर तें नाहींसं झालं नसतं. मोह असला तर तो मात्र विरून जातो.

निष्ठेनं माणूस स्वाध्याय करतो पण नंतर कटाळा येतो. याचं कारण मोह होय स्वाध्यायाची गोष्ट सोडाच पण आपण कोणत्याही कामाला जरी सुरवात केली तरी काहीं दिवसांनीं आपण हळूहळू ढिले होतों. याचं कारण मोह आहे. प्रेम नव्हे जगात जगदीशाकडे पाहाण्याचा मोह आहे. प्रेम नाहीं व दृष्टीही नाहीं.

माझ्याजवळ प्रेमाचा अंशही नाहीं आणि तुझ्या पुस्तकात प्रेमाचीच लिपी आहे म्हणून तुझं पुस्तक मला वाचता येत नाहीं माझ्या ठिकाणीं परिपूर्ण मोह भरला आहे जिथं प्रेम असतं तिथं काहींही कंटाळा येत नसतो

जोपर्यंत मोह असतो तोपर्यंत भिन्न भाषा बोलणाऱ्या पति-पत्नीसारखी आपली अवस्था होते पति बोलतो तें पत्नीला कळत नाहीं व पत्नी बोलते तें पतीला कळत नाहीं. अशाचा संसार सुखी कसा होणार? अशाच तऱ्हेनं आई! तुझी प्रेमाची भाषा व माझी मोहाची भाषा. याचा मेळ होणाऱ्या

कमा? भाषा समजण्यासाठीं दोघाची भाषा एक असावी लागते. याचा अर्थ तूं मोहापर्यंत ये असा नव्हे तर माझा हात पकडून प्रेमाकडे घेऊन जा.

आई! तुझ्या हातात ज्ञानाचं पुस्तक आहे. पतंजलि भगवान म्हणतात- एकः शब्दः सुप्रयुक्तः सम्यक् ज्ञातः स्वर्गेलोकेच कामधुक भवति। एक शब्द जरी जीवनात आला तरी जीवन बदलत. शब्द ब्रह्म आहे. त्याचं वाचन केलं, पचवला तर तो ब्रह्मापर्यंत घेऊन जातो. अनेक गोष्टींमुळं माणूस बदलूं शकत नाहीं व ही गोष्टही वाटते तितकी सोपी नाहीं. सर्व ग्रंथ वाचायचे सोडून तुझ्याकडेच पाहात राहूनच कृतार्थ व्हावं असं मला वाटतं.

**माला पुस्तकपाश** . आई! तुझ्याजवळ पाश आहेत. आम्हीं तुझ्यापासून वेगळे झालों कीं, तूं आम्हाला खेचतेस. कुत्र्याला वाटेल तिथं जायला परवानगी असते कारण त्याच्या गळ्यात पट्टा असतो. तो ज्यावेळीं लांब जातो असं वाटतं, त्यावेळीं त्याला खेचता येतं तसंच माणसाला खेचता यावं यासाठीं भगवतीजवळ पाश आहेत श्रावण महिना आला कीं, माणूस जवळ जातो व श्रावण महिना गेला कीं, माणूस पुन्हा ईश्वरापासून दूर जातो.

आई! तुझ्याजवळ कितीतरी प्रकारचे पाश आहेत. वेदात ज्याची निंदा करतो ते पाश भगवंतनच निर्माण केलेले आहेत. स्त्री पुरुषांना एकमेकांविषयीं वाटणार आकर्षण हा पहिला पाश आहे. दुसरा पैसा, पुत्र, कीर्ति याच्याविषयीं वाटणारा मोहपाश आहे. या सर्वांपेक्षा प्रभावी असा तिसरा पाश आहे. तो यमपाश होय या यमपाशाच्या भीतीमुळं माणूस थोडासा योग्य मार्गानं जात असतो

आई! हें तुझं नाटक आहे नट दीडशहाणेपणा करायला लागला कीं सूत्रधार त्याची कानउघडणी करतो. तसंच या सृष्टींत माणूस दीडशहाणा झाला कीं, त्याची जगदंबा यमपाशाची भीति दाखवून त्याला धमकावते.

तसंच जगदंबेजवळ प्रेमपाशही आहेत व शेवटचा मुक्तिपाश याला पाश म्हणणं बरोबर नाहीं

कामपाशानं मैथुनी प्रजा निर्माण होते पूर्वी मानसिक प्रजा निर्माण होत होती म्हणून माणसाना वाटलं कीं, मुलाच्या संगोपनाची जबाबदारी कोण घेणार? त्यामुळं प्रजा कमी होऊं लागली तें पाहून ब्रह्मदेव विचारात पडला.

व त्यानं तप केलं. मग एका पुरुषाचे दोन विभाग केले. स्त्री व पुरुष हे ते दोन विभाग. विभिन्न लिंगी व्यक्तींचे ठिकाणीं कामशक्ति ठेवली. याकाम-पाशामुळं सृष्टि अविच्छिन्न सुरू झाली

हा कामपाश जे तोडतात त्याना मुक्त म्हणतात. यद्गत्वा न निवर्तंते। माणसाची जन्म मरण-परंपरा सुरूच आहे. या सृष्टींत आलेल्या व्यक्तीनं रमावं यासाठीं बाहेर जाताना आई मुलाला खेळणीं देऊन बाहेर जाते त्याप्रमाणं पुत्र, वित्त, घर वगैरे खेळणीं निर्माण केलेलीं आहेत. पण याचा परिणाम असा झाला कीं, या खेळ्यांत रमलेला माणूस ईश्वरालाच विसरला. साठ वर्षांचं वय झालं तरी आपली आई कोठं आहे याची माणसाला आठवणही होत नाहीं. आपल्याला सोडून गेलेली आई अजून का बरं परत आली नाहीं? आईची आठवण करायला या युगांत सवडच कुठं आहे?

आई! या मोहपाशामुळं संसारात मला आनंद मिळावा व तुला *शांतपणं एकांतात बसायला मिळावं म्हणून तूं रचलेलं हें कारस्थान आहे.*

ईश्वर तर दिसत नाहीं. सृष्टीचं रहस्य उलगडत नाहीं. मग माणसानं कसं जगायचं? म्हणून भगवंतानं हा मोहपाश निर्माण केलेला आहे. हा नसता तर माणूस जगूंच शकला नसता. जे लोक निर्झर, पर्वत इंद्रधनुष्य, चंद्रोदय, सूर्यास्त हीं दृश्यं पाहाता पाहाता तल्लीन होऊन जातात त्याची गोष्ट वेगळी आहे ते अशा प्रकारं जीवन व्यतीत करूं शकतात. पण जे निसर्गात रममाण होत नाहींत, ज्याना भगवान दिसत नाहीं, सृष्टींतील आनंद उपभोगता येत नाहीं त्याच्यासाठीं, हा मोहपाश आहे. मग त्याना शंभर वर्षेपर्यन्तही जगायला हरकत नाहीं.

सृष्टि चालावी यासाठीं कामना उत्पन्न होणं व सुखी होणं या मोहपाशामुळं, जीवन व्यतीत करता येतं. परंतु हे अशा प्रकाराचे जीव या मोहपाशातच रमतात. त्याना खेचण्यासाठीं हा यमपाश आहे. त्याद्वारें भगवान सांगतो "बेटा! ऊठ खूप खेळलास. चल; जायची वेळ झाली."

प्रेमपाश हा चौथा पाश आहे. पूर्वजन्मींचं पुण्य असेल तरच जीवाच्या मनात ही भावना निर्माण होते सर्वभूतस्थमात्मानम् सर्वत्र समदर्शन हें भावुक जीवन आहे यामधं भगवान प्रेमपाश निर्माण करतो यामुळं भावना पुष्ट होते. भावजीवनात प्रेमपाश असतो. या प्रेमपाशामुळं जीव मुक्तिमार्गानं जायला

लागतो यासाठीं भगवंताला मोह वाटतो. हें भावजीवनही भगवंतामुळंच पुष्ट होतं.

सर्वसामान्य लोक कामपाश, मोहपाश व यमपाश या पाशांतच फिरत असतात. जायस्व, म्रियस्व या गोष्टी चालूच असतात. **मातापितृसहस्राणि पुत्रदार शतानिच। संसारेष्वनुभूतानि यान्ति यास्यंतिचापरे।** अनेक जन्मात अनेक आईबाप होतात. जीव जन्माला येतात व मरतात.

प्रेमपाशामुळं भावजीवन निर्माण होतं. त्यासाठीं कोट्यवधि वर्षांची तपश्चर्या हवी.

**सांकुशधरी...** तुझ्या हातात अंकुश आहे. काय उत्कृष्ट वर्णन आहे हें! भगवताच्या गळ्यांत असलेल्या सहा माळा पाहिल्यानंतर जीवनांत क्रांति होईल. त्या माळांचं सतत स्मरण केलं तर जीवन हें नवजीवन होईल.

आई! तुझ्या हातांत जसे पाश आहेत तसा अंकुशही आहे. अंकुश नसता तर हे जीव बेफाम झाले असते. कंस, जरासंध यासारख्या लोकांसाठीं हे अंकुश आहेत. आई खाऊ देते तसे फटकेही मारते.

दुःख आणि असहायता हें भगवंताचे अंकुश आहेत. या गोष्टी सर्व प्राण्यांच्या जीवनांत त्यांना अनुभवायला मिळतात. महापुरुषाना वाटतं कीं, परमेश्वराचं दर्शन होत नाहीं व त्याचं या जगावर प्रेमही नाहीं. ते असहाय होतात. तसंच सत्तर वर्षांपर्यंत मुलासाठीं माणूस सर्व काहीं करतो. मोहपाशामुळं तो धावतच राहातो. त्यासाठीं धर्म, धारणा या सर्वांचाही त्याग करतो. मुलगा व्यवसाय करूं लागतो व म्हणतो म्हाताऱ्याला या बाबतींत काय विचारायचं? 'साठी बुद्धि नाठी' हा शेरा मारून मोकळा होतो हें ऐकून वडिलाना किती दुःख होत असेल? जगावर प्रेम नाहीं व जीवनांत भगवंताला स्थान नाहीं, यामुळं सज्जन असहाय होतात. शेवटीं वृद्धपणीं भगवंताकडे जातात. जीवनांतल्या कटु अनुभवामुळं ही त्यांची वृत्ति होते. अशा लोकांसाठीं असहायतेचा अंकुश आहे. **गतिस्त्वं गतिस्त्वं त्वमेका भवानि।** असं म्हणावं लागतं. यासाठींच दुःख आणि असहायता याचे अंकुश जगदंबेच्या हातात आहेत.

**काशीपुराधीश्वरी...** आई! तुझा काशीपुरांत वास आहे. या विशेषणाचं वर्णन पूर्वीच्या अंकात आलं आहेच.

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

श्लोक १० वा चालू

क्षत्रत्राणकरी महाऽभयकरी माताकृपासागरी
साक्षान्मोक्षकरी सदाशिवकरी विश्वेश्वरी श्रीधरी ॥
दक्षाक्रंदकरी निरामयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षांदेहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥ १० ॥

(या श्लोकावरील प्रवचन प. पू. पांडुरंग वैजनाथ आठवले शास्त्रीजींनी परम पवित्र श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशीं दिलेलें आहे. त्यामुळें त्याचें आगळच वैशिष्ट्य आहे.)

आज महान् दिवस आहे. फार मोठी भिक्षा मागितली तरी ती आज मिळणार आहे. भगवती प्रसन्न झालेली आहे. भगवती कशी आहे! **क्षत्रत्राणकरी** तूं क्षत्रियाना रक्षण देणारी आहेस. **क्षतात् नाम भयात् त्रायते इति क्षत्रिय।** लोकांचें भीतीपासून जे रक्षण करतें त्याला क्षत्र म्हणतात. क्षत्रिय लोकांचें भय निवारण करतात. या क्षत्रियाना ही शक्ति तूं दिली आहेस. म्हणून शंकराचार्य 'माता' हें विशेषण मुद्दाम वापरीत आहेत. शक्ति तर तूं सर्वांनाच दिलेली आहे. पण क्षत्रियाना दिलेल्या या शक्तिमुळें लोक भीतिमुक्त होतात. म्हणून क्षात्र म्हणतात

भारतीय संस्कृतींत असा एक वर्ण आहे कीं जो सत्प्रवृत्तीच्या लोकांना मदत करतो व असत् प्रवृत्तीच्या लोकाना शासन करतो. या वर्णाला क्षत्रिय म्हणतात. ब्राह्मणाचे जितकें महत्त्व तितकेंच याही वर्णाचें महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीनें सत्प्रवृत्तीच्या लोकाचें रक्षण व असत्प्रवृत्तीच्या लोकाना शासन करण्यासाठींच हा वर्ण मुद्दाम निर्माण केलेला आहे. या जगातून क्षत्रिय किंवा क्षात्रवृत्ति गेली तर जग बिघडून जाईल, अव्यवस्था माजेल.

भारतीय संस्कृतींत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र या चार वर्णांचें महत्त्व आहे. परंतु त्यामध्यें क्षत्रिय वंशाचीही अत्यंत आवश्यकता आहे. समाजातली जर क्षात्रवृत्ति गेली तर समाजाचें अधःपतन होतें. भगवंतानें

क्षत्रिय वर्णात अनेक अवतार घेतले आहेत. याचं कारण क्षत्रियांची परंपरा काहीं वेगळीच आहे. या क्षत्रियांना ही जी शक्ति प्राप्त झालेली आहे, ती जगदंबेनं दिलेली आहे व तीच त्याचा सांभाळही करते म्हणून तिला क्षत्र त्राणकरी असं म्हणतात. भगवतीला जगाचं रक्षण करायचं असेल तर तें ती कोणाकरवी तरी करणार. क्षत्रिय सत्तेला अन्याय सहन होत नाहीं. असत् शक्ति पाहिल्यानंतर त्यांना चीड येते. क्षत्रियाची प्राणार्पण करण्याची तयारी असली पाहिजे, ध्येयासाठीं इतर सर्व तुच्छ वाटलं पाहिजे. अशा प्रकारचा वर्ग म्हणजे क्षत्रिय वर्ग. क्षत्रिय नाहींसे झाले तर क्षात्रवृत्तीही जाणार व जग निष्प्राण होणार.

आज त्वेष, आवेश या गोष्टी दिसतच नाहींत. सर्वत्र सामसूम पाहून कोणालाही त्वेष, आवेश चढतच नाहीं. आमचं रक्त सळसळतच नाहीं. सर्वत्र आध्यात्मवादी झालेले आहेत. सर्वांचा भगवंतावर विश्वास आहे कीं, भगवान येऊन हें सर्व करील. दीन, दुबळे, लाचार लोक भगवंताला सांगत आहेत कीं हे भगवंता! तूं केव्हां येणार व हें जग सुधारणार? भगवंताच्या भरवशावर हे लोक खुशाल घोरत पडलेले आहेत. आजच्या इतका आध्यात्मिक विकास (?) किंवा ईश्वरावरील विश्वास कोण्याकाळीं होता कीं नाहीं युगाला माहित!

प्राचीन काळीं लोकांना त्वेष येत असे. ऋषि अग्निपूजा करीत असत.

यत्ते अग्ने तेजस्तेनाहं तेजस्वी भूयासम्।
यत्ते अग्ने वर्चस्तेनाहं वर्चस्वी भूयासम्।

यामुळं ऋषींना त्वेश येत असे. आज दीनता, दुर्बलता याचं साम्राज्य दिसतं. आज खूपच भक्ति वाढली आहे असं दिसतं मग भगवतीची गरजच काय! या सर्वांचा अर्थ असा आहे की भारतीय संस्कृतीतील क्षत्रिय परंपरा नष्ट झालेली आहे.

आज श्रीकृष्ण जन्माष्टमी आहे. म्हणून त्याचं पूजन करायला हवं. श्रीकृष्णाच पूजन म्हणजे क्षत्रियाचं पूजन. क्षत्रियाचं पूजन म्हणजे माळ घालणं नव्हे तर समाजांत क्षत्रियाचं रक्त सतत फिरत राहावं यासाठी

साधना करणं याला खरं क्षत्रियपूजन म्हणतात व हेंच श्रीकृष्णाचं पूजन होय.

माणूस एखादं बंधन बुद्धीनं स्वीकारतो कीं धर्म किंवा नीति यांच्या भीतीनं स्वीकारतो ही वैश्विक समस्या आहे. परंतु आमच्या देशांत हा प्रश्न कधीं नव्हताच. क्षत्रिय परंपरा चालूच होती. याबाबतींत परशुरामाचाही दोष दाखविण्यांत आला आहे.

सत्ता असल्यामुळं क्षत्रिय उन्मत्त होतात. म्हणून त्यांच्यावर नियंत्रण ठेवणं आवश्यक आहे. म्हणून परशुरामानं एकवीसवेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली. या पृथ्वीवर एकही क्षत्रिय राहाता कामा नये. म्हणून क्षत्रिय संहार केला. याचा उलट परिणाम झाला कीं, त्यामुळं राक्षसांची सत्ता वाढली. रामाला अशा प्रकारच्या राक्षसांशी फार मोठा सामना द्यावा लागला. जनस्थान व लंका यामधं ज्याची दृष्टि विकृत झालेली होती असे ९०% लोक होते. त्यामुळं रामाला पुन्हा क्षत्रिय सत्ता उभी करावी लागली.

स्मृतिकारांनीं क्षत्रियांचं खूप कौतुक केलं आहे. त्यांना कांहीं सवलती दिल्या आहेत. त्या सवलती वाचून माणसाला चीड येते याचं कारण मत्सर होय. हातांत प्राण घेऊन उभी राहिलेल्या, स्वतः झीज सोसणाऱ्या व आपलं बलिदानही करायला मागं पुढं न पाहाणाऱ्या क्षत्रिय जातीला सवलती दिल्याच पाहिजेत.

श्रीकृष्ण क्षत्रिय कुळांत जन्माला आलेला होता. त्याचं जीवन यशस्वी होतं. त्यानं क्षत्रियांची संघटना केली. शिस्त रहित असलेल्या क्षत्रियांना शिस्तपूर्ण केलं व त्यांच्यावर स्वतःचं प्रभावी वर्चस्व स्थापन केलं. क्षत्रियांना समर्थ करणं, त्यांना मार्गदर्शन करणं आणि उन्मत्त झालेल्या लोकांना शासन करणं हें त्याचं काम. त्यानं जरासंध, शिशुपाल, कंस व दुर्योधन यांसारख्या उन्मत्त झालेल्या क्षत्रियांना शासन करून त्यांना वठणीवर आणलं.

त्याकाळीं संस्कृति व धर्म उभे व्हावेत यासाठीं एका बाजूला युधिष्ठिर प्रयत्न करीत होता तर दुसरीकडे उन्मत्त झालेले कंस, दुर्योधन, जरासंध आदि संस्कृतीचा विनाश करण्याचा प्रयत्न करीत होते. श्रीकृष्णानं जरासंधाला मारून त्याच्या पाशवी शासनाखालीं असलेल्या ८६ राजांना मुक्त केलं व सर्व

राजे नजराणे घेऊन त्याला नमस्कार करायला आले. हे सर्व राजे श्रीकृष्णाला म्हणाले– "आम्हीं तुला शरण आलों आहोंत तूं जसं सांगशील तसे आम्हीं राहायाला तयार आहोंत." माझ्याकडे येऊं नका असं श्रीकृष्णानं त्यांना सांगितलं नाहीं. युधिष्ठिर संस्कृती समर्थ करण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या मदतीला जा असं श्रीकृष्णानं त्याना सांगितलं. नंतर त्यांनीं सर्व नजराणे श्रीकृष्णाला अर्पण केले व ते सर्व नजराणे श्रीकृष्णानं प्रतीक म्हणून ठेवून घेतले क्षत्रिय सत्ता प्रभावी करणं, त्याची संघटना करण हें त्याचं जीवन कार्य होत.

क्षत्रिय सत्ता जर जगातून नष्ट होत असेल तर केवळ लोणी, साखर खाण्यानं श्रीकृष्णाचं पूजन होणार नाहीं लोणी साखर खाणं हा जन्मोत्सव नव्हे. ज्याचं शाश्वत मूल्यांवर प्रेम आहे, जे शस्त्रानं प्रभावी आहेत. वाणींनं संपन्न आहेत व त्यागानं जे समृद्ध आहेत त्याना क्षत्रिय म्हणतात. हे चार गुण निर्माण करणं म्हणजे श्रीकृष्णाचं पूजन होय. क्षत्रियधर्म समाजांत आणण्यासाठीं जे प्रयत्न तें क्षत्रियपूजन होय. व अशा प्रकारचं क्षत्रियपूजन हें श्रीकृष्णपूजन होय. अशा प्रकारच्या क्षत्रियांनीं नुसता श्वासोच्छ्वास केला तरी परत चैतन्य निर्माण होईल. अशा प्रकारचा विचार असलेल्या माणसांची संघटना व्हायला पाहिजे. यातून काय मिळेल असा क्षत्रिय कधीं हिशोबच करीत नाहींत. ते नेहमी सर्वस्वाचं बलिदान करायला तयार असतात.

प्रभुकार्य व भगवद्भक्ति यांत वैश्यवृत्ति चालत नाहीं. व्यवहारांत ती कदाचित् चालेल परंतु या दोन कार्यांत तर ती मुळींच उपयोगी नाहीं. यामुळें प्रभुकार्य व भगवद्भक्ति यांत दुर्गंधि निर्माण होते. वैश्यवृत्ति वाईट नव्हे परंतु तिलाही मर्यादा आहे. तिनं मर्यादेतच राहिलं पाहिजे.

श्रीकृष्णाचं शाश्वत मूल्यांवर प्रेम होतं. तो शस्त्रानीं समृद्ध व वाणीनें संपन्न होता. जग निर्माण करील अशी वाणी होती. ही वाणी कृष्णभक्त वाचीत नाहींत. श्रीकृष्ण ज्यावेळीं तह करण्यासाठीं गेला त्यावेळीं तिथं त्यानं जें भाषण केलं, त्यावरून त्याच्या वाणीच्या संपन्नतेची कल्पना येते. त्या पद्यमय भाषणाचं गद्यांत रूपांतर करायला हवं., कोणते शब्द कसे व केव्हां वापरायचे यांत श्रीकृष्ण प्रवीण होता. श्रीकृष्ण शब्दाचा

राजा व कृतीचा सम्राट् होता. आम्ही केवळ शब्दांचे राजे आहोंत पण कृतीनं मंद आहोंत. 'ज्ञानं भारः क्रियां विना।' त्यावेळीं दुर्योधन आदींच्या निर्भत्सनेवर श्रीकृष्णानं फार मोठा प्रहार केलेला आहे. शेवटीं धृतराष्ट्र व इतर सर्वांना सांगितलं कीं, भीष्म, द्रोण यांसारखीं प्रभावी, चारित्र्यवान माणसंही क्षुद्र व मोगलंपट व्यक्तीला मदत करीत आहेत. त्यांनाही माणूस व मार्ग ओळखतां आला नाहीं. ही त्यांची दुर्बलता आहे. धृतराष्ट्राला सांगितलं कीं, "तुला एकच गोष्ट सांगतो कीं– तुझी धार्मिक, सांस्कृतिक व कौटुंबिक परंपरा आहे, ती परंपरा जर टिकवणार असशील तर पांडव तुझी सेवा करायला तयार आहेत. त्याना राज्याचा वाटा नको. पण याप्रमाणं जर तूं वागला नाहींस तर तुझा विनाश होईल." हें याचल्यानंतर इतकं स्पष्ट बोलणाऱ्या श्रीकृष्णाच्यासमोर आपलं मस्तक नम्र होतं. श्रीकृष्णानं मोघम भाषा वापरलेली नाहीं. स्पष्ट शब्दांत भविष्यवाणी कथन केली.

वाणीनं संपन्न असलेल्या श्रीकृष्णानं अन्यायाचा पक्ष घेऊन उभे राहिलेल्या लोकांना ढिले केलं, इतकं श्रीकृष्णाच्या वाणींत सामर्थ्य होतं.

क्षत्रियसत्ता नाहींशी झाली कीं, चार गुणांचा विनाश होतो. आजही क्षत्रिय वाणीनं संपन्न आहेत पण ती वाणी दुसऱ्यावर प्रहार करणारी आहे.

क्षत्रियांची वाणी तेजस्वी असायला पाहिजे. श्रीकृष्णाजवळ ओज होतं. श्रीकृष्ण जितका ओजस्वी होता तितका रामही नव्हता. राम व कृष्ण या दोघांचंही शाश्वत मूल्यांवर प्रेम होतं. परंतु रामाजवळ शांतता दिसते व श्रीकृष्णाजवळ ओज दिसतं. श्रीकृष्णाचं बोलणं, चालणं मुडद्यासारखं नव्हतं. श्रीकृष्ण नेहमी धावत धावत चाले व सतत कार्यमग्न असे.

जो धृतिमान व उत्साही असेल तोच कृष्णभगवानाजवळ भिक्षा मागूं शकतो. श्रीकृष्णाजवळ ओज दिसतं. रामाजवळ दिसत नाहीं. याचं एक कारण आहे. उन्मार्गगामी लोकांना ताळ्यावर आणण्याकरितां श्रीकृष्णाचा अवतार होता आणि नष्ट होत चाललेल्या क्षत्रिय संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठीं व शाश्वत मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठीं रामावतार होता. अशा प्रकारचा दोघांमधें मूलभूत फरक दिसतो. राम शाश्वत मूल्यांची जोपासना करतो. त्यानं कुटुंब हें एक (Unit) मानलं होत. श्रीकृष्णानं क्षत्रियांची संघटना करण्यांत आपलं

जीवन व्यतीत केलं. सत् प्रवृत्तीच्या लोकांना एकत्र केलं व असत् प्रवृत्तीच्या लोकांना कंठस्नान घातलं. बिघडलेल्या क्षत्रियांना वठणीवर आणण्यासाठीं, क्षत्रयपरंपरा टिकविण्यासाठीं, त्यांची संघटना करण्यासाठीं व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठीं श्रीकृष्णाचा जन्म होता.

क्षात्र संघटन करून त्यानं साऱ्या पृथ्वीचं मंथन केलं व त्यांतून जें सार निघालं त्यानं क्षत्रियांचं प्रतिपालन केलं.

श्रीकृष्णाच्या जन्मदिवशीं जगांत त्वेष, आवेश नसेल, रक्त सळसळत नसेल किंवा चीड येत नसेल तर लोणी व साखर खाऊन श्रीकृष्णाचा जन्म दिवस साजरा करण्यांत अर्थ नाहीं. त्या दिवशीं भजन करतों, जागतों, चहा कॉफी पितों व हें सारं असलं तर आपण जन्मोत्सवासाठीं जमतों. लोणी साखर खाऊन फुलं अर्पण करीत असूं तर तीं फुलं नव्हत ते दगड आहेत. हें श्रीकृष्ण पूजनच नव्हे. क्षत्रिय परंपरा उभी करणं हा खरा श्रीकृष्ण पूजनाचा अर्थ आहे. आज कुठंही पाहा. सगळीकडे सामसूम. आवेश नाहीं, त्वेष नाहीं. बाप म्हणतो कीं, भगवान जेव्हां सद्‌बुद्धि देईल तेव्हां मुलगा सुधारेल. मुलगा दिवसें दिवस बिघडत चालला आहे याची बापाला चीडच येत नाहीं. पत्नीचे क्षुद्र विचार ऐकून पतीला वाईट वाटतच नाहीं. लहान भाऊ असन्मार्गानं जात आहे हें पाहून मोठ्या भावाला चीड येतच नाहीं. सर्वच तत्त्वज्ञानी झाले आहेत. आज आध्यात्मिकता इतकी वाढली आहे कीं, ती थोडी कमी होऊं दे असं मागण्याचा आजचा दिवस आहे. वैभव व क्षुद्र स्वार्थासाठीं चीड न येऊं दे पण भाऊ, मुलगा बिघडत चालले आहेत यांच्याविषयीं चीड नको का यायला?

क्षुद्र विचार असलेल्या पत्नीला पाहून पतीला चीड नाहींना येत? आज ज्या पद्धतीनं आपण श्रीकृष्णपूजन करतों. त्यापद्धतीनं तें करणं केव्हांही श्रेयस्कर नव्हे. ही क्षत्रिय परंपरा आहे. आपण समजावून घेतली पाहिजे. ६ लोक मरायला तयार झालेले होते. आणि आज आम्हीं कृष्णभक्त खरे पण स्वतःला तोशिस न लागेल तर बरी असं म्हणणारे आपण सर्व माशांपंडित आहोंत, म्हणून म्हणतों कीं- "भगवंता! एक दिवस येऊन हें सारं जग सुधार."

सर्वेऽत्र सुखिनः सतु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःख माप्नुयात् ॥

आज यज्ञ, सत्कार्य वगैरे सर्व गोष्टी भाषेतच राहिलेल्या आहेत. गीतेतल्या चौथ्या अध्यायाच्या बत्तीसाव्या श्लोकात अशाची टर उडविलेली आहे.

श्रीकृष्णाचं पूजन करायचं असेल तर क्षात्रधर्म पुन्हा पुनरुज्जीवित केला पाहिजे. आज आनंदानं वेहोष होण्याचा दिवस आहे. या दिवशीं केवळ उपवास करून किंवा खिचडी खाऊन पुण्य मिळणार नाहीं भावनेचं कौतुक करायला हवं. नाहीं तर श्रीकृष्ण जन्मोत्सव कसला ! क्षात्रवृत्ति निर्माण करण्यासाठीं तन-मन-धनानं तयारी असली पाहिजे. चार गुणानीं युक्त असलेल्या क्षत्रियाना पुन्हा उज्जीवित करणं हेंच खरं कृष्ण पूजन होय.

राम व कृष्ण हे त्यागाचे आदर्श आहेत. श्रीकृष्णानं जरासंधाचं राज्य घेतलं नाहीं. त्याच्या मुलाला तें दिलं व सांगितलं कीं, युधिष्ठिर जसं सांगेल तसं कर. त्याला मारलं नाहीं; तसंच त्याचं राज्यही घेतलं नाहीं. कृष्णासमोर खरोखर उभं राहण्याएवढीही आपली योग्यता नाहीं. आपण भगवंतासाठीं कोणता त्याग करायला तयार आहोंत ! भागवतात एक रोकठोक प्रश्न त्यानं विचारला आहे कीं 'मदर्थेऽर्थे परित्यागः भोगस्यच सुखस्यच । माझ्यासाठीं भोगाचा आणि सुखाचा त्याग करण्याची तयारी आहे का ' आपण ज्यावेळीं दुबळे विचार प्रदर्शित करतों त्यावेळीं त्याला चीड येत नसेल का !

क्षत्रियाचं रक्त सतत समाजात फिरत राहावं यासाठीं समाजानं सतत प्रयत्न करायला हवा. ही जबाबदारी आपण दुसऱ्यावर टाकता कामा नये. समाजांत चैतन्य का दिसत नाहीं ? त्यासाठीं काय करायला हवं ? हा विचार करणं म्हणजे खरं कृष्ण पूजन होय. खरोखर क्षत्रियाचं प्रतिपालन करून पापानी वृत्तीच्या क्षत्रियाचा संहार केला. अशा प्रकारची महान् कार्यं त्यानं केलेलीं आहेत. म्हणून त्याचं चरित्र महान् आहे.

जगदंबेचं वर्णन करतांना तिला क्षत्रत्राणकरी असं म्हटलेलं आहे व तें अगदीं सार्थ आहे.

माणसाचे ठिकाणीं त्यागाचा आदर्श निर्माण व्हायला पाहिजे. पौगंडावस्थेत कंसाचं साम्राज्य पायाशीं आलं असताना एखादी गोष्ट आपण जशी झटकून टाकतो तसा त्याचा त्याग केला. चौदाव्या वर्षापासून अखेरपर्यंतच कृष्णाचं जीवन म्हणजे त्यागमय जीवन होय. **यत्रयोगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।** पाडवाना समर्थ बनविलं. पाडवाना वेगवेगळ्यारूपानं शक्ति, बुद्धि व वित्त दिलं. हें एक राजकीय लग्न होय. **(Political Marriage)** गात श्रीकृष्णाचं फार मोठं कारस्थान होतं. अर्जुनाला त्रिदंडी संन्यास दिला, यादवाचा प्रतिपाळ केला व अर्जुनाला बहिण देऊन अगणित संपत्ति दिली. तन, मन व धन या सर्वांनिशीं तो पाडवाच्या पाठीमागं उभा राहिला. त्याला स्वतःला यापैकीं कशाचीही गरज नव्हती. तो खरा क्षत्रिय होता. युधिष्ठिर सागेल तस वाग, माझ्याकडे येऊं नकोस असं स्पष्ट भाषेत सागणारा श्रीकृष्ण होता.

युधिष्ठिर शात स्वभावाचा व ˙ कृति व ईश्वरी परपरा याच्यासाठीं मनापासून प्रयत्न करणारा होता. तो भगवद्भक्तीसाठीं व संस्कृतीसाठीं सर्वस्वाचा होम करायला तयार झालेला होता. शक्ति, शौर्य इत्यादि गुणसागर जवळ असतानाही ८६ राजाना युधिष्ठिर सागेल तसं वागा अस सागणाऱ्या श्रीकृष्णाच्या चरित्राचा जितका विचार करूं तितका तो थोडाच होणार आहे. श्रीकृष्णाला राजकारणी म्हणावं कीं तत्त्वज्ञानी म्हणावं हा मोठा प्रश्न आहे. हें सर्व कार्य म्हणजे भक्ति आहे अस श्रीकृष्ण मानीत होता. अर्जुनाला त्यानं मित्र मानलं होतं. म्हणूनच तो म्हणतो- **पाडवाना धनंजय** । ही एक प्रकाराची भक्तीच आहे अस वाटतं.

सोळा वर्षापासून सत्तर वर्षापर्यंत माणसाला जीवनात जर स्फूर्ति मिळत नसेल तर श्रीकृष्णाचं पूजन व्यर्थ होय कृष्णाचा जन्मोत्सव तर करतो मग स्फूर्ति कां नाहीं? श्रीकृष्ण पूजनानं उत्साह, स्फूर्ति व चैतन्य जर मिळत नसेल तर पूजन करून काय उपयोग? स्फूर्ति, उत्साह जर मिळत नसतील तर देण्याची कृष्णाची ताकत नसेल किंवा उत्सवात काहीं तरी उणीव असेल कृष्णाचे ठिकाणीं ताकत नसेल तर उत्सव करूं नका व उत्सवात दोष असेल तर आत्मनिरीक्षण करा.

श्रीकृष्णांत ताकत नसेल तर गेलीं ५००० वर्षे हा उत्सव कां बरं होतो आहे? श्रीकृष्णजीवन स्फूर्ति व चैतन्य यांनीं भरलेलें आहे. तें झोपलेल्याला जागृत करील, जागणाऱ्याला उठून बसवील, बसलेल्याला उभा करील. उभा असलेल्याला चालायला लावील, व चालणाऱ्याला धावायला लावील. व तें लावल तरच त्या पूजेची सफलता आहे.

वस्तुतः आजच्यासारख्या पवित्र दिवशीं अमंगल बोलणं बरं नव्हे. पण तें बोलणं भाग आहे. प्रत्येकाच्या पूजेंत फरक आहे. अग्नि, पुत्र आणि गुरु याच्या पूजेंत भेद आहे. सूर्याच्या पूजेची पद्धत वेगळी. त्याच्याजवळ जाऊन त्याला फुलं अर्पण करता येणार नाहींत. तसंच श्रीकृष्णाच्या पूजनाची पद्धत वेगळी. लोणी, साखर खाऊन तें पूजन होणार नाहीं. श्रीकृष्णाचं पूजन करतांना चैतन्य व स्फूर्ति याची प्राप्ति झाली पाहिजे. जगदंबेजवळ हीच भिक्षा मागायला हवी. ती भिक्षा जर मिळत असेल तरच हा जन्मोत्सव सफल झाला असं म्हणतां येईल.

प्रत्येक व्यक्तींत ब्राह्मण गुण, क्षत्रिय गुण, वैश्य गुण व शूद्र गुण यायला पाहिजेत. हे गुण जागृत व्हायला पाहिजेत. श्रीमदाद्य शंकराचार्यांनीं प्रेम व ज्ञान यांची भिक्षा मागितली. पण आज आपण स्फूर्ति व चैतन्य याची भिक्षा मागायला हवी. भगवंताचा हात नेहमीच सुटा असतो पण आज विशेष सुटा आहे. प्रभो! आमच्या चेहेऱ्यावर चैतन्य व स्फूर्ति याचं तेज दिसेल अशी भिक्षा आम्हाला दे.

आजच्या जन्म दिवशीं प्रसाद मिळणारच. लोक हात पुढं करून प्रसाद मागतात. परंतु जिथं प्रतिष्ठित लोक असतील तिथं त्याना प्रसाद द्यायला भगवंताला जावं लागतं. ते झोपले असले तरी भगवान् त्याच्यासाठीं प्रसाद राखून ठेवील परंतु इतराना प्रसाद मागावाच लागणार. चैतन्य व स्फूर्ति मिळाली तर उत्साह वाटेल व त्यामुळं मन अतिशय आनंदित होईल.

आज आपल्याला भगवान चैतन्य व स्फूर्ति याचा प्रसाद देणार आहे म्हणून आपण अतिशय आनंदित आहोत.

卐

# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

श्लोक १० वा चालू

क्षत्रत्राणकरी महाऽभयकरी माताकृपासागरी
साक्षान्मोक्षकरी सदाशिवकरी विश्वेश्वरी श्रीधरी।
दक्षाक्रंद करी निरामयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षांदेहि कृपावलंबनकरी माताऽन्नपूर्णेश्वरी ॥१०॥

**क्षत्रत्राणकरी...** आई! तूं क्षत्रियांना रक्षण देणारी आहेस. तू क्षत्रियांना शक्ति दिलेली आहेस म्हणूनच त्यांच्यामधें स्वार्थत्यागाची वृत्ति दृष्टोत्पत्तीला येते. शक्ति सर्वांचे ठिकाणीं असते पण तिचा उपयोग स्वतःच्या संसारासाठीं केला जातो.

प्रश्न असा निर्माण होतो कीं, या सृष्टींत माणसानें दुसऱ्यासाठीं त्याग करावाच कां? माणसाचें केवळ भौतिक जीवनच असेल तर त्यामधें ही गोष्ट शक्य नाहीं. मी दुसऱ्यासाठीं स्वार्थत्याग केला पाहिजे ही वृत्ति सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाशिवाय येणें शक्य नाहीं.

इतर सर्व व्यक्ति संसार करीत आहेत, शेती व इतर व्यवसायही करीत आहेत मग आम्हींच कां मरायचें; विचार जर क्षत्रियांत असते तर हा समाज टिकला नसता. दुसऱ्यासाठीं झिजण्याची अजूनही थोडीशी वृत्ति समाजात दिसते म्हणूनच हें जग चांगल्या तऱ्हेनें चालू आहे. मी कां झिजावें! ही वृत्तींतली क्षुद्रता आहे.

हे आई! तूं क्षत्रियाना दिलेली शक्ति आहेस. व ती अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. ही क्षत्रियाची वृत्ति टिकावी अशी श्रीशंकराचार्यांची इच्छा आहे. म्हणून ते म्हणतात- क्षत्रत्राणकरी...

**महाऽभयकरी....** आई! तूं मोठें अभय देणारी आहेस. महान अभय देणारी याचा अर्थ तूं लोकांना दुःखांतून मुक्त करणारी आहेस. इथें दुःख शब्दाचा अर्थ गरीबीचें, इतर व्यवहारांतली सामान्य दुःखं वगैरे दुःखं असा नाहीं. इथें महाऽभय शब्द वापरलेला आहे. महादुःख म्हणजे मरणाचें दुःख

होय. भक्त म्हणतो- आई! मी तुझ्यापासून अलग झालों आहें. हा जीव तुझ्यापासून अलग झाला आहे. या जीवाला तुझ्यापासून वेगळंच रहावं लागत आहे असं नव्हे तर तो पाण्यापासून बाहेर काढलेल्या मासळीप्रमाणं तडफडत आहे. आई दिसत नाहीं व आईचं स्थान माहित नाहीं मग तिला पत्र तरी कसं लिहिणार? तसंच तुझं पत्र आलं तर तें मला वाचतां येत नाहीं. आई! नेहमीं मला तुझीं पत्रं येतात पण तीं वाचण्याची माझ्याठिकाणीं युक्त नाहीं.

हा विश्वंभर प्रभु पुष्कळ पत्रं पाठवितो पण तीं आपल्याला वाचतां येत नाहींत. सकाळच्या वेळीं अरुणोदयापासून सूर्यास्तापर्यंत रोज पोस्टमन येत असतो. पण त्यानं आणलेलीं पत्रं वाचतांच येत नाहींत. म्हणून हा जीव दुःखी होतो. हें सर्वांत मोठं दुःख आहे. आई! या दुःखातून तूंच मुक्त करणारी आहेस. तुझ्याशिवाय या दुःखांत अभय कोण देणार?

असं जरी असलं तरी हें दुःख मोठं आहे असं म्हणतां येणार नाहीं. वास्तविक वियोगाची आवश्यकता आहे. विरहांत आतुरता व आसक्ति हे दोन गुण पुष्ट होतात. म्हणून विरह हें मोठं दुःख म्हणतां येणार नाहीं.

आई! तुझ्यापासून मी वेगळा झालों हे महादुःख नव्हे तर तुझं विस्मरण हें महा दुःख आहे. संसारांत इतकीं खेळणीं तूं ठेवलेलीं आहेस त्यामुळं तुझं विस्मरण होईल कीं काय असं वाटतं व हें महादुःख आहे. खेळण्याशीं दंग झाल्यामुळं तुझीं पत्रं वाचतां येत नाहींत व तुला लिहितां येत नाहींत. तूं प्रत्यक्ष न येतां खेळणीं पाठवितेस म्हणून तुझं विस्मरण होतं व हें महा दुःख आहे.

प्रातःस्मरणीय कुन्तीमातेनं तुझं विस्मरण न व्हावं असा वर मागितलेला आहे. म्हणून विस्मरण हें महा दुःख आहे.

विपदः सन्तु नः शश्वत् यत्रतत्र जगद्गुरो।
विपद् विस्मरणं विष्णोः संपन्नारायणः स्मृतिः॥

तुझं विस्मरण होत आहे असं वाटलं कीं, तूं आम्हांला जागृत करतेस. कधीं कधीं पुत्राचा मृत्यु येतो, धंदांत खोट येते ही परमेश्वरानं आम्हांला दिलेली समज आहे. कारण दुःख येतं त्यावेळीं भगवंताचं स्मरण होतं.

परमेश्वरानें मुलगा दिला कीं, त्याच्याशींच आपण रममाण होतों व परमेश्वराला विसरतों. पुत्राला मृत्यु येतो त्यावेळीं भगवान म्हणतो, अरे बाबा! सारं जीवन मुलासाठींच खर्च करतोस व माझं स्मरण करायला तुला वेळच नाहीं. आता तरी इकडे वळ. प्रभूचं स्मरण व्हावं यासाठीं संसारात अशा प्रकारचीं दुःखं प्राप्त होत असतात. आई! तूं महाऽभयकरी आहेस.

आई! तुझं विस्मरण हें महा दुःख आहे. तुझं दर्शन होत नाही हें ठीक परंतु तुझं स्मरण होत नाहीं हे महा दुःख आहे. कोणतंही सुख मिळाल्यावर प्रभूची आठवण व्हायला हवी. हें मिळालेलं सुख माझ्या प्रभूनं माझ्यासाठीं पाठविलं आहे अशी आठवण यायला हवी. ती आठवण येत नाहीं म्हणून आपण मोहात बुडालेले असतों. आपल्याला कैफ चढतो व आपण उन्मत्त होतो. सुख मिळाल्याबरोबर आईचं स्मरण झालं तर कैफ व उन्मत्तपणा येणार नाहीं. ज्यानं जीवनांतला हा प्रथम क्षण जिंकला त्याचं जीवन सार्थ झालं. जनकराजाला वैभव मिळालं त्यावेळीं हें सारं वैभव जगदंबेनं माझ्यासाठीं पाठविलेलं आहे असं त्याला वाटलं. त्यामुळं एवढं वैभव मिळूनही त्यांच्या वृत्तींत बदल झाला नाहीं.

आई! तुझ्या केवळ दर्शनानंच मी निर्भय होतों असं नव्हे तर तुझ्या स्मरणानंही मला अभय मिळतं. तुझ्या स्मरणांत निर्भयता प्राप्त करून देण्याची महान शक्ति आहे.

**माताकृपासागरी** - आई! तूं कृपासागरी आहेस. तूं आई आहेस म्हणूनच कृपा करतेस. तूं माझ्यावर दया करतेस याचं मला मुळींच वाईट वाटत नाहीं. वैदिक संस्कृतींत दया शब्दाला स्थानच नाहीं. ख्रिश्चन धर्माच्या संसर्गानें हा दया शब्द आलेला आहे दया शब्द हा खालच्या दर्जाचा निकृष्ट शब्द वाटतो. उपनिषदातही दयेची कल्पना नाहीं. दयाळू भगवान दयादृष्टि ठेवतो हें म्हणणं ठीक आहे पण वडील मुलावर दया करतात हें म्हणणं संयुक्तिक वाटत नाहीं. वैदिक वाङ्मयाची उपासना खंडित झाली व पौराणिक वाङ्मयाचं महत्व जेव्हापासून वाढलं तेव्हापासून दयेला थोडंबहुत महत्व प्राप्त झालं आहे. ख्रिश्चन धर्मात दयेला फार मोठं महत्व दिलेलं आहे. रडत असलेल्या काहीं आळशी लोकांवर भगवान दया करतो हें म्हणणं ठीक

आहे. परंतु कर्मयोगी कधींही दयेची भीक मागणार नाहीं. कर्मयोग्यांवर भगवान कृपा करतो. कर्मयोगी नेहमीं प्रभूचं काम करीत असतात. ते कधींही रडत बसत नाहींत. त्यांच्या प्रत्येक क्रियेच्यामागं एकच प्रेरणा असते व ती म्हणजे यायोगं प्रभुचं कार्य अतिशय चांगल्या तऱ्हेनं व्हावं. त्यांच्या मनांत दुसरा विचार नसतो. दुसरी कल्पना नसते. घरांत खोलींत मुलगा अभ्यास करीत बसलेला आहे व आई घरांत स्वयंपाक करीत आहे. तीन तास झाले तरी मुलगा उठत नाहीं हें पाहून आई येते व जेवायला घेऊन जाते, त्याच्या अभ्यासांत त्याला मदत करते. या मदतीला आईची कृपा म्हणतात. यांत दया नाहीं. यांत प्रीतीचा प्रवाह आहे.

कर्मयोग्याला पाहिल्यानंतर अशाच प्रकारचा प्रेम-प्रवाह प्रभूच्या अंतःकरणांत निर्माण होतो व तो त्याला मदत करायला धावून येतो. परमेश्वराचं हृदय द्रवित होतं.

माया, ममता या कृपेच्या वरच्या पायऱ्या आहेत. जे लोक स्वतःच्या जीवनाचं सर्वस्व असलेलीं जीं कर्मे प्रभूला अर्पण करतात त्यांच्यावर प्रभूची माया-ममता असते. या सृष्टींतलं आपलं येणंही कर्मामुळंच असतं. कर्मामुळंच आपल्याला सुख-दुःखं प्राप्त होतात. जातांनाही हेंच कर्माचं गाठोडं घेऊन जायचं असतं. ज्यांनीं अशा प्रकारच्या कर्माचं सार परमेश्वरचरणीं वाहिलं त्याच्याशीं भगवान हसतो, खेळतो व रडतोही.

जगताला हृदय जाणतां येत नाहीं. त्याला रोचक तेवढं ऐकायला आवडतं. ज्यांच्यावर भगवंताची ममता असते, त्यांचं ऐकायला कोणी येणारही नाहीं व एखादे वेळेस आला तर ऐकणारही नाहीं. नामदेवाचं कीर्तन ऐकायला लोकांना नको होतं. त्यामुळं त्यानं त्रागा केला. कोणीही ऐकायला येत नाहीं म्हणून हे प्रभो! मी कीर्तनच करणार नाहीं असं नामदेव म्हणाले. भगवान म्हणाले. "कोणी नसेल तर मी तरी आहे ना? मी तुझं कीर्तन ऐकेन. मी तुझ्या कीर्तनांत नाचेन." खरोखर परमेश्वरानं हें नुसतं आश्वासन दिलं नव्हतं तर प्रत्यक्ष कृतीही केली होती.

भगवंतानीं हेंच सांगितलं आहे. सर्व संकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते त्यानं इच्छाही आपली नाहीं असं म्हणून इच्छाही,

परमेश्वराला अर्पण केली त्याच्या इच्छेप्रमाणेंच भगवान वागतो. (Thy will shall be done) अशा प्रकारच्या लोकांना भगवान आपल्या मांडीवर बसवितो.

आपण भक्तांचे प्रकार केले आहेत. हे प्रकार शास्त्रीय नव्हत. केवळ व्यवहारासाठीं आहेत. (१) दयाभक्त (२) कृपाभक्त (३) मायाममताभक्त (४) आत्मीयभक्त. पहिल्या प्रकारचे जे भक्त असतात त्यांना निर्विकल्प, निरंजन भगवंताला प्रसन्न करण्यासाठीं, दगडाला पाझर फोडण्यासाठीं जेवढी मेहनत करवी लागेल तेवढी करावी लागते. भगवंताच्या हृदयांत दया उत्पन्न करण ही गोष्ट किती कठीण असेल! अशा प्रकारच्या आर्त भक्तांचे अतिशय प्रयत्न असतील तरच भगवंताच्या मनांत दया उत्पन्न होईल. दयाभक्ति हा भक्तीचा कनिष्ट प्रकार आहे. अशा प्रकारच्या भक्ताचे ठिकाणीं तेजस्विता दिसत नाहीं एखादा मुलगा परीक्षेला बसतो व नापास होण्याची त्याला भीति वाटते तेव्हां तो गुरुजींकडे जातो, त्यांच्या पाया पडतो व आईवडील मारतील असेंही सांगतो. शेवटीं गुरुजी अधिक (Grace) गुण देऊन पास करतात. अशा प्रकारचें दयाभक्तांचें रुदन असतें.

कृपाभक्त कधींही शक्ति व फळ यांचा विचार करीत नाहीं. तो स्वतः-च्याच कार्यांत मग्न असतो. कोपऱ्यांत बसून, खाण्यापिण्याची पर्वा न करणाऱ्या व अभ्यासांत मग्न असणाऱ्या विद्यार्थ्यासारखा तो असतो. अशा प्रकारच्या भक्ताला पाहून परमेश्वराला प्रेमाचें भरतें येतें. व तो त्वरित येऊन मदत करतो. कृपेची याचना करायची नसते. ती समोर धावत येत असते. अशा प्रकारचे भक्त कर्माचें नवनीत परमेश्वराला अर्पण करतात. आपण परमेश्वरा-जवळ प्रसाद मागतों पण हे तर परमेश्वरालाच अर्पण करतात.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्।
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥

हे भक्त परमेश्वराशीं माया-ममतेचा संबंध जोडतात. भक्ताला कोणी मारलं तर भगवंताच्या पाठीवर वळ उठतात. अशी स्थिति होते. परंतु ज्या भक्तांनीं कर्मसंकल्पही भगवंतावरच सोपविले अशा भक्तांशीं ईश्वराचे आत्मीय संबंध असतात.

दयाभक्ताला मागावं लागतं तर कृपाभक्तांला ईश्वर धावत येऊन मदत करतो.

! आपण आपल्यावर ईश्वराची कृपा आहे असं म्हणतों. पण ईश्वर कृपा होणं ही सहज गोष्ट नाहीं. कर्मयोग्यावर भगवान कृपा करतो निष्कामकर्मयोग्याविषयीं भगवंताला ममता वाटते. व सर्व संकल्प अर्पण करण्याविषयीं प्रभु आत्मीय भावानं पाहातो. अशा प्रकारचे भक्त महान होत.

**माताकृपासागरी...** आई धावत येते मुलाला एखादी गोष्ट जमत नसेल तर आई त्याला मदत करते. यालाच कृपा संबंध म्हणतात भगवंताची कृपा होणं ही वेगळीच गोष्ट आहे

दयेंत भगवान जें देतो तें घ्यायच असतं व कृपेंत जें मागतों तें मिळत असत

प्रभो! मी कर्म करतों पण तूं तर दिसत नाहींस. मग हीं कर्म तुला कशीं अर्पण करू? तुला कर्म मी अर्पण करूं शकत नाहीं म्हणून हीं कर्म माझ्याच नावावर चढतात व फळ मला बंधनकारक होतात. प्रभो! मीं कर्म मंद भावनामंद आहें. तुझ्या कृपेनच या गोष्टी जाणार आहे.

आपण सर्व मंद साधक आहोंत. सकाळीं सात वाजता धावत धावत येतों. परतु भगवंताविषयीं प्रेम, ममता, माया या सर्व गोष्टी मंद आहेत कर्म होत नाहीं याचं कारण बुद्धिमदता व भावमंदता होय

भावनेची ज्योत मंद असली तर ती छोट्याशा वाऱ्यानं विझते. परतु मोठी वात वाऱ्याला दाद देत नाहीं. आमच्या भावनेची ज्योत अगदींच मंद आहे. श्रावणात भाव निमाण होतो पण वर्षभरही टिकत नाहीं हा आमच्यातला महान दोष आहे

आइ! तुझी ज्याच्यावर कृपा होते तो भावमंद राहूच शकत नाही. आकाश फाटलं व कोसळलं तरी तो कर्मत्याग करीत नाहीं. असे लोक बुद्धिमद नसतात. ब्रह्मांडाचाही भेद करणारी त्याची बुद्धि असते ते भावमंद होत नाहींत, याच कारण तुझी कृपा होय

आपलं सर्व काहीं विपरीत आहे लहानपणीं आईविषयीं आपल्या मनात खूप भाव असतो. पण जसजसा बुद्धीचा विकास होतो तसतशी भावमंदता येते.

बुद्धि प्रखर झाली तर भावनेचं पुष्प कोमेजतं. प्रभावी बुद्धि असूनही ज्यांच्याजवळ लोकोत्तर भाव असतो ते महापुरुष असतात. पण आई! तुझी कृपा असेल तरच हें सारं शक्य आहे.

**माताकृपासागरी....** याचा अर्थ केवळ धंद्यांतली बरकत असा नव्हे. या तुझ्या कृपेमुळं भावमंदता नष्ट होते असा अर्थ आहे.

वाल्मीकींच्याजवळ असलेला भाव कोठेंही पहायला मिळत नाहीं. त्यांच्या रामायणांतल्या प्रत्येक पंक्तींत भाव भरलेला आहे. बुद्धि तर आहेच पण वाक्यावाक्यांत भाव दिसतो. याज्ञवल्क्यांच्या ठिकाणीं भाव, बुद्धि व कर्म यांचा त्रिवेणीसंगम दिसतो.

**साक्षान्मोक्षकरी....** तूं मोक्ष देणारी आहेस. भगवंताची मनापासून भक्ति केली तर रोगमुक्ति, भयमुक्ति व विकारमुक्ति मिळते. या सर्व प्रकारच्या मुक्ति याच देहांत मिळतात. म्हणून साक्षात् मोक्ष देणारी आहेस. असं तुझं वर्णन केलेलं आहे तुझ्या कृपेमुळंच मोक्ष मिळतो. ही वस्तुस्थिति आहे.

**आनंदंब्रह्मणोविद्वान् न बिभेति कदाचन।** त्याला विकारांचा स्पर्श होत नाहीं. भयमुक्ति प्राप्त होते. भक्तीचं फळ मेल्यानंतर मिळनं असा याचा अर्थ नाहीं तर तें याच देहीं याच डोळ्यं मिळतं. मेल्यानतर जें फळ मिळायचं असेल तें मिळेल. परंतु हें फळ याच देहांत मिळतं.

जीवनांत भक्तीचा अविष्कार झाल्यावर जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोण बदलतो. दृष्टि बदलली तर वृत्ति बदलते व वृत्ति बदलली तर जीवन बदलतं. त्याच जीवन अतिशय सुंदर होतं. भक्तीच फळ याच जन्मांत, त्याचा आनंद याच देहीं उपभोगायला मिळतो.

**मी गातों, नाचतों आनंदें......** तो आनंदी असतो. जग मला खुशाल वेडा म्हणो, अयशस्वी म्हणो परंतु मी सुखी व आनंदी आहें. सॉक्रेटिसाचं जीवन लोकानीं अयशस्वी ठरविलं आहे परंतु त्यानं मात्र त्या अपयशांतही आनंद मानलेला होता.

आई! तुझ्याविषयीं असलेला भुक्तीचा भाव जसजसा वाढतो तसतसा मला मुक्तीचा अनुभव येतो. भीति व विकार नष्ट होतात.

या सर्व गोष्टी लाभित होतात. म्हणून तूं साक्षान्मोक्षकरी... आहेस

आई! तूं सगशिवकरी... आहेस. याचा अर्थ तूं सुखदुःखांत कल्याण करणारी आहेस. आई! तूं सुखात तसं दुःखांतही माझं कल्याण करतेस. आईचं जेवायला वाढण्यात व लंघन करायला लावण्यातही प्रेम आहे. पण मिष्टान्न खायला देणारी आई प्रिय वाटते. परंतु लंघन करायला लावणारी आई निष्ठुर नाही, कारण लंघन करायला लावण्यांत मुलगा आजारी पडूं नये ही हिताची भावना असते.

विश्वेश्वरी... आई! या जगात तूं ऐश्वर्य निर्माण करणारी आहेस. विविधता हेंच एक मोठं ऐश्वर्य होय.

सृष्टि हा भगवंताचा एक कारखाना आहे. एका कारखान्यांतून निघालेला माल एकसारखा दिसतो व असतो. परंतु हा कारखाना कांहीं वेगळ्याच आहे. एकासारखा दुसऱ्याचा चेहरा नसतो. हें प्रभूचं ऐश्वर्य होय. मोटारीचं नवं मॉडेल आलं कीं, आपल्याला तात्काळच त्यांतील फरक कळतो. परंतु अनेक वस्तु भगवंताच्या कारखान्यांत निर्माण होतात व त्यांपैकीं प्रत्येकाचं वैशिष्ट्य असतं. नाकाच्या ठिकाणीं नाक असूनही प्रत्येक नाक वेगवेगळ्या प्रकारचं असतं, हजार माणसं घेतलीं तरी एक माणूस दुसऱ्या माणसासारखा नसतो. अशा प्रकारं भगवंताच्या विविधतेंत कमालीचं ऐश्वर्य आहे.

हजार कुत्र्याच्या वेगवेगळ्या जिल्ह्या मिळतात हें वाचून आश्चर्य वाटतं पण हजार चेहेऱ्यापैकीं एकही चेहरा सारखा नसतो ही गोष्ट आश्चर्य-कारक नाहीं. का? माळमसाला एकच असताना काय ही विविधता! याचंच नाव एकतेंत विविधता. हा वस्तुनिष्ठ फरक नव्हे. नाक, डोळे हीं इंद्रिय समानाच सारखीं असतात. इंद्रियाणि दशैकंच. साधनं तींच पण या एकतेंत विविधता आढळते. साधन कमी करून निर्माण केलेली ही विविधता नव्हे.

भगवंतानं ही विविधता निर्माण केली खरी परंतु या प्राण्यामधं एक प्रकारचं आकर्षण निर्माण केलं आहे.

या जगात कोणालाही वेळ व्यर्थ घालवायला सवड नाहीं. सवच

ठिकाणीं गतिशीलता दिसते. शरीरांतले परमाणु मिनिटामिनिटाला बदलत असतात. त्यामुळेंच आपण तीन वर्षांचे असलेले तीस वर्षांचे होतों. ही गतिशीलता आहे. त्यामुळं सृष्टींत ऐश्वर्य आहे.

सृष्टि सतत बदलत असते. पण हा बदल आपल्याला जाणवत नाहीं हीच सृष्टीची विविधता होय.

एकतेत त्रिविधता, गतिशीलता व तिसरी गोष्ट अनिश्चितता असं सृष्टीच विविध ऐश्वर्य आहे. अनित्यता हें सर्वश्रेष्ठ ऐश्वर्य आहे. कारण हे सर्व अनित्य आहे म्हणूनच आपण प्रेम करतों. शरीर अनित्य आहे हे कळत असतानाही त्यावर प्रेम करतों. शरीर नित्य आहे असं कळलं तर शरीराविषयीं आसक्ति राहाणार नाहीं. मुलाला साधा ताप आला तरी आपण घाबरतों कारण हे शरीर अनित्य आहे व त्यामुळं जीवनात एक वेगळाच आनंद निर्माण झाला आहे.

अनित्यता व मृत्यु हें सृष्टीचं वैभव आहे. श्रावण महिन्यातलं सृष्टीचं वैभव भाद्रपद महिन्यात नसतं. अनित्यपणामुळेंच श्रावण महिन्याचं महत्व टिकून आहे. एखादी गोष्ट सतत झाली तर त्याचा माणसाला कंटाळा येतो. या सृष्टींत आपणा सर्वांची किंमत या अनित्यतेमुळंच आहे. या अनित्यतेमुळं प्राचीन ऋषींना मृत्युमुळ जीवनात संगीत भरलं आहे असं वाटे. व ही गोष्ट अगदीं सत्य आहे या त्रिविध ऐश्वर्यामुळच शंकराचार्य म्हणतात कीं, आई! तूं **विश्वेश्वरी** आहेस तूं विश्वाला ऐश्वर्य देणारी आहेस.

**श्रीधरी** श्री म्हणजे शोभा. सौंदर्य, आनंद याची शोभा. आई! तूं सौंदर्य व आनंद याची देवता आहेस यात माधुर्य व खारटपणाही आहे. हे प्रभो! तुझ्या वैभवाचं मी स्वागत करतों. तूं सौंदर्याचा स्वामी आहेस.

प्रभो! लोक तुझ्या प्रकाशाचा नगारा वाजवतात. परंतु लोकांची हृदयं अंधारानं भरलेलीं असतात. प्रत्येकाच्या हृदयात अन्याय व असत्य याची प्रचंड भिंत उभी असल्यामुळं सर्व लोक अंधारात चाचपडत आहेत. कोणीही समाधानी नाहीं. मग काय करायची ती तुझी प्रकाशमयता? तुझ्या सृष्टींत प्रकाश नाहींच

जगात चिंता, पीडा यांचे अस्तित्व दिसत अनाथ स्त्रियांच्या करुण आक्रंदानें तुझे कान बहिरे झाले आहेत. असे अनेक दुर्दैवी लोक आहेत की त्यांना प्यायलाही मिळत नाही. अशा लोकांकडे तूं डोळेझाक करतेस

मध्याह्नाच्या वेळी मारी बाळ, आईच्या मांडीवर बसलेली असतील अशा वेळी एखादी पाच वर्षांची मुलगी आकाशाकडे पाहून विचारीत असेल की, माझी आई कुठं आहे! आई! तूं कधीही रागावत नाहीस आई! तूं ये मला मारलेस तरी चालेल पण तुझ्या मांडीवर मला बसू दे हें दृश्य पाहून भगवंताच्या डोळ्यात पाणी येत असेल.

नुकताच विवाह झालेली व संसारात पदार्पण केलेली नवयौवना अमाजी व तिच्यावर चार महिन्याच्या आतच वैधव्याचा प्रसंग यावा त्यावेळी असें वाटतें की, हें तुला बरें वाटतं का? तुझ्या सौंदर्याचे व वैभवाचे वर्णन करणारे लोक खुशामत करणारे तर नाहीत ना?

एखाद्या लहान मुलाची आई जाची मग तें मूल कोणाच्या मांडीवर बसणार? त्यावेळी असे वाटतं की, तुझं श्रीधरी असं वणन कस करूं?

आज आनंदाचे कुठेही नाव सुद्धा दिसत नाही, इतका आनंद महाग झालेला आहे. त्याचा कोणी तरी साठा केलेला असावा असं वाटतं. आई! तू जशी आनंददेवता आहेस तशी समरदेवताही आहेस तू चंद्रिकेसारखी आल्हादक आहेस तशीच दाहक पण आहेस तुझ्याठिकाणी परस्पर विरोधी गुणही एकत्र झालेले दिसतात

तूं विकास तसा ध्वसही करणारी आहेस. तुझ्या एका डोळ्यात प्रेम तर दुसऱ्यात चंडिकेचं रूप पण तुझ्या आल्हादकतेत दाहकता आहे म्हणून त्याला विशेष शोभा प्राप्त झाली आहे

**दक्षाकंदकरी** - दक्ष म्हणजे व्यवहारी दक्ष प्रजापतीने यज्ञात शंकराची थट्टा केली. दक्षाच्या मनातून शकर उतरले गेले शंकराजवळ एवढं ज्ञान असतांनाही स्मशानात राहातो व पिशाच्चाचा उद्धार करतो ही गोष्ट त्याला आवडत नसे

व्यवहारी माणसाला ध्येयनिष्ठ आणि तत्त्वनिष्ठ माणसं आवडत नाहींत. दक्ष लोकांना ध्येयनिष्ठ माणसं मूर्ख आहेत असं वाटतं. भगवत्कार्यांतही जे व्यवहारी दृष्टि ठेवतात ते दक्ष प्रजापति होत. त्यांना शिव महाभयंकर वाटतो. ध्येयनिष्ठ व्यक्तींना क्षुद्र समजून ज्यावेळीं आक्रमण केलं जातं त्यावेळीं आई त्याचा नाश करते. म्हणून आई! तूं दक्षाक्रंदकरी आहेस.



# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

श्लोक १०–११ वा

क्षत्रत्राणकरी महाऽभयकरी माताकृपासागरी।
साक्षान्मोक्षकरी सदाशिवकरी विश्वेश्वरी श्रीधरी ॥
दक्षाक्रंदकरी निरामयकरी काशीपुराधीश्वरी ।
भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥१०॥

भगवति भव रोगान् पीडितं दुष्कृतोत्थान् ।
सुत दुहितृ कलत्रोपद्रवेणानुयानम् ॥
विलसदमृतदृष्ट्या वीक्ष्य विभ्रान्तचित्तम्
सकलभुवन मातस्त्राहि मामों नमस्ते ॥११॥

**दक्षाक्रंदकरी** — तूं दक्षाला रडवणारी आहेस. अशा प्रकारची एक पौराणिक कथा आहे कीं, दक्षप्रजापतीनं शंकरांची टिंगल केली व त्यामुळं जगदंबेनं त्याला रडविलं. दक्ष म्हणजे व्यवहारी. आम्हीं आम्हाला सामाळतों, ही भूमिका असलेले लोक आपण दक्ष आहोंत असं सांगतात अशा लोकांना ही रडवते. पुराणांत एक सुंदर रूपक आहे. तत्त्वनिष्ठ व ध्येयनिष्ठ लोकांची समाज नेहमीच टिंगल करतो. दक्ष शंकरांना सांगतो कीं, तुमच्याजवळ शक्ति असतांनाही तुम्हीं स्मशानांत पिशाचांचा उद्धार करीत बसला आहांत. या पेक्षां आमच्या नागरी जीवनांत या. नागरी जीवनांत तुम्हाला संस्कृत शिकलेलें लोक मिळतील. म्हणून शहरांत येऊन पिशाचांचा उद्धार करण्यापेक्षां सुसंस्कृत लोकांचा उद्धार करा. अशा प्रकारें ध्येयनिष्ठ व्यक्तींचा नेहमीच उपहास केला जातो. भगवान शंकरांचा असाच उपहास केला गेला. व्यवहारी माणूस म्हणतो कीं, कसं राहायचं हें मला माहीत आहे. आई म्हणते, रावणाची शेवटीं काय अवस्था झाली माहीत आहे ना! मग तुमचा काय पाड! यामुळंच आई तुला- क्षत्रत्राण करी म्हणतात

**निरामयकरी**- आई! तूं रोग दूर करणारी आहेस. शारीरिक

रोग औषधानीही नाहींसे होतात व यासाठींच प्रभूनं औषधि निर्माण केल्या आहेत. औषधि वनस्पति परमेश्वरानं निर्माण केलेल्या असतांना कित्येक भक्त आजारी पडल्यावर म्हणतात कीं, आम्ही औषध घेत नाहीं. भगवंताला रोग नाहींसा करायचा असला तर तो करील. प्रभो! मला वरं कर. मी औषध घेणार नाहीं. हें बोलणं म्हणजे दुर्मोक्ति होय. यावर आणखी म्हणतात औषधं जान्हवी तोयं वैद्यो नारायणो हरिः। गंगेच्या पाण्याला औषधि व नारायणाला वैद्य समज, असा लोक उलटा अर्थ करतात. या श्लोकांत असं सागायचं आहे कीं, औषधि वनस्पति परमेश्वरानं निर्माण केलेल्या आहेत. त्यामुळं औषधाला गंगाजल समज व औषधांचे गुणधर्म समजणाऱ्याला नारायणरूप मान. तूं भक्त आहेस ना? मग औषध घे. औषध असतांना भगवंतान रोग बरा करावा अशी इच्छा ठेवणं हा उद्धटपणा आहे. चुकून औषध घेतलं नाहीं तर ती गोष्ट वेगळी आहे.

**निरामयकरी**- यामधं शारीरिक रोगाचं वर्णन असावं असं वाटत नाहीं. शंकराचार्यांना स्वतःला भगंदर रोग होता. असं असूनही तो रोग दूर होण्यासाठीं जगदंबेजवळ याचना केली असेल असं वाटत नाहीं. आमय= रोग. पण कोणता रोग? जगदीशाजवळून दोन रोग दूर करायाचे असतात. एक बुद्धीचा व दुसरा मनाचा. हे दोन रोग भगवान नाहीसे करील. रोगी माणसाची बुद्धि क्षुद्र आणि स्वार्थी होते. त्याची बुद्धि संकुचित होते. तिची विशालता कमी होते. मनाचा मोठ्यातला मोठा रोग म्हणजे तिला दुसऱ्याचा उत्कर्ष सहन होत नाहीं. हा मनाचा रोग आहे. आपण कोणाचं ही भलं ऐकलं कीं, वर वर फार छान! असं म्हणतो. पण आतल्या आत जळत असतो. परोत्कर्ष सहिष्णुता हा मोठ्यातला मोठा रोग आहे व तो कोणाही वैद्याकडून नाहींसा न होणारा रोग आहे.

तसंच आत्मलक्षी होणं हा बुद्धीचा रोग आहे. आई! तुझ्याकडे पहिलं तर हा आत्मलक्षीपणाचा रोग नाहीसा होतो. तसंच स्वार्थ हाही महा भयंकर रोग आहे. या रोगांनीं पछाडलेल्या व्यक्तींनीं बुद्धीकडून कोणत्याही चांगल्या कामाची इच्छा सोडून द्यावी. पण आई! तुला हाक मारणं हाच हे रोग दूर व्हायला एकमेव उपाय आहे. दुसरा कोणताही उपाय नाहीं. हे रोग गेल्यावर आत्मविकास होतो. हे रोग दूर व्हायला प्रभुकृपाच

हवी. अशा प्रकारच्या रोगांनीं पीडलेली बुद्धि वेद, स्वाध्याय किंवा प्रभुकृपा यांमुळंच रोगरहित होते.

**काशीपुराधीश्वरी**–हा शब्द प्रत्येक श्लोकांत आहे. काशी म्हणजे ज्ञाननगरी. **एकमेवाद्वितीयं ब्रह्म** ही गर्जना करणाऱ्या नगरींत–ज्ञान नगरींत प्रेमळपणा व भक्ति या गोष्टी असणारच कुठून? प्रेमळपणा आला कीं, द्वैत आलंच. भक्ति व प्रेमळपणा यांचा ज्ञानाशीं मूलतःच विरोध आहे. ज्ञानी स्वतःला पूर्ण मानतो व अपूर्णतेंतून प्रेम निर्माण होतं. भक्तिमधं स्वतःला अपूर्ण मानलं जातं व त्यामुळंच आकर्षण असतं. ज्ञानांत अद्वैत असतं व भक्तींत द्वैत असतें.

ज्ञानी कुठं मिळणार? काशींत. एका काळीं काशी ही ज्ञानियांची नगरी होती. काशींत अनेक ज्ञानसंपन्न राहात होते. काशींत बसल्या बसल्या संपूर्ण जगावर सांस्कृतिक शासन चालत होतं. तिथं तत्त्वपिपासूंची वस्ती होती. तत्त्वज्ञानांतील शंकांचं निवारण तिथं होत असे. संपूर्ण जगाला कसं वदलायचं याचे विचार काशींत चालत. त्यामुळं काशीचं महत्त्व होतंच परंतु काशींत राहाणारे ज्ञानी सुद्धा भक्ति करीत असत हें तिचं वैशिष्ट्य आहे. वस्तुतः ज्ञानी माणसाला भक्तीचा मोह असण्याचं कारण नाहीं.

ज्ञान व भक्ति यांत मूलभूत विरोध आहे. ज्ञानी **एकमेवाद्वितीयं ब्रह्म** असं म्हणणार. त्याना भक्तीची गरजच काय? पण शंकराचार्य म्हणतात कीं, **मोक्ष साधन सामग्र्यां भक्तिरेवगरीयसी।** भक्ति हें साध्य नसून साधन आहे.

परंतु भक्ति दोन प्रकारची आहे. एक **परा** व दुसरी **अपरा** भक्ति. **पराभक्ति** हें ज्ञानाचंही साध्य आहे. त्यामधं प्रभूशीं तल्लीनता काशींतल्या लोकांनीही मान्य केलेली आहे. तुला पाहिल्यानंतर तल्लीन होणे–**बोधयन्तः परस्परम्–अन्योन्यं तत्कथयन्** हें जे मला श्रेष्ठ वाटले, हें आई तुझं वैशिष्ट्य आहे.

ज्ञानी माणूस ज्यावेळीं भक्ति स्वीकारतो त्यावेळीं आनंद होतो अज्ञानी माणसाला भक्ति खेळवते व ज्ञानी माणसाशीं भक्ति रममाण होते. अज्ञानी व्यक्तीशीं भक्ति खेळते त्यावेळीं खेळणाऱ्याला आनंद होतो पण

भक्तीला त्यांत आनंद नसतो. परंतु ज्ञान्याशी भक्ति खेळते त्यावेळी त्यामध्ये भक्तीला आनंद होतो म्हणूनच तिला आनद होतो. उदा. अठरा वर्षांची युवति एखाद्या पांच-सात वर्षांच्या मुलाला खेळवील पण ज्ञानी तरुणाशीं खेळेल.

याचप्रमाण शंकराचार्य, याज्ञवल्क्य, ज्ञानेश्वर, पतंजलि, वसिष्ठ यांच्याशीं भक्ति खेळली असेल. पण नारायणरावाला खेळविले असेल. शंकराचार्य व नारायणराव यांच्या भक्तींत भेद आहे. शंकराचार्यांशीं भक्ति खेळते व नारायणरावाला भक्ति खेळविते. भक्तीला जर कुठं खरा आनंद मिळत असेल तर ज्ञानी भक्ताशी रममाण होण्यात. **काशीपुराधीश्वरी**-यामधला काशी शब्द सोडायला मन तयार होत नाहीं. कारण काशीचं महत्त्व अद्भुत व लोकोत्तर आहे. ज्ञानी व अज्ञानी यांच्या भक्तींत जमीनअस्मानचं अंतर आहे. एका काळीं ज्ञानी लोकांचे अनेक संघ काशींत होते. काशी हें आमचं आध्यात्मिक केंद्र होतं. भौगोलिक दृष्ट्याही काशी मध्यभागी आहे. यासाठींच गंगा नदी धावत धावत आली व तिला काशीमुळंच तीर्थ स्थानाचं महत्त्व प्राप्त झालं.

भक्तीला ज्ञानी माणसाशीं रमण्यांत खरा रंग चढतो. माझ्या 'आंगणांत प्रभो! तूं खेळायला ये, या अज्ञानी भक्ताच्या भक्तींत कांहीं अर्थ नाहीं. ज्ञानी व्यक्तीच्या भक्तींत दिव्यता असते, गोडी असते, तल्लीनता असते. भक्तीपुढं त्याला जग तुच्छ वाटतं. जगांत कोणी तरी आपलं कौतुक करावं यासाठी आपली भक्ति असते. परंतु ज्ञानी माणसानी भक्ति जग तुच्छ वाटावं यासाठी असते. परंतु ज्ञानी व्हायला भक्तीची गरज असते. नारायणरावाशीं भक्ति मुलीसारखी तर याज्ञवल्क्यांशीं भक्ति तरुण स्त्रीसारखी असते. परा व अपरा भक्तींतलं हें अंतर होय. म्हणूनच **काशीपुराधीश्वरी** असं वर्णन केलं आहे. अहं ब्रह्मास्मि याचा अनुभव घेण्यासाठीं तूं ज्ञानी लोकांशी रममाण झालीस व त्यामुळंच खऱ्या भक्तीचा तिथं प्रत्यय येतो.

ज्ञानी व्यक्तीच्या जीवनांत भक्ती आली कीं तिचं रूप पालटतं. ज्ञानेश्वर ज्यावेळीं भक्तीची भाषा बोलतात त्यावेळीं तिचं स्वरूप कांहीं वेगळंच असतं. नामदेवाशीं भगवान् बोलत असत. दोघेही भक्तच पण दोघांच्या भक्तींत फरक होता. ज्ञानेश्वरांच्या संगतींत भक्ति रंगली व नामदेवांच्या

सहवासांत भक्ति रममाण झाली. ज्ञानी लोकांच्या घरीं भक्तीला कांहीं काम नसतं. आपल्या घरीं भक्तीला काम करावं लागतं. सामान्य माणसाच्या जीवनांत भक्ति सेवक आहे. कारण कांहीं तरी मिथ्यविण्यासाठींच भक्ती आवाहन केलेलं असतं

शंकराचार्यांच्या घरीं भक्तीला कांहीं कामच नाहीं भक्तीनं त्यांच्या घरीं येऊन फक्त खेळायचं. परंतु सामान्य व्यक्तीच्या जीवनांत भक्तीला काम करावं लागतं म्हणूनच "काशीपुराधीश्वरी, असं म्हटलं आहे.

सकल भुवन मातस्त्राहिमाम् – हे आई! तू त्रिभुवनाची माता आहेस; तू माझं रक्षण कर.

आई विचारते, मुला झालं तरी काय? आई! माझं चित्त विभ्रांत झालेलं आहे.

आई: "पण याचं कारण काय?"

तुला रममाण व्हायला- सुतदुहितृ कलत्र- या गोष्टी आहेतच. पण आई! काय सांगू तुला? मला याचांच उपद्रव झाला आहे. त्यामुळंच तर माझं चित्त विभ्रांत झालं आहे.

आई! माझ्या ठिकाणीं अध्यात्माची खोली नाहीं. सेवा, पूजा नाहीं. पूजा करायला बसलों तर लक्ष लागत नाहीं. घरांत मान सन्मान नाहीं. संसारांत सार नाहीं. स्वास्थ्य नाहीं. चित्त समाधानी नाहीं. जीवना पासून मन परावृत्त होऊं पहात आहे. त्रिविध तपानं मी तप्त झालों आहे. अध्यात्माबरोबर माझ्याजवळ भावजीवनही नाहीं. त्यामुळं संसार हा मला दुःखद झालेला आहे. मग आई! मीं करूं तरी काय?

ज्ञान नाहीं तोंपर्यंत कांहीं हरकत नाहीं. परंतु ज्ञान झाल्यावर असं वाटतं कीं, मी दुसऱ्यांसाठीं गाढवा सारखा मरायला का जन्माला आलों आहे? मला आपला विकास करायला हवा. भक्तींत मन लागत नाहीं. ज्ञान झाल्यानंतर इतर गोष्टींत स्वारस्य वाटत नाहीं. खरोखर अज्ञानी राहाण्या सारखं सुख नाहीं.

अज्ञानी राहाण्यासारखी उत्कृष्ट गोष्ट नाहीं 'मी पूर्ण आहें,' ही गोष्ट ध्यानात येत नाहीं तोंपर्यंत कुटुंबियांनीं केलेला अपमान चांगला वाटतो. परंतु ज्ञान झाल्यानंतर मात्र अपमान सहन होत नाहीं. मी तेजस्वी आहे ही अनुभूति येईपर्यंत अपमान होतच राहाणार. वस्तुत मी तेजस्वी असूनही मुलगी मला चिंताक्रांत बनवते. चेहऱ्यावरून कळत कीं हा मुलीचा बाप आहे. मुलगा झाला तरी मुलगा अपमान करतो म्हणून काळजी. अपमान होऊं नये म्हणून मुलाची मनधरणी व व्याह्याची मनधरणी चाललेली असते. खोटं खोटं प्रेम दाखविलं जातं. पण हेंच प्रेम जर परमेश्वरावर केलं तर कदाचित् मुक्ति मिळेल.

पत्नीही पतीला मूर्ख ठरवित असते. याना अक्कल थोडी कमी आहे असं म्हणत असते. अशा तऱ्हेनं या सर्वांपासून या ना त्या तऱ्हेचा उपसर्ग प्राप्त होतच असतो. म्हणूनच "सुतदुहितृ कलत्र' हे शब्द मुद्दाम योजलेले आहेत.

वस्तुतः ही शंकराचार्यांची अनुभूति नव्हती. परंतु संपूर्ण जगाशीं-त्यांच्या अनुभवाशीं एकरूपता प्राप्त झालेली असल्यामुळ सर्वांच्या अंतःकरणांतील भाव व्यक्त करीत आहे. संसारात मुलगा, मुलगी व पत्नी यानीं हैराण झालेल्याला भगवत्प्राप्ति होणार नाहीं. **नायमात्मा बलहीनेन लभ्यः।** वर वर्णन केलेल्या लोकांमुळं स्वास्थ्य मिळत नाहीं. त्यामुळ मन एकाग्र होत नाहीं. चित्त विभ्रांत होतं मग भगवान कसा मिळणार?

परंतु भगवान् पशु तुला फुल समर्पण करीत नाहींत, पक्षी तुझं भजन गात नाहींत, अशाचा तूं विचारही करीत नाहींस, कारण त्याच्या जवळून तुला काहीं अपेक्षाही नाहीं या निरपेक्ष वृत्तीमुळं त्यांच्याविषयीं तुझ्या मनांत दयाभाव आहे. त्याचप्रमाणं माझ्या जवळ व्यवसायात्मिका बुद्धि, शुद्ध अहंकार व तेजस्वी मन नाहीं परंतु यापैकीं तुला कशाचीही अपेक्षा नाही. प्रभो! हीच वृत्ति माझ्याविषयीही ठेव माझं मन इतकं शुद्ध आहे कीं तें तुझ्याकडे पाठवूच कसं!

माझ्याजवळ अध्यात्माची अनुभूति नाही, भावजीवन, सेवा-पूजा नाहीं, यामुळ काय करावं हें मला सुचत नाहीं यामुळं माझं चित्त विभ्रांत झालेलं

आहे. आई! अशा स्थितींत तूंच माझें रक्षण कर.

भवरोगानें माझें चित्त पीडित झालेलें आहे. मला भवरोग झालेला आहे. भव म्हणजे होणें (Becoming) असें म्हणतात. हा रोग कधींही नाहींसा होत नाहीं. लक्षाधीश झालें तर कोट्याधीश व्हावें असें वाटतें बाप झालों तर आजोबा व्हावें असें वाटतें. याला भवरोग म्हणतात व तो नाहींसाच होत नाही. दररोज नवी वासना, इच्छा व आकांक्षा निर्माण होत आहेत. परंतु अशा प्रकारें होण्याची ही इच्छा दुष्कृत्यांतून निर्माण होत असते परंतु हा संसार दुष्कृत्यांतून निर्माण झालेला आहे अशी शंकराचार्यांची भावना नाहीं. मी केलें हें दुष्कृत्य व देवांनी केलेलं हें सत्कृत्य. दुष्कृत्य म्हणजे केवळ दारू पीणें, व्यभिचार करणें एवढेंच नव्हे तर 'मी केलें' ही भावना आली कीं दुष्कृत्य होतें. समजा आपण एक हजार लोकांना भोजन दिलें, पण हें सत्कृत्य होत नाहीं कारण त्यांना जेवायला घालतांना "मी जेवायला घालतों आहे" असा अहं चिकटून बसलेला होता. 'मी केलें.' ही भावनाच अध्यात्म दृष्टिचा दुष्कृत्यकारक आहे.

आम्हीं आमच्या प्रत्येक कृत्यावर आमचा हक्क प्रस्थापित करीत असतों. त्यामुळें तें दुष्कृत्य होतें. हें देवांनी केलें किंवा घरविलें ही भावना यायला पाहिजे, म्हणजे सत्कृत्य होईल.

जीवन एक मंदिर आहे. यावर एक चौकीदार ठेवलेला आहे. व त्याचें नाव म्हणजे 'मी' या 'मी' नें या मंदिराला आपल्या ताब्यांत घेतला आहेत व ही दुःखाची गोष्ट आहे. या चौकीदाराला चांगले कपडे द्या, सर्व कांहीं द्या पण मंदिराच्या बाहेर ठेवा. हें एक दुःख आहे. एक दुष्कृत्य आहे. या दुष्कृत्यानें दुःखी झालेल्या व संसारांतील उपद्रवामुळें ग्रस्त झालेल्या मनामुळें मी विभ्रांत झालों आहे. हे आई! तूं माझें रक्षण कर.

भगवंता आम्हीं असें कोणतेंही चांगलें काम केलेलें नाहीं. म्हणून आम्हीं हांक मारल्यावर तूं धावत येणार नाहीस. पण तू अमृतमय व प्रसन्न दृष्टीनें पहा तर खरं. माझ्याशीं बोलूं नकोस, कारण माझी तेवढी योग्यता नाहीं. पण एवढीच अपेक्षा आहे कीं तूं माझ्याकडे प्रसन्न दृष्टीनें पहावेंस.

भगवान्! माझ्याशीं बोलला नाहीं तरी चालेल, कारण तो माझ्याशी बोलला तर त्याची भाषा मला समजेल कीं नाहीं याची शंकाच आहे. कानडीनं केला मराठीचा भ्रतार, भगवंता! तुझी व माझी भाषा वेगळीच आहे. त्यामुळं तूं बोलूं नकोस, कारण मला ती समजणार नाही. पण प्रण प्रसन्न दृष्टीनं तरी पहा.

दृष्टी तीन प्रकारची असते-(१) क्रोधी, (२) उपेक्षा-दृष्टि; (३) सुस्वागतम्‌ची दृष्टि. रस्त्यांत घात असतांना पुष्कळांकडे आपण पाहातो पण त्यांच्या विषयीं आपली उपेक्षादृष्टि असते. पण आपला लाडला मुलगा समोरून येऊं द्या कीं, दृष्टि ताबडतोब बदलते. त्याच्याकडे पाहातांना अमृतमय दृष्टि असते. भगवान्! तूं आमच्याकडे उपेक्षाच्या व क्रोधी दृष्टिन पाहिलंस तर आम्हीं खलास होऊन जाऊं. म्हणून भगवंत तूं कांहीं नाहीं केलंस. तरी चालेल पण प्रेमळ दृष्टिनं फक्तपहा.

भगवान म्हणतोः 'ठीक आहे' मी तुझ्याकडे अमृतमय दृष्टिनं पाहिलं तर चालेल का; तुला मृत्यु येणार नाहीं पण छे! ते शक्य नाहीं, कारण त्याविषयीं ब्रह्मा, विष्णु, महेश यांची एक कमिटी आहे. उत्पत्ति, स्थिति व संहार करणाऱ्या या तीन शक्ति आहेत. प्रत्येकाच्या ताब्यांत वेगवेगळं खातं दिलेलं आहे. मला ही कमिटी निर्णय देईल तसं करावं लागलं मला तर सर्वांचीच मत घ्यावी लागतात. कल्पना कर कीं तुझे दिवस या जगांतले संपलेलें आहेत. मग मला तुझ्याकडे क्रोधानंच पाहाय लागणार ना!

पण भगवंता! मला तुझ्या ठीकाणीं तिन्ही शक्तिचं दर्शन होतं तुझ ॐ हे स्वरूप आहे. यामध्यं अकार, उकार, मकार या शक्तिचं दिसत आहेत. म्हणून माझा असा आग्रह आहे कीं-मांत्राहि! तूं माझं रक्षण कर.



# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

श्लोक १२ वा

माहेश्वरीमाश्रित-कल्पवल्लीमहंभवोच्छेद-करीं भवानीम्।
क्षुधार्त जाया तनयाद्युपेत स्त्वामन्नपूर्णे शरणं प्रपद्ये॥१२॥

**माहेश्वरी माश्रित कल्पवल्लीम्**-हे अन्नपूर्णे! मी तुला शरण आलों आहे परंतु आई! तूं कशी आहेस! माहेश्वरीम्, आश्रित कल्पवल्लीम्, अहंभवोच्छेदकरीं, भवानी म्हणूनी आहेस.

**माहेश्वरीम्...** तूं अधिष्ठानशक्ति आहेस. म्हणूनच मी तुला शरण आलों आहे.

हें जगत कोणामुळं उभं आहे? गीतेंत भगवान सांगतात-यंत्रारूढानि मायया। हें जगत महान चिच्छक्तीच्या आधारावर चाल्तं. आई! ज्यानं तुझा आश्रय घेतला त्याला तूं कल्पलतेसारखी आहेस. कामधेनु जशी सर्व इच्छा पूर्ण करते त्याप्रमाणं तूं सर्व इच्छा पूर्ण करणारी आहेस. तुझा आश्रय करणाऱ्याला तूं ऐश्वर्य, वैभव देतेस इतकंच नव्हे तर त्याला तूं आपलं सिंहासनही देतेस. त्याला **अहंब्रह्मास्मि** ही अनुभूति येते. तूं तुझी सत्ता, शक्ति इत्यादि सर्व त्याला देतेस. आजपर्यंत मी देणारे पाहिले, **राजा तुष्टो ग्राममेकं ददाति।** राजा तुष्ट झाला-संतुष्ट झाला तर फार तर एखादा गांव देईल. पण आई! तूं राज्यपदही देतेस. तूं तुझं स्थान देतेस. हा अंतिम प्रसाद आहे. तुझं स्थान प्राप्त झाल्यावर ती व्यक्तीच प्रसादरूप होते. तुझं स्थान प्राप्त करणं हाच मोठा प्रसाद व तो तुला शरण येणाऱ्या व्यक्तीला प्राप्त होतो. म्हणून तूं कल्पवल्लीसारखी आहेस.

आश्रित व्हायचं झाले तर कोणाचं आश्रित व्हावं? या जगाला कोणी आधार दिलेला आहे? श्रीकृष्णानं गोवर्धन पर्वत अंगुलीवर उचलून धरला हें कशासाठीं वाचायचं तर हा पर्वत उचलून धरणारा माझा संसार नाहीं का उचलून धरणार? त्याच्या शक्तीमुळंच तर मी चालूं शकतों

आपल्याला असं वाटतं की, हा संसार आपल्या कर्तृत्वावर उभा आहे. परंतु काहीं काहीं वेळां आपल्या कर्तृत्वालाही यश मिळत नाहीं. तर कधीं प्रयत्न न करताही यश मिळतं. त्यामुळं फळाचा व कर्तृत्वाचा काहीं संबंध असला पाहिजे हें बुद्धीला पटत नाहीं. नंतर आपल्याला असं वाटतं कीं, कर्मा वर सर्व उभं आहे. म्हणून आपण दैवाश्रित होतो. अशा तऱ्हेनं कित्येक लोक कर्तृत्व, दैव व कर्म यांचा आश्रय घेऊन उभे असतात. पण आई! कांहीं लोक मात्र तुझ्या आश्रयानंच उभे असतात.

महान् चिच्छक्तीच्या जोरावर हें जग चालतं. त्या शक्तीचा आश्रय न घेतां आपण आपल्या कर्तृत्वाचा आश्रय घेतो. आपल्याला वाटतं कीं, हें सारं मीच करीत आहें. दुर्योधनासारख्या व्यक्ति कर्तृत्वावर जगतात. त्यांना आपल्या कर्तृत्वाचा गर्व चढतो परंतु जो दुबळा असतो तो आपल्या नशीबावर हवाला ठेवून रडत बसतो व गेल्या जन्मातील कर्मांचीं फळं उपभोगीत असतो.

परंतु कर्तृत्वाचा आश्रय किंवा दैवाश्रय यापेक्षा भगवदाश्रय ही गो काहीं वेगळीच आहे. दैवाचा आश्रय घेणारा उच्चही नसतो व हल्काही नसतो. परंतु कर्तृत्वाचा आश्रय घेणारा नेहमींच क्षुद्र असतो. परंतु **गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्।** असं म्हणणारा नेहमींच उच्च व श्रेष्ठ असतो आई! तुझ्या आश्रयामुळंच हें सारं जग, चंद्र, सूर्य व तारे यांचं परिभ्रमण सुरू आहे भगवंताच्या छायेखालीं बसल्यावर ताप कोठून लागणार? याला नेहमीं शीतलताच मिळणार.

माणसाला कंटाळा येतो त्यावेळीं माणूस क्लबात जातो व पत्ते खेळतो. कित्येक पंडित पुस्तकात रममाण होतात तर कित्येक अरसिक (?) भगव मूर्तींत तल्लीन होतात. याला भगवदाश्रय म्हणतात. अशा लोकांना श्रम कधीं होतच नाहींत परंतु भगवंताची मूर्ती समोर आणणं ही साधीसुधी गोष्ट नव्हे

आई! माझे श्रम कमी करण्याची शक्ति भौतिकपदार्थांत नाहीं ही शक्ति फक्त तुझ्याच ठिकाणीं आहे.

आपण जीवनांत कोणाचा आधार घ्यावा ही महत्त्वाची वस्तु आहे.

यासाठीं भगवंतानं आपल्याला इच्छाशक्ति व कर्तृत्वशक्ति दिलेली आहे. ही गोष्ट आपणच निश्चित करायची आहे कीं, आपण कोणाचा आश्रय घ्यावा!

अरे! कुत्राच व्हायचं असेल तर समर्थाचा तरी व्हा. रामदासस्वामी म्हणतात **समर्था घरचें श्वान त्याला देती सर्व मान।** समर्थाच्या कुत्र्याला सर्व मान देतात. साहेबाला टॉमी आवडतो म्हणून आपण सर्व प्रथम टॉमी कसा आहे याची चौकशी करतों. **जो आवडतो देवाला तोचि आवडे सर्वांना।** हें खरं आहे. जो भगवंताचा आवडता होतो तो सर्वांचा आवडता होतो. म्हणूनच गीता **महापुरुषसंश्रयः** असं सांगते. म्हणून भगवंताचा आश्रय घेतला पाहिजे. ज्यानं आईचा आधार घेतला त्याला आई कल्पवल्ली आहे

**अहंभवोच्छेदन करीम्....**आम्हीं रात्रंदिवस अहंकरी असतों. माणूस सर्व पापं नाहींशीं करूं शकेल पण स्वतःच्या 'अहम्'ला दूर करणं कठिण आहे या अहंकारामुळें त्याला दुसरं कांहीं सुचतच नाहीं.

अहंकारामुळं माणूस सारं विसरतो. माणसाला विद्वत्तेचा, धनिकांना धनाचा, अधिकाऱ्यांना अधिकाराचा आणि सुंदरांना आपल्या सौंदर्याचा अहंकार वाटत असतो. या अहंकाराला कोण नाहींसं करूं शकणार? म्हणूनच माणसाच्या जीवनांत साडेसाती येते. ही साडेसाती एक प्रकारं control आहे. त्यामधं माणसाला स्वतःची कल्पना येते.

रावणाला अहंकार झाला होता. रावण कर्तृत्वसंपन्न होता. त्यानं ज्या प्रकारची भक्ति केली होती त्या प्रकारची भक्ति गेल्या दहा हजार वर्षांत कोणीही केली नव्हती. ज्यानं भगवंताला आपलीं शिरकमळं अर्पण केली होतीं त्याची भक्ति कोणत्या प्रकारची असेल? वैभव व अधिकार आल्यानंतर अहंकार पाठोपाठ येणारच. नंतर भाषा वेगळी व पोटांत वेगळं अशी वृत्ति होते. संन्याशाला म्हणतों—'आपले पवित्र चरण माझ्या घराला लागले पाहिजेत. तुमच्या मठाला मला पैसे द्यायचे आहेत.' व्यापारी माणसाची भाषा वेगळीच असते. ज्या भाषेत विनयाचा आभास असतो परंतु त्या भाषेपाठीमागं अहंकार दडलेला असतो. तो मनात म्हणतो कीं, संन्याशाला पैसे हवे असतील तर त्यानं माझ्या घरीं यायलाच पाहिजे.

**धन हरे धीरज दे रहे दास का दास।** याचं नांव व्यापारी. हा

व्यापारी संन्याशाचे पवित्र पाय लागले तरच पैसा देणार आहे. यांत अहंकार आहे. अहंकार गुप्त ठेवण्याचे अनेक मार्ग आहेत.

रावणाला वाटलं कीं, शंकरांनीं माझ्या घरीं यावं. भगवान प्रेमानं हें बंधन स्वीकारतो. कारण त्याला दुसरं कोणतंही बंधन अडवूं शकत नाहीं. कवि पुष्पदंत याचं सुंदर वर्णन करतो– **प्यलस चलितांगुष्ट शिरसि।** भगवान शंकरांनीं आळसांत सहज पायाचा आंगठा दाबला त्यावेळीं रावण 'चींचीं' करूं लागला या अहंकाराचं छेदन करणारी आई! तूंच आहेस.

**अहंभव** याचा जसा एक अर्थ अहंकार आहे, तसा दुसराही एक अर्थ आहे. **अहंभव** म्हणजे अहंकारापासून निर्माण झालेला संसार. त्याचं उच्छेदन करणारी तूंच आहेस. संसार अहंकारामुळं निर्माण होतो. आई! या संसाराचा छेद करणारी तूंच आहेस.

संसाराची आवश्यकता नाहीं. संसार कशाला हवा? मी अपूर्ण आहें. म्हणूनच संसाराची गरज आहे. संसारांत अपूर्णता आहे. मला घर हवं, मला पैसा हवा, पत्नी हवी, पुत्र हवा, जावई हवा. नातू हवा. या गोष्टी नाहींत म्हणून मी अपूर्ण आहें. नातू झाल्याच्या आनंदापेक्षां दुसरा श्रेष्ठ आनंद तो कुठला असणार असं वाटतं. परंतु आई! माझ्या ठिकाणीं असलेली अपूर्णता तूं दूर करतेस. तूं मला सांगतेस कीं, 'तूं सिंहाचा छावा आहेस.' सिंहाचा छावा कधींही कपाळावर हात मारून रडत बसणार नाहीं, हें आई आपल्याला शिकविते. मी कोण हें सांगते. स्वतःचं ज्ञान झालं कीं, भगवंताचं ज्ञान होतं व हें ज्ञान झालं कीं, संसाराचं उच्छेदन होतं कारण त्यावेळीं अपूर्णता दूर झालेली असते.

भगवंताचा आश्रय केला कीं, संसाराचा उच्छेद होतो. त्याचा संसार आई नाहींसा करते.

आज या जगांत प्रत्येक रडतो आहे. कारण त्याचेठिकाणीं असलेल्या भगवंताचं अनुसंधान टिकत नाही. संसार वस्तुतः वाईट नाहीं पण त्यामधे प्रभूची विस्मृति होते त्याचं अनुसंधान राहात नाहीं.

गरीब गरिबीच्या दुःखांत असतात व त्यामुळं त्यांना प्रभूचं विस्मरण

होत. श्रीमंत पैशाच्या मोहामुळं प्रभूचं स्मरण करीत नाहींत. पंडित अहंकारी असतात म्हणून ते भगवंताला विसरतात त्यांना प्रभुस्मरण करायला वेळच नसतो. अज्ञानी लोकांना प्रभूचं स्मरण करण्याचं ज्ञानच नसतं. तात्पर्य सर्वांना या जगांत प्रभूचं विस्मरण होतं. या अहंभावाचा तूं नाश करणारी आहेस.

संसारांचा नाश करणं याचा अर्थ प्रपंचांतील सर्व व्यक्तींना ठार करणं असा नव्हे. यामधं शंकराचार्यांचा दुसरा हेतु आहे.

संसारांत दोन गोष्टी असतात. एक अपूर्णता व दुसरी प्रभूची विस्मृति. हे दोन्ही ही दोष आहेत. या दोन्ही दोषांचं उच्छेदन आईच करूं शकते. अहंभावामुळ संसार निर्माण होतो व संसारामुळं हे दोष येतात. हे दोन दोष दूर झाले तर संसार हा परमार्थच आहे. या संसाराचा आई उच्छेद करते.

आई आरसा घेऊन दाखवते कीं, तूं कोणाचा पुत्र आहेस, तूं कसा राहातोस, तुला हें शोभत नाहीं असं सांगते. महाभारतांत कुंतीमातेनं जे श्लोक सांगितलेले आहेत ते वाचण्यासारखे आहेत. सर्व पांडव निष्क्रिय होऊन बसलेले आहेत. दैव विपरीत झालेलं आहे. तह झाला तर बरं असं त्यांना वाटूं लागलं आहे. त्यामुळं ते तह करण्यासाठीं श्रीकृष्णाला पाठवतात. त्यावेळीं कुंतीमाता अर्जुनाला श्रीकृष्णाच्याद्वारं संदेश पाठविते–'तूं कोणाचा पुत्र आहेस? तुझी आई कोण? तुझ्या आईचे डोळे उघडे आहेत. तुझ्या आईनं दुग्धरूपानं कोणते विचार दिलेले आहेत? तूं क्षत्राणीचा पुत्र आहेस. असा निष्क्रिय होऊन रडत काय बसलास? सिंहाचा छावा जन्मून रडत बसला आहेस!'

अशा प्रकारं जगदंबा सांगते कीं– तूं माझा पुत्र होऊन लाचारी करतोस? हा बंगला मिळावा म्हणून लाचारी करतोस? दुसऱ्याचा बंगला पाहून रडतोस? कुत्र्यासारखं जीवन जगतोस? तूं माझा मुलगा असून अशा प्रकारचं जीवन जगतोस! अशा प्रकारचे शब्द ऐकल्यावर मुलाचा उत्साह वाढतो व त्याची अपूर्णता नाहींशी होते. मुलाची अपूर्णता नाहींशी करून त्याला प्रभु स्मृति करून देतो.

मी अपूर्ण आहें व मला प्रभु-विस्मृति होते हीं या संसारांतील दोन शल्यं

आहेत. या गोष्टी दूर केल्यावर संसारच परमार्थ होईल. जंगलांत जाऊन परमार्थ होणार नाहीं.

अर्जुन म्हणाला कीं – **श्रयो भोक्तुं भक्ष्य मपीहलोके।** मी संन्यास घ्यायला तयार आहें. त्यावेळीं श्रीकृष्ण म्हणाले कीं, तूं कुठं चाललास? तूं जंगलांत गेलास तर भिल्लांचं राज्य करावं लागणार. भिल्लांचा राजा व्हावं असं तुला वाटेल. म्हणून जंगलांत गेल्यावर संसार विसरशील ही गोष्ट खोटी आहे. म्हणून संसारांतील हीं दोन शल्यें काढ कीं हाच संसार परमार्थ होईल.

'मी करतों' याचं नांव संसार व 'तूं करतोस, याचं नांव परमार्थ. त्यासाठीं योगी व्हायचं कांहीं कारण नाहीं. त्यासाठीं कपडे बदलण्याची गरज नाहीं. त्याला साधक व्हायला पाहिजे.

'तूं करतोस' ही भावना येणं याचंच नांव परमार्थ. अंतःकरणांतल्या सातव्या पडद्यांतही 'तूं करतोस' ही भावना जरी आली तरी हा संसार परमार्थ होईल. जनकराजानं अथपासून इतिपर्यंत साम्राज्य उपभोगलं. पण त्याच्या अंतःकरणांत 'तूं करतोस' ही भावना असल्यामुळंच गीतेंत त्याचं वर्णन केलं आहे–**आस्थिता जनकादयः। पांडवानां धनजयः।** अर्जुन व जनकराजा यांच्याविषयीं लोभ उत्पन्न व्हावा असं त्यांचं लोभस व्यक्तिमत्व होतं. गीता हें उपनिषदांचं सार आहे. अशा प्रकारच्या ग्रंथांत या व्यक्तींची फार मोठ्या भावनेनं पूजा केलेली आहे. तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांत एकेक शब्द तोलून मापून वापरलेला असतो. गीतेंत भगवंताचे शब्द आहेत. त्यांतल्या प्रत्येक शब्दाला किंमत आहे. झवेरी बाजारांतल्या हिरे तोलायच्या तागडीनं ते शब्द तोलायला हवेत. भाजीपाला खरेदी करतांना थोडा कमीजास्तपणा चालतो पण हिऱ्यांनी विक्री करणाराला डोळ्यांत तेल घालून जपावं लागतं. म्हणून गीतेंत जनकराजाचं नांव आलं आहे तें आदर्श राजा म्हणून आलेलं आहे. अर्जुनाचं सारं जीवन तपासून भगवंतानीं स्वतः प्रमाणपत्र दिलं आहे. **पांडवानां धनंजयः।**

भक्तींत 'मी करतों' ही भावना आली कीं संसार निर्माण होतो व 'तूं करतोस' ही भावना आली कीं परमार्थ होतो. 'मी'च्या जागेवर 'तूं'ची स्थापना करणं याचं नांव परमार्थ. या गोष्टीमुळं संसाराचा उच्छेद होतो उच्छेद याचा अर्थ अपूर्णता व विस्मृति यांचा उच्छेद.

शास्त्रांतील घटपटादि पदार्थांची चर्चा करून परमार्थ येत नाहीं. पंचीकरण, अपंचीकरण या व असल्या प्रकारच्या चर्चेची अवश्यकता आहे. त्यामुळं बुद्धि तीक्ष्ण होते.

आई! तुझ्या कृपेनें 'मी करतों' ही भावना बदलून 'तूं करतेस' ही भावना येते. ही भावना निर्माण झाली तरच जीवन बदलतं परंतु तूं करतेस.' ही भावना टिकत नाहीं.

आपण कांहीं वाईट नाहीं. पण याचा अर्थ आम्हीं चांगले आहोंत असाही नाहीं सकाळच्या वेळीं सूर्योदय तसंच आकाशांत बदलणारे विविध रंग पाहून असं वाटतं, हें सारं जग तूं चालवतोस. पण ही वृत्ति टिकत नाहीं. संसार जसा क्षणिक तशी वृत्तीही क्षणिक. ती वृत्ति निर्माण होते व नष्टही होते. ती वृत्ति तुझ्या कृपाप्रसादानं टिकते.

वसिष्ट पूर्ण संसारी असूनही त्यांनीं परमार्थ केला. आईची कृपा असेल तरच हा संसार परमार्थ होतो. म्हणूनच शंकराचार्य म्हणतात— **अहंभवोच्छेद करीम्।**

**भवानीम्...** भवाचा नाश करण्याची शक्ति तूं देतेस. भवाचा अर्थ समृद्धि, ऐश्वर्य, उत्कर्ष या गोष्टी जी देते ती भवानी. आई! तूंच या साऱ्या गोष्टी देतेस. संसारांतली अपूर्णता जायला समृद्धि हवी. पण ती समृद्धि कसली? पैशाची का? छे! छे! भव समृद्धि हवी. आपल्या अंतःकरणांत भाव नसतो तो तू निर्माण करतेस. आई! मला दुसरं कांहींही नको. तूं मला फक्त भाव दे, भावाचा प्रसाद दे. परंतु तो भाव नष्ट होतो. श्रावण महिन्यांत नवा नवा भाव निर्माण होतो पण चातुर्मास गेला की, तो खलास होतो. भगवंताच्या दरबारांत समृद्धि, वैभव व पैसा यांना किंमत नाहीं पण भावाला किंमत आहे. भगवंताच्या दरबारांत जायचं असेल तर भावसमृद्धि हवी. ही भावसमृद्धि तूं यादविणारी आहेस. म्हणून तूं भवानी आहेस.

पण आई! मी कसा आहें तुला माहीत आहे का? क्षुधार्त आया तनया क्षुधेत:। मी तुला एकटा शरण आलेला नाहीं सर्व नातेवाइकांना घेऊन शरण आलों आहें. भगवंता! हे सारे क्षुधार्त आहेत. त्यांना भूक लागलेली आहे त्या सर्वांचा उद्धार कर.

एखादा संशोधक म्हणेल कीं हा श्लोक प्रक्षिप्त असला पाहिजे कारण शंकराचार्यांना पत्नी व पुत्र हीं होतींच कुठं ' परंतु शंकराचार्यांचं' हें भावावस्थेंतील बोलणं आहे. शंकराचार्य सर्वांच्या वतीनं हें सांगत आहेत.

संसार व्यापक केला कीं तो परमार्थ होतो. मी कोणासाठीं तरी करीत आहें ही या संसाराच्या मुळाशीं भावना आहे. मी दुसऱ्यासाठीं का करावं ही पशूलाची भावना आहे. मी कोणाकरितां तरी आहे ही भावना व्यापक झाली तरच संसार परमार्थ होतो. शंकराचार्यांची ही व्यापक भावना यात दिसते.

हा श्लोक संसारी लोकांसाठीं आहे. आपल्यासारख्या दुबळ्या व्यक्तींचं प्रतिनिधित्व शंकराचार्य या श्लोकात करीत आहेत. त्यांच्या आवाजामुळ भगवंताचं दार उघडत मी प्रभुसाठीं राहातों आहें ही भावना निर्माण व्हायला पाहिजे.

आई, या सर्व क्षुधार्त लोकांना घेऊन आलो आहें. त्यांना तू ज्ञानामृत प्रेमामृत यांच भोजन घाल. मुलांना भूक लागली पाहिजे. तुकाराम महाराज आपल्या पत्नीच्या ठिकाणींही ही भूक जागृत करूं शकले नव्हते. म्हणूनच ती त्यांच्यावर चिडत असे. 'मी कोणाकरिता तरी आहें' ही भावना प्रथम निर्माण व्हायला पाहिजे 'नंतर मी प्रभूसाठीं आहे' ही भूक निर्माण होईल.

या श्लोकाचा अर्थ नीट ध्यानात घ्यायला पाहिजे. पत्नी, मुलं या सर्वांना घेऊन आलों आहे. त्यांना भूक लागलेली आहे, हे प्रभूला सांगायला आलों आहे. त्यांना ज्ञानामृताच व प्रेमामृताच भोजन दे असं सांगायला आलों आहे.



# श्री अन्नपूर्णास्तोत्रम्

श्लोक १३ वा

— ❀ —

दारिद्र्यदावानलदह्यमानं पाह्यन्नपूर्णे गिरिराजकन्ये।
कृपाम्बुधौ मज्जय मां त्वदीये त्वत्पादपद्मार्पितचित्तवृत्तिम् ॥१३॥

दारिद्र्यरूपी दावानलाने मी पोळलों आहें. तो दाह शांत होण्यासाठीं मी माझ्या चित्तवृत्ति तुझ्या चरणकमलावर समर्पित केलेल्या आहेत हे अन्नपूर्णे! हे गिरिराजकन्ये! त्याच तू रक्षण कर. तुझ्या कृपासिंधूत मला सतत ठेव. संपूर्ण जगाची कृपा संपादन करण्यापेक्षा तुझी कृपा संपादन करणें हेंच उचित होय.

गेल्या श्लोकांत या संसाराचा उच्छेद कर अशी मागणी केलेली आहे मला भूक लागलेली आहे. मी कुटुंबातल्या सर्व लोकांचा होण्यापेक्षा प्रभूचा झालों तरच ही माझी भूक शांत होणार आहे. प्रभूचा झाल्यानंतर ही भूक राहाणार नाहीं आजच्या श्लोकांत शंकराचार्य सांगतात कां, हे भगवान! मी दारिद्र्यानं व्याकूळ झालो आहें, मला पैसा दे, श्रीमंत कर

प्रभो! तुझं काम करण्याची मला इच्छा होते पण मी काय करणार? मी दरिद्री आहे. ज्याला प्रभुकार्य करण्याची इच्छा आहे त्याच्याजवळ वित्त नाहीं व ज्याच्याजवळ वित्त आहे त्याला प्रभुकार्य करण्याची इच्छा नाहीं

खरोखर हृदय-विदारक असं दारिद्र्य आहे माझ्याजवळ वृत्ति आहे, चैतन्य आहे पण वित्त नाहीं ज्याच्याजवळ द्रव्य आहे त्यांना कांहींही करण्याची इच्छा नाहीं हें पाहून मला अतिशय दुःख होतं शंकराचार्यांचं अंतःकरण सारखं पेटलेलं आहे ते म्हणतात माझ्या स्वार्थासाठीं मला संपत्ति नको तर तुझ्या कार्यासाठीं मला संपत्ति हवी आहे. ही भगवंताची लीला आहे म्हणूनच आदिकालापासून भगवान सांगत आले आहेत कीं, सत्कार्य करा व काम करा

उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथा अशी गरीब माणसाची अवस्था होते व त्यामुळ मला अतिशय दुःख होतं व पश्चात्तापही होत आहे. जन्मजन्मांतरीच्या पुण्यानं पैसा मिळतो असं मानलं जातं. परंतु हें विधान बरोबर नाहीं. कारण पुण्य असलं तर पैसा मिळतोच असं नाहीं. पुण्यामुळ अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्। योग्याच्या घरीं जन्म येतो हें शक्य आहे परंतु केवळ पुण्यामुळच पैसा मिळतो हें बरोबर नाहीं.

आई! मी काहीं करू शकुन नाहीं याचा मला पश्चात्ताप होत आहे. पण नुसता पश्चात्ताप काय कामाचा'

भगवंता! याबाबतींत तुझं व माझं ऐक्य आहे. जें दुःख तुला वाटत तें मलाही वाटतं. माझ्याजवळ पैसा नाहीं याचा मला पश्चात्ताप होतो आणि भक्ताला आपण पैसा दिला याचा तुला पश्चात्ताप होतो आहे पण हें बोलून मला तुझ्या जखमेवर मीठ चोळायचं काम करण्याची माझी इच्छा नाहीं. मी तुझं काम करीन असं खोटंच आश्वासन देऊन तुझ्याकडून पैसा मिळविला काम मात्र मुळींच केलेलं नाहीं. अशा लोकांना उगीच द्रव्य दिलं असा तुला निश्चित पश्चात्ताप होत असणार ही वस्तुस्थिति आहे माणसानं आपला शब्द पाळला नाहीं तर तूं मात्र दिलेलं वचन कधींही मोडीत नाहींस.

भगवंतानं दुर्योधनाच्या चेकवर सही केली त्यानं भगवंताचीं काम केलीं नाहींत पण तू मात्र शेवटपर्यंत त्याला सम्राट ठेवलास तुला मात्र या गोष्टीचा पस्तावा झाल्याशिवाय राहिला नसेल.

शंकराचार्यांसारख्या व्यक्तींना द्रव्य नसल्यामुळ जें दुःख होत आहे तें स्वतःविषयीं नसून संपूर्ण जगाविषयीं आहे. दारिद्र्य, दैन्य याचं दुःख निश्चितपण आहे.

संसारी माणसाला दारिद्र्याचं दुःख निश्चितच आहे. मुलगा आजारी पडला व औषध आणायला जर द्रव्य नसेल तर वडिलांना दुःख होणारच. अशा प्रसंगीं सांसारीक व्यक्तीला ज्या प्रकारचं दुःख वाटत असेल त्याच प्रकारचं दुःख सांस्कृतिक कार्य करणाऱ्या व्यक्तीलाही वाटत असेल.

सांस्कृतिक कार्य करणाऱ्या व्यक्तीला दारिद्र्यामुळं दुःख होत.

पुष्कळ काम करायचीं असतात पण तीं पैसामुळ शक्य होत नाहींत आध्यात्मिक व्यक्तींना अशा प्रकारच दु:ख वाटत नाहीं ही गोष्ट वेगळी परतु संसारामध्ये व सास्कृतिक कार्य करण्यासाठीं द्रव्याची निश्चित आवश्यकता आहे. भगवता! तुझ काम करणारे जे नमनीत त्याना तू दुसऱ्या प्रकारच वैभव दे आणि दुसरी गोष्ट अशी कीं, अशा प्रकारचे जे वचक लोक असतील ते काहीं दिवसानीं आपोआप वठणीवर येणारच आहेत यात शका नाहीं. परतु प्रभो! ज्याना सास्कृतिक काम करण्याची इच्छा आहे त्याना तूं दारिद्र्याच्या दावानलात टाकू नकोस

भगवान्! रघुराजाकडे कौत्साला पाठविणाऱ्या वरतंतूंना केवढ दु:ख झाल असेल! वरतंतु काहीं सामान्य व्यक्ति नव्हती त्याना ही गोष्ट सतत सलत होती पण काय करणार? कारण साठ हजार विद्यार्थ्यांना शिक्षण द्यायच काम करायच होत ना? परतु तेवढा पैसा नव्हता शेवटीं कौत्साला सागितल नाइलाजान सागितल सास्कृतिक कार्य करण्यासाठीं पैशाची आवश्यकता वाटल्यामुळ वरतंतुन पैशाची मागणी केली असावी

प्रभो! तू सास्कृतिक कार्य करणाऱ्याना पैसा दे व अस झाल तर सपत्तिचा मोहच वाटणार नाही भगवता! तू सर्वांना सारखी सपत्ती दे किंवा सर्वांची सपत्ति काढून घे म्हणजे शोक किंवा मोह राहाणार नाहीं परतु सर्वांना सारख द्रव्य मिळतच नाहीं जोपर्यंत कर्मांचीं फळ मिळणार आहेत तोंपर्यंत हें शक्य नाहीं

या सृष्टींत आर्थिक समता येणार नाहीं असे आमचे शास्त्रकार म्हणतात कर्मसिद्धाताप्रमाणें फळ मिळणार असतील तर आर्थिक विषमता राहाणारच या श्लोकात शंकराचार्य मला सपत्ति दे अशी मनमोकळी भाषा बोलत आहेत पैशाशिवाय ससार करण कठीण आहे परमेश्वरालाही स्वत:चा ससार आहे अस पुराणात वर्णन आहे प्रत्यक्ष काय असेल त त्या परमेश्वरालाच माहीत परतु दुसऱ्या कार्याचा ससार आहे. या दोन्ही प्रकारच्या ससाराना उपयोगी पडेल अस द्रव्य दे प्रभो! तुझ कार्य करण्याची अत:करणात तळमळ आहे पण द्रव्य नाहीं तेव्हा तें दारिद्र्य दूर करून मला शाति दे

भगवंता! तू आर्थिक दारिद्र्य जसं दूर करतेस तसं मनाचं दारिद्र्यही दूर कर. कारण तुझ्याजवळ येणारी जी व्यक्ति असेल तिच्याजवळ मनाचं दारिद्र्य असता कामा नये मनाचं दारिद्र्य जर दूर झालं नाही तर तुझं कार्य कसं होणार? तुझं काम करणं याचा अर्थ तुझ्या भरवशावर राहाणं होय. तुझ्याच विश्वासावर शेतकरी आषाढ महिन्यात शेतात दाणे फेकून देतो व तीन महिन्यानंतर त्या दाण्यापासूनच त्याला पोतभारी धान्य मिळतं. अशा तऱ्हेनं तुझ्याकार्यासाठीं तन, मन आणि धन खर्च करायला हवं यासाठी मनाची श्रीमती असायला हवी भगवंता! तू सर्वांना मनानं श्रीमंत कर. या मनाच्या दारिद्र्यामुळं संसारात सुख मिळणार नाही माझ्याबरोबर माझ्या धाकट्या भावान राहावं, खावं, प्यावं हा विचार कोत्या मनाच्या पत्नीला पटत नाही ज्याच्या अंतःकरणात कृतज्ञता नाहीं त्याना तू कर्तव्यबुद्धीनं देतोस कारण तुझ्याजवळ मनाची श्रीमंती आहे. भगवंता! तूं आमच्यातील मनाचं दारिद्र्य दूर कर.

तिसरं बुद्धीचं दारिद्र्य होय. बुद्धीनं दरिद्री असलेला मनुष्य या जगाचं कोडं समजू शकणार नाहीं. ही सृष्टि म्हणजे बुद्धीबळाचा खेळ आहे माझी बुद्धी परिपक्व नसल्यामुळंच तूं ही सृष्टि का निर्माण केलीस व या सृष्टींत विषमता का या गोष्टी मला उलगडत नाहींत. माझी बुद्धी अपरिपक्व आहे. अशा प्रकारची बुद्धी घेऊन मी तुझ्याजवळ येऊंच कसा? प्रभो! यामुळं मला तुझ्याजवळ येणं शक्य नाही **थोरापासुनि दूर दूर फिरतो लाजूनि वस्त्राविणे।** मी मोठ्या माणसापासून दूर राहातों कारण त्याच्याजवळ जायला मला लाज वाटते. त्याच्याप्रमाणं कोति बुद्धी व दरिद्री मन घेऊन मला तुझ्याजवळ यायला लाज वाटते प्रभो! तूं आपल्या बुद्धीनं या विश्वाचा सारा प्रपंच उभा केला आहेस पण या विश्वाचं ज्ञान करून घेण्याएवढी बुद्धी माझ्याजवळ कोठं आहे? **ॐ पूर्णमदः पूर्णमिदम्** याप्रमाणं मी पूर्ण असूनही माझी बुद्धी मर्यादित आहे. असं असताना तुझा व माझा संबंध राहाणार कसा? संबंध जोडायचा जर असेल तर **ययोरेवसमं वित्तं ययोरेव समं कुलम्। तयोर्मैत्री विवाहश्च नतुपुष्ट विपुष्टयोः॥** श्रावण महिना आला कीं वाटतं तुझ्याशीं संबंध जोडण्यालायक मी झालों. पण तें खरं नव्हे. विपुष्ट व पुष्ट याच्यात मैत्री व विवाह होऊं

शकत नाहीं. श्रीमंताच्या घरीं मुलगी देणाऱ्या गरिबाच्या नाकीं नऊ येतात हा अनुभव आहे. ॐ पूर्णमिदः असं म्हणणारा शेवटीं मैं गुलाम तेरा। तू साहेब मेरा। याप्रमाणं मी तुझा दास होऊं शकेन व तूं माझा साहेब ही माझी स्थिति होऊं नये यासाठीं बुद्धीचं दारिद्र्य दूर कर.

बुद्धीच्या दारिद्र्याबरोबर माझ्या हृदयाच दारिद्र्यही दूर कर. यामुळंच *मी तुझ्यासारखं प्रेम करूं शकत नाहीं. प्रेम जाणण्याचीही माझ्याठिकाणीं* ताकद नाहीं. प्रभो! तुझ्यासमोर मी कितीतरी छोटा आहें. वेदांनीं मी **पूर्णमदः** हें जें सांगितलें आहे तें आश्वासनरूप असेल किंवा मला चढविण्यासाठीं असेल. परंतु वेदांनीं जें सांगितलें तें आत्मसूचक आहे.मुलगा अवखळ असला तरी आई म्हणते, 'माझा मुलगा शहाणा आहे. एक मिनिटांत दूध घेऊन येईल.' याचं कारण चार पाहूणे घरीं आलेले आहेत मुलगा आपलं ऐकत नाहीं हें आईला माहीत आहे. असं असूनही मुलगा शहाणा आहे असं आई वर्णन करते. मुलगा धावत धावत जातो व दूध घेऊन येतो. यामधं मुलाला 'तूं शहाणा हो' व तातडनीनं काम कर अशी सूचना असते. त्यामुळंच आई त्याचं कौतुक करते. त्याचप्रमाणं आई! तूं पूर्ण आहेस ही गोष्ट माझ्यासाठीं सूचक आहे. परंतु ऋषी व प्रभू तूं या दोघांनीं मिळून कारस्थान केलंत व सांगितलंत कीं, 'तूं पूर्ण आहेस.;

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवम्।
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः॥
यदा किंचित् किंचित् बुधजन सकाशादवगतम्।
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः॥

प्रारंभीं मला वाटलं कीं, मी विद्वान आहे, बुद्धीमान् आहे परंतु मी ज्यावेळीं बुद्धिशाली लोकांजवळ जायला लागलों त्यावेळीं मला कळून आलं कीं, या लोकांजवळ ज्ञानाचं भांडार आहे. ते बुद्धी व मन यांनीं श्रीमंत आहेत व मी मूर्ख आहे. मी निरर्थक त्यांचं अनुकरण करीत होतों. परंतु तसं करायाची माझी लायकी नव्हती. वाल्मीकि मारल्या व्यक्तीच्या सांगण्यानं मी ज्यावेळीं आलों त्यावेळीं त्याच्याजवळ मन व बुद्धी यांचं भांडार आहे असं मला कळून आलं म्हणून प्रभो! तूं माझं सर्व प्रकारचं दारिद्र्य दूर कर.

याच प्रमाणं माझ्याजवळ भाषेचही दारिद्र्य आहे माझ्या हृदयात तुझ्या विषयी भाव आहे, प्रेम आहे पण ते मी व्यक्त करू शकत नाहीं भिषेक वाचस्पति हृदयात भाव नसताही ते व्यक्त करतात त्यातही दुसरी गोष्ट अशी कीं, तुझी भाषा मला येत नाहीं परतु भगवताची भाषा कोणती? या देशात तेलगू, तामिळी, मराठी, गुजराथी अशा विविध भाषा बोलल्या जातात मग प्रभो! यापैकीं तुझी कोणती? सस्कृत ही तुझी भाषा आहे असे म्हणतात परतु जगात पुष्कळ असे देश आहेत कीं ज्याना सस्कृत येत नाहीं मग त्याना काय तू आपल्यापासून दूर ठेवणार? पण हें शक्य नाहीं

वर वर्णन केलेल्या सर्व लोकभाषा आहेत परतु देववाणी ही वेगळी आहे देवभाषा हृदयातून निघते व लोकभाषा मुखातून निघते देवभाषा ही दृष्टीने वाचली जाते लोकभाषेंत मी तुझ्यावर प्रेम करतो असे सागावला लागते प्रभो! या तुझ्या भाषेशीं मी सपूर्णपणे अपरिचित आहे, तुझी ही भाषा कोणत्याही सस्थेत शिकविली जात नाहीं नाहितर मी ती जरूर शिकलो असतो त्यामुळें तुझा आलेला मदश, टेलिफोन तसाच परत जातो मला त्याच मुळींच ज्ञान होत नाही '

भगवताची भाषा नेत्राना वाचायची असते व आमची भाषा पाट्यावर वाळ केल्या नतर वाचायची असते ही विधीना विचित्र लीला आहे कारण त्या शिवाय आमची भाषा कळणार नाही

आमची जीवनपत्रिका कोरी नाही व न लिहिलेल आम्हाला वाचता येत नाही व तशी आमचे ठिकाणी शक्तिही नाही.

चागदेव ज्ञानेश्वराना पत्र लिहायला बसले व मायना काय लिहावा पेचात पडले. ज्ञानेश्वराना तीर्थरूप लिहाव का ' पण ते मोठयाना लिहितात वर, चिरजीव लिहाव तर ज्ञानेश्वर इतके ज्ञानी आहेत, कीं त्याना कमी लेखल्या सारख होइल व मी श्रेष्ठ ठरेन ज्ञानेश्वरांना मी माझ्यापेक्षा लहान का मानू? मग श्री .. लिहाव तर ते अनान ठरेल वर, मिस्टर-श्री लिहाव तर त्याचा व माझा कांही मेळ नाहीं असा त्याचा अर्थ होइल

ही उपेक्षा होईल. लिहायचं झालं तर आत्मिय भाषेत लिहिलं पाहिजे. शेवटी त्याना काय लिहावं हेंच सुचे ना व तो कोरा कागद तसाच पाठवून दिला. पत्र मिळतांच मुक्ताबाईंनं चांगदेवांची थट्टा केली. परंतू तें कोरं पत्र ज्ञानदेवानी वाचलं. चांगदेवाच हृदय व दृष्टि ज्ञानदेवांना कळली व ज्ञानेश्वरांनी त्याच पत्रात पासष्ट श्लोक लिहून पाठविले. तिलाच आता **'चांगदेव पासष्टी'** म्हणतात.

प्रभो! माझें हें भाषेचं दारिद्र्य दूर कर. तू मुक्यानाही बोलायला लावतोस मग मलाही तुझ्या भाषेत बोलता कर. म्हणून हे सर्व प्रकारचं दारिद्र्य दूर करून आम्हाला श्रीमंत कर अशी मागणी शंकराचार्य करीत आहेत.

वाल्मीकि, याज्ञवल्क्य, वसिष्ठ वगैरे पूर्ण श्रीमंत असल्यामुळंच ते परमेश्वरावर प्रेम करू शकले. त्यांच्या जवळ मनाची श्रीमंती होती, इतकंच नव्हे तर वसिष्टां जवळ कामधेनू होती. त्यामुळं त्यांचे जवळ सर्व प्रकारचं भौतिक ऐश्वर्यही होतं.

वाल्मीकि, याज्ञवल्क्य, वसिष्ठ इत्यादिकांची श्रीमंती पाहून त्यांच्या जावं असं वाटतं पण जाताना शरम वाटते. कारण त्यांच्या जवळ असलेली श्रीमंती माझ्याजवळ कुठं आहे? म्हणून हे प्रभो! मला माझ्या चित्तवृत्ति तुझ्या चरणी अर्पण करण्याची शक्ति दे. **'त्वत्पाद पद्मार्चित चित्त वृत्तिम्'**

भगवंताच्या चरण कमला जवळ जायचं असलं तर तीन गोष्टींची आवश्यकता आहे. १)शुद्ध आचरण, (२)शुद्ध अंतःकरण, ३)प्रभूंच नाम स्मरण. परंतू हे प्रभो! तुझे चरण कमल आहेतच कुठं? एखाद्या मंदिरात जाऊन तेथील मूर्तीच्या पायावर नम्र व्हावं पण ती मूर्ति शिल्पकारानं बनविलेली आहे. शिल्पकाराने वेतन घेऊन ती मूर्ती तयार केली आहे. धनिक अशा लोकांना विकत घेतात व त्यांत त्यानां आसुरी आनंद मिळतो. मग त्या शिल्पकाराजवळ प्रभुचे चरणकमल निर्माण करण्याची ताकत कोठून असणार!

शुध्द आचरण, अंतःकरण व प्रभूचं नामस्मरण असले तरच प्रभूच्या चरणकमलांच दर्शन होतं. शुद्ध आचरणानं दोन गोष्टी येतात. (१) प्रामाणिकपणा (२) नैतिकता. शुद्ध अंतःकरण होण्यासाठीं जीवनातून

अभिमान, द्वेष, मत्सर या गोष्टी दूर करायला हव्यात. तिसरी गोष्ट प्रभूंचं नामस्मरण करायला हवं. नामस्मरण ही गोष्ट हातांत माळ घेऊन जप करण्यापुरतीच मर्यादित नाही. प्रभूचं नामस्मरण याचा अर्थ कोणत्याही क्षणी त्याला न विसरणं, जें मी करतो तें त्याच्या शक्तीनं होत आहे हें ज्ञान व्हायला पाहिजे

कोणतंही कार्य करतांना हा विचार सतत राहिला पाहिजे कीं हे कार्य केल्यामुळं भगवंताच्या कार्यात प्रगति होईल का? म्हणून प्रभूकार्य याचा अर्थ आपल्या प्रत्येक वर्तनानं प्रभुकार्य प्रगत झालं का हें पाहायचं.

जीवनांत शुद्ध आचरणान, प्रामाणिकपणा व नैतिकता या गोष्टी आणल्या, शुद्ध अंतःकरण होण्यासाठी अभिमान, द्वेष, मत्सर दूर केले आणि प्रत्येक क्षणाला प्रभुस्मरण याचा अर्थ प्रभुचं कार्य आपल्या हातून घडतं आहे का ही दृष्टी असली तर आपण प्रभुचरणांजवळ जाऊं शकूं व त्याला सांगू कीं हे प्रभो! तूं आम्हाला श्रीमंत कर. म्हणून जीवनांत शुद्ध आचरण, शुद्ध अंतःकरण व प्रभुस्मरण या तीन गोष्टीची अत्यंत आवश्यकता आहे.

प्रभो! निस्पृह व विरक्त, अलौकिक बुद्धिवान व लोकोत्तर भक्त असलेल्या शंकराचार्यांनीं या श्लोकांत खरोखरच उत्कृष्ट मागणी केली आहे. मागायचं झालं तर अशा प्रकारच्या व्यक्तींनीच मागायला हवं. मागण्याची खरी योग्यता त्यांचीच आहे. महापुरुष एका शब्दांत त्रिभुवन मागतात. कारण या श्लोकांत शंकराचार्यांनी सर्वच प्रकारची श्रीमंती मागितलेली आहे. खऱ्या अर्थानं शंकराचार्य भाषाप्रभु आहेत. त्यांच्या शब्दात वैभव प्रगट झालेलं आहे आचार्यांची वाणी प्रासादिक आहे. त्याच्या प्रत्येक शब्दांत हृदय, मन, बुद्धि यांच वैभव प्रकट झालेलं आहे. प्रभो! तू आम्हाला श्रीमंती दे. यासाठीं मी तुझ्या चरणकमलावर नत झालो आहे. तुझ्या कृपासिंधूत आम्हाला खुशाल डुंबू दे अशा प्रकारची मागणी केवळ शंकराचार्यांसारखेच लोक करूं शकतात.

या स्तोत्रांतले शेवटचे दोन श्लोक उपसंहारात्मक आहेत त्यांचा पुढील मंत्री विचार करू.

# श्री अन्नपूर्णा स्तोत्रम्

श्लोक १४-१५

## भावानुवाद

अन्नपूर्णे सदापूर्णे शंकर-प्राणवल्लभे।
ज्ञान-वैराग्य-सिध्यर्थं भिक्षां देहिच पार्वति॥१४॥
माताच पार्वती देवी पिता देवो महेश्वरः।
बांधवः शिवभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम्॥१५॥
इति श्रीमच्छंकराचार्य विरचितमन्नपूर्णास्तोत्रं संपूर्णम्॥

अन्नपूर्णे सदापूर्णे शंकरप्राणवल्लभे-हीं सर्व संबोधनं आहेत. शंकराची प्राणवल्लभा शं करोति इति शंकरः पार्वती. तिच्या ठिकाणी असलेल्या कोमलपणा व प्रेमळपणा यामुळे त्या आदिम शक्तीला अर्धनारी नटेश्वराच रूप दिलं. त्या आदिम शक्तीच्या ठिकाणी वास करणाऱ्या स्त्रीगुणांना उद्देशून हांक मारण्यासाठी शंकरप्राणवल्लभे असं म्हटले आहे. भगवंताचे ठिकाणी हा प्रेमळपणा व कोमलपणा कोठून आला? त्याला अपूर्णता मान्य नाही. तरी ही त्याच्या अर्धनारीनटेश्वराच्या रूपाची कल्पना केलेली आहे व 'शंकर प्राणवल्लभे' अशी हाक मारलेली आहे. ती भगवंताचे ठिकाणी वास करणाऱ्या प्रेमळपणा व कोमलपणा या दोन गुणामुळे आहे.

सदापूर्णे-भगवती! तू सदापूर्ण आहेस. सदापूर्ण म्हणजे तूं अपूर्ण नाहीस परंतु हा अर्थ इथ अपेक्षित नाही. कारण शंकरप्राणवल्लभा म्हणण्यात अपूर्णता आहेच. नाही तर कोमलता व प्रेमळता हे दोन गुण संभवणारच नाही. द्वैतानच हे दोन गुण संभवतात व ते अन्नपूर्णे पासून येतात. आई! तुझं मन नेहमी दया, प्रेम व कृपा यांनी भरलेल आहे. 'जे पूर्णदयेने भरले' आई! तुझ्या ठिकाणी असलेली कृपा कधी कमीच होत नाही. अशा प्रकारच्या अन्नपूर्णा! सदापूर्णा! शंकर प्राणवल्लभे! पार्वती! ज्ञान व वैराग्य यांची प्राप्ति होण्यासाठी भिक्षा दे.

कसली भिक्षा दे? ज्ञानाची भिक्षा दे मला जर काही मिळवायचंच असेल तर ते ज्ञान कारण ज्ञानान दृष्टि बदलते व दृष्टीन सृष्टि बदलते म्हणूनच ज्ञानदाता श्रेष्ठ होय इतर सर्व गोष्टी देता येतील, पण दृष्टि कोणी देणार नाही. तूच ज्ञानाचा दृष्टिकोण देऊ शकतेस म्हणून मी तुझ्या चरण-कमलाजवळ आलो आहे

आई! मला वैभव, आयुष्य दे यासाठी मी तुझ्या पायाशी आलो नाही मला तू ज्ञान व प्रेम याची भिक्षा दे. आज शंकराचार्य आपल्या मूळ स्थितीवर येऊन ते वैराग्याची भिक्षा मागत आहेत मी कधीही आशाळभूत होऊ नये यासाठी ज्ञान व वैराग्य याची भिक्षा दे

वैराग्य म्हणजे सृष्टीचा कटाळा किंवा अनास्था नव्हे. तसच इथ मागितलेल ज्ञान ही गणित, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्राच नव्हे ज्ञान म्हणजे शुद्ध चैतन्याच ज्ञान मागितल आहे या शुद्ध चैतन्याच ज्ञान झाल की ते चैतन्य कोठ आहे? या सपूर्ण सृष्टीत ते तत्त्व भरलेल आहे, हें त्याच उत्तर आहे हें चैतन्य अणुअणूत भरलेल आहे, या जगातल्या प्रत्येक वस्तूत चैतन्य भरलेल असेल तर कटाळा कशाचा येणार? उपेक्षा किंवा अनादर कोणाचा करणार?

भगवान् या सृष्टीहून वेगळा नाहीच ही सृष्टि निर्माण करून या सृष्टीत तो राहिला आहे अशा तऱ्हेन ज्ञान मागितल्यावर या सृष्टीचा कटाळा येईलच कसा? कारण शंकराचार्यांनी व्यापक ज्ञान मागितलेल आहे शंकराचार्य केवलाद्वैती होते व त्यांनी निराकार व व्यापक असं ज्ञान मागितलेल आहे ते चैतन्य अणुरेणूत व्याप्त असूनही त्याला या अणुरेणूचा आकार प्राप्त होत नाही 'अत्यतिष्ठद्दशाङ्गुलम्' अशा प्रकारच चैतन्य शंकराचार्य मागत आहेत मग वैराग्याला अर्थच नाही त्याचा 'मी' आहेच कोठ? सार चैतन्य एकच आहे जड ही चैतन्याची छाया आहे, माया आहे, कारण जडाच्या अणुरेणूत चैतन्य समाविष्ट झालेल आहे अस चैतन्यरूप ज्ञान मागितल्यावर वैराग्याला अर्थच उरत नाही दुसऱ्या कोणत्या वस्तूच अस्तित्वच उरत नसेल तर वैराग्य येणार तरी कोठून व त्या वैराग्याची उपेक्षा तरी कशी संभवणार? कारण आपण वैराग्य शब्दाचा अर्थ 'कटाळा' असा करतो म्हणून हा प्रश्न

निर्माण होतो.

संपूर्ण स्तोत्र ध्यानात घेतल्यावर असं वाटतं कीं ज्ञान म्हणजे प्रभु तुझ्या व माझ्या संबंधाच ज्ञान अपेक्षित आहे. तू व मी दोघे एकच आहोत. मी तुझा आहे म्हणूनच हक्कानं मी सांगू शकतो कीं प्रभो! तूं माझा आहेस. सगुणांत ही व्याख्या येते. निर्गुणांत ही व्याख्या बसतच नाही. शंकराचार्य सर्व व्यापक चैतन्याच्या ज्ञानाचा अनुभव मागत असतील कीं काय तें कोण समजणार? परंतु या स्तोत्राचा जो रंग आहे त्या प्रमाणच ते सांगत असणार, कारण अद्वैतांत मीही उरत नाही व तूही उरत नाही. पण मागाचा प्रश्न उरतोच कोठें? म्हणून निर्गुणनिराकारांत ही व्याख्या बसतच नाही. सगुणातच ही व्याख्या समर्पक ठरते व त्यामुळं मी व तूं यांच्या ऐक्याच ज्ञान शंकराचार्य मागत आहेत हें ज्ञान झालं कीं या सृष्टीविषयी उपेक्षावृत्ति संभवत नाही व उपेक्षितही नाही.

'तुझा' व 'माझा' संबंध या सृष्टीचं आकर्षण असल्यामुळं होत नाही. व सृष्टि वाईट आहे असं बोलता येत नाही. सृष्टीवर असलेलं प्रेम कमी करायचं असेल तर तुझ्यावर असलेलं प्रेम वाढायला हवं. खेळण्याशी खेळणाऱ्या मुलाच खेळणं काढून घेऊन चालणार नाही तर त्या खेळण्यापेक्षा चांगलं खेळणं जर त्याला आपण दिलं तर कदाचित तें खेळणं देण्याची शक्यता आहे म्हणून वैराग्य म्हणजे भगवत्प्रेम वाढणं व ते वाढलं कीं सृष्टीचं प्रेम आपोआपच कमी होइल. म्हणूनच ते ज्ञान व वैराग्य याची भिक्षा मागत आहेत. 'मी' व 'तू' याच्या ऐक्य संबंधाच ज्ञान व वैराग्य म्हणजे तुझं प्रेम किंवा आकर्षण मागत आहेत. हें झाल्यावर प्रभूचा पहिला क्रमांक व सृष्टीचा दुसरा क्रमांक होइल. तात्पर्य ईश्वराच आकर्षण सतत वाढत जाणं याच नांव वैराग्य.

विराग म्हणजे 'विगतः रागः यस्य सः' ज्यामधली आसक्ति गेली तो. विरागी व्यक्तीला वस्तूची किंमत समजते पण त्या वस्तूची आसक्ति रहात नाही. रत्नपारखी दुसऱ्याच्या हिऱ्याची पारख करतो पण त्याला त्या हिऱ्याविषयी आसक्ति असत नाही. कारण त्याला हे नक्की ठाऊक आहे की हा हिरा आपला नव्हे म्हणून वैराग्य म्हणजे प्रभूच आकर्षण प्रभूचं आकर्षण

वाटलं कीं हें सर्व तुच्छ आहे असं वाटू लागतं. हें शरीरही त्याच्यासमोर किंवा त्याच्या कार्यासाठीं तुच्छ वाटायला हवं.

धर्माच्या करितां आम्हास जगतीं रामानि धाडीयलें।
ऐसे जाणुनि रामभक्ति करितां ऐश्वर्य हें लाभलें॥
आतां धर्मसख्या तुझ्या पुढतिं हा नम्रत्वतेने असे।
इच्छा हो जशि मानसी करितसे हा देह तूझा असे॥

हा देह तुझा आहे. तुझ्या विषयींच्या आकर्षणानं या शरीरावरची आसक्तीही नाहीशी होते. सर्व तूंच आहेस याचं नांव ज्ञान व अशा प्रकारच्या ज्ञानाची व वैराग्याची आचार्य भिक्षा मागत आहेत.

आमच्या घरात एक छोटसं देवघर असतं. त्यासाठीं स्वतंत्र खोली असते पण हें देवघर व उरलेलं घर काय सैतानाचं घर म्हणायचं? यातला विनोद बाजूला ठेवू. परंतु हे भगवान्! तूं माझं सर्वस्व आहेस. तुझ्यासाठी हें सारं मला तुच्छ वाटतं अशा प्रकारच प्रभुविषयीं प्रेम मात्र वाटत नाही. परंतु प्रभो! तुझ्या समोर सर्व तुच्छ वाटावं याची भिक्षा मला कोणीही घालीत नाही. तुझं प्रेम मला तूंच दे व मग मला बंगला, मोटार यांचं आकर्षण वाटणार नाही. सृष्टीवरचं प्रेम कमी व प्रभूवरचं प्रेम वाढायला हवं. भगवंता! यासाठीं मी सर्वस्व द्यायला तयार आहे तूं मला असं वरदान दे कीं तुझं काम झाल कीं मला कशाचंही भान राहाता कामा नये.

ज्यानं भगवंताला मन व बुद्धी दिली तोच खरा भक्त. भगवंतानी बाराव्या अध्यायात मन व बुद्धी मागितली आहे. 'मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय।' कारण मन व बुद्धि यांच्या अधीनच सर्व गोष्टी आहेत.

भगवंताच सर्वांवर प्रेम आहे. भगवंताच्या दारीं पुष्कळ भक्त उभे आहेत. मंदिराचं दार उघडत व जगदंबा येऊन आपल्या आसनावर विराजमान होते. कित्येक लोक विविध प्रकारचे नजराणे घेऊन येतात. कांही सुंदर फुलं बरोबर आणतात काहींनी रत्नाहार तर काहींनी सुगंधी फुलांच्या माळा आणलेल्या आहेत. सर्वांनी आपापल्या वस्तु जगदंबेला समर्पण केल्या व

प्रार्थना केली की हे देवी! तूं सर्वस्व आहेस आईचं हृदय भरून आलं. डोळे भावनाश्रूंनी भरून गेले. आईला वाटलं की या साऱ्या वस्तु स्वत न वापरता, मला समर्पण केल्या व त्यामुळ आईचं हृदय ओलावलं. इतक्यात ज्याच्या जवळ वैभव, रत्न वगैरे काही नाही न डोळ्यात भगवती विषयीं प्रेम भक्ति आहे असा एक तरूण आला व त्यानं स्वत-च बोट कापून त्यातून स्रवणाऱ्या रक्ताचा अभिषेक केला व म्हटल : आई! माझं रक्त, माझं शरीर या सर्वांचा तुझ्या कार्यार्थी उपयोग होऊ दे. त्यावेळी त्या जगदंबेला काय वाटलं असेल? भावनाचे अश्रु पाहून आईला त्याच्या विषयीं आकर्षण निर्माण झालं असेल

आई! तुझ्या प्रेमापुढं सार जग, माझं शरीरही मला तुच्छ वाटतं हे प्रेम वैराग्य या शब्दात अभिप्रेत आहे. वैराग्य शब्द नीरस नाही तर तो सरस आहे. संपूर्ण जग तुझ्या प्रेमासमोर तुच्छ वाटत हे शरीर तुच्छ वाटतं. केवळ तूच सर्वस्व वाटतेस. अस प्रेम असेल तर त्याला खरं प्रेम म्हणायच. आमचंही भगवतावर प्रेम असत पण तें सगड मिळाली तर असत. पैसा व प्रभुप्रेम यापैकी आपण पैशाकडेच ओढलो जातो. पैसा सोडून देऊन तुझ आकर्षण आम्हाला वाटत नाही तुझ्या समोर पैसा, हें शरीर सार तुच्छ आहे असं वाटणं याच नाव खरं प्रेम वैराग्याचा अर्थ अशा प्रकार प्रेम असा आहे. तू कीं भोग हा प्रश्न उभा राहताच भोग तुच्छ वाटायला हवेत ही सर्व श्रेष्ठ भावना होय व हें समजावून देण्यासाठी प्रेम शब्द न वापरता शंकराचार्यांनी 'वैराग्य' शब्द वापरला आहे हा त्याचा उत्कृष्ट दृष्टिकोण आहे.

एक मुलगा आजारी पडला डॉक्टराकडे गेला व त्यांनी निदान करून सांगितलं की दोन हजार रुपये खर्च येईल. परंतु मुलाजवळ दोन हजार रुपये नव्हते. डॉक्टर म्हणाले–'मी काय करूं' पैसे नसतील तर प्रभूच नाव घे' "औषधं जान्हवी तोयं वैद्यो नारायणोहरिः।" हे डॉक्टर वाईट नव्हते. परंतु त्याना त्या मुलाबद्दल प्रेम नव्हत. डॉक्टराना त्या मुलाबद्दल प्रेम नव्हते तर पैशावर प्रेम होत घरी येऊन आईला ही हकीगत सांगितली. आई म्हणाली मी माझ्या जवळचा दोन हजार रुपये नाहीत पण तूं बरा व्हावास अशी माझी इच्छा आहे आजारी मी घर, सोन

सार विकीन व ते पैसे तुला देईन. तुझ्यासमोर मला पैशाची पर्वा नाही तू बरा व्हावास हीच माझी इच्छा आहे आईला मुलाविषयी आत्मीयता आहे व डॉक्टराना पैशाविषयी प्रेम आहे याचप्रमाण प्रभू की पैसा हा प्रश्न निर्माण होताच आपल्याला वाटत की, समुद्र खारा आहे तो साखरेची एखादी गोण टाकून गोड होणार नाही आमची अशी इच्छा आहे की–

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात्॥

या दृष्टीने विचार केला तर आपण वाईट नाही. परतु आमचे प्रभूवर प्रेम नाही.

डॉक्टर रोग नाहीसा व्हावा यासाठी औषध देतात परतु डॉक्टर हमी देऊ शकत नाहीत ते म्हणतात मी प्रयत्न करीन पण हजार रुपये खर्च येईल तुम्ही औषध घेऊन पहा. याच तन्हेने वैराग्य निर्माण झाल्यावर सृष्टि तुच्छ वाटते कारण भगवत्प्रेम वाढलेले असते. हे वैराग्य अशा तन्हेने आकर्षक असल्यामुळे आचार्यांनी ज्ञान व वैराग्य याची भिक्षा मागितली आहे.

पार्वतीमाता विचारते की –'तू माझ्याजवळ का आलास?' शंकराचार्य म्हणतात– काय सागू? ज्ञान आणि प्रेम ही मला कमी पडतात मग ती तुझ्याजवळ मागू नको तर कोणाजवळ मागू? घेताना वडिलांच्या खिशातून घ्यायचे पण मी घेतो असे रागाचे अशा प्रकार मी हक्काने आलो आहे मी कोणी निराश झालेला मुलगा नव्हे शकराचार्यांचे ठिकाणी दुर्दम्य श्रद्धा होती व नीरनाची अशी धारणा होती की – माताच पार्वतीदेवी पिता देवो महेश्वर। माझी आई तू आहेस व तुझ्या दारी मी आलो आहे 'जगतः पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ।' माझी आई तू आहेस व जनकही तूच आहेस भगवती विचारते की–'मी तुला जर ज्ञान व वैराग्य याची भिक्षा दिली तर तू काय करशील?' आई! आम्ही वाटून घेऊ तुम्ही किती भाऊ आहात? प्रभो! तुझ्या कल्याणाला पात्र जितके लोक आहेत ते सर्व माझे बांधव व त्या सर्वांना मी ही भिक्षा वाटून देईन

आपण ज्याना नातेवाईक समजतो ते बांधव आहेत की नाही हा प्रश्न आहे रावण हा बिभीषणाचा भाऊ असून बिभीषण त्याला आपला

माऊ मानीत नव्हता. शंकराचार्य म्हणतात–'माझे बांधव कोण?' बांधवा शिवभक्ताश्च। जे शिवभक्त म्हणजे कल्याण करणारे प्रभूचे भक्त आहेत ते माझे बांधव होत. जे भगवंताला मानतात, भगवत्कार्याला मानतात तेच माझे बांधव. भारतीय युद्धाच्या वेळीं भगवंतानी अर्जुनाला विचारलें, तुझे बांधव कोण? दुर्योधन अर्जुनाचा बांधव होऊं शकत नाही. अशा प्रकारची तीव्र तपोभावना भगवंतानीं अर्जुनाला शिकविली होती. आवेश, त्वेष यांनी तेजस्वी जीवन ज्वलंत जीवन होतें. अशा प्रकारचें जीवन जगणारालाच माझा कोण हें कळतें. जीवन नदीच्या प्रवाहासारखें असलें पाहिजे. मंदाकिनी अलकनंदा खळखळत वाहाते आहे. मार्गांत पत्थर आहेत तरी त्यांना ओलांडून ती पलीकडे जाते. तिचं जीवन जखडलेलं असतं. अशा प्रकारचं जिवंत जीवन जगणाऱ्याला भगवंतानी अवतार घेऊन शिकविले आहे, श्रीकृष्णांनी त्याला आवेश शिकविला' श्रीकृष्ण म्हणाले: 'कंस माझा मामा होऊं शकत नाहीं. मामाचं आकर्षण किती असणार? चंद्र हा आपला काका नव्हे तर तो मामा आहे. आपण त्याला मामा म्हणून हाक मारतों. कारण आपल्या मामाचें विशेष आकर्षण असतं असं असूनही श्रीकृष्ण म्हणाले कीं कंस माझा मामा असू शकत नाही. श्रीकृष्णांनी कंसाला ठार केल. श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले– 'माझ्या जीवनांत ज्या गोष्टी आहेत त्या तुला मी शिकविते मी मामाला मारल आहे कारण कंस हा माझा होऊं शकत नाही ही गोष्ट मी माझ्या वर्तनानं दाखवून दिली आहे' म्हणून हे अर्जुना! हे समोर उभे असलेले लोक तुझे संबधी कसे होऊ शकतात? भगवंताला मारणारे व भगवंताचे काम करणारेच माझे बांधव होत.

खरोखरच शंकराचार्यांना ज्ञान व वैराग्य यांची भिक्षा मिळाली व ती वाटण्यासाठी शंकराचार्य आसेतुहिमाचल घरोघरी हिंडले. बद्रीनाथावर सगुण उपासनेचा झेंडा त्यानी फडकविला. लोक म्हणतात कीं बद्रीनाथाला शंकराचार्यांना साक्षात्कार झाला पण ही गोष्ट खरी नाही. कारण साक्षात्कारासाठी त्यांना दक्षिण समुद्राचा किनारा सोडून हिमालयावर जावे लागलं असं म्हणणं बरोबर नाही. या उलट बुद्धान आपल्या विचारांनी सगुणोपासना नाहीशी केली होती तिची पुन: प्रतिष्ठापना करण्यासाठीं खूप परिश्रम करावे लागले व ती पुन्हा उभी केली. शंकराचार्यांनां जी भिक्षा मिळाली ती त्यांनी वाटली पण घेणाऱ्यानी ती खाल्ली कीं नाही ही एक स्वतंत्र गोष्ट आहे.

खरोखर भगवंतच माता-पिता आहे. पिता कोण? जो मंत्र देतो तो पिता व जी संस्कार देते ती माता. भगवंताचं नाव दिलं की माणूस संस्कारी होतो. वाल्मीकि संस्कारी झाले. संस्कारी जीवन ही माझी धारणा आहे ती पॉलीसी नव्हे. पॉलीसी म्हणून दुर्योधनही सद्वर्तनी होता नंतर कारस्थान करून चोरी केली ही गोष्ट वेगळी, एका माणसाला मारलं तर त्याला खून म्हणतात पाचशे माणसानी एकत्र येऊन मारलं तर त्याला क्रांति म्हणतात हे नीतिशास्त्र आहे एकानं खून केला तर ती अनीति व पाचशे लोकांनी मिळून हत्या केली तर ती नीति ही काही अजब गोष्ट आहे. त्यामुळं सद्वर्तन ही दुर्योधनाची पॉलिसी होती. ती त्याची जीवनधारणा नव्हती प्रभो! ज्या दिवसापासून तू माझ्या जीवनात आलास त्या दिवसापासून माझ्या जीवनाला एक वेगळाच रंग चढला व त्यामुळं तूच माझा पिता आहेस

अशा तऱ्हेन पालन करणारी माताही तूंच आहेस तूं माझी आई व जनक आहेस म्हणून तुझ्याकडे हक्कानं मागायला आलो आहे तूं जे मला देशील ते मी बांधवा मध्ये वाटून खाईन बांधवा कोण? सत्य, शिव सुंदराचे उपासक माझे बांधव होत भारतीय संस्कृतीच्या उपासकाचे निर्णय दृढ असले पाहिजेत जोपर्यंत सिद्धांताला धक्का बसत नाही तोपर्यंत ते तोडता कामा नये म्हणूनच दुर्योधनाच्या घरी भगवान श्रीकृष्ण जेवायला गेले नाहीत. कारण आपला कोण हें त्याना निश्चित माहित होत. आपला कोण हा ज्याचा निश्चय दृढ होऊ शकत नाही तो अध्यात्मात प्रगति कशी करणार? बिभीषण रावणाचा सख्खा भाऊ असूनही त्याचा निर्णय दृढ होता. सिद्धांताचा प्रश्न येताच त्यान सबध तोडून टाकला इतकच नव्हे तर तो रावणाची उत्तरक्रिया करायलाही तयार नव्हता. त्यावेळीं उलट रामाला सांगावं लागल की– मरणान्तानि वैराणि'

तूं जर रावणाची उत्तरक्रिया करणार नसलास तर मी करीन असं रामचंद्र जेव्हा म्हणाले त्यावेळीं बिभीषणान उत्तरक्रिया केली बिभीषणाला वाटल की ज्याची शक्ति प्रभुकार्यासाठी वापरली गेली नाही तो माझा भाऊच कसा होऊ शकणार? श्री शंकराचार्यांनी ज्ञान वैराग्य याची भगवती

पासून जी भिक्षा मिळविली ती बांधवांमध्ये वाटून दिली

भगवती विचारते, 'शिवभक्त तुझे बांधव खरे पण कोणत्या देशातील? तुझा स्वदेश कोणता?' 'स्वदेशो भुवनत्रयम्' त्रिभुवनांत तुझ्या कार्यासाठी ज्याचं अंतःकरण तुटत असेल, तुझ्या कार्यासाठी रक्ताचं पाणी करण्याची तयारी असेल त्याच्याशी माझा संबंध आहे तेच खरे माझे बांधव होत

किती उच्च हा भक्तीचा दृष्टिकोण! भक्तांची भूमिका द्वैतात असते. द्वैतात राहायचं व काम करायची वेळ आली की माया अद्वैताची ओढायची शंकराचार्य म्हणतात की, मी समाजात राहिलो तर द्वैत नाहीं तर अद्वैत

श्रीकृष्णानीही समाजाचे दोन भाग केले आहेत: (१) दैवी (२) आसुरी भगवंताजवळ भेद आहे म्हणून तो म्हणतो की दैवी माझा व असुरी माझा नव्हे

भगवती जवळ मागितलेली भिक्षा सर्वांना वाटून देण्याला शंकराचार्य प्रवृत्त झाले आहेत. हे एक मांगलिक स्तोत्र आहे हा भिकारीही वेगळाच आहे त्याचे डोळे पाणावलेले आहेत डोळ्यात प्रभुप्रेम आहे म्हणूनच ते भगवतीजवळ अशा प्रकारची भिक्षा मागू शकले

आपण या शंकराचार्यांच्या स्तोत्राचं अध्ययन केलं शंकराचार्यांचा विनय काही वेगळाच आहे हक्काने मागत असूनही त्यांची वाणी नम्र आहे हे त्याचं वैशिष्ट्य आहे खरोखरच शंकराचार्यांचा आपल्याला पत्ताच लागला नाही 'आपण शंकराचार्यांच्या भक्तीनं पूजन केलं' हीं शब्दपुष्पं भगवान शंकराच्या चरणीं अर्पण करूया

इत्येषा वाङ्मयी पूजा श्रीमच्छंकरपादयो ।
अर्पिता तेन देवेश प्रीयता मे सदाशिव ॥

भगवान्! ही या श्रावण महिन्यातली पूजा आम्ही केली आहे आमच्या हातावर लोण्याचा प्रसाद द्या शंकराचार्यांनी भिक्षा मागितली तर आपल्याला मागायला काय हरकत आहे? या मांगलिक स्तोत्राचं सतत वाचन करू या

——*——

# शुद्धीपत्रक

| पान | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ७ | दे | देहि |
| २ | ११ | तर्कंच | इतर्कंच |
| ५ | ९ | भोनंदाची | भोगानंदाची |
| ५ | १५ | प्रमाण | प्रमाणें |
| ७ | २७ | शास्कार | शास्त्रकार |
| ८ | ९ | आ पण | आईपण |
| ८ | १२ | प्राढ | प्रौढ |
| १९ | २० | गाकोर्गाङ्गिरागौतमः | गार्गाङ्गिरागौतम |
| २२ | २२ | तपयामि | तर्पयामि |
| २६ | २२ | आईचंद र्शन | आईचं दर्शन |
| २७ | १२ | यंम्रारूढानि | यंत्रारूढानि |
| २९ | २१ | मशेप | विशेप |
| ३९ | ४ | त्याचप्रकाणं | त्याचप्रमाणं |
| ४६ | १६ | आर्ही | आम्हीं |
| ४९ | ९ | कामारी | कौमारी |
| ५० | १८ | वाढते | वाटते |
| ५१ | १३ | नाहीत | नाहीं |
| ५३ | २२ | भपाही | भापाही |
| ६४ | २१ | तुज्यासमोर | तुझ्यासमोर |
| ६६ | २३ | श्वर्यस्य | ऐश्वर्यस्य |
| ७२ | २६ | अश्र | अश्व |
| ७३ | ७ | अपत्ति | आपत्ति |
| ७३ | २५ | न्हणूनच | म्हणूनच |
| ७६ | ९ | धाळतो | धावतो |
| ७७ | ४ | म्रिपुरेश्वरी | त्रिपुरेश्वरी |
| ७८ | १२ | अग | अंग |
| ७८ | १६ | गरसमज | गैरसमज |
| ८० | २ | अर्य | अर्थ |
| ८१ | २७ | आधष्ठात्री | अधिष्ठात्री |
| ८२ | २२ | टिकत चनाहीं | टिकतच नाहीं |

| पान | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९० | २३ | अग्र | अश्रू |
| ९४ | ३ | सादर्य | सौंदर्य |
| ९६ | २२ | पक्वाम्न | पक्वान्न |
| ९७ | १७ | प्रमंण | प्रमाणं |
| ९८ | २३ | कामा | काम |
| ९९ | २२ | अजनानं | अर्जुनानं |
| १०१ | २० | यश्चित्त | प्रायश्चित्त |
| १०२ | १० | म्हणयचा | म्हणायचा |
| १०३ | २४ | केव्यवधि | कोट्यवधि |
| १०७ | ६ | मळ | माळ |
| १०७ | २७ | अश्रची | अश्रूंची |
| ११७ | २४ | निमाण | निर्माण |
| १२५ | १६ | दशनानंच | दर्शनानंच |
| १२६ | १६ | वमाचं | कर्माचं |
| १२६ | २७ | —— | गीतेत |
| १२८ | ११ | अपण | अर्पण |
| १२९ | ८ | कम | कर्म |
| १३० | २२ | सवानाच | सर्वानाच |
| १३० | २७ | सवच | सर्वच |
| १३१ | २५ | सव | सर्व |
| १३२ | १४ | वणन | वर्णन |
| १३५ | १३ | वणन | वर्णन |
| १३६ | १६ | असण्या | असण्याचें |
| १४१ | ८ | लाडला | लाडका |
| १४१ | १० | अमृतमय | अमृतमय |
| १४१ | १८ | मत | मतें |
| १४२ | ७ | भवानीम्‌अशी | भवानीम् अशी |
| १४३ | १३ | कतृत्वसंपन्न | कर्तृत्वसंपन्न |
| १४४ | १८ | श्रयो | श्रेयो |
| १४७ | ३ | भक्ष्य | भेक्ष्य |
| १४७ | ३ | पासपष्ट | पासष्ट |
| १५६ | ५ | त्याच्या जावं | त्याच्याजवळ जावं |
| १५६ | १५ | नर्माण | निर्माण |
| १२६ | २५ | | |